म. ग्र. सं. ठाणें

| विषय | लेखक | सन |
| --- | --- | --- |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव | |


# अन्नपूर्णा आणि वामनराव.

कादं

३८८

४३३
―
२

[illegible] $\frac{२४[illegible]}{२}$

$\frac{४३३}{२}$ $\frac{३८८}{२}$

आ[redacted] क्रं ३५०

रा. रा. दत्तात्रय वासुदेव जोगळेकरविरचित.

# अन्नपूर्णा आणि वामनराव

अथवा

# भूतभ्रम.

## एक नव्या पद्धतीची मनोरंजक कादंबरी.

हें पुस्तक

नारायण गोपाळ हरडीकर बुकसेलर,
रामवाडी.
मुंबई.

यांनीं हक्कासह घेऊन

मुंबईत "इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापविलें.

सन १८९० शके १८११-१२.

किंमत एक रुपाया आठ आणे.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर करून सर्व प्रकारचे हक्क **ग्रंथप्रकाशकानें** आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. या पुस्तकापैकीं निरनिराळे भाग छापणें, भाषांतर करणें अगर पुनरावृत्ति छापणें हे सर्व प्रकार **ना. गो. हर्डीकर** यांच्या स्वाधीन आहेत.

# प्रस्तावना.

प्रत्येक मनुष्यास आपल्या कर्तव्यकर्मांतीं विश्रांति घेण्याची गरज आहे; त्याप्रमाणें विश्रांतीच्या वेळीं मनुष्य आपल्या शक्त्यनुरूप कांहीं ... व्यासंगांत कालक्रमण करीत असतो. निरनिराळ्या देशांत विश्रांतीच्या वेळीं करमणुकीस्तव निरनिराळे अनेक व्यासंग करण्याची चाल जरी आहे; तरी सर्वांत वाचनाचा व्यासंग श्रेष्ठ होय. विश्रांतीच्या वेळीं वाचनाचा व्यासंग ठेवल्यानें आजपर्यंत पुष्कळांस पुष्कळच प्रकारचे लाभ झालेले आहेत असें दिसून येतें. परंतु आमच्या देशांत वाचनविषयक पुस्तकांची फारच उणीव आहे, असें म्हटलें तर साहस होईल असें नाहीं. आजपर्यंत वाचनविषयाची पुस्तकें लिहून अनेक लोकांनीं देशसेवा केल्याचें जरी दिसून येतें; तरी तीं पुस्तकें लक्ष्यपूर्वक वाचून पाहणारास सर्वांत एकसारखाच विषय आढळल्यामुळें वाचतांना कंटाळा येतो, हें निर्विवाद होय. मूळ गद्यात्मक पुस्तकें लिहिण्याची व तीं वाचून करमणूक करून घेण्याची चाल **इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी,** इत्यादिक पाश्चात्य प्रदेशांतुन आमच्याकडे आली आणि तिला अनुसरूनच आमचे लोक गद्यग्रंथ लिहूं लागले. परंतु तशा लिहिण्यांतील मुख्य हेतु जो निरनिराळ्या मानवी प्राण्यांचें **स्वभाव वर्णन;** तो आमचे लोक मुळींच विसरले, असें म्हणायाला मुळींच चिंता नाहीं. आमच्याकडील कोणतेंही पुस्तक घ्या. नायक व नायिका सर्व गुण संपन्न असलींच पाहिजेत. त्यांच्यावर कांहीं तरी बिकट प्रसंग हे यायचेच व त्यांतून त्यांची मुक्तता होऊन शेवटीं त्यांची भेट व्हावयाची. असें हें ठरीव संविधानक असल्या कारणानें वाचणारास तेंच तें वाचून कंटाळाही उत्पन्न व्हायचाच. असा प्रकार असल्यामुळें अलीकडे कित्येक कादंबरीचे वाचक कंटाळूं लागल्याचें ऐकूं येऊं लागलें. तेव्हां असा विचार उत्पन्न झाला कीं, कांहीं तरी संविधानक असें चमत्कारिक रचावें कीं, ज्या पासून वाचकांचें रंजनच होईल. परंतु अशा विचारांत असतां असतां कित्येक दिवस निघून गेले. कारण आजपर्यंत जें कोणीच केलें नाहीं; तें करण्याचा विचार फारच बिकट आहे, असें वाटूं लागलें. नंतर अनेक **इंग्रजी** व **गुजराथी** ग्रंथांचें वाचन चाललें असतां सदर्हू "**अन्नपूर्णा** आणि **वामनराव**" या नांवाची कादंबरी लिहिण्याची कल्पना उभी राहिली.

सदर्हू कादंबरींतील नायिका "**अन्नपूर्णा**" ही बापाची एकुलती एक व लाडकी असतांही व्यवहारोपयोगी सर्व सद्गुण तिच्या हाताचा मळच होता, असें म्हटलें तरी चालेल. त्याचप्रमाणें "**वामनराव**" या उभयतांचा विवाह व्हावा, अशी "अन्नपूर्णेच्या" बापाची इच्छा असतां तो बाप अकस्मात् मरण पावल्यावर ह्या सुशिक्षित व सुशील मुलीनें अनेक संकटें अनुभवून शेवटीं आपल्या बापाच्या इच्छेप्रमाणें केलें आणि स्वतः आपल्या इच्छित पति बरोबर अखंडानंदानुभव घेत राहिली. हें संविधानक म्हणजे अगदीं नवें आहे असें नाहीं आणि अशाच रचनेबद्दल आम्हीं लोकांना नांवें ठेवावींत हेंही योग्य नाहीं. तरी ही आमची कादम्बरी अगदीं नव्या पद्धतीची आहे, असें वाचकांस सहज कळून येण्यासारखें आहे. म्हणून आमच्या लेखाचें सत्यत्व किंवा मिथ्यात्व पाहण्यास आम्हीं एकवेळ समग्र कादम्बरी वांचण्याची शिफारस करितों. नंतर ज्याला जें वाटेल, तें बोलण्यास तो मुखत्यार आहे. या पुस्तकांत जागोजागीं भूतचेष्टेचा भ्रम झालेला पाहण्यांत येईल; तरी तसें तें कां होत होतें व ती कृति कोण करीत होतें? याचा उलगडा झाल्यावांचून राहणार नाहीं. त्याचप्रमाणें केवळ आत्महित पाहणारे जे असतात; ते परक्यांवर व ज्याला आपलें म्हणतील त्यावरही कसा जुलूम चालवितात हें स्पष्ट समजेल. तसेंच प्रीतीच्या संबंधानें मनुष्याच्या मनोविचारांत जी विलक्षण भानगड चालत असते, ती तर हुबेहुब दृष्टीस पडेल. असो. आतां या ठिकाणीं विशेष पाल्हाळपणा न करितां सुज्ञवाचकांस अशी प्रार्थना करितों कीं, त्यांनीं एकवेळ तरी हें पुस्तक वांचून हंसक्षीरन्यायानें गुणांचें ग्रहण करावें. शेवटीं जगन्नियंत्या परमेश्वरानें आमचें हें कृत्य निर्विघ्नपणें पार पाडल्याबद्दल त्याची अनन्यभावानें प्रार्थना करून हा प्रस्तावलेख पूर्ण करितों.

**द० वा० जोगळेकर.**

कादम्बरीकार.

मुंबई, ता. १ जानेवारी,
सन १८९०. शके १८११-१२

श्री

# अन्नपूर्णा आणि वामनराव
अथवा
# भूतभ्रम.

## प्रकरण पहिलें.

श्लोक–हरिणी वृत्त.

वतन मजला प्राणापेक्षां असे प्रिय सर्वथा ॥
बहुत रमलों बालत्वीं या स्थलीं नच अन्यथा ॥
जतन करितां कष्टांतेंही मनीं नच आणिलें ॥
विसरुनि तया कैसें जावें कळे न मला भलें ॥ १ ॥

सातारा प्रांतांतील कोयनानदीच्या मनोरंजक किनाऱ्यावर एका एकांत स्थानीं आत्मारामतात्या नामक एका सत्पुरुषाचा वाडा होता. त्याच्या बारींतून नदीच्या किनाऱ्यावरील मनोरंजक चमत्कार, तऱ्हेतऱ्हेच्या वृक्षांनीं भरलेलीं सुंदर अरण्यें, द्राक्षांचे मनोहर मंडप आणि फुलें फुलून रंगीबेरंगी झालेलीं क्षेत्रें ( शेतें ) दृष्टीस पडत असत. दक्षिणदिशेकडे सह्याद्रीची उंचउंच शिखरें मेघांनीं आच्छादन केल्याप्रमाणें दिसत आणि एकाद्या ठिकाणीं हिरवीगार झालेली जमीन आसपासच्या ओसाडीमुळें फारच मनोरंजक दिसत असे. पर्वतशिखरांवरील ओसाड देखावा पाहिल्यावर त्याच्या पायथ्याजवळचीं सुंदर खेडीं दृष्टीस पडतांच मनाला आनंद व नेत्रांला थंडावा येत असे. पूर्व आणि पश्चिम दिशांकडे पाटणचा मार्ग व मैदान नजरेस पडत असे.

आत्मारामतात्याला आपल्या सुंदर कन्येस बरोबर घेऊन, स्त्रीसह कोयनानदीच्या किनाऱ्यानें फिरून, या नदीच्या बिल्लोरी

पाण्याच्या लाटांनीं होणाऱ्या नैसर्गिक गायनाची फार हौस असे. गांवढ्यांतील साधेपणा तो पसंत करी, कारणः—त्यानें मनुष्यजातीला अकलेच्या कसोटीवर पुष्कळ कसून पाहिलें होतें. मनुष्यजातींतील जे उत्तम गुण, ते सर्व त्याच्यांत वास करीत असत. त्याचाच आधार धरून राहणाऱ्या गरीबाचा तो मायेनें व उदारपणानें प्रतिपाळ करीत असे. तो एका उंच कुलांतील पुरुष होता.त्याचा बाप मेल्यानंतर त्यानें एका सुंदर स्त्रीबरोबर लग्न केलें होतें. तीही एका श्रीमान् व अनुदार घराण्यांतील होती. तिचें वय आत्मारामतात्याच्या बरोबरीचेंच होतें. आत्मारामतात्याच्या बापानें परोपकारांत अतोनात द्रव्य खर्च केलें होतें. त्यामुळें आत्मारामतात्याला आपल्या वारशाच्या इस्टेटांतील फारच मोठा भाग विकून बापाच्या नांवाचें कर्ज फेडावें लागलें. त्यानें आपल्या लग्नानंतर आपल्या केशवराव नामक मेव्हण्याला आपल्या स्थावर संपत्तींतील मोठा भाग विकला व नंतर तो आह्मीं वर सांगितलेल्या महालांत जाऊन राहिला होता. ह्या महालांतच त्यानें आपलें बाळपण घालविलें होतें; ह्मणून त्याला येथें येऊन राहण्यास फार कठीण वाटलें नाहीं. हिरवींगार मैदानें, ज्यांवर त्यानें आपल्या भरउमेदींत उड्या मारलेल्या होत्या; पर्वताचे दरे, जंगलांनीं भरलेलीं अरण्यें, दूरदूरचे चमत्कारिक देखावे आणि नदीच्या उसळत्या लाटा—ज्यांच्या बरोबर त्यानें वारंवार कुस्त्या मारल्या होत्या. हें सर्व जेव्हां त्याच्या मनांत येत असे; तेव्हां तारुण्याच्या गमती आठवून त्याच्या नेत्रांतून अश्रु येत असत. ज्या वाड्यांत तो रहात होता, तो कांहीं उगीच राजकीय थाटमाटाचा होता असें नाहीं. तो अगदीं साधा, स्वच्छ आणि स्वाभाविक रमणीय देखाव्यांनीं घेरलेला गांवढ्यांतील एक मोठासा वाडा होता. आत्मारामतात्या या गांवठी महालाला मोठ्या प्रेमदृष्टीनें पहात असे व त्याच्या प्रत्येक भागाबद्दल तो मोठा अभिमान बाळगीत असे. आत्मारामतात्याच्या स्त्रीचा पवित्र साधेपणा त्या महालांतील सुंदर व्यवस्थेवरून ताबडतोब ध्यानांत येई व ती व्यवस्था एकाद्या अक्कलवाल्याच्या मनाजवळ

त्या महालांतील राहणाऱ्याच्या संसारसुखाबद्दल साक्ष देत असे. महालाच्या पश्चिमभागांत आत्मारामतात्याची पुस्तकशाळा होती, जींत पुष्कळ चांगलीं चांगलीं व मूल्यवान् पुस्तकें व्यवस्थेनें लाऊन ठेवलेलीं होतीं. या पुस्तकशाळेंतून एके बाजूस उंच झाडांच्या ओळीची गार व सुंदर छाया दृष्टीस पडत असे व त्या छायेपुढूनच नदी वहात असल्यामुळें पहाणारास चमत्कारिक शांति उत्पन्न करीत असे. पुस्तक शाळेजवळच एक काचेचा बंगला होता व त्यांतील सुंदर आणि दुर्मिळ रोप्यांचा संग्रह त्याच्या मालकाची झाडपानांच्या विद्येची स्वाभाविक हौस दाखवीत असे. आत्मारामतात्या पर्वतांत फिरून वनस्पतींचा शोध करण्यांत फार श्रम करीत असे व कधीं कधीं आपल्या कन्येला आणि स्त्रीलाही बरोबर घेऊन रानांत हिंडत असे. अन्नपूर्णा (आत्मारामतात्याची मुलगी) आपल्या मातापित्याबरोबर जेव्हां पर्वतावर जात असे; तेव्हां एका लहानशा टोपलींत गांवठ्यांतील आरोग्यकारक साधीं पक्वान्नें फराळासाठीं बरोबर नेत असे; व जेव्हां रानांतील आणि जंगलांतील सहल करून तीं परत फिरत, तेव्हां अन्नपूर्णा आपल्यासाठीं वनांतील चित्रविचित्र मनोहर व सुवासिक पुष्पें निवडून त्या टोपलींत भरून आणीत असे. जेव्हां पर्वताच्या उंच शिखरावर चढल्यामुळें व पुष्कळ चालल्यामुळें तिचा पिता व माता हीं उभयतां श्रमून झाडाच्या सुंदर छायेखालीं बसत असत; तेव्हां अन्नपूर्णा आपली लहानगी टोपली त्यांच्यापुढें ठेऊन पाण्याची झारी घेऊन ठुमकत ठुमकत झऱ्यावर जाऊन पाणी आणी व मातापितरांपुढें ठेवी. हें सुखी कुटुंब ईश्वराच्या स्वभावसिद्ध कृतीबद्दल विचार करणारें व त्याच्या अद्भुत चातुर्यावर थक्क होऊन त्याचे आभार मानणारें होतें.

कांचेच्या बंगल्याजवळच अन्नपूर्णेची ह्मणून एक खोली होती. तींत कित्येक पुस्तकें, चित्रें करायाचीं व काढण्याचीं हत्यारें, वाद्यें आणि कित्येक पक्षी व कांहीं झाडांच्या कुंड्या ठेविलेल्या होत्या. त्या खोलींत बसून ती नित्य आपला अभ्यास करीत असे. या खो-

लींतून अनेक ईश्वरी चमत्कार दृष्टीस पडत असत. आत्माराम-तात्यानें आपली बाग चमत्कारिक तयार केलेली होती व वडिलां-च्या हातच्या झाडांस तर तो फारच जपत असे, त्यांतील एक आं-ब्याचें झाड, ज्या खालीं आत्मारामतात्या आपल्या कुटुंबासहित बसून अनेक चमत्कार अवलोकन करीत करीत सायंकाळची हवा घेत असे, आणि पाण्याच्या काळ्या सपाटीवर नजर टाकून नेत्रांस थंडावा आणित असे. चांदण्यांत सब्जरंगी (हिरव्या) गवतावर बसून भोजन करण्याची त्याला फार आवड होती.

त्याची कन्या अन्नपूर्णा लावण्यलतिकेची फुलण्याच्या लागला आलेली एक कच्ची कळी होती. जरी पर्वताच्या शिखरावर व अर-ण्यांतून फिरण्याचा तिला प्रसंग येई, तरी तिजवर अशक्तपणाची छाया पडलेली नव्हती. तिचा बांधा नाजुक पण मजबूत आणि बुद्धि फार तीक्ष्ण असे. आत्मारामतात्याला तिचा स्वभाव ठाऊक होता, तरी तिच्या वर्तणुकींतील चुका काढून तिला बोध करण्याबद्दल तो फार सावधगिरी ठेवीत असे. तिचें रूप अगदी तिच्या माते-प्रमाणेंच होतें, तरी नाकडोळे आणि चेहरा तिला पाहणारास त्व-रित लालुच उत्पन्न करणारा होता. आत्मारामतात्यानें तिला संसारशिक्षण देण्यांत अगदी हयगय केली नव्हती. अन्नपूर्णेलाही अरण्यशोभा पहात फिरण्याची फार आवड असे. ती वारंवार आपल्या घराजवळच्या अरण्यांत जाऊन सायंकालचा शांत वेळ वनशोभा पाहण्यांत घालवीत असे. झाडांच्या खालीं बसून वरचेवर ती अकल्पित व ईश्वर निर्मित सहज देखाव्यांची तारीफ करीत असे. सूर्यास्ताच्या वेळीं रंगीबेरंगी ढगांचा प्रवास, वृक्षांच्या पानांवरू-न वाऱ्याची झुळुक गेल्यामुळें सहज वाजणारी सनई, दूरदूरच्या झोंपड्यांतून दिसणारा दिव्यांचा मंद प्रकाश, पक्ष्यांची धामधुम आणि शब्द ऐकून तिच्या मनावर ज्यादूसारखा आश्चर्यजनक परि-णाम होत असे. आणि तशा वेळीं वनाच्या स्वाभाविक वर्णनाचीं सुरस गाणीं ती रचीत असे. अरण्यांतील एका दाट झाडींत ति-च्या बापाचा एक शिकारी बंगला होता व त्याच्याजवळच निर्मळ

उदकाचा एक झरा होता. त्या बंगल्यांत आत्मारामतात्या उष्ण-काळच्या दिवसांत हवा घेण्यासाठीं आपल्या कोमलकन्येला व स्त्री-ला बरोबर घेऊन रहात असे. अन्नपूर्णा आपलीं वाद्यें बरोबर घेऊन, त्या ठिकाणीं बसलेल्या आपल्या आईबापांस मधुर गाणीं ऐकवून रंजवीत असे.

एकेदिवशीं अन्नपूर्णा एकटीच फिरत फिरत त्या बंगल्यांत गेली आणि तिची दृष्टी सहज एका बारीवर पडली, तों त्या बारीवर खालीं लिहिलेल्या ओळी होत्या:—

( मज बहुतचि ही आशा होती वहिनी; ही चाल. )

"प्रिय लेखनि तूं पोंचवि संदेशाला ॥ जी रंभा केवळ तिजला ॥ ध्रु ॥ येईल पुन्हां पुष्पें ती न्यायासी ॥ प्रेमानें कथ हें तिजसी ॥ मी झुरतों गे पाहुनियां रूपासी॥ कथवेना परि ती कैसी ॥ चाल ॥ ज्यादूचीं नेत्रें दोनीं ॥ भृकुटी ही वक्र कमानी ॥ मी मूढ कसावर्णूं शृंगा-राला ॥ जी रंभा० ॥ १ ॥ दिसतात सदा गाल गुलाबा ऐसे ॥ टवटवीत फुलले खासे॥ जे बोलतसे बोल बाण ते मृदुसे ॥ सुमनांचे, तिखटहि तैसे ॥ चाल ॥ भेदूनि कर्ण ते जाती॥ हृदयाला मोहित करती ॥ ती हसत तदा होय विकासच कमला ॥ जी रंभा के० ॥ २ ॥ ती मुर-डुनियां चालतसे मृगनेत्री ॥ चपलासी परि मृदुगात्री ॥ सहजांत पहा भासतसे सुखदात्री ॥ भुलवीत जना निजनेत्रीं ॥ चाल ॥ पसरिते प्रेमजालासी ॥ परि बां-धिल कोणा कैसी॥नकळेच सखे काय कथावें तुजला ॥ जी रंभा के० ॥ ३ ॥"

वरील ओळी कांहीं कोणाच्या नांवाचा स्पष्टपणें उच्चार करून लिहिलेल्या नव्हत्या; त्यामुळें अन्नपूर्णेनें जरी त्या वाचल्या व तशा-वर्णनाची केवळ रंभा, त्या ठिकाणांत येणारी जरी तीच होती, तरी "हा लेख मनविषयींच आहे !" असें कांहीं तिनें मनांत आणलें नाहीं. कांहीं वेळानें वरील लेखाविषयींचा विचारही तिच्या मनांतून

नाहींसा झाला. पुढे कांहीं दिवसांनीं आत्मारामतात्या आपल्या स्त्रीला बरोबर घेऊन त्याच बंगल्यांत जाण्यासाठीं निघाला. ह्या वेळेस त्याची स्त्री वार्धक्यांतील दुखण्यानें जर्जर झाली होती; तिच्यानें कांहीं चालवत नवतें; तरी तिच्या मनाला उत्साह येऊन तिनें पाऊल उचलावें ह्मणून तात्यानीं अन्नपूर्णेला सांगितलें—"बेटा, लौकर पुढे जाऊन तूं आपली बांसरी घेऊन ती वाजवीत वाजवीत आह्मांला नेण्यासाठीं ये. तिच्या मंजुल स्वरानें तुझ्या मातेच्या मेंदूला स्फुरण होईल." असें ऐकतांच अन्नपूर्णा धांवतच त्या बंगल्याकडे निघाली. पण जशी जशी ती जवळ पोंचत चालली; तसतसा बांसरीचा मंजूळ ध्वनि तिला ऐकूं येऊं लागला. पुढें "बांसरी वाजविणारा कोणी गायनकलेचा वस्ताद असला पाहिजे." असेंही तिला वाटलें आणि "कदाचित् आपली चाहुल ऐकून तो गवय्या आपलें मंजूळ वाद्य बंद करील." असें मनांत आणून पाऊल न वाजवितां ती बंगल्याजवळ गेली. त्याच्या आसपास सगळें शांत होतें; तशा एकांत ठिकाणीं गंधर्वाप्रमाणे गुण बाळगणारा कोणी एकटाच येऊन बांसरी वाजवीत बसला आहे, असें जेव्हां निश्चयात्मक तिला समजलें; तेव्हां पहिल्यानें तर ती थक्क होऊन त्या बंगल्याच्या बाहेर स्तंभाप्रमाणें उभी राहिली व तो रागयुक्त शुद्ध ध्वनि लक्ष्यपूर्वक ऐकूं लागली. कांहीं वेळानें "आंत जाऊन त्या बांसरी वाजविणाराला पहावें." असें जेव्हां तिच्या मनाला वाटलें, तेव्हां ती आंत शिरली आणि पाहूं लागली तों खिडकींत जागच्याजागीं बांसरी आहे व बंगल्यांत चिटपाखरूंही नाहीं. "-तर बांसरी वाजवित कोण बसलें होतें? बंगल्याच्या खिडकीतून आंत शिरलें असेल असें ह्मणावें तर मी येतांच तें नाहींसें कसें झालें?" इत्यादि अनेक विचार मनांत येऊन अन्नपूर्णेला फारच भय वाटलें. तिनें भीत भीत सगळें घर सोधलें आणि "खरोखर कोणी नाहीं," अशी खात्री होतांच तिचे हातपाय मोडले; आणि ज्या बारीवर मागील लेख लिहिला होता; त्याच बारींत ती घामाघूम होऊन बसली. तिच्या मनांत अनेक विचार येऊं लागले;

तों सहज त्याच लेखावर तिची दृष्टि गेली व त्याच्याखालीं " ह्या भूलोकांतील अप्सरा **अन्नपूर्णा** " हीं अक्षरें अधिक लिहिलेलीं पाहतांच तिच्या मनांत फारच घोंटाळा उत्पन्न झाला. "वरील लेख लिहिणारा व बांसरी वाजवीत बसणारा एकच असावा. " असेंही तिच्या मनाला वाटूं लागलें आणि त्या धास्तींतच आसपासच्या झाडांच्या पानांची खडबड व होत असलेला अंधार भर टाकूं लागला. तरी ह्या धीट मुलीनें आपली बांसरी घेतली आणि धांवत जाऊन ती आपल्या मातापितरांस तेथें घेऊन आली. तेथें जाऊन त्या सर्वांनीं कांहींवेळ बसून हवा घेतल्यावर फराळ केला आणि इकडे तिकडे फिरून पूर्ण काळोख पडल्यावर **आत्मारामतात्यांनीं** चूड पेटवून निघण्याची तयारी केली. कांहीं पावलें चालून गेल्यावर **अन्नपूर्णेच्या** मातेला आपल्या हातांतील पोंचीची आठवण झाली. ती पोंची फराळाचे वेळीं तिनें आपोआप सुटल्या मुळें सोडून ठेवली होती. तिची आठवण होतांच तिनें **अन्नपूर्णेला** सांगितलें आणि हातांत चूड देऊन **आत्मारामतात्यानें** तिला परत पाठविलें. त्याप्रमाणें तिनें परत जाऊन तीं फराळाला बसलीं होतीं ती जागा पाहिली. पण तेथें पोंची नाहीं, असें पाहून सगळ्या बंगल्यांत तिनें शोध केला, तरी ठिकाण नाहीं. तेव्हां मात्र मनांतल्या मनांत चपापून ती परत आपल्या मातापितरांजवळ आली. पोंची सांपडली नाहीं ह्मणून **अन्नपूर्णेच्या** मातेला फार वाईट वाटलें. कारण त्या पोंचींत **अन्नपूर्णेची** नवीन काढलेली तसबीर होती, ती गेली. **अन्नपूर्णेला** त्यावरून एका संशय आला कीं, " बारीवर लेख लिहिणारा, बांसरी वाजविणारा आणि पोंची चोरणारा गृहस्थ एकच असला पाहिजे." ह्या विचारांनीं जरी तिच्या मनाची चलबिचल झाली होती, तरी तिनें त्याबद्दल कोणाजवळही कांहीं सांगितलें नाहीं. तिनें " पुनः कधीं एकटें या बंगल्यांत यावयाचें नाहीं !!" असा आपल्या मनाजवळ मात्र निश्चय केला. दुसऱ्या दिवशीं तिची माता " मी फिरावयाला येत नाहीं " ह्मणाली. ह्मणून ती आपल्या बापाबरोबरच फिरायासाठीं

बाहेर गेली. त्या दिवशीं आत्मारामतात्यानें आपल्या आश्रयानें असलेल्या गरीब लोकांच्या झोंपड्यांतून जाऊन त्यांचा समाचार घेतला आणि त्यांच्या ज्या ज्या कांहीं अडचणी होत्या त्या दूर करून तो अन्नपूर्णेसह पुढें चालला. आत्मारामतात्याचें मन लहानपणापासून परोपकारांतच गढलेलें असल्यामुळें फारच शांत झालेलें होतें. आपल्या कन्येसह चालत असतां तो तिला ह्मणाला—"हा सायंकाळचा आनंददायक समय मला पुर्वी फारच आवडत असे. मला स्मरण आहे कीं, माझ्या तारुण्यांत या सायंकाळच्या समयीं नानाप्रकारचे विचार मनांत उत्पन्न होऊन ते हवेवर उडून जात असत व मनाला वनगायनाची विलक्षण प्रीति उत्पन्न करीत असत." असें ऐकतांच अन्नपूर्णेच्या नेत्रांतून मौक्तिकाप्रमाणें एकच अश्रुबिंदु पडला आणि ती ह्मणाली:—"तात्या, माझ्या मनाची स्थिति आपण बरोबर पारखली. ईश्वरानें स्वभावसिद्ध चमत्कार दाखवून मला आनंदाच्या जाळ्यांत अडकवून ठेविलेंच आहे आणि नित्य नवे नवे चमत्कार दाखवून तो आश्चर्यांत गर्क करीतच आहे, तें निरालेंच." याप्रमाणें अनेक प्रकारें बोलत असतां तो निर्मळ मनाचा बाप, ईश्वराचे उपकार आठवीत आठवीत दिवे लागण्याच्या सुमारास कन्येसह आपल्या घरीं परत आला.

अन्नपूर्णा घरीं येऊन पाहते, तों आपली माता फार दुखणेकरी आहे. तिला काय होतें तें समजावें ह्मणून अन्नपूर्णेनें अनेक प्रकारें विचारलें; परंतु त्या समजूतदार मातेनें शांत वृत्ति दाखवून तिची धास्ती दूर केली. तरी अन्नपूर्णेनें ती गोष्ट आत्मारामतात्यांला कळविली. ती ऐकतांच त्यांनीं आपल्या प्रिय पत्नीला फार ताप आला आहे, असें जाणून वैद्याला बोलाविलें. त्यानें नाडी पाहतांच तिच्या प्रकृतीविषयीं फार धास्ती दर्शविली; तरी तसें होण्याचें कारण कांहीं त्याला सांगतां आलें नाहीं. ती वारंवार आत्मारामतात्या व अन्नपूर्णा यांजकडे प्रेमदृष्टीनें पहात असे व एकादे वेळीं तिच्या नेत्रांतून अश्रुप्रवाह चालत असत. या गोष्टीला सात दिवस झाले व ती अगदी मरणोन्मुख होऊन गेली

वैद्यानें तिची आशा सोडली; हें तिनें आपल्या चातुर्यानें ताडलें आणि एकांत पाहून त्या वैद्याला जवळ बोलावून सांगितलें:—"वैद्यराज, मी सगळें समजतें. माझा अंतकाळ आतां अगदी जवळ आला आहे. आतां माझ्या प्रिय भर्त्याला व कन्येला अधिक वेळ पर्यंत ठकविल्यापासून फायदा न होतां उलट तोटा होईल. यासाठीं माझ्या प्रकृतीची खरी स्थिति तुह्मी त्यांना कळवा. कांहींच ठाऊक नसतां एकाएकीं जर मी मरण पावलें; तर तीं दोघें अकस्मात् लागलेल्या धक्क्यानें कदाचित् प्राण सोडतील; तर तसें न व्हावें. आधींच कळलेलें असलें ह्मणजे त्यांना दुःख होईल खरें, पण तें सहन करतां करतां पुढचें मोठें दुःख सहन करण्याची त्यांना शक्ति येईल." याप्रमाणें तिचे पोक्त विचार ऐकतांच वैद्याला फार आश्चर्य वाटलें व त्यानें तिच्या इच्छेप्रमाणें ती गोष्ट आत्मारामतात्यास कळविली. ती खबर ऐकतांच त्याला अनिवार दुःख झालें, तरी "आपलें दुःख पाहून कदाचित् आपली स्त्री धीर सोडील;" असें मनांत आणून त्यानें तें आवरलें. आपली आई अत्यवस्थ आहे, हें ऐकून अन्नपूर्णेला जरी अनावर दुःख झालें, तरी तिच्या निर्दोष मनांत "आपली आई कांहीं इतक्यांतच मरणार नाहीं. मी तिच्यासाठीं ईश्वराची प्रार्थना करीन व तो दीनदयाळू तिला आणखीं हयाती देईल." असे विचार उभे राहिल्यामुळें ती वेडी मुलगी वरचेवर ईश्वराजवळ, आपल्या आईसाठीं आयुष्य मागूं लागली. आत्मारामतात्याची स्त्री आपलें दुःख मोठ्या शांतपणानें व धैर्यानें सहन करून सदोदित हास्यवदनानें आपल्या प्रिय मनुष्यांस उलट धीर देत असे. ईश्वरी मार्गांतूनच चालल्यामुळें तिच्या मुखावर निर्भयपणाचें चमत्कारिक तेज चमकत राहिलें होतें. तिच्या मनांत पूर्ण संतोष वास करीत होता. जसजसा तिचा अंतकाळ जवळ येत चालला, तसतसा ईश्वराच्या चरणांजवळ जाण्याबद्दलचा अधिकाधिक आनंद तिच्या मनांत उद्भवूं लागला व ती फारच गंभीर आणि सौम्य दिसूं लागली. तिनें अन्नपूर्णेला व आत्मारामतात्याला आपल्या बिछान्याजवळ बो-

लाविलें; त्यांच्याकडे शांत, सौम्य व स्मित वदनानें पाहिलें आणि दोघांचेही हात आपल्या हातांत धरून ईश्वराची प्रार्थना केली; नंतर "आपली सर्वांची पुनः परलोकीं भेट होईल" अशी त्यांस आशा दिली; "हा मायामय जगाचा पसारा सोडून सर्वांलाच आधीं मागून जाणें आहे" असें बोलून तिनें त्या दोघांसही धीर दिला आणि शेवटीं " तुह्मीं अगदीं दुःख करूं नका. मी सुखांत आहे. " असें त्यांना सांगितलें व दोघांकडे आपली दृष्टि फिरवून पाहिलें. त्या पाहण्यांत प्रीतीचें तेज पूर्ण चमकत होतें. आत्मारामतात्याच्यानें हा देखावा फार वेळपर्यंत पाहवेना. त्यामुळें त्यानें आपल्या नेत्रांला पदर लावला आणि पुनः आपल्या प्रिय पत्नीकडे पाहिलें. त्याच्या नेत्रांतून अश्रूंची धार लागली व तो ती खोली सोडून बाहेर गेला. अन्नपूर्णा आपल्या मातेजवळ एकटीच होती. थोडा वेळपर्यंत त्या दोघीही अगदीं स्वस्थ राहिल्या, तरी तोंपर्यंत दोघी एकमेकींकडे पाहून एकमेकींवर प्रीतिकिरणांचा प्रकाश पाडीत होत्या. आत्मारामतात्या पुनः खोलींत आला आणि आपल्या प्रियेकडे प्रेमदृष्टीनें पाहूं लागला. अन्नपूर्णेच्या नेत्रांला तर अश्रूंचा झरा लागला आणि त्याच वेळेस त्या निर्दोष कुटुंबावर मृत्युनें घाला घातला !!

अन्नपूर्णेला तिच्या मातेनें जवळ बोलावून सदोदित शांत वृत्तीनें वागण्याविषयीं उपदेश केला आणि तिचा हात धरून तिनें त्याचें चुंबन घेतलें. आत्मारामतात्याच्यानें हें पाहवेना, तरी अन्नपूर्णेसाठीं मन कठीण करून तो आपल्या प्रियेजवळ गेला. तिनें त्याचे दोन्ही हात घेऊन आपल्या नेत्रांवर ठेविले आणि शेवटीं आकाशाकडे दृष्टि देऊन तिनें आपला प्राण आपल्या उत्पन्नकर्त्याच्या हवालीं केला ! तिची जवळच्याच एका स्मशानांत नेऊन उत्तरक्रिया करण्यांत आली व त्यानंतर अन्नपूर्णा व आत्मारामतात्या हीं दोघें आपापल्या खोलींत जाऊन दुश्चित्तपणा स्विकारून कांहीं वेळपर्यंत बसलीं.

नंतर आत्मारामतात्यांनीं अन्नपूर्णेला आपल्या खोलींत बोला-

विलें आणि समयाला योग्य असा उपदेश केला. तात्यांची पत्नी मेल्यावर त्यांच्या समाचारास माधवराव बेगडे या नांवाचा मनुष्य पहिल्यानें आला. हा मनुष्य फारच योग्य व भला होता. आत्माराम-तात्यांप्रमाणें यालाही झाडांपानांच्या विदेचा शोक होता. डोंगरांतून वारंवार फिरत असतां या दोघांची ओळख पडून स्नेह वाढला होता. माधवरावही मनुष्यजातीच्या दुष्कर्मांला कंटाळून आत्मारामतात्याच्याच खेड्यांत येऊन राहिला होता. तात्यांनीं त्याला आपल्या घरीं आलेला पाहतांच फार आश्चर्य मानलें. कारण पूर्वीं वारंवार बोलाविलें असतांही कधीं तो तात्यांच्या घरीं येत नसे; पण आज एकही सूचना न पाठवितां तो आला. त्यानें येतांच निर्मळ अंतःकरणानें तात्यांच्या दुःखाचा विभाग घेतला आणि त्याबरोबरच साध्या शब्दांनीं त्यांचें शांतवन केलें. त्याच वेळीं आत्माराम तात्यांची बहीण चिमाबाईही त्यांच्या समाचारासाठीं आली होती. ती एक विधवा जवळच्याच एका खेड्यांत राहणारी असे. जसा त्या परक्या माधवरावानें येऊन तात्यांला धीर दिला, तसा कांहीं चिमाबाईच्यानें देववला नाहीं. तरी त्यांच्या स्त्रीच्या मरणामुळें आपण फार दुःखित आहों, असें तिनें थोडक्या शब्दांत त्यांला कळविलें. नंतर ती परत निघाली त्या वेळेस तात्यांनीं कांहीं दिवस आपल्या घरीं येऊन रहावें, अशा आशयानें ती तात्यांला ह्मणाली—"हवेच्या फेरफारानें मनुष्याच्या मनाला हुशारी येते व तें मानसिक दुःख क्षणांत विसरून जातें."

आत्मारामतात्यानें तिचें वचन मान्य केलें. तरी त्याला आपलें वतन सोडून जावें असें वाटेना; जें आपल्या पवित्र स्त्रीच्या पायगुणानें निर्दोष आहे असें त्यास वाटत असे. तरी कांहीं विशेष कारणामुळें त्याला तें पवित्रस्थान सोडून जाण्याचा प्रसंग आला. त्याचा मेव्हणा केशवराव, ज्याला त्यानें आपल्या इस्टेटपैकीं कांहीं भाग विकला होता; त्या विषयींच्याच कांहीं विशेष व्यवस्थेसाठीं तो तिकडे जाण्यासाठीं निघाला. अन्नपूर्णेलाही त्यानें जातांना बरोबर नेलें. आपल्या बापाची मिळकत अव्यवस्थेंत

आहे, असें पाहतांच त्याला फार खेद वाटला. एका चाकरानें येऊन त्या दोघांसही केशवराव बसला होता त्या दिवाणखान्यांत नेलें. आंत जातांच केशवराव आपल्या स्त्रीबरोबर गोष्टी सांगत असलेला आत्मारामतात्यानें पाहिला. आत्मारामतात्याला पाहतांच तीं दोघेंही उभीं राहिलीं आणि डौलदार सभ्यतेनें त्यांनीं आत्मारामतात्याचा कन्येसह सत्कार केला. त्यास आंत नेऊन बसविलें आणि त्याची स्त्री–ह्मणजे केशवरावानें आपली बहीण मेल्याबद्दल थोडासा खेद दर्शविला व कांहीं वेळानें तो दुसऱ्या गोष्टी काढून त्यांच्या नादांत लागला. यावरून केशवरावाचें आपल्या बहिणीवर किती प्रेम होतें? हें आत्मारामतात्याला उघड दिसून आलें. नंतर तात्याला घेऊन केशवराव दुसऱ्या एका खोलींत गेला आणि अन्नपूर्णा केशवरावाच्या स्त्रीजवळ गोष्टी सांगत बसली असतां त्यांच्या घरांत आज मेजवानी आहे हें तिला कळलें. आत्मारामतात्याला हें कळतांच 'येथें राहूं नये' असें वाटलें. तरी त्यानें दूरवर विचार करून 'आपल्यामागें अन्नपूर्णेला यांच्यांच आश्रयानें दिवस काढावे लागतील' असें मनांत आणून केशवरावांचे वचन मान्य केलें. त्या दिवशीं मेजवानीसाठीं जे गृहस्थ आले होते, त्यांत एक मोरोबा नांवाचा मनुष्य हिंदुस्थानांतील राहणारा होता. त्याची मुद्रा भयंकर असून घातकीपणाची साक्ष देत असे. तो स्वभावानें मोठा तापट होता व कोणत्याही गोष्टीबद्दल दूरवर विचार करणारा नव्हता. केरोबानामक त्याचा एक मित्रही त्या ठिकाणीं हजर होता. तो तीस वर्षांच्या वयाचा, मोरोबाहून कमी श्रीमान्, पण चंचल असे. अन्नपूर्णेची आते चिमाबाईही तेथें आलेली होती. ती आपल्या भावाला जें बोलली, तें ऐकून अन्नपूर्णेला फार वाईट वाटलें. ती चिमाबाई आत्मारामतात्यास ह्मणाली–"दादा, जें झालें तें होऊन गेलें. आतां आपल्या मनांतील दिलगिरी काढून टाकली पाहिजे." आत्मारामतात्यानें मी स्वतः दिलगीर नाहीं असें तिला सांगितलें. भोजनोत्तर सर्व गोष्टी सांगत बसले असतां

मोरोबा हिंदुस्थानांतील राजकीय खटपटीच्या गोष्टी सांगूं लागला. त्या वेळेस हिंदुस्थानांत ज्या लढाया चालल्या होत्या, त्याबद्दलच्या गोष्टींत तो आपलें अंग फार दाखवीत असे.

नंतर आत्मारामतात्यानें केशवरावाचा निरोप घेतला व गाडी जोडून तो आपल्या घरीं जाण्यासाठीं निघाला. त्या वेळेस अन्नपूर्णेला फार दुःख वाटलें. कारण तिची माता तिला दरवाज्यांत उभी असलेली दिसणार नाहीं, असें तिच्या मनांत आलें. आत्मारामतात्यावरही दिवसेंदिवस दुःखाची छाप अधिक पडूं लागली. तो दिवसेंदिवस झुरूं लागला, तेव्हां त्याच्या वैद्यानें त्याला प्रवास करून हवेंत फेरफार करण्याचें मत दिलें. तेव्हां ताराबाई नांवाची त्याची एक वृद्ध कुळंबीण होती, तिला घर राखण्यासाठीं ठेऊन तो अन्नपूर्णेला बरोबर घेऊन महाबळेश्वराकडील रमणीय खेड्यांत फिरायाला जाण्यासाठीं तयार झाला. ज्या दिवशीं तीं प्रवासाला निघणार, त्याच्या आदल्या रात्रीं अन्नपूर्णेनें आपलीं सर्व पुस्तकें बांधून बरोबर घेण्यासाठीं ठेवलीं. तिच्या सामानाची बांधाबांध होय तोंपर्यंत मध्यरात्र उलटून गेली होती. तरी शेवटीं तिला चित्रें काढण्याच्या हत्यारांची आठवण झाली. तीं सर्व खालीं राहिलीं होतीं. जेव्हां तीं घेण्यासाठीं ती खालीं उतरली; तेव्हां तिला तात्यांच्या खोलीवरून जाण्याचा प्रसंग आला. तिनें त्या खोलीचें अर्धें दार उघडें पाहतांच आपला पिता 'कांहीं वाचीत बसला असेल,' असें मनांत आणून दार ठोठावलें; पण तिला आंतून कांहींच उत्तर मिळालें नाहीं. अन्नपूर्णा, तात्या आहेत कीं नाहींत हें पाहण्यासाठीं आंत शिरली. खोलींत सर्वत्र अंधार होता; तरी खिडकींतून आलेला थोडथोडा उजेड तिला दिसला. त्या भोळ्या कन्येनें पुढें होऊन पाहिलें तों तिचा बाप कित्येक कागदांचीं पुडकीं सोडून त्यांतील एकेक कागद लक्ष्यपूर्वक वाचीत होता व ठेवतांना हुंदके घेऊन रडत होता आणि मधून मधून डोळेही पुशीत होता. त्याचें ते वर्तन पाहतांच अन्नपूर्णेला आश्चर्य वाटलें, तरी तिच्यानें पुढें जाववलें नाहीं. ती

त्याच ठिकाणीं उभी राहिली आणि पाहूं लागली. तात्याचीं सर्व पत्रें वाचून झाल्यावर त्यानें आकाशाकडे हात जोडून ईश्वराची स्तुति केली. त्या वेळेस त्याला अपार शोक झाला. तेव्हां अन्नपूर्णेला "आतां येथून निघून जावें" असें वाटलें. तों आत्माराम तात्यानें उठून एका पेटींतून एक डबी काढली आणि फार वेळपर्यंत तिच्याकडे पाहून ती उघडली व तिच्यांतून एक तसबीर बाहेर काढली. त्याच्याजवळ एक दिवा मंद जळत होता. त्या दिव्यापुढें धरून ती तसबीर त्यानें लक्ष्यपूर्वक परमप्रीतीनें पाहिली आणि रुदन केलें. ज्या वेळेस त्यानें ती तसबीर दिव्याजवळ आणली; त्या वेळेस अन्नपूर्णेच्याही ती दृष्टीस पडली व 'ही आपल्या मातेची नव्हे' अशी तिची पूर्ण खात्रीही झाली. तात्या त्या तसबिरीकडे वारंवार पाहून तिचें चुंबन घेत व प्रीतीनें हृदयाजवळ धरून रुदन करीत असत. तरी अन्नपूर्णेला तो देखावा खरा वाटेना. "आपल्या मातेशिवाय दुसऱ्या स्त्रीवर आपला बाप प्रीति करतो." हें तिनें आजच पाहिलें. असो. तात्यानें ती तसबीर पुनः डबींत घातली व ठेवली. इतक्यांत 'मी आपल्या बापाचें गुप्त कृत्य चोरून पहात आहें हें योग्य नव्हे' असें वाटल्यावरून अन्नपूर्णा तेथून निघून गेली.

---

## प्रकरण दुसरें.

श्लोक—भुजंगप्रयात.

चढोनी बघूं दिव्य शोभा वनाची ॥
स्वतःसिद्ध जे कां कृती ईश्वराची ॥
पहातां गमे रम्य आनंदगाभा ॥
करी कैद चित्तास ही रत्नगर्भा ॥ १ ॥

आम्हीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें आत्मारामतात्या झाडपानांच्या व वनस्पतिविद्येच्या नादीं असल्यामुळें तो डोंगरी मार्गानें महाबळेश्वराकडे मुसाफरी करीत निघाला. मार्गास लागल्यावर त्याला बाळपाटील या नांवाचा त्याचा एक मित्र भेटला, जो डोंगरांत

फिरून चमत्कारिक झाडें एकत्र करण्याच्या कामांत गुंतलेला होता, त्यानें तात्यांनीं "लौकर परत यावें," अशी इच्छा दर्शित केली. त्याला सोडल्यानंतर आपले दोन्ही प्रवासी डोंगर चढूं लागले. वारंवार अन्नपुर्णा व तात्या गाडीबाहेर मान काढून आपल्या वडिलोपार्जित वतनावर नजर फेंकीत असत. शेवटीं तो देखावा त्यांना दिसेनासा झाला आणि नवीन प्रदेशाचे नवीन देखावे त्यांच्या नेत्रांसमोर येऊं लागले. इतक्यांत त्यांची गाडी डोंगराच्या खिंडींतून चालूं लागली, तेव्हां आसपास आलेले भयंकर झुलते खडक, त्यांचे ओसाड देखावे, मधून मधून राक्षसी झाडें, चपल गतीनें धांवणारीं हरिणें, हे सर्व प्रकार त्या दोघांस आश्चर्यांत पाडूं लागले. कांहीं वेळानें त्यांची गाडी डोंगरावर चढूं लागली. त्यांस तो रस्ता उंच नीच असल्यामुळें दोघांसही गाडींतून उतरावें लागे, तरी जेव्हां गाडीवाला बैलांस हळू चालवी, तेव्हां आसपासची अरण्यशोभा पाहून त्यांस फारच आनंद होत असे. त्यांनीं फराळाचें साहित्य पुष्कळ घेतलें होतें, त्यामुळें मनासारखें स्थल दिसतांच गाडींतून उतरून दोघेंही फराळ करीत असत. एके दिवशीं सायंकालीं मार्गश्रमामुळें दोघांसही श्रम झाले आणि हिरव्यागार गवतावर तीं दोघें विश्रांति घेत बसलीं. त्यांच्या आसपासचा देखावा जिवाला लालूच उत्पन्न करणारा होता. जरी त्या वेळेस सर्व शांत होतें, तरी दुरून ऐकूं येणारा बैलांच्या गळ्यांतील घंटांचा शब्द त्यांच्या मनाला आनंद उत्पन्न करीत असे. त्याचप्रमाणें गुरें राखणारांचीं अलगुजीं मनाला समाधान देत. पर्वताच्या शिखरांवर सूर्याचीं किरणें पडल्यामुळें त्यास सोनेरी रंग चढला होता व आपल्या दोघां प्रवाशांचे श्रम हरण करण्यासाठीं झाडांचीं पानें चवऱ्यांप्रमाणें हालत असत. एके बाजूच्या झाडींतून निर्मळ उदकाचा प्रवाह बाहेर आला होता व तो धबधब्याप्रमाणें खडकावरून खालीं पडत असल्यामुळें शुभ्र फेसाच्या राशीप्रमाणें दिसत असे. हीं दोघें सह्याद्रीच्या एका शिखरावर असल्यामुळें जलमर्गानें प्रवास करणारीं मोठमोठीं तारवेंही त्यांच्या

दृष्टीस पडत होतीं. थोडक्याच वेळानें सूर्यास्त झाला आणि अंधारी रात्र आपली काळी साडी नेसून बाहेर पडली. तिच्या साडीवर कशीदा काढला होता व त्यांत अपूर्व नक्षत्ररूपीं रत्नें जडविलीं होतीं, तीं चमकूं लागलीं; आणि कांहीं वेळपर्यंत फारच गंभीर देखावा दिसूं लागला. नंतर कांहीं वेळानें रात्रिपति चंद्र पूर्वदिशा उजळीत जसजसा वर येऊं लागला तसतसा काळोख नाहींसा होत चालला. तेव्हां तात्या व अन्नपूर्णा यांनीं ईश्वराचे आभार मानून आनंदानें थंडवेळांत पुन: मार्गक्रमण करण्याचा विचार केला.

त्यांनीं उठून भिरोबा (गाडीवाल्याचें नांव) ला गाडी जोडण्यास सांगितलें व श्रम परिहार झालेले असल्यामुळें दोघेंही पुढें चालूं लागलीं. मार्ग जरी कठीण होता, तरी बैलांस विसांवा मिळालेला असल्यामुळें ते मोठ्या हुशारीनें चालूं लागले. पण अन्नपूर्णेला धास्ती पडली आणि वाटूं लागलें कीं, " ते कड्यावरून कोसळून न पडोत. " गाडी उतरणीला लागल्यामुळें खूप वेगानें चालली होती; ती कांहीं वेळानें खालीं उतरून एका सपाट व रुंद वळणांत येऊन पोंचली. आत्मारामतात्याच्या माहितीचा रस्ता असल्यामुळें तो चोरांची धास्ती वाहूं लागला. त्यानें आपल्याबरोबर दोन पिस्तुलें व दारू गोळा बाळगला होता. भिरोबा गाडीवाला आपलें गांवढळ गायन उंच सुरावर गात असे, त्यामुळें देखाव्यांतील भयंकरपणा जरा जरा कमी अनुभवास येऊं लागला. कांहीं वेळानें भिरोबाचें गायन बंद झालें व रानांतील वाऱ्यामुळें झाडपानांच्या मंजुल ध्वनीशिवाय कांहीं ऐकूं येईना. इतक्यांत एकाएकीं एक बंदुकीचा आवाज झाला आणि आपलीं दोन्हीं वाटसरें चपापून इकडे तिकडे पाहूं लागलीं. आत्मारामतात्यानें गाडी उभी करविली; इतक्यांत दूरून घोड्याच्या टांपा त्यांना ऐकूं आल्या. बंदुकीचा आवाज कांहीं पुन: झाला नाहीं, तरी आसपासच्या झाडांतून खडखडाट ऐकूं येऊं लागला. तेव्हां तात्यानें आपलें पिस्तुल भरून हातांत घेतलें आणि गाडी पुढें चालविण्याचा हुकूम केला. तों सगळ्या खिंडींत रणशिंगाचा आवाज घुमूं लाग-

ला. तेव्हां तात्या डोकें बाहेर काढून पाहूं लागला, तों एक तरुण पुरुष कुत्र्यांच्या जोडीसह झाडींतून बाहेर येत असलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें शिकारी पोषाख करून बंदुक खांद्यावर टाकलेली होती, कंबरबंदाला रणशिंग बांधलें होतें आणि त्याच्या हातांत एक भाला होता, तो त्याची बहादुरी स्पष्ट दाखवीत असे. जेव्हां तो तरुण अगदीं गाडीच्या जवळ आला, तेव्हां तात्यानें त्याला जवळच्याच गांवढ्याबद्दल प्रश्न केला. तेव्हां त्या तरुणानें फारच नम्रतेनें सांगितलें कीं, " येथून एका कोसावरच तें खेडें आहे व मलाही तेथेंच जाणें आहे. " त्याच्या नम्रतेबद्दल तात्याला फार आनंद झाला. इतक्यांत मार्ग दाखवीत बरोबर येण्याची आपली इच्छा त्यानें तात्यास कळविली. त्याची हुशारी व एकंदर शिपाईगिरीचा थाट पाहून आत्मारामतात्या फारच संतोष पावला आणि त्यानें आपल्याबरोबर गाडींत बसावें म्हणून तो त्याला फार आग्रह करूं लागला; पण त्यानें फारच नम्रपणानें आपली चालण्याचीच इच्छा प्रदर्शित केली. तो म्हणाला " पुढें येणाऱ्या खेड्यांत आपणांस कांहीं सामानसुमान मिळेल, असें वाटत नाहीं. कारण तेथील लोक फार गरीब आहेत. " तात्या म्हणाला:—"तुम्हीं तेथील रहिवासी नसाल असें वाटतें."तो म्हणाला:— " खरी गोष्ट आहे. मी एक प्रवासीच आहें." याप्रमाणें बोलत आहेत तों गाडी पुढें चालूं लागली. अन्नपूर्णा व तात्या त्या तरुणाचे फारच उपकार मनांत आणूं लागले. मार्गांतील उंच सखल टेंकड्या रात्रीच्या समयामुळें धास्तींत भर टाकीत असतां शेवटीं त्यांना दूर थोडासा दिव्याच्या उजेडाचा भास झाला आणि कांहीं वेळानें चंद्राच्या शांत प्रकाशांत खेड्यांतील झोंपडीं आपला देखावा दाखवूं लागलीं. त्या झोंपड्यांतून जो प्रकाश केला होता; त्याचें प्रतिबिंब नक्षत्रांत मिळून नदींत दिसत असल्यामुळें एक चमत्कारिकच देखावा दिसत असे. तात्या त्या तरुणाजवळ चौकशी करीत असतां त्यांना उतरण्यासाठीं त्या खेड्यांत धर्मशाळा किंवा घर मिळेल अशी आशा करणें व्यर्थ आहे, असें त्याच्या

ध्यानांत आलें. तरी त्या तरुणानें पुढें जाऊन कांहींतरी व्यवस्था करण्याची आपली इच्छा त्यांस कळविली. तेव्हां तात्यानें त्याचे आभार मानून तो स्वतःही त्याजबरोबरच गांवांत जाण्यासाठीं गाडींतून उतरला. अन्नपूर्णा मात्र त्यांच्या मागून गाडींतून चालली.

मार्गानें चालत असतां तात्यानें त्या तरुणास "तुह्मीं आजपर्यंत कोणकोणत्या जातींची शिकार केली आहे?" असें विचारलें. तेव्हां तो ह्मणालाः—"नाहीं नाहीं. मी कांहीं केवळ शिकार करण्यासाठींच येत असतों असें नाहीं. मला वनशोभा पाहण्याचा नाद आहे. हे कुत्रे मार्गांत सोबत करण्यासाठीं बरोबर बाळगले आहेत आणि शिकारीचा पोषाख केला ह्मणजे गांवढेकऱ्यांत मान मिळतो, ह्मणून हा असा वेष धारण केला आहे." तात्या ह्मणालाः—"या तुमच्या हौशीवर मी फार खुष आहे. जर तुमच्याप्रमाणें मी तरुण असतों, तर तुमच्याबरोबर आनंदानें फिरून तुमच्या सुखाचा भाग घेतला असता. मी तरी तुमच्याप्रमाणेंच एक प्रवासी असून हा प्रवास शरीरप्रकृतिसाठींच करीत आहे. महाबळेश्वरावरून खालीं कोंकणांत उतरावें असा माझा विचार आहे. तुह्मांला जर त्या प्रदेशाची माहिती असेल तर मला सांगा." असें ऐकतांच त्याला जी माहिती होती ती त्यानें सांगितली, इतक्यांत ते दोघे त्या खेड्यांत पोंचले. आत्मारामतात्यानें जीं झोंपडीं पाहिलीं, त्यांत त्यांना गरीबाई व दरिद्रावस्थेशिवाय कांहीं दिसलें नाहीं. शेवटीं त्यांना एक झोंपडें दिसलें, त्यांत दोन खोल्या होत्या. त्यांतील एकींत गुरें बांधलेलीं व एकींत मनुष्यें निजलेलीं होतीं. तरी दोघेंही आंत जातांच त्यांचा चांगला सत्कार झाला. गाडी आली, अन्नपूर्णा खालीं उतरून आंत आली व पाहूं लागली तों त्या आकुंचित जागेंत आठ बालकांसह त्यांचा पिता निजलेला होता. तिला या गोष्टीचें फार आश्चर्य वाटलें व ती चकित होत्साती तात्याकडे पाहूं लागली. पण तिची इच्छा तो चतुर तरुण तत्काल समजून गेला. त्यानें तात्याला बाजूला बोलावून आपल्या बिछान्याचा त्यांच्या मुलीनें स्वीकार करावा अशी इच्छा त्यांना दर्शविली. तात्यानें या त्या-

त्या चमत्कारीक सभ्यतेवर फारच खुषी दाखवून 'बिछान्याची तिला गरज नाहीं' ह्मणून सांगितलें. तरी त्याच्या आग्रहास्तव अन्नपूर्णा बिछान्यावर बसली व तो बाजूला जाऊन बसला. अन्नपूर्णेनेंही स्मित वदनानें त्याजकडे पाहून आभार दर्शविले.

घरांत जातांच त्या घरवाल्या बाईनें फराळाची तजूद केली आणि त्यांचीं पानें वाढलीं. त्या वेळेस तात्यानें आपल्या जवळचे फराळाचें साहित्य काढून त्यांत मिळविलें आणि बरोबर आलेल्या तरुणाला आपल्या पंक्तीस बोलाविलें, त्यानेंही तें मोठ्या आनंदानें कबूल केलें. भोजन होत असतां गोष्टी चालू झाल्या व त्यांत तात्यानें त्या तरुणाचें नांव विचारलें तें त्यानें वामनराव ह्मणून सांगितलें. फराळ आटपल्यावर सर्वांची तजवीज लावून वामनराव बाहेरच निजला. अन्नपूर्णा व तात्या यांस सर्वांच्या मागून झोंप लागली. ज्या ठिकाणीं तात्या निजला होता, त्या ठिकाणीं कित्येक कवितेचीं पुस्तकें पाहून तात्यास आश्चर्य वाटलें तरी त्यांवर वामनरावाचें नांव पाहतांच त्यास समाधान झालें.

---

# प्रकरण तिसरें.

श्लोक भुजंगप्रयात.

**जया आवडे ईश्वरीकृत्य भारी ॥ जयाला वनें वाटती फार प्यारीं ॥**
**सदा कष्ट सोसूनियां धैर्य ठेवी ॥ प्रसंगांतही सभ्यता थोर दावी ॥ १ ॥**

आत्मारामतात्या प्रातःकालीं लौकर जागृत झाले व त्यांनीं थंडवेळांतमार्गक्रमण करण्याची आपली इच्छा दर्शविली. त्यांनीं वामनरावाजवळ "गांव कितीसें दूर आहे?" याची चौकशी केली, तेव्हां त्यानें सांगितलें कीं, येथून दोन कोसांवर तुह्मांला वस्ती करण्यायोग्य गांव मिळेल. तुमची इच्छा असेल तर मी मोठ्या आनंदानें त्या गांवापर्यंत मार्ग दाखवीत तुमच्याबरोबर येतो. आत्मारामतात्यानीं ह्या त्याच्या उदारपणाबद्दल त्याचे फार आभार मानिले आणि त्यासह सर्व मार्गक्रमण करूं लागले. ता-

त्यांनीं वामनरावास गाडींत बसण्याचा आग्रह केला, पण त्यानें तें कबूल केलें नाहीं. त्यांस आतां तळमार्ग चांगल्या सपाटीचा लागला. प्रातःकाळ असल्यामुळें पुष्पांचा मधुर सुवास चांगला पसरला होता. आमचीं तिन्हीं मुशाफरें स्वतःसिद्ध ईश्वरनिर्मित व्यवहारांची आवड बाळगणारीं असल्यामुळें तिघेंही वनशोभा पहात पहात चाललीं असतां अरुणोदयाचा समय झाला. पक्षी किलबिल शब्दांनीं उदय पावणाऱ्या सूर्याचा सत्कार करूं लागले. तेव्हां अन्नपूर्णेनें खालीं उतरून दवानें भिजलेल्या गवतावरून हळू हळू चालण्याची इच्छा दर्शविली. वामनराव वारंवार गाडी जवळ येऊन त्यांना निरनिराळे चमत्कार दाखवीत होता व तात्या 'हा तरुण फार भोळा आहे.' असें वारंवार मनांत आणीत होते. शेवटीं वामनराव जेथून मागें फिरणार होता तेथपर्यंत तीं तिघेंही आलीं, तेव्हां मात्र त्या तरुणाला त्यांच्या वियोगाबद्दल फार वाईट वाटलें. तात्यांसही त्याला परत जाण्याला निरोप देण्यास फार वाईट वाटलें. "याला परत जाऊं देऊं नये," असेंही त्यांच्या मनांत आलें. त्याचप्रमाणें वामनरावही वारंवार "जातों जातों" ह्मणून गाडीमागून येतच होता. तरी शेवटीं त्यानें खरोखर निरोप घेतला आणि तो मागें फिरला. तो परत गेला त्या वेळेस तात्यांनीं पाहिलें; तों वामनरावानें अन्नपूर्णेकडे मोठ्या प्रेमदृष्टीनें पाहिलें आणि अन्नपूर्णेनेंही मोठ्या आनंदमुद्रेनें त्याला नमून निरोप दिला. गाडी पुढें चालूं लागली व कांहीं थोड्या वेळानें तात्यांनीं बाहेर डोकें काढलें; तों वामनराव आपल्या भाल्यावर टेंकून गाडीकडे पहात उभा राहिला आहे. त्यांनीं आपल्या हातांतील रुमाल उडवून खुणेनें त्यांला नमस्कार केला आणि वामनरावही त्याचा त्याचप्रमाणें जबाब देऊन खरोखर परत फिरला.

आतां देखावा बदलूं लागला. पर्वताची चढण पुनः ह्या वनस्पतिदर्शनोत्सुकांस आनंद देऊं लागली. उंचावरून खालीं फेंकून देऊन मुशाफरांचा चुराडा उडविण्यासाठीं झुलते कडे झुलत होते. जे झरे पर्वतावरून बारीक स्थितींत निघाल्यामुळें पाझरत होते

तेंच पर्वताखालीं गेलेले पाहिले तर विशाळ नद्यांचें रूप धरून प्रवाशांस भय दाखविणारे झालेले दिसत असत. परंतु आमचीं प्रवास करणारीं मनुष्यें हे देखावे पाहून आनंदित होत होतीं. अरण्य तर दाट वरपर्यंत गेलेलें किर्र दिसत होतें. मिरोबा फार जपून गाडी हांकीत होता. कारण त्याला रस्ता ठाऊक नव्हता. पुढें त्यांचा रस्ता बदलला आणि उतरण लागली. थोड्या अंतरावर त्यांना मोठा प्रकाश दिसूं लागला, ज्यानें आसपासचे खडक व वृक्ष धगधगीत दिसत होते आणि मोठी आग लागली असावी असें अनुमान होत होतें; त्यावरून तात्यांनीं मनांत आणलें कीं, जंगलांतील लुटारू लोकांनीं शेकण्यासाठीं मोठी आगटी पेटविली असेल. त्यांनीं मनांत आणलें कीं, "आपल्याजवळ जीं दोन लहान लहान पिस्तुलें आहेत, तीं कांहीं लुटारू लोकांजवळ लढाईची टक्कर देण्यास उपयोगी पडतील असें नाहीं." हे विचार त्यांच्या मनांत उद्भवताहेत तों मागून कोणी गाडीवाल्यास गाडी उभी करण्याचा हुकूम केला आणि तात्यांनीं गाडीवाल्यास "जलद हांक" ह्मणून सांगितलें. पण त्याच्यानें तें मान्य करवलें नाहीं. इतक्यांत मागून घोड्याच्या टापा ऐकूं येऊं लागल्या आणि थोड्याच अवकाशांत एक स्वार गाडीसमोर येऊन उभा राहिला आणि त्यानें मिरोबाला गाडी उभी करण्याचा हुकूम केला. तेव्हां "आतां बेतली," असें मनांत आणून तात्यांनीं जें पिस्तुल भरून तयार केलें होतें तें त्या स्वारावर सोडलें. बार निघून जातांच एका मनुष्याचा दुःखशब्द त्यांच्या कानावर पडला आणि तात्यांनीं डोकें गाडीबाहेर काढलें तों वामनरावाला तिरमिरी येऊन तो घोड्यावरून खालीं पडत आहे! तात्यांनीं गाडी उभी केली व त्या आपल्या नव्या मित्राला मदत करण्यासाठीं ते खालीं उतरले. त्याच्या हाताला गोळी लागली होती आणि तेथून रक्ताचा प्रवाह चालला होता, तरी तात्यांची धास्ती कमी व्हावी ह्मणून त्यानें "मला फार इजा झाली नाहीं." असें त्यांना सांगितलें. तात्यांनीं ह्या अकस्मात् घडलेल्या अपघाताबद्दल मोठ्या दुःखानें

वामनरावाजवळ क्षमा मागितली आणि सांगितलें कीं. "कोणी लूटारू समजून मीं पिस्तुल झाडलें." तात्या व मिरोबा यांनीं वामनरावाला सांवरून धरलें होतें, तों वामनरावाचा घोडा पळाला, त्याला आणावयासाठीं मिरोबा धांवत गेला. इतक्यांत तात्यांनीं दोन तीन हात रुमाल काढून वामनरावाच्या जखमेवर पट्टा बांधण्याचें काम चालविलें; पण त्यांच्या हाताला कंप असल्यामुळें तें बरोबर होईना; तेव्हां त्यांनीं अन्नपूर्णेला हांक मारली; पण त्यांना जबाब मिळाला नाहीं. तर ती गाडींत नव्हती काय? होती, पण तिला मूर्छना आली होती. म्हाताऱ्यानें दुसरी हांक मारली आणि जबाब नाहीं, असें होतांच तो वामनरावाला 'सांवरून बसा' म्हणून सांगून गाडीजवळ आला व पाहूं लागला तों मुलीला शुद्धि नाहीं! आतां? एकट्या म्हाताऱ्यानें दोघांची खटपट एकेच समयीं कशी करावी? त्यानें पाणी घेऊन येण्यासाठीं मिरोबाला पुष्कळ हांका मारल्या पण त्यांचा आवाज खडकावर आपटून तींच तीं उत्तरें त्यांना मिळूं लागलीं. वामनराव अन्नपूर्णेचें नांव वारंवार ऐकून व म्हातारा घाबरून मिरोबाला हांका मारीत होता; त्यावरूनच काय झालें होतें तें समजला आणि आपलें दुःख विसरून तो गाडीकडे धांवला. तों अन्नपूर्णा थोडथोडी सावध होत होती. तरी वामनरावानें पाहिलें कीं, अन्नपूर्णा आपल्या दुःखानें दुःखित होऊन मूर्छित पडली आहे! तेव्हां त्यानें फारच मृदु शब्दांनीं तिला सांगितलें कीं, "मला कांहीं विशेष इजा झालेली नाहीं." अन्नपूर्णा पूर्ण सावध होतांच तात्यांचे मन वामनरावाच्या जखमेवर पट्टा बांधण्याकडे लागलें. त्यांनीं दोन तीन रुमाल जोडून भला मजबुद पट्टा केला आणि वामनरावाच्या हाताला बांधला. नंतर त्याच्याच जवळ पुढील गांवाबद्दल त्यांनीं चौकशी केली; तों तें फार दूर नाहीं, असें त्यांना समजलें. तरी वामनरावाला गाडीचे धक्के सोसणार नाहींत आणि घोड्यावर बसण्यासारखी त्याची स्थिति नाहीं; असें जाणून ते त्याच ठिकाणीं मुक्काम करण्याचा विचार करूं लागले. पण

वामनरावानें पुढील गांवापर्यंत चालत जाण्याची उमेद बांधल्यावरून तात्याही त्याजबरोबर चालूं लागले. मिरोबानें वामनरावाचा घोडा धरून आणला व तो गाडीमागें बांधून चालविला. चालतां चालतां तात्यांनीं वामनरावास विचारलें—" तुम्हीं एकाएकीं इतक्या घाईनें कोणत्या कारणास्तव घोड्यावर बसून आलां ? " असें ऐकतांच वामनराव ह्मणाला—"आपल्या सुसंगतीनेंच मला इकडे पुनः येण्याची इच्छा उत्पन्न केली. आपणां शिवाय त्या भयंकर अरण्यांत मला करमेनासें झालें." तात्यांनीं आपल्या उतावळी बद्दल पुनः दिलगिरी दाखविली. तों मागें सांगितलेल्या आगट्यांच्या नजिक त्यांची गाडी आली. तों खरोखरच रामोशीलोक आगट्या पेटवून शेकत व स्वयंपाक करण्यांत गुंतलेले होते. त्यांचा उद्योग मार्गस्थांस लुटण्याचा हें उघडच. तात्यांच्या व वामनरावाच्या मनांत पुनः धास्ति उत्पन्न झाली. त्यांनीं एकेक पिस्तुल हातांत घेऊन तयारी केली आणि मिरोबाला गाडी लौकर हांकण्याचा हुकूम करून स्वतःही त्या रामोशांच्या टोळीकडे लक्ष्य ठेऊन पाय जलदीनें उचलूं लागले. तात्यांनीं आपणाकडून जरी इतकी सावधगिरी ठेविली; तरी तिचा मुळींच उपयोग झाला नाहीं. ते रामोशी आपल्याच नादांत असल्यामुळें त्यानीं यांच्याकडे लक्ष्यच दिलें नाहीं. गाडी सुमारें एक कोस पुढें गेल्यावर एक धर्मशाळा दिसली व तेथेंच मिरोबानें बैल उभे केले. कांहीं वेळानें वामनरावासह तात्याही त्या ठिकाणीं आले आणि त्याच ठिकाणीं वस्तीस राहिले.

बिऱ्हाडची व्यवस्था लागतांच तात्यानीं गांवांत जाऊन एका वैद्याला बोलावून आणलें. त्यानें आपल्या गांवढळ रितीप्रमाणें वामनरावाचा हात तपासून " सुदैवानें गोळी हाडाला किंवा शिरेला लागल्या शिवाय केवळ मांसांतूनच निघून गेली आहे, " असें सांगितलें आणि जखमेवर मलमपट्टी मारून वामनरावाला "कांहीं दिवस अगदीं हालचाल करूं नका." असें सांगून मार्ग धरला.

नंतर जरी पुष्कळ उशीर झालेला होता; तरी तात्या धर्मशाळेंतील रखवालदारास बरोबर घेऊन बाजारांत गेले आणि अन्नपूर्णा एकटी राहिल्यामुळें वामनरावाजवळ जाऊन गोष्टी सांगत बसली. त्यांनीं जे नैसर्गिक देखावे पाहिले होते; त्यांच्याच गोष्टी चालविल्या आणि एकमेकांची कवितेविषयींची आवड एकमेकांस जाहीर केली. त्या वेळीं अन्नपूर्णा वामनरावाबरोबर बोलण्यास फारच उत्सुक आहे, असें पाहणारास वाटावें, पण तें पाहण्यासच कोणी नवतें. असो. तात्या बाजारांतून आल्या नंतर जेवणाची तयारी झाली आणि भोजनोत्तर सर्वांसच मार्गश्रम झालेले असल्यामुळें सर्वच निजून राहिलीं. वामनराव दुखणाईत असल्यामुळें त्याच धर्मशाळेंत त्यांना फार दिवस मुक्काम करावा लागला; पण तितक्या दिवसांत तात्यांनीं वामनरावाच्या चाली रीतिबद्दल फार कसोशीनें आपली खात्री करून घेतली. त्यांनीं वामनरावाजवळ भोळेपणा, निष्कपटपणा, दातृत्व, सहनशीलता, ईश्वराविषयीं आस्तिक्य बुद्धि व नैसर्गिक स्थितीची आवड इत्यादिक अनेक सद्गुणांचा पूर्ण संग्रह आहे, असें पाहिलें आणि वामनरावाची प्रकृति नीट होई तों पर्यंत प्रवास करण्याचा विचार त्यांनीं रहित केला. वामनरावाच्या सुशीलपणाकडे पाहून तात्या आपल्या मनाजवळ वारंवार ह्मणत असत कीं, "ह्या तरुण गृहस्थानें पुणें किंवा मुंबई हीं शहरें कधींच पाहिलीं नसावीत" असो. वामनरावाची प्रकृति नीट होतांच त्यांनीं आपला प्रवास पुढें आरंभिला आणि आपल्या बरोबर "वामनरावानेंही यावेंच" अशी उत्कट इच्छा दर्शवून त्यांनीं त्याला बरोबर घेतलें. गोष्टी निघतां निघतां वामनराव, तात्याच्या गांवाजवळच्याच एका अव्रूदार घराण्यांतील मुलगा आहे." असें आत्मारामतात्यांस कळून आलें आणि वामनरावाच्या बापाची व तात्यांची ओळखही निघाली; त्यामुळें तो त्या वृद्धास फारच प्रिय झाला.

मिरोबा गाडीवानानें गाडी जोडतांच आमचें प्रवाशी कुटुंब पुन: प्रवास करूं लागलें. मार्गांत उंच सखल चढणी व उतरणी

आल्या, ह्मणजे सर्वांनीं गाडींतून उतरून चालूं लागावें, आत्मारामतात्यांस वनस्पतिविद्येचा नाद असल्यामुळें ते नवीन रोप्यांच्या शोधास जात असत व अन्नपूर्णा आणि वामनराव अरण्यांतील नैसर्गिक देखावे व चमत्कार पाहण्यासाठीं आसपास फिरत असत. वामनराव अन्नपूर्णेस वरचेवर नवे नवे चमत्कार दाखवून तिला आवडणारीं गाणीं ह्मणत असे, पण जेव्हां सगळ्या गोष्टी संपत; तेव्हां अन्नपूर्णा खालीं पाहून मुकाट्यानें चालत असे आणि तिच्या गुलाबी गालांवरील खुशालीच्या ओळी वामनराव बारीक दृष्टीनें तपाशीत असे. जेव्हां जेव्हां अकस्मात् एकादा चमत्कार पाहून अन्नपूर्णा त्याकडे वामनरावाच्या मनोवृत्ति ओढून घेण्याचा यत्न करी; तेव्हां तेव्हां तिच्या मुखातून सुगंधिक शब्दसुमनें पटापट बाहेर पडत आणि त्यांच्या प्रीतिसुगंधावर वामनरावाचें मन भ्रमराप्रमाणें लगटून रहात असे. ह्या दोघांहीं तरुणांस बहुतकरून जगांतील अवगुणांचा वाराही लागला नव्हता, असें ह्मटलें तरी चालेल. तें तरुण जोडपें अरण्यांतील नैसर्गिक चमत्कार पाहून समाधान मानीत असतां त्यांच्याकडे पाहणारास असें वाटावें कीं, ईश्वरानें या दोघांस हे स्वभावसिद्ध चमत्कार पाहण्यासाठींच उत्पन्न केलें आहे. त्यांनीं संसारसुखाचा दीर्घ अनुभव घेतला असावा, असेंही वाटण्यासरखी त्यांची स्थिति नव्हती.

एके दिवशीं तीं सर्व प्रवासी मनुष्यें गाडींतून उतरून चमत्कार पहात चालत असतां मिरोबा त्यांच्या मागून हळू हळू गाडी आणीत होता. तों "आपण मार्ग चुकलों आहों!" असें एकाएकीं त्यांच्या लक्ष्यांत आलें आणि वामनराव मिरोबास मोठ्यानें हांका मारूं लागला; पण त्याचाही जबाब परत मिळेना. याप्रमाणें वामनराव, तात्या आणि अन्नपूर्णा हीं तिघेंही संकटांत असतां तेथें दोन महावृक्षांच्या मध्यभागीं एक झोंपडें वामनरावाच्या दृष्टीस पडलें आणि "त्यांतील राहणारास मार्ग विचारावा," अशा उद्देशानें तो त्या झोंपडीजवळ गेला. तेथें दरवाज्यांत दोन लहान लहान मुलें खेळत होतीं. वामनरावानें त्या

झोंपडीच्या जवळ जाऊन आंत डोकावून पाहिलें, पण कोणीही मोठें मनुष्य त्याला दिसेना. तेव्हां त्यानें त्या मुलांसच विचारलें. तेव्हां त्याला असें कळलें कीं, त्यांचा बाप ढोरें चारण्यासाठीं गेला आहे आणि आई शेतांत गेली असून ती लौकरच येणार आहे. **वामनरावास** इतकें समजतांच तो मागें फिरला. इतक्यांत पर्वताच्या शिखरावरून **गिरोबा** हांका मारीत होता, त्या **वामनरावानें** ऐकल्या, तेव्हां तो धांवतच आधीं गाडीजवळ गेला. **वामनरावास** पाहतांच **गिरोबानें** त्याजवर शब्दांचा तोशेरा झाडला. तरी **वामनरावानें** स्वतः शांतपणा धरून **गिरोबासही** मृदुवचनांनींच शांत केलें आणि जेथें **अन्नपूर्णा** व **तात्या** हीं दोघें बसलीं होतीं, "तेथें गाडी घेऊन चल." असें सांगितलें. तरी रस्ता फारच कठीण होता व तशा चढणी चढून **अन्नपूर्णा** व **तात्या** यांस येववेल असें नव्हतें, ह्मणून **वामनराव** सोपा रस्ता शोधूं लागला. इकडे **वामनराव** परत येत तोंपर्यंत **तात्या** व **अन्नपूर्णा** हीं दोघें त्या झोंपड्याच्या दारांत एक घडवंची ठेवली होती, तीवर जाऊन बसलीं. तेथें बसल्यावर **तात्यांनीं** **अन्नपूर्णेस** एक गाणें ह्मणायाला सांगितलें, तें तिनें लागलेंच आरंभिलें. इतक्यांत **वामनराव** आला आणि तें गाणें ऐकत दूर उभा राहिला. गाणें पुरें होतांच त्यानें त्यांच्याजवळ येऊन **गिरोबाला** शोधून काढल्याचें वर्तमान सांगितलें. आणि दोघांस एका सोप्या मार्गानें वर घेऊन जाण्याचा इरादा दाखविला. पण **अन्नपूर्णेनें** आपल्या बापाचा अशक्तपणा जाणून "थोडासा फराळ करून मग वर जावें." अशी आपली इच्छा प्रकट केली. **वामनरावानें** सांगितलें कीं, "थोडीशी चढण चढून जातांच उत्तम प्रकारचे स्वतःसिद्ध देखावे दृष्टीस पडतील. त्या ठिकाणीं गेल्यावर फराळ करायालाही चांगलें!" असें ऐकतांच **अन्नपूर्णा** व **तात्या** उठून **वामनरावाच्या** मागून चालूं लागले. इतक्यांत एक बाई त्या झोंपडीजवळ आली व त्या दोन्ही मुलांस पोटाशीं धरून रडूं लागली. तरी तिनें **तात्या** वगैरे परकी माणसांस पाहतांच आपले डोळे पुसले. पण तितक्यांत

तात्यांनीं तिच्याकडे पाहिलें आणि रडण्याचें कारण विचारिलें. तेव्हां त्यांस असें कळलें कीं, त्या बाईचा नवरा दुसऱ्यांचीं गुरें राखीत होता, त्यांतील कांहीं गुरें कोणीं चोरून नेलीं. त्यामुळें त्या दोघांनीं आपल्या मुलांबाळांसाठीं जो कांहीं अल्प संचय केला होता, तो त्या चोरीस गेलेल्या गुरांसाठीं द्यावा लागेल. ह्मणून ती बाई दुःख करीत होती. हें वर्तमान सांगत असतां त्या बाईचें हृदय पुनः भरून आलें, तिच्यानें पुढें बोलवेना व अश्रुपात केल्याशिवाय राहवेना. त्या बाईची ती स्थिति पाहतांच तिघांसही तिची दया आली व त्यांनीं त्या ढोरांची किंमत तिला विचारली. नंतर प्रत्येकानें आपआपल्या जवळचे थोडथोडे पैसे त्या बाईला देऊन तिचें शांतवन केलें, आणि तिघेही पुढें चालूं लागलीं. पण तितक्यांत दोघांचाही डोळा चुकवून वामनराव पुनः त्या बाईजवळ गेला आणि तिच्या हातांत एक नाण्यानें भरलेली थैली देऊन आनंदयुक्त मुद्रेनें परत फिरला. याप्रमाणें त्यानें आपल्याकडून जरी तें त्या दोघांच्या न कळत केलें होतें; तरी तात्या व अन्नपूर्णा यांनीं त्याचें तें परोपकाराचें कृत्य पाहिलें होतें. त्यामुळें वामनराव हास्यमुखानें त्यांच्याजवळ येतांच तात्यांनीं त्याला विचारलें, "वामनराव, आज तुह्मांला इतका आनंद कसला झाला आहे?" वामनराव त्या गोष्टीची उडवाउडव करण्यासाठीं ह्मणाला—"आजचा हा दिवस फारच आनंददायक आहे असें मला वाटतें." तात्या "वामनराव गोष्ट उडवीत आहे" असें जाणून ह्मणाले, "पण आजचा हाच दिवस त्या एकलकोंड्या व अप्पलपोट्या श्रीमंतांच्या मनानें कसा असेल, हें तुमच्या लक्षांत आहे काय? खरोखर परोपकारांनीं उत्पन्न झालेली शांति त्यांच्या हृदयानें कधींच अनुभवलेली नसते. तर वामनराव, तुह्मी धन्य आहां. तुमच्या शिरावर परोपकारभास्कर सदोदित प्रकाश करो आणि तुमची ही अशीच बुद्धि ईश्वर दृढ राखो." याप्रमाणें तात्यांनीं निर्मळ अंतःकरणानें आशीर्वाद देतांच वामनरावास आपल्या गुप्त कृत्याचें फळ मिळालें असें वाटलें. असो. तिघेही

बोलतचालत विकट मार्ग ओलांडून एका हिरव्यागार टेंकडी-वर येऊन उभीं राहिलीं. नंतर त्या ठिकाणीं सर्व प्रकारें रम्य देखावा आहे, असें पाहून तिघेंही तेथील एका झऱ्यावर फराळ करण्यासाठीं बसलीं.

---

## प्रकरण चौथें.

श्लोक—भुजंग प्रयात.

कळेना कसा दैव घालील घाला ॥
अकस्मात जाईल सारें लयाला ॥
तरी शील माझें जगन्मान्य राहो ॥
कदा दोष माझ्या मुखासी न पाहो ॥ १ ॥

फराळ आटपल्यावर तीं सर्व माणसें आपल्या मार्गास लागलीं, आणि आतां तर तीं एका मोठ्या शहराच्या पहाडी हद्दीवर येऊन दाखल झालीं. तेथील गांवठी माणसें फारच सभ्य असल्यामुळें त्यांनीं आमच्या प्रवाशांस रात्रीं राहण्यासाठीं उत्तम प्रकारची जागा दाखविली आणि त्यांचा चांगला पाहुणचार केला. तरी वामनराव आणि अन्नपूर्णा यांस त्या रात्रीं कांहीं चांगली निद्रा आली नाहीं. कारण दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं त्यांचा वियोग होणार होता. वामनरावाची प्रकृति आतां चांगली दुरुस्त झाली होती; ह्मणून तात्यांच्याबरोबर त्यानें आणखी कांहीं दिवस रहावें असा प्रकार उरला नव्हता. तात्यांनीं त्याला जरी महाबळेश्वरापर्यंत येण्याचा आग्रह केला, तरी अधिक राहण्यांत कांहीं फायदा नाहीं, असें त्यानें पाहिलें-व त्यामुळें त्यानें दुसऱ्या दिवशीं त्यांना सोडून निघण्याचा निश्चय केला.

प्रातःकालीं उठल्यानंतर मुखमार्जनादि नित्यविधि आटपल्यावर तीं तिघेंही भोजनास बसलीं. तात्यांच्या मुखावर अजून दुःखाची कळा दिसतच होती व अन्नपूर्णेच्या मुखावर दिलगिरी स्पष्ट उमटलेली भासत होती. त्यांचा भोजनविधि आटपल्यावर गोष्टी चालल्या होत्या, तों गाडीचा खडखडाट ऐकूं आला आणि वामनराव

आपल्या जाण्याची तयारी करण्यासाठीं जाग्यावरून उठला. खरें पाहतां वाजलेली गाडी तात्यांचीच होती, तरी वामनरावाचा निघण्याचा वेळ जवळ आला होता. ह्मणून तो जेव्हां तात्यांच्या महालाकडून जाईल तेव्हां त्यानें त्यांची भेट अवश्य घ्यावी असें तात्यांनीं त्याला सांगितलें. आणि तें वामनरावानें मोठ्या आनंदानें कबूल केलें. तात्यांचें सांगणें कबूल करीत असतां वामनरावानें सहज अन्नपूर्णेवर नजर फेंकली आणि अन्नपूर्णेनें ओढूनताणून हास्यवदन केलें. नंतर तीं सर्व बाहेर पडलीं. तात्या पुढें चालूं लागले व त्यांच्या मागून वामनराव आणि अन्नपूर्णा हीं दोघें मुकाट्यानें निघालीं. दाराबाहेर मिरोबानें जोडून आणलेल्या गाडींत तात्या व अन्नपूर्णा हीं दोघें बसलीं व वामनराव गाडीच्या दाराजवळ उभा राहिला. पण तिघांतून एकाच्यानेंही शेवटच्या निरोपाबद्दल शब्दोच्चार करवेना. अखेर तात्यांनीं तो कटु शब्द बाहेर काढण्याचा धीर केला; तेव्हां अन्नपूर्णेनें कोमल स्वरानें वामनरावांस "ओळखदेख ठेवा." असें सांगितलें आणि वामनरावानें तें मोठ्या आनंदानें कबूल केलें.

गाडी चालूं लागली. आमचीं दोन्हीं मुशाफर माणसें थोडा वेळ अगदीं गपचूप बसून होतीं, पण शेवटीं तात्या बोलूं लागले,—"हा तरुण पुरुष वामनराव, पुढें अब्रूदार व नामांकित निपजण्याचें चिन्ह स्पष्ट दिसत आहे. आज कित्येक वर्षे झालीं; मी कोणत्याहि मनुष्याबरोबर इतक्या लौकर सख्य केलें नाहीं. फार काय सांगावें? तरुणांच्या दुष्कर्मांचा कंटाळा करून मी त्यांच्याजवळ बोलतही नसें. पण ज्या वेळेस मला प्रत्येक वस्तु व गोष्ट नवीच आहे असें वाटत असे, आणि त्या अनुभवानें हर्षच होत असे, त्या माझ्या तारुण्याचें ह्या तरुणानें मला हुबेहुब चित्र दाखविलें." असें बोलून तात्या विचारांत गर्क झाले. असें पाहून अन्नपूर्णेनें आपलें डोकें गाडींतून बाहेर काढलें व मागें पाहिलें तों वामनरावाचें हास्यवदन तिच्या दृष्टीस पडलें. वामनराव अद्याप त्याच जाग्यावर उभा होता, तेव्हां त्यानेंही अन्नपुर्णेकडे पाहिलें व दोघांची दृष्टि

एक होतांच त्यांतून गुप्त प्रीतिसूर्याची किरणें स्पष्ट चमकूं लागलीं. त्यानें आपला हात वर करून स्वस्थ मनानें जाण्याची खूण दिली. ती पाहतांच अन्नपूर्णेनेंही आपला रुमाल उडवून हास्यवदनानें त्याला " यावें, यावें ! " असें दर्शविलें; आणि तो दिसत होता तोंपर्यंत रुमाल तसाच उडवीत राहिली.

" मी लहान होतों, त्या वेळचें मला स्मरण आहे कीं, " तात्या पुनः बोलूं लागले— " मीही ह्या तरुणाप्रमाणेंच अहोरात्र आनंदानुभव घेत होतों. त्या वेळेस दुनियेंतील दरवाजे माझ्यासमोर उघडे होते. आतां ते बंद होताहेत ! "

हे शेवटचे शब्द उच्चारीत असतां तात्यांच्या नेत्रांतून अश्रुपात झाला. तेव्हां अन्नपूर्णा कांपत कांपत ह्मणालीः— "तात्या, तात्या, आपण एव्हांशींच असें बोलूं नये ! आपणांस अजून आपल्या सुखासाठीं—माझ्या स्वतःच्या सुखासाठीं पुष्कळ दिवसपर्यंत वांचायाचें आहे. "

" हा ! होय, प्रिय कन्ये, तुझ्या सुखासाठीं मला जगलेंच पाहिजे ! मीही असेंच समजतों. " असें तात्या डोळे पुशीत ह्मणाले.

तरी पुन्हा त्यांच्या सुरकुतलेल्या गालांवरून अश्रूंची धार चालू झाली व ती त्यांनीं पुनः पुसली आणि हास्यवदन करून ते ह्मणाले,—" एक वृद्ध मनुष्य जेव्हां तारुण्यांतील निर्दोष मौजांचें स्मरण करतो, तेव्हां त्याला पुष्कळ हुशारी येते, व तो आपणास ' पुनः तरुण झालों ' असें मानीत असतो. ईश्वरानें मनुष्यांत जर स्मरणशक्ति ठेवली नसती, तर त्यानें दुःखांच्या वेळीं सुखाचें व सुखाच्या वेळीं दुःखाचें स्मरण केलें नसतें. मला माझ्या तारुण्याचें चांगलें स्मरण होतें; त्या वेळेस असें वाटतें कीं, मीही असाच आनंदांत काळ घालविला आहे. थंडीच्या ऋतु नंतर वसंत जसा मनाला आनंदप्रद होतो, तसा आनंद मला माझ्या पूर्वकृति आठवून होत आहे. "

अन्नपूर्णा, जी प्रीतीनें तात्यांचा हात धरून त्यांच्या तोंडाकडेच पहात व त्यांचा प्रत्येक शब्द ऐकत बसली होती; ती

"तात्या वामनरावास नांवाजीत आहेत" असें जाणून फार हर्ष पावली. तिनें आजपर्यंत इतक्या प्रीतीनें कोणाचेंही वर्णन ऐकलें नव्हतें. फार काय सांगावें? तिला तिच्या स्वतःच्या वर्णनापासूनही कधीं जो आनंद झाला नव्हता; तो आपला बाप वामनरावाला वाखाणीत आहे, असें पाहून झाला. असो.

आतां तीं दोघें द्राक्षांचे मंडप, जंगलें व हिरव्या गार बागा मागें टाकीत जाऊं लागलीं. कांहीं वेळानें गाडींतल्या गाडींतच तात्यांस स्वस्थ झोंप लागली आणि अन्नपूर्णा आपलीं आवडतीं पुस्तकें वाचीत बसली. त्यांतही जीं पुस्तकें वामनरावानें मोठ्या प्रेमानें मागून घेऊन वाचलीं होतीं, तीं तिला फारच अपूर्व वाटत! खरेंच आहे. आपल्या प्रियकरानें प्रीतीनें पाहिलेल्या वस्तु पाहूनही मनुष्याला आनंद होणें स्वाभाविक होय! वामनरावाच्या प्रीतींतील पुस्तकांपैकीं एक न सांपडल्यामुळें अन्नपूर्णा क्षणभर खिन्न झाली; परंतु शोधीत असतां एक वामनरावाचेंच पुस्तक तिच्या पुस्तकांत मिसळून राहिलेलें तिला मिळालें! ज्यांतील कित्येक कविता वामनरावानें तिला स्वतः वाचून अर्थही सांगितला होता; आणि ज्यांतील कित्येक स्त्रीनीतिपर श्लोक तिनें तोंडपाठ केले होते. तें पुस्तक हातीं येतांच आधीं सुंदर अक्षरांनीं लिहिलेलें वामनरावाचें नांव तिच्या दृष्टीस पडलें.

तें पुस्तक हातांत घेऊन ती भोळी मुलगी फार खोल विचारांत पडली. तिच्याबद्दल त्या वेळेस जर दुसरें कोणी असतें; तर त्यानें असा निश्चय केला असता कीं, हें काम वामनरावानें मुद्दाम आपलें प्रेम तिला दर्शविण्यासाठीं केलें. असो. अन्नपूर्णेस तसें कांहींच वाटलें नाहीं; तरी तिनें कांपऱ्या हातानें तें पुस्तक उघडलें आणि पाहिलें तों ज्या कविता वामनरावानें तिला वारंवार ऐकविल्या होत्या, त्यांवर त्यानें खुणा करून ठेविलेल्या दिसल्या, त्यांशिवाय ज्यांतून स्त्रीपुरुषांच्या प्रेमाचेंच वर्णन आहे, अशीं कित्येक गाणीं त्यानें तिला ऐकविलीं नव्हतीं, तरी त्या प्रत्येकावर कवितेच्याच दोन दोन ओळी स्वतः लिहून त्यांत अन्नपूर्णेचें नांव

त्यानें मोठ्या चातुर्यानें गोंविलें होतें. तो प्रकार जेव्हां तिनें बघितला, तेव्हां मात्र मनांत आणलें कीं, "वामनरावांनीं पुस्तकांची अदलाबदल मुद्दाम केली." हे विचार मनांत येत असतां मूर्तिमंत वामनराव हास्यवदन करून आपल्यापुढें उभा आहे, असें तिला वाटूं लागलें, आणि त्याबरोबर तिच्या मनांतलि प्रीतिसागरास अपरंपार भरती आली.

गाडी सायंकालपर्यंत वेगानें चालत असतां दिवे लागणीच्या सुमारास ती एका गांवांत आली. त्या गांवांत तात्या आपल्या एका मित्राकडे जाऊन उतरले. त्या ठिकाणीं त्यांच्या मेव्हण्याकडील कांहीं पत्रें मिळण्याचा संभव होता. गांवांत जाऊन राहिल्यावर तात्यांस प्रयास न पडतां तीं पत्रें मिळालीं; पण त्यांतील कांहीं उघडून वाचून पाहतांच त्यांच्या मनाला खिन्नता उत्पन्न झाल्या कारणानें त्यांजवर कालिमा दिसूं लागली. अन्नपूर्णेनें तो प्रकार जाणून मोठ्या प्रेमानें "तात्या, काय झालें?" असें विचारलें; पण त्याचें उत्तर अश्रुपाताशिवाय दुसरें कांहीं मिळालें नाहीं. त्यामुळें ती सगळी रात्र अन्नपूर्णेला विचारांत गुंतून घालवावी लागली.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं त्यांनीं तें गांव सोडलें व पुढचा मार्ग धरिला. गाडींत बसल्यावर अन्नपूर्णेनें रात्रीची गोष्ट तात्यांला पुनः विचारली, व ती गोष्ट न कळल्याबद्दल आपली दिलगिरी त्यांना स्पष्ट दाखविली. तेव्हां तात्या आपली गुप्त गोष्ट तिला सांगण्यास तयार झाले. ते ह्मणाले:—"मुली, ज्या गोष्टी तुला पुढें कळून दुःख झालें असतें, त्या ह्या वेळेस न कळून होत आहे. असें जर मला स्पष्ट दिसतें, तर तुला त्या गोष्टी सांगण्यास आतां विलंब करणें नीट नव्हे. बये, मी तुझ्या मामाची शेवटची भेट घेतली, त्या वेळेस त्यानें मला ज्या गोष्टी सांगितल्या होत्या, त्या शेवटीं खऱ्या ठरल्या. मोरोबाचें नांव तूं माझ्या तोंडानें पुष्कळदां ऐकलें असशील; पण तुला अजून ठाऊक नाहीं. मी आपली सगळी संपत्ति त्याच्याजवळ गहाण ठेवली आहे. माझा त्याच्यावर फार वि-

श्वास बसला होता व त्याप्रमाणें अजूनही आहे. परंतु कांहीं घोर प्रसंगामुळें तो सर्फ बुडाला आहे आणि आज त्याच्याबरोबर मीही अगदीं बुडालों!" हें बोलत असतां तात्यांचें हृदय भरून आलें व ते क्षणभर स्वस्थ राहून पुन: सांगूं लागले.

"जीं पत्रें काल मला मिळालीं, त्यांत मोरोबाकडीलही पत्रें आहेत व त्यांवरून तो व्यापारांत बुडाल्याचा पुरावा होत आहे."

"तर काय हेळवांकांतील आपला वाडाही आपणांस आतां सोडावा लागेल?" असा अन्नपूर्णेनें त्यांस प्रश्न केला.

"त्याबद्दल ह्या वेळेस कांहीं सांगतां येत नाहीं." तात्यांनीं उत्तर दिलें. "आतां मोरोबा आपल्या मागणारांजवळ जशा कबुलायती करील, तसें आपणांस वागावें लागेल. मुली, माझें उत्पन्न आणि मिळकत फार होती असें नाहीं, हें तुला ठाऊक आहे. आतां तर ती फारच थोडी होणार आहे. आतां माझें काय आहे? तरी हें सर्व तुझ्यासाठीं—अन्नपूर्णे, तुझ्यासाठीं माझ्या मनांत येत आहे. मी बुडालों आणि तूं दरिद्री झालीस!" हें बोलत असतां पुन: त्यांचें हृदय भरून आलें व त्या म्हाताऱ्याच्यानें पुढें बोलवेना! तेव्हां अन्नपूर्णा त्यांचें दु:ख कमी होण्यासाठीं ह्मणाली,—"तात्या, आपण माझ्यासाठीं किंवा आपणांसाठींही कधीं दिलगीर होऊं नये, असें माझ्या पोरबुद्धीला वाटतें. आपण अजून सुखीच आहों. आपला हेळवांकचा नुसता वाडा जरी आपल्या ताब्यांत राहिला, तरी आपण सुखी आहों, यांत संशय नाहीं. कामासाठीं अधिक चाकर माणसें न ठेवतां एकच ठेऊन राहिलों, ह्मणजे आलें तेवढेंच उत्पन्न आपणांस पुष्कळ होईल. मी थोडें अंगमोडून काम करीन आणि कोणतीही अडचण पडूं देणार नाहीं. तर तात्या आतां आपण अगदीं दु:ख करूं नये. आपण आजपर्यंत जर उगीच पोकळ डामडौलानें वागलों असतों; तर मात्र आपणांस पुढें अडचणींत पडण्याचा संभव होता. पण तसा प्रकार मुळींच नाहीं. आपणांस गरीबी जरी आली, तरी ती आपलें प्रेमसुख लुटून

नेणार नाहीं, आणि आपला हलकेपणाही कधीं लोकांत उघड करणार नाहीं अशी माझी खात्री आहे."

या बोलण्यावर तात्यांच्यानें कांहीं बोलवलें नाहीं, त्यांनीं तिला आपल्या हृदयाजवळ प्रेमभरानें दाबून धरलें आणि त्या प्रसंगीं दोघां-च्याही नेत्रांतून निर्मळ प्रीतिजीवनाचा झरा वाहूं लागला. तरी तात्यांच्या मनांत विवेक उत्पन्न झाल्या कारणानें त्यांनीं फार थोडा वेळ तशी स्तब्धपणाची शोचनिय स्थिति ठेविली आणि पुन्हां इकडचें तिकडचें बोलणें बोलून त्यांनीं आपल्या मुलीचें शांतवन करून स्वत: तिचे डोळे पुसले.

---

## प्रकरण पांचवें

आर्या.

क्रूर भयंकर मोठीं,वसती भूतें अशा वनीं आलों ॥
फसलों धीर न धरवें काय करावें खरोखर निमालों ॥ १ ॥

तात्यांस त्यांच्या मेव्हण्याकडील पत्रें मिळतांच, त्यांचा महाब-ळेश्वरास जाऊन राहण्याचा जो पूर्वींचा बेत होता, तो त्यांनीं रहित केला आणि रत्नागिरीस त्यांचा एक सधन मित्र रहात होता; त्याच्याकडे ते निघाले. ते बहुत दिवसपर्यंत प्रवास करून कोंक-णांत उतरले. त्या जाण्यांत त्यांस विनाकारण फार मोठा फेरा पडला. तरी त्यांच्या वैद्यानें त्यांस "प्रवास करून निरनिराळ्या ठिकाणची हवा घ्या" असें सांगितलें होतें, ह्मणून त्यांनीं जाणून-बुजूनच तितका फेरा घेतला, असेंही ह्मटलें तरी चालेल. असो. कसेंही असलें तरी त्यांनीं असा विलक्षण प्रवास पत्करला; पण त्या-पासून त्यांच्या वार्धक्यांतील प्रकृतीस फार श्रम झाले आणि वैद्यानें जो रोग जाण्यासाठीं उपाय ह्मणून योजला होता, तोच दुर्दैवानें अपाय झाला !

आत्मारामतात्या समुद्रकांठानें प्रवास करीत फिरत असतां एके दिवशीं पूर्वरात्रीं अस्ताचलाकडे चाललेल्या चंद्राचीं किरणें पा-ण्याच्या झळकत्या सपाटीवर कांपत होतीं; आणि दूरच्या पर्वता-

वरील सोनेरी प्रकाश अतित्वरेनें गुप्त होत होता. तों तात्यानीं मिरोबास " गाडी उभी कर." असें सांगून विचारलें:— " येथून गांव किती दूर आहे, याचा तुला अदमास आहे काय ? " " दहा कोस महाराज !" असें मिरोबानें उत्तर दिलें.

" मला वाटतें कीं, आतां माझ्यानें पुढें येववणार नाहीं." तात्या ह्मणाले:—" गाडींत बसण्याचे श्रम मला सहन होत नाहींत; यासाठीं मार्गांत जर आपणांस राहण्यासारखी धर्मशाळा, अथवा दुसरी एकादी जागा असेल तर चौकशींत रहा."

इतकें बोलून ते पुन्हा गाडींत आडवे पडून राहिले. मिरोबानें चाबुक वाजवून बैलांस इशारा करितांच ते वेगानें चालूं लागले; तेव्हां तात्यांनीं पुन्हा गाडी थांबवून मार्गानें जाणाऱ्या एका गांवढळ मनुष्यास " आह्मांस कोठें उतरण्यासारखी जागा आहे काय ?" असे विचारलें.

" मला काहीं ठाऊक नाहीं." त्या मनुष्यानें मोठ्या तोऱ्यानें सांगितलें—" ह्या मैदानांत एक वाडा आहे खरा; पण तेथें तुह्मांला उतरायाला कोणी जागा देईल असें मला वाटत नाहीं. शिवाय त्या वाड्याचा रस्ताही मला ठाऊक नाहीं. कारण कीं, मीहि येथें नवीनच आलों आहे. "

तात्या त्या मनुष्याजवळच त्या वाड्याविषयीं कांहीं अधिक चौकशी करणार होते; पण तो मिजासखोर कुळंबी आपल्या डौलांत त्यांची पर्वा न करितां पुढें निघून गेला.

तात्यांनीं मिरोबाला गाडी पुढें चालवायाला सांगितलें. त्याला क्षणोक्षणीं मार्ग चुकण्याचें भय वाटत असे. कारण:—अंधार पडत चालला होता, व रात्र तर मोठ्या त्वरेनें वाढत होती.

इतक्यांत दुसरा एक कुळंबी मार्गानें चाललेला मिरोबाच्या दृष्टीस पडतांच त्यानें त्याला " या मैदानांत एक वाडा आहे त्याचा रस्ता कोणता रे बाबा? " असें विचारिलें.

"मैदानांतील वाडा ?" तो कुळंबी आश्चर्यानें विचारूं लागला:— " तुह्मीं काय त्या गच्चीच्या वाड्याबद्दल चौकशी करतां ?"

"गच्चीबिच्ची मला ठाऊक नाहीं." मिरोबा त्रासून बोलला:—"मी हें या झाडींतून दूर सफेत दिसतें तें काय आहे? असें तुला विचारतों."

"अरे हो, तीच सफेत गच्ची; कां? तुह्मीं लोक कोण आहां? तेथें जाऊन राहणार आहां कीं काय?"

असा विलक्षण प्रश्न ऐकतांच तात्यांनीं गाडींतून डोकें बाहेर काढलें आणि ते त्या कुळंब्यास ह्मणाले:—"अरे बाबा, आह्मीं प्रवासी आहों. रात्र झाली आहे, ह्मणून कोठें तरी उतरण्यासाठीं जाग्याचा शोध करीत आहों."

"नाहीं महाराज, येथें या रानांत तुह्मांला रात्रभर रहायाला जागा मिळणार नाहीं."

"तर मग तो वाडा आहे तो कोणाचा आहे?" असें तात्यांनीं त्या कुळंब्याला पुनः विचारिलें.

"कोणाचा आहे हें मला ठाऊक नाहीं?"

"तर काय तो ओसाड आहे?"

"नाहीं महाराज, मला वाटतें कीं, तो वाडा संभाळणारा एक कारभारी व त्याची बायको त्या ठिकाणीं राहत असते."

असें ऐकतांच तात्यांनीं तेथें जाण्याचा बेत केला आणि त्या कुळंब्यास कांहीं देऊं करून त्या वाड्याचा रस्ता मिरोबाला दाखवायाला सांगितलें. पण त्यानें थोडा वेळ विचार केल्यासारखें करून "मला काम आहे, रस्ता दाखवीत तेथ पर्यंत येण्यास मला फुरसत नाहीं." असें सांगितलें. तरी "जर गाडीवाला उजव्या हातानेंच दोन बाजूंनीं लावलेल्या झाडांच्या मधून जाईल तर [illegible]कणार नाहीं." असें बोलून तात्या जरी [illegible], पण त्या[illegible]बोलणार होते, तरी तिकडे [illegible] श्रम झाले आणि वैद्यानें ह्मणून तो चा[illegible] उपाय ह्मणून योजला होता, तोच दुर्दैवानें [illegible]ला!

आत्मारामतात्या समुद्रकांठानें प्रवास करीत फिरत असतां एके दिवशीं पूर्वरात्रीं अस्ताचलाकडे चाललेल्या चंद्राचीं किरणें पाण्याच्या झळकत्या सपाटीवर कांपत होतीं; आणि दूरच्या पर्वता-

उतरून तो उघडला आणि पुन: धुरेवर बसून बैल हांकूं लागला. गाडी चालतां चालतां दोन्हीं बाजूनें लागलेल्या उंच सुरूच्या झाडांतून जाऊं लागली. त्याशिवाय गगनचुंबित नारळी त्या काळोखाच्या सर्वत्र शांत समयीं फार भयंकर दिसत असत. तो सर्व देखावा दृष्टीस पडतांच अन्नपूर्णा धास्तीनें पांढरी शुभ्र होऊन जागच्या जागीं थरथर कांपूं लागली. वाटेंत भेटलेल्या कुळं- ब्यानें जें संशय उत्पन्न होण्यासारखें भाषण केलें होतें; त्याचा भयंकर ठसा त्या कोमल अबलेच्या मनावर पूर्णपणें उमटला होता! आणि आतांतर त्यांची ती गाडी भरगच्च झाडीमुळें झा- लेल्या पूर्ण काळोखांतून चालली आहे. महा वृक्षांच्या मोठमो- ठ्या भयंकर खांद्या अगदीं हालचाल न करतां जागच्या जागीं शांत आहेत. तरी मधून मधून झाडींतून कोणी धांवत जात असल्याप्रमाणें पावलांचा पडसाद सुकलेल्या पाल्यावर पाय पडून ऐकूं येत आहे, तों मिरोबानें एकदम गाडी उभी केली आणि त्याचें कारण विचारण्यासाठीं तात्यांनीं गाडीच्याबाहेर तोंड काढलें, तेव्हां त्यांच्या समोरच "एक अति उंच राक्षसासारखा आकार येत आहे," असें त्यांस दिसलें. तरी मनांत शंका न आणतां त्यांनीं "बैल हांक." असें मिरोबाला सांगितलें. तेव्हां तो भीत भीत हळू हळू बैल हांकूं लागला. त्यामुळें गाडी सावकाश चालूं लागली. ती "लौकर चालीव" असें सांगण्या- साठीं तात्यांनीं पुन: गाडीबाहेर डोकें काढून पाहिलें; तों पुन: तो भयंकर आकार त्यांच्या दृष्टीस पडला आणि त्या वेळेस [illegible] त्यांच्या मनांत भय उत्पन्न झालें! तें इतकें कीं, त्यांनीं "मि- चाल [illegible], वे [illegible]." असें सांगितलें. तें ऐकतांच त्यानें

इतक्यांत दुसरा एक कुळं[illegible] येत असल्याचा आवाज ऐकूं दृष्टीस पडतांच त्यानें त्याला "या मैदानांत [illegible]डत आहे" त्याचा रस्ता कोणतारे बाबा?" असें विचारिलें.

"मैदानांतील वाडा?" तो कुळंबी आश्चर्यानें विचारूं लागला:— "तुम्हीं काय त्या गच्चीच्या वाड्याबद्दल चौकशी करतां?"

बाहेर येऊन उभे राहिले; आणि मग मिरोबाच्या जिवांत जीव आला; परंतु बैल उधळल्यामुळें गाडी फारच हादरली आणि त्यांत बसलेल्या दुखणेकरी तात्यांचा प्राण कंठाशीं आला. तरी त्यांत त्यांच्यानें नुस्तें ओरडवलेंही नाहीं, इतक्या वेगानें व जोरानें ते धक्के बसले. तरी दरवाजाच्याबाहेर पडतांच गाडी हळू चालूं लागली.

नंतर थोडासा विसांवा मिळाल्यामुळें तात्यांनीं अन्नपूर्णेचा हात धरून सांगितलें:—" बये, आतां माझ्यांत शक्ति अगदीं राहिली नाहीं. " बस! इतकेंच शब्द त्यांच्या तोंडांतून बाहेर पडले, आणि त्याबरोबर ते बेशुद्ध होऊन पडले. तेव्हां घाबरून त्यांना सांवरून धरलेल्या अन्नपूर्णेनें मोठ्यानें ओरडून गाडी उभी करावयाला सांगितलें, तेव्हां गाडी उभी राहिली; पण तितक्यांत वाऱ्याबरोबर गायनाचे स्वर ऐकूं येऊं लागले. तरी तिनें तितक्यांत दूरवर नजर पोंचविली. तेव्हां "आसपास कांहीं घरें, किंवा निदान झोंपडीं तरी असावीं," असें तिला वाटलें. ह्मणून तिनें मिरोबाला तेथून पाणी घेऊन येण्याला सांगितलें व तो गेल्यावर ती तात्यांस हळू हळू हांका मारूं लागली. पण ते मुळींच बोलतना. त्यामुळें ती अधिकाधिक दुःखि होऊं लागली. मिरोबा पाणी घेऊन आला. तेव्हां तिनें त्यांच्या तोंडावर व मस्तकावर पाणी मारून त्यांना सावध करण्याचा यत्न चालविला. तरी तो फुकट गेला! तांब्याभर पाणी संपलें, तरी त्यांची शुद्धीवर येण्याची आशा नाहीं! त्यामुळें तर ती फारच घाबरली. इतक्यांत बैलांनीं गाडी वळविल्यामुळें चंद्राचीं मंद किरणें त्यांच्या मुखावर आलीं आणि त्यांजवर अगदी मरणकळा आली आहे, असें अन्नपूर्णेच्या दृष्टीस पडलें. आणि त्यामुळें त्यांच्याविषयीं तिची आशा अगदीं सुटली. तरी " दिसत असलेल्या झोंपड्यांतून कांहीं मदत मिळाल्यास पहावें." असें तिच्या मनांत आलें; ह्मणून तिनें तात्यांस मिरोबाच्या हवालीं करुन गाडींतून खालीं उडी टाकली, आणि ती त्या दिसत असलेल्या झोंपड्यांकडे धांवत निघाली. थोडथोडें चांदणें पडलेंच

होतें आणि हवेंतून जें गायन—ऐकूं येत होतें त्या गायनानेंच तिला त्या झोंपड्याकडील मार्ग दाखविला. त्या झोंपड्यांकडे जाण्याचा मार्गही दाट झाडींतून होता. झाडींत शिरल्याबरोबर पहिल्यानें तिला भय वाटलें. तरी आपल्या बापाची स्थिति मनांत आणून मोठ्या हिंय्यानें ती त्या गायनाच्या अनुरोधानें त्या झोंपड्यांच्या अगदीं नजीक जाऊन पोंचली. तिला पहिल्यानेंच गवत उगवून हिरवें गार झालेलें एक मैदान दिसलें. त्यांत जावें, कीं नाहीं? ह्मणून ती क्षणभर विचार करीत उभी राहिली तों कांहीं माणसें हंसल्याचा तिला भास झाला. तेव्हांतर ती उभीच राहिली. तों "मिरोबा आपणांस हांक मारीत आहे," असें तिला वाटलें. त्या वेळेस तिला वाटलें कीं, "तात्यांच्या मरण्याच्या भयानेंच तो आपणांस हांका मारीत असेल." असें तिच्या मनांत आलें आणि जिकडून हंसण्याचा आवाज तिला ऐकूं आला होता, तिकडल्या बाजूस ती पुनः धांवत निघाली. ती कांहीं अंतरावर जातांच तिला कित्येक झोंपड्या दिसल्या व कित्येक मनुष्यें जमून बसलेलीं तिच्या दृष्टीस पडलीं. त्यांच्या पोषाखावरून तीं सर्व गांवढळ आहेत, हें सहज ध्यानांत येत होतें. अन्नपूर्णा त्या झोंपड्यांच्या सन्निध गेल्यावर कित्येक स्त्रिया शृंगार करून बाहेर आल्या; अनेक प्रकारचीं वाद्यें वाजूं लागलीं आणि नृत्याची सुरुवात झाली. अन्नपूर्णेच्यानें कांहीं तो आनंद पाहवेना. तेव्हां ती एके बाजूस कांहीं वृद्ध मनुष्यें बसलीं होतीं, त्यांच्याजवळ गेली आणि त्या सर्वांस मोठ्या विनयानें आपली हकीकत सांगून त्यांजपाशीं मदत मागूं लागली. अन्नपूर्णेचें बोलणें संपतांच त्यांतील कित्येकांनीं तिला धीर दिला आणि कित्येक तिच्या बरोबर जाण्यास तयार झाले. नंतर चार पांच मनुष्यांसह अन्नपूर्णा आपल्या गाडीजवळ आली; तों तात्या शुद्धीवर आले होते. अन्नपूर्णेच्या बरोबर आलेल्या मनुष्यांजवळ तात्यांनीं आसपास कोठें राहण्यासारखी जागा सांपडेल कीं नाहीं याबद्दल शोध केला आणि तशी जागा नसल्यास समोर दिसत असलेल्या

महालांत (वाड्यांत) आपली राहण्याची इच्छा प्रदर्शित केली. तेव्हां त्यांतील एक वृद्ध मनुष्य त्यांस ह्मणालाः—"महाराज, आपणांस राहण्यासारखी धर्मशाळा तर येथें नाहींच, व समोरच्या महालांतही आपणांस आश्रय देण्यासाठीं कोणी रहात आहे असें नाहीं. आतां आपण माझ्या गरिबाच्या घरांत राहून जर माझ्या झोंपडीचा आपल्या पायधुळीनें भाग्योदय करीत असाल, तर मी तुमच्यासाठीं माझ्यानें होईल ती खटपट करण्यास कबूल आहें."

वाचकहो, जशा भोळेपणानें ही विनंति करण्यांत आली, तशा भोळेपणानेंच तिचा स्विकारही झाला, आणि गाडीसह तीं सर्व मनुष्यें त्या गरिबाच्या झोंपडीकडे निघालीं. गाडी घराजवळ येतांच नाच बंद झाला आणि त्या सर्व खेडुतांच्या बायका गाडी-सभोंवतीं जमल्या व विचारपूस करूं लागल्या. "एक दुखणेकरी पाहुणा आला आहे." असें कळतांच त्या सर्व बाया आपापल्या झोंपड्यांत धांवत गेल्या आणि आपापल्या कडून होणारी मदत मोठ्या उत्साहानें व काळजीनें करूं लागल्या. ज्या खेडुतानें तात्यांस बोलावून आणलें होतें; त्यानें त्यांस गाडींतून उतरून आपल्या झोंपडींत नेऊन निजविलें. त्या झोंपडींत कायतो चंद्राचा मात्र प्रकाश पडला होता. तरी झोंपडीच्या आसपास असलेल्या फुलझाडांवरून येणाऱ्या सुवासिक वायूनें तात्यांच्या शरीराला मंद मंद स्पर्श करून पुष्कळच हुशारी उत्पन्न केली. त्यांना आपल्या घरीं घेऊन येणाऱ्या खेडुताचें नांव बोरकर नाना असें होतें. त्यानें कांहीं मिष्ट मिष्ट फळें व आंटीव दूध आणून तात्यांच्या पुढें ठेवलें आणि त्यांनीं त्याचा स्वीकार करावा अशा आशयानें तो त्यांस विनवूं लागला; तेव्हां त्या लोकरीतींत प्रवीण असलेल्या आत्मारामतात्यानें विनाकारण ओढून न धरतां त्या पदार्थांचा स्विकार केला व ते भक्षण केल्यापुळें त्यांस बरीच हुशारी आल्यासारखें वाटलें. अन्नपूर्णेनें, जरी तिला इच्छा नव्हती तरी तात्यांच्या सांगण्यावरून थोडें खालें. मिरोबाचा फराळ झाला.

नंतर जवळ बसलेल्या बोरकर नानाजवळ तात्या गोष्टी

बोलूं लागले. या खेडुतानें आधीं आपल्या कुटुंबाबद्दल कित्येक गोष्टी सांगितल्या, त्यांत पुष्कळच भोळेपणा असल्यामुळें तात्यांस आवडल्या. त्या गोष्टींच्या भरांत असतां त्या खेडुताला तेथें दिवा नसल्याची आठवण झाली आणि तो ह्मणालाः–"अरेरे! मी किती वेडा हा! आपण आल्यापासून दिवा लावलाच नाहीं." असें बोलून तो दिवा घेऊन येण्यासाठीं उठूं लागला. तेव्हां तात्या ह्मणालेः–"तुह्मांला उठण्याचें कारण नाहीं. हा नैसर्गिक प्रकाश मला फार आवडतो! शिवाय येथील हवाही पुष्कळ हुशारी देत आहे आणि आतां तर हें दुरून ऐकूं येणारें गायन फारच संतोष उत्पन्न करीत आहे. हें कोण गात असेल बरें?" बोरकर ह्मणालाः–"नित्य रात्रीं सर्व शांतता झाल्यावर हें गायन होत असतें. कधीं याच्या बरोबर बांसरी व सतारही वाजते. कधीं कधीं तर या गायनानें ऐकणारांच्या मनाला द्रव उत्पन्न होतो. पण हें गायन कोण करीत असतें, या गोष्टीचा आजपर्यंत कोणालाही शोध लागला नाहीं. यावरून कित्येक लोक "ही भूतचेष्टा आहे" असेंही ह्मणतात." "खरोखर, या ठिकाणीं भुतें असलींच पाहिजेत, असा मलाही संशय येतो." असें तात्या बोलले. तेव्हां बोरकर ह्मणतोः–"आपणांस जरी संशय आला; तरी तीं सर्व मानवी भुतेंच असावीं असा माझा समज आहे." असें ह्मणून तो त्यांची धास्ती उडवूं लागला. पुनः तो सांगूं लागलाः–"कधीं कधीं मला झोंप येईनाशी झाली, ह्मणजे बरोबर मध्य रात्रीनंतर हें गायन मी ऐकतों. कधीं कधीं माझ्या झोंपडीच्या अगदीं जवळ गाणें होत असतें. त्यांत माधुर्य किती असतें ह्मणून सांगूं? अशा वेळीं त्या गायकास पाहण्याच्या हेतूनें मी बाहेर पडलों, कीं गायन बंद व कोणीच दिसत नाहीं. अशा प्रसंगीं कोणाला बरें धास्ती उत्पन्न होणार नाहीं. या गायनाबद्दल कोणी कोणी गोष्टी बोलतांना असें ह्मणतात कीं, "हें यमदूतांचें गायन होय." तरी मी कित्येक वर्षे हें ऐकत असूनही जिवंतच आहे. यावरून तें बोलणेंही मिथ्याच आहे असें मानावें लागतें."

याप्रमाणें गोष्टी चालल्या असतां अन्नपूर्णा भयानें कांपूं लागली. तरी आपलें भय लोकांस न दाखविण्याचा प्रयत्न करून ती मोठ्या धैर्यानें ह्मणाली:—"अहो, असा प्रकार नित्य घडत असतां आजपर्यंत तुमच्यांतून कोणीं एकानेंही त्याचा शोध कसा लावला नाहीं? मला असें वाटतें कीं, जर कोणी ह्याच प्रयत्नाला लागेल, तर तो त्या गायकाला शोधूनही काढील!" बोरकर ह्मणाला:—"बाई, आजपर्यंत पुष्कळजण याचा पाठलाग करून दमले, पण कांहीं वळत नाहीं. कोणी स्वराच्या धोरणानें त्याचा शोध करीत निघाला, ह्मणजे ते स्वरही पुढें पुढें चालूं लागतात आणि त्या शोध करणारास गर्द झाडांत नेऊन त्याची त्रेधा उडवून देतात. असें झाल्यावर अधिक शोध करण्याचें धैर्य कोण करील? हें गायन कधींकाळीं असें लौकर ऐकूं येतें. नाहीं तर खरें ह्मटलें ह्मणजे—( हातानें दाखवून ) जेव्हां तो आकाशांतील तारा अगदी त्या मनोऱ्यावर येतो; तेव्हां हें गायन सुरू होतें." तात्यांनीं विचारलें—"कोणता मनोरा? मला तर दिसत नाहीं." बोरकर पुनः दाखवून—"तो, तो, ज्यावर ह्या वेळेस चांदणें पडलें आहे. तो ज्या महालाचा आहे, तो महाल दाट झाडींत असल्यामुळें स्पष्ट दिसत नाहीं." असें ऐकतांच तात्या लक्ष्यपूर्वक पाहून ह्मणाले "हो हो, आतां मात्र तो मला दिसूं लागला. पण कायहो, तो महाल कोणाचा आहे हें तुह्मांला ठाऊक आहे काय?" बोरकर ह्मणाला:—"होय. तो मारुतीराव विजापूरकरांचा आहे." असें ऐकतांच एकदम कांहीं स्मरल्यासारखें करून तात्या ह्मणाले:—"तरकाय आपण बिलोरी महालाच्या अगदीं जवळ आहों?" होय, जो "बिलोरी" या नांवानें प्रसिद्ध आहे, तोच हा महाल. मारुतीराव पूर्वी यांत रहात असत, पण कांहीं कारणावरून येथून त्यांचें मन उडालें आणि ते निघून गेले. आतां थोड्याच दिवसांवर ते गुजरले व हा महाल दुसऱ्या कोणाच्या ताब्यांत गेला आहे, असेंही ऐकलें होतें." असें बोरकरानें सांगितलें.

तात्या जे एवढा वेळपर्यंत कांहीं खोल विचारांत गढले होते,

ते एकाएकीं स्मृतीवर आल्यासारखें करून ह्मणाले,–" काय! ते मरण पावले! अहो केव्हां?"

" सुमारें दोन महिने होत आले. पण महाराज, यावरून आपण मारुतीरावांस जाणत होतां, असें झालें."

या बोलण्यास ध्यानावर न घेतां तात्या आपल्याशींच पुनः ह्मणाले,–" चमत्कार आहे खरा! बरें पण आतां तो कोणाच्या ताब्यांत गेला आहे?"

" मी त्या धन्याचें नांव विसरलों आहें. तरी एवढें आठवतें कीं, ह्या महालाचा नवा धनी मुंबईंत रहातो असेंही ऐकण्यांत आलें होतें." असें बोरकर ह्मणाला.

तात्या पुनः ह्मणाले,–" तर मग आतां ह्यांत कोणीही राहत नाहीं; हें उघड झालें. असेंचना?"

" असें तर खरेंच. तरी महालाचा कारभार करणारा एक मनुष्य त्याच्याजवळच एक लहानसें झोंपडें बांधून त्यांत आपल्या बायकोसह राहत असतो,"

अन्नपूर्णा ह्मणाली,–" आकारावरून महाल मोठाच असावा असें वाटतें. एवढ्या महालांत दोनच माणसांनीं राहणें कठीण आहे. तीं त्याच्या विस्तारानेंच भिऊन अर्धीं होतील."

बोरकर ह्मणालाः–" खरेंच. मला जरी कोणी लाखों रुपये देण्याचें कबूल केलें तरी मी एक रात्रसुद्धां ह्या महालांत राहणार नाहीं."

याप्रमाणें बोलणें होत असतां तात्यांनीं खेदप्रदर्शक एक दीर्घ श्वास टाकला. तरी आपली ती स्थिति कोणास कळूं नये अशा आशयानें त्यांनीं बोरकरास विचारलें. " तुह्मी या ठिकाणीं किती दिवस रहात असतां?" " अगदीं बाळपणापासून!" असें उत्तर मिळतांच ते पुनः ह्मणाले:–" असें आहे तर तुह्मीं या महालांतील पहिल्या जाहगीरदारणीला ओळखत असाल."

" हें काय विचारणें! मीच काय पण ह्या प्रांतांतील बहुतेक लोक तिला ओळखीत होते."

"आणि त्यांतीलच मीही एक आहे." असें तात्या मोठ्या औत्सुक्यानें ह्मणाले. तेव्हां बोरकर त्यांस पुनः विचारूं लागलाः– "महाराज, आपण त्या आमच्या मायाळु जाहागीरदारणीला पूर्ण ओळखत होतां काय? अरेरे! तिच्या सारख्या साध्वीला असें खेदोत्पादक मरण येणें, ही एक विचित्रच गोष्ट होय!"

तात्यांच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागला आणि त्यांचा कंठ दाटून आल्या कारणानें ते घोगऱ्या स्वरानें ह्मणालेः–"पुरे, पुरे, मला याहून अधिक ऐकवत नाहीं."

आपल्या बापाची अशी चमत्कारिक स्थिति पाहतांच अन्नपूर्णा चकित झाली. इतक्यांत त्या गोष्टी उडवून देण्यासाठीं तात्या बोरकरास ह्मणाले,–"एकून तें गायन तेथून ऐकूं येतें, असें तुमचें ह्मणणें आहेना?" बोरकर ह्मणाला,–"होय, पण महाराज, ऐका ऐका, तें गायन पुनः ऐकूं येत आहे!" असें ऐकतांच तीं सर्व माणसें अगदीं स्वस्थ राहून तें गायन ऐकूं लागलीं. तों हळूं हळूं तें जवळ जवळ येत आहे, असाही भास होऊं लागला. कांहीं अवकाशानें त्याचा मधुर स्वर शिकस्तीनें चढला आणि त्यानें प्रत्येकाला द्रव उत्पन्न केला. त्यांतच अलगुजें, सारंगी, सतार इत्यादि वाद्यांची साथ होत आहे, असें वाटूं लागलें आणि कांहीं वेळानें गायनाचा ध्वनि कमी होत होत अगदी बंद झाला व नुसती सतारच ऐकूं येऊं लागली. शेवटीं शेवटीं तात्यांस असें वाटूं लागलें कीं, "हा मनुष्यकृतींतील कोणत्याही वाद्याचा स्वर नव्हे!" याप्रमाणें जों त्यांच्या मनांत येत आहे, तों तो स्वर हवे-बरोबर मिळत चालला आणि त्या सर्व ऐकणारांस आश्चर्यचकित स्थितींत टाकून तें गायन पूर्णपणें बंद झालें! तेव्हां सर्व मनुष्यें उठून वेड्याप्रमाणें एकही शब्द न बोलतां उभीं राहिलीं. असा प्रकार थोडाच वेळ सर्वांनीं अनुभविला, तों तात्यांनीं त्या स्तब्ध-पणाच्या स्थितीला मोडून काढलें आणि "फारच चमत्कार आहे!" असें ह्मणाले. तरी अन्नपूर्णेच्या तोंडातून शब्द निघण्याचेंही कठीण पडलें. त्या विलक्षण प्रकारानें तिला मात्र धास्तींत टाकलें!

नंतर थोडीशी हिम्मत धरून बोरकर ह्मणालाः—"खरोखर, ह्या गोष्टी फारच अजब आहेत. सुमारें अठरा वर्षें होत आलीं. मी हें गायन ऐकत आहें. मला स्मरण आहे कीं, एक वेळ उन्हाळ्याच्या दिवसांत मी सहज ह्या समोरच्या गर्द झाडांतून हिंडत होतों. त्या वेळेस माझें एक मूल फारच बेजार असल्या कारणानें माझ्या मनाला उदासीनता उत्पन्न झाली होती, आणि त्या तशा स्थितींत असतांही फिरे झाडींतून मी रस्ता काढीत असतां कोणा मनुष्याला गातांना ऐकलें. तरी तसाच मी पुढें झालों आणि पाहूं लागलों, तों माझा शेजारी एका झाडाखालीं बसून अलगुजें वाजवीत होता. त्याची पर्वा न धरितां मी तसाच पुढें गेलों, तों आकाशांत एक नक्षत्रांचा गुच्छ (पुंजका) माझ्या दृष्टीस पडला. तेव्हां मी त्याच्या कडेच पाहूं लागलों; तों त्यांतून गायनाचा ध्वनि बाहेर पडत आहे! तेव्हां मात्र मी धास्तीनें अगदीं फिक्का पडलों आणि मग मागें पुढें न पाहतां घरीं आलों. पण हीच गोष्ट दुसऱ्या दिवशीं जेव्हां मी आपल्या शेजाऱ्याला सांगितली, तेव्हां त्यानें हंसून मला मूर्खांत काढलें. पण पुढें कांहीं दिवसांनीं तसेंच गायन माझ्या बायकोनें ऐकलें. तेव्हां आमच्या ह्या खेड्याच्या शेजारीं एक जोशी रहात होता, त्याच्या कडे जाऊन आह्मीं ती गोष्ट सांगितली. तेव्हां तो ह्मणाला कीं, " ज्या ठिकाणीं कोणी मरण पावणार असतें त्याच ठिकाणीं असें गायन ऐकूं येऊं लागतें."

हें ऐकतांच अन्नपूर्णेस आपल्या बापाच्या प्रकृतीविषयीं जबरदस्त धास्ती उत्पन्न झाली.

इतक्यांत बोरकर ह्मणाला,—" महाराज, असें जरी आह्मीं हें गायन ऐकून भय पावलों होतों, तरी जोशाचें बोलणें अजीबात खोटें ठरलें. माझें मूल अद्याप खुशाल आहे."

तात्या एवढा वेळपर्यंत जे लक्ष्यपूर्वक ऐकत होते, ते मध्येंच बोरकरास विचारूं लागलेः—"तर काय एथें जवळ कोठें ब्राह्मणवस्तीही आहे ?" " ब्राह्मणवस्ती कांहीं सांगण्यासारखी नाहीं;

तरी केशवस्वामीचा मठ एथून अगदीं जवळ आहे. तेथें ब्राह्मण लोक येऊन कधीं कधीं कधीं राहतात." असें बोरकरानें सांगितलें. तें ऐकतांच तात्या पुनः कांहीं स्मरल्यासारखें करून ह्मणाले,—" अरे, केशवस्वामीचा मठही एथून जवळच आहे काय?" हा प्रश्न करीत असतां तात्यांच्या मुखावर दिलगिरी व धास्ती स्पष्ट उमटलेली अन्नपूर्णेच्या दृष्टीस पडली. तेव्हां तिनें आपल्या प्रेमळ व कोमल वचनांनीं त्यांना "आतां आपण थोडासा आराम अनुभवाल, तर बरें होईल." असें सांगितलें. तेव्हां त्यांनीं तें मान्य करून दुसऱ्या दिवशींच तेथून निघून आपल्या घराकडे परत फिरण्याची आपली इच्छा उघड केली आणि आराम करण्यासाठीं ते आपल्या नियमित स्थलीं जाऊन निजून राहिले. अन्नपूर्णेला कांहीं रात्रभर झोंप लागली नाहीं· रात्रभर तिच्या मनांत आपल्या बापाविषयींचेच विचार घोळत होते. मारुतीरावाचें नांव ऐकतांच त्यांना उत्पन्न झालेलें आश्चर्य; जहागिरदारणीचें मरण ऐकतांच त्यांस उपजलेला खेद आणि बिलोरी महालाची चौकशी करण्याचें अगत्य; ह्या सर्व प्रकारांचा आपल्या बापाशीं काय संबंध आहे; हें तिला कळेना! सारांशः—त्या विचारतरंगांत निमग्न असतां शेवटीं तीही निद्रावश झाली.

---

## प्रकरण सहावें.

श्लोक—शा. वि.

आहे नश्वर वस्तुमात्र अवघें नेत्रांस जें भासतें ॥<br>
देहाचाहि नसे जरी भरंवसा वाढे तरी आसतें ॥<br>
राजा रंक समान कर्मगतिनें सोडोनियां वैभवा ॥<br>
जाती घेउनि पुण्य पातक फळें चाले न तैं वानवा ॥ १ ॥

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं अन्नपूर्णा जागी होऊन बापाच्या भेटीला जातांच तिला कळलें कीं, तात्यांना सगळ्या रात्रींत

कांहीं झोंप लागली नाहीं. रात्रींतल्या रात्रींत त्यांचें दुखणें इतकें वाढलें कीं, सकाळीं अन्नपूर्णेला ते "अगदीं अशक्त झाले आहेत," असें दिसलें. त्यांना उठून उभें राहण्याचीही शक्ति उरली नाहीं. अन्नपूर्णेस पाहतांच त्यांनीं तिला आपल्या जवळ बोलाविलें. त्यांची ती स्थिति पाहतांच "आतां कांहीं हे फारवेळ वांचत नाहींत!" असें अन्नपूर्णेस वाटलें. त्यांनीं अन्नपूर्णेला आपल्या शेजारीं बसवून पुष्कळ धीर दिला आणि अंतकाळीं बापानें जें मुलाला सांगावें, तें तो म्हातारा आपल्या एकुलत्या एक मुलीला सांगूं लागला. पहिल्यानें त्यानें गंभीरपणा धरून तिच्याजवळ एक वचन मागितलें. तेंव्हा पहिल्यानेंच अन्नपूर्णाही घाबरली; तरी आपल्या बापाचें शेवटचें मागणें तिला कबूल करावें लागलें. त्यांतच "आपल्या पित्याच्या मनांत इतकें गुप्त काय सांगावयाचें आहे!" तें ऐकण्याबद्दल तिची आतुरता वाढूं लागली. तिनें त्यांला वचन देतांच तात्या खालीं लिहिल्याप्रमाणें तिला सांगूं लागलेः—

"अन्नपूर्णे, प्रियकन्ये अन्नपूर्णे, आतां मी निश्चयपूर्वक असें मानतों कीं, तूं कधींहि वचनभ्रष्ट होणार नाहींस. तर आतां मी जें सांगतों, तें ध्यानांत ठेऊन त्याप्रमाणें वाग. जर माझ्या सांगण्याच्याविरुद्ध वागशील, तर मला व तुला सारखें दुःख होईल. यासाठीं निश्चय कर आणि ऐक. आपल्या हेळवांकच्या वाड्यांत माझ्या खोलीच्या शेजारीं जी एक धाकटी खोली आहे, तिच्या जमिनींत एक सरकवण्यासारखा गुप्त दरवाजा आहे. त्या खोलींत खालवर सगळी तक्तपोशी जरी आहे, तरी जमिनीवरचे सगळे तक्ते गांठीशिवाय आहेत. पण जी फळी सरकते ती गांठीची आहे. त्या खोलींत शिरतांच जी पहिली खिडकी दिसते, तिच्या समोरच ती फळी असून तिला एक उभी रेघ आहे. त्या रेघेकडे पाहतांच तो एक कळाशींतील सांधा आहे, असें मनांत येतें. पण त्या रेघेंतच तें गुप्त दार उघडण्याची कळा आहे. त्या रेघेवर पाय ठेऊन जोरानें दाबलास म्हणजे फळी दाबली जाईल. ती फळी दाबली म्हणचे बसून हातानें उलट फिरवावी. ती फळी फिरविलीस म्हणजे तुला लि-

हिलेल्या कागदांचें एक पुडकें दिसेल. आतां नीट लक्ष्य ठेव. मी तुजपासून जें मुद्दाम वचन घेतलें तें आतां जी गोष्ट सांगणार आहें, तिच्या साठींच होय. तें कागदांचें पुडकें तुझ्या हातीं येतांच त्याचें जाळून भस्म कर. आणि त्याबद्दल मी तुला अशी ताकीद करितों कीं, तें उघडून त्यांतील एकही कागद तूं वाचूं नयेस!"

हें शेवटचें वाक्य उच्चारते वेळीं तात्यांचा चेहरा लाल भडक होऊन राहिला! कांहीं वेळपर्यंत त्यांच्यानें श्वासोच्छ्वासही करवेना! त्या कागदांच्या पुडक्याबद्दल सक्त ताकीद ऐकतांच अन्नपूर्णा फारच घोंटाळ्यांत पडली. तरी "त्या कागदांत असा काय भ्रम असेल?" याविषयीं तिची मति चालेना!

"त्या गुप्त पेटींत—" तात्या थोडासा दम घेऊन पुनः बोलूं लागले—"तुला एका रेशमी पिशवींत पांच हजारांचा विषय सांपडेल. त्याचा उपयोग तूं आपल्या इच्छेप्रमाणें करावास! हो, पण थांब, मला तुजपासून आणखी एका गोष्टीबद्दल वचन घेतलें पाहिजे. तें हें कीं, माझ्या पश्चात् हेळवाकचा वाडा तूं कधींही कोणांस विकूं नयेस. त्वां आपल्या लग्नाचे वेळीं तो वाडा अक्षयीं तुझ्याच ताब्यांत राहण्याबद्दल बंदोबस्त करून ठेवावास आणि आपल्या पतिसह तूं त्याच वाड्यांत रहावेंस, अशी माझी फार उत्कट इच्छा आहे."

याप्रमाणें मनांतील मुख्य मुख्य गोष्टींविषयीं तिला ताकिदी केल्यावर त्यानें तिला विस्तारानें आपली सगळी हकीकत सांगितली. पण त्यामुळें त्यांना फारच श्रम झाले व कांहीं वेळ ते अगदीं स्तब्ध राहिले. अन्नपूर्णा त्यांच्यासमोर उभी असून एकसारखी रडत होती. नंतर तात्यांच्या इच्छे प्रमाणें केशव स्वामीच्या मठांतील एका उपाध्यायास बोलावून आणलें आणि तात्यांनीं शक्त्यनुरूप दानधर्म केला. नंतर त्याच उपध्यानें त्यांचें और्ध्व देहिक कर्म अन्नपूर्णेला सांगावें असें ठरवून ठेवलें. आतां याच्या पुढचें गंभीर शोक

कारक चित्र वाचकांच्यापुढें मांडून त्यांचें मन दुखवावें, अशी कांहीं आमची इच्छा नाहीं. यासाठीं संक्षेपानें इतकेंच सांगितलें ह्मणजे पुरें. तात्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत अन्नपूर्णेचा सांभाळ चिमाबाईनें (आपल्या बहिणीनें) करावा; अशी व्यवस्था केली आणि ते हा मृत्युलोक सोडून परलोकीं निघून गेले. मरतेवेळीं त्यांनीं त्या भल्या खेडुतास (बोरकरास) आपल्याजवळ बोलाविलें आणि त्यानें निरपेक्ष बुद्धीनें आपल्याला आश्रय दिल्याबद्दल पहिल्यानें त्याचे उपकार मानले आणि "अन्नपूर्णा आपल्या घरीं जाण्यास शक्तिमान् होईल, तोंपर्यंत तिला त्यानें आपल्या गरीब झोंपड्यांतच आश्रय द्यावा." अशाबद्दल त्याजपासून वचन घेतलें.

तात्या मरण पावल्यानंतर पहिल्याच दिवशीं रात्रीं अन्नपूर्णा जेव्हां आपल्या निजायाच्या खोलींत गेली; तेव्हां तिला "आपल्या बापाचा आकार दारांत उभा आहे" असें दिसलें. तेव्हां धास्तीनें ती कांपूं लागली; पण तो आकार मागल्या पायानें मागें हटूं लागला व अगदीं खिडकीच्या जवळ जाऊन "मुलीनें खोलींत यावें," अशा आशयानें तिला खुणावूं लागला. अन्नपूर्णेनें खोलींत पाऊल ठेवलें मात्र, तों तो आकार खिडकींतून खालीं निघून गेला. अन्नपूर्णा त्याला धरण्याच्या इच्छेनें अति त्वराकरून पुढें झाली; पण तोही तशाच त्वरेनें मागच्या मागें निघून गेला. त्यानें बोलण्याच्या हेतूनें आपले ओंठ उघडले होते; पण त्याचा शब्द तिला ऐकूं न येतां दुरून गायनाचा ध्वनि तिच्या कानीं आला. जसें पूर्व रात्रीं (कालच्या रात्रीं) सर्वांनीं गायन ऐकलें होतें, तसेंच अन्नपूर्णेला ऐकूं आलें. तरी त्यांत वाद्याचा ध्वनि मात्र प्रधान असून गायन कांहीं स्पष्ट होत नव्हतें. तें गायन वाढतां वाढतां फारच वाढलें आणि शेवटीं हळू हळू अगदीं बंद झालें. पण तो सर्व प्रकार साग्र होई तोंपावेतों अन्नपूर्णा एकाद्या पुतळ्याप्रमाणें जागच्या जागीं उभी राहिलेली होती. त्या वेळेस काय करावें, आणि काय न करावें; हें तिला सुचेना! गायन बंद झाल्यावर ती त्या आकारास पहावें ह्मणून खिडकीजवळ

गेली, पण तो कांहीं तिला पुनः दिसला नाहीं. तेव्हां ती मागें फिरली, तों तो आकार तिच्या समोर! तो हळू हळू तिच्या पाठी-मागच्या भिंतींत गुप्त होत आहे, असें जेव्हां तिला दिसलें; तेव्हां भयानें ओरडून ती मूर्छित पडली! तिच्या आरोळीबरोबर बोरकर व घरांतील सर्व मनुष्यें जागृत होऊन धांवत आलीं आणि तिची ती स्थिति पाहतांच त्यांनीं तिच्या डोळ्यांला पाणी लावून, व वारा घालून तिला सावध केलें आणि "काय झालें?" असें विचारलें. तेव्हां तिनें पाहिलेला व ऐकलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला. तेव्हां 'तिला सोबत करावी,' म्हणून बोरकरानें आपलें अंथरूण तेथें आणलें व तिच्या बिछान्यावर तिला निजविलें. तरी साऱ्या रात्रींत तिला निद्रा आली नाहीं.

केशवस्वामीच्या मठांत कित्येक नामांकित योगिनी (तप करणाऱ्या बायका) रहात असत; त्यांतील मुख्य योगिनीकडून अन्नपूर्णेला दुसऱ्या दिवशीं बोलावणें आलें. त्या मठाजवळच्या स्मशानांतच तात्यांचें दहन केलें होतें. तेव्हां "ती जागा तरी दृष्टीस पडेल," अशा इच्छेनें अन्नपूर्णा बोरकराला बरोबर घेऊन दोन प्रहरचें ऊन कमी झाल्यावर त्या योगिनीच्या दर्शनासाठीं निघाली.

जाण्याचा मार्ग किर्र झाडींतून होता व त्या झाडीच्या पलीकडे समुद्रकांठीं तो मठ बांधलेला असे. तेथें पोंचतांच सगळ्या योगिनींनीं अन्नपूर्णेला मातृस्नेहानें आपापल्याजवळ बसवून घेतलें आणि बापाच्या मागें तिनें चांगल्या रीतीनें वागावें, अशा आशयाचा उपदेश त्यांतील मुख्य योगिनीनें फारच कोमल व मृदु शब्दांनीं अन्नपूर्णेच्या मनांत भरवून दिला. त्या वृद्ध योगिनीचे ते मातेसारखे गोड, मृदु व हितवर्धक शब्द ऐकतांच अपूर्न्नणेला आपल्या आईबापांचें स्मरण झालें आणि ती एकसारखी रडूं लागली. तेव्हां त्या योगिनीनें तिला आपल्या पोटाशीं धरून तिचें शांतवन केलें आणि सूर्यास्त होण्याचा समय जाणून तिला परत जाण्यासाठीं निरोप दिला. सूर्यास्तानंतर बोरकराबरोबर ती त्याच्या घराकडे निघाली व त्याच्या मागून विचार करीत

खालच्या मानेनें पायांकडे पहात चालूं लागली. थोडासा मार्ग चालल्यावर बोरकर एकाएकीं दबकून उभा राहिला, आणि घाबरल्यासारखें करून इकडे तिकडे पाहूं लागला. नंतर एकदम रस्ता बदलून जिकडून फारच उंच झाडी होती, त्या झाडींतील मार्गानें निघाला. अन्नपूर्णा घाबरून उभी राहिली आणि "बोरकर काका, काय आहे?" असें विचारूं लागली.

"बाई, कांहीं नाहीं. आपण रस्ता चुकलों आहों."

"इतकेंच ना? चलातर, आपण त्या बिल्लोरी महालांत जाऊन तेथील कारभाऱ्याजवळ रस्ता विचारूं."

"नको. तसें करण्याचें कारण नाहीं. आपण या समोरच्या झऱ्याजवळ गेलों म्हणजे तेथून माझें झोंपडें अगदीं जवळ आहे. आज रस्ता कसा चुकलों, हें कांहीं माझ्या ध्यानांत येत नाहीं. रात्र पडल्यावर मी कधींच इकडे येत नसतों, त्यामुळें चूक झाली."

"मी असें म्हणतें कीं, येथें या झाडींत कोणी लुटारू तर रहात नसतील ना!"

"नाहींत. बाई, रात्र पडल्यावर येथें लुटारूही कधीं येत नाहींत."

"असें आहे तर तुम्हीं भितां कां? तुम्ही संशयखोर स्वभावाचे नाहीं, असें मी समजत होतें."

"बाई, जरी मी संशयखोर नाहीं, तरी रात्र झाल्यानंतर त्या महालाच्या आसपास कोणी फिरत नाहीं हें मला ठाऊक आहे."

"ज्यांना तुमच्यासारख्या जाणत्या लोकांनीं भ्यावें, असे कोण लोक त्या महालांत राहतात बरें!"

"हल्लीं तर तेथें कोणीच रहात नाही. त्यांत जो जहागीरदार पूर्वी राहत होता, तो हल्लीं मरण पावला आहे, आणि त्या महालाची राखण करणारा मनुष्य त्याच्या शेजारीं एक खोंपट बांधून त्यांत राहत असतो."

याप्रमाणें दोघांचें बोलणें झाल्यावर अन्नपूर्णेच्या ध्यानांत आलें कीं, बोरकरानें आपल्या बापाला मारुतीराव जहागीरदाराचा

वाडा सांगितला होता, व ज्यांचें नांव ऐकतांच तिचा बाप आश्चर्य चकित झाला होता, तो वाडा हाच आहे. इतक्यांत बोरकर सांगूं लागला:--

" पूर्वीं हा वाडा कसा आनंदोत्साहानें गाजत होता; पण तो हल्लीं अगदीं ओसाड पडून भयंकर झाला आहे. "

" असा फेरफार होण्याचें कारण काय? " असें जेव्हां त्याला अन्नपूर्णेनें विचारलें; तेव्हां तो कांहींएक बोलला नाहीं. आपला बाप त्या जहागीरदाराचें नांव ऐकतांच चकित कां झाला होता, हें समजून घेण्यासाठीं अन्नपूर्णेनें बोरकरास असा प्रश्न केला होता. त्याचें उतर न मिळाल्या कारणानें तिनें पुन त्याला तसेंच विचारलें आणि ह्मणाली—"जर तुह्मीं संशयी नसून तेथील राहणाराचें भय बाळगीत नाहीं, तर तुह्मांला असें भिण्याचें कारण काय? "

बोरकर ह्मणाला,—" अन्नपूर्णाबाई, माझ्या ह्या कृतीवरून मी संशयखोर व भित्रा आहें, असें जरी तुह्मांला वाटत असेल, तरी त्या वाड्याबद्दल जितकें मीं ऐकलें आहे, तितकें जर तुह्मीं ऐकाल तर माझ्याप्रमाणेंच तुह्मीही संशयी व्हाल. त्या वाड्यांत फार अघटित कृत्यें घडून आलेलीं आहेत. माझे धनी, ह्मणजे तुमचे कैलासवासी वडील तात्या, त्या वाड्यांतील जहागीरदारणबद्दल पुष्कळ जाणत होते.

" असें आहेतर तेथें काय काय घडलें? तें तुह्मी मला सांगाल काय? "

" बाई, तो प्रकार माझ्यानें सांगवत नाहीं; ह्मणून मी फारच दुःखी आहें. "

हें शेवटचें वाक्य उच्चारते वेळीं बोरकराचे तोंड धास्तीनें अगदीं फिकें दिसूं लागलें. तेव्हां " अधिक विचारणें कांहीं चांगलें नाहीं, " असें अन्नपूर्णेनें मनांत आणलें. तरी त्या वाड्याबद्दल गोष्टी ऐकण्याबद्दल तिच्या मनाला चुटपुट लागली. मग तिनें त्या गायनाविषयीं गोष्टी काढल्या.—

" तर मग तुह्मी त्या गायनाच्या संबंधानें कायविचार ठरविला

आहे ? तें गायन काय त्या वाड्यांतूनच ऐकूं येतें ? ”

“ असें तर खरेंच ! त्याविषयीं पुष्कळच गोष्टी आहेत. पण त्या या वेळेस सांगण्याचें मला भय वाटतें. ” हें बोलत असतां बोरकराचें हृदय कंपित झाल्या सारखें वाटलें.

याप्रमाणें गोष्टी बोलत बोलत दोघेंही आपल्या घरीं आलीं. त्याच रात्रीं अन्नपूर्णेनें आपली आत चिमाबाई आणि हेळवांकास ठेवलेली घराची रखवालदारीण ताराबाई, यांस पत्रें लिहलीं व त्यांस आपल्या बापाचें दुःखदायक वर्तमान कळविलें. त्यांतच स्वतः ती येथें कोणत्या स्थितींत आहे, हेंही तिनें आपल्या आतेला लिहून कळविलें. पण एकाद्या शेजाऱ्यानें जसें शेजाऱ्याचें वर वर शांतवन करावें; त्याप्रमाणें चिमा बाईनें अन्नपूर्णेला पत्राचें उत्तर पाठवून तिचें शांतवन केलें आणि आपल्याकडून तिला हेळवांकास घेऊन येण्यासाठीं तिनें एक गडी पाठवून दिला. कारण, तिनें पत्रांत अन्नपूर्णेला असें लिहिलें, कीं “ ह्या वेळेस इतका लांबचा प्रवास करण्यास मला फुरसत नाहीं.” असो.

ही झोंपडी सोडून जाण्याचे आधीं अन्नपूर्णेनें आपल्या बापाला जेथें जाळलें होतें, ती जागा तेथें जाऊन पाहिली आणि त्या जागेवर शेवटचीं आसवें ढाळलीं. त्याचप्रमाणें मठांतील योगिनींचे आशीर्वाद घेऊन परत बोरकराच्या घरीं आली आणि बोरकराचे अनेक प्रकारें उपकार मानून आतेकडून आलेल्या मनुष्या बरोबर ती आपल्या बापाच्या वतनाच्या गांवीं ( हेळवांकास ) जाण्यासाठीं तेथून निघाली.

पहिल्यानें तात्या हवा खाण्यासाठीं ह्मणून महाबळेश्वराकडे निघाले होते, पण मध्येंच त्यांना कांहीं पत्रें मिळालीं आणि मग त्यांचा रत्नागिरीस जाण्याचा बेत झाला. तेव्हां परत हेळवांकास न येतां द्राविडी प्राणायाम केल्याप्रमाणें मोठा थोरला प्रवासाचा फेरा पत्करून कोंकणांत उतरले. त्यामुळें त्यांना अतिशय प्रवास करावा लागला आणि इच्छित मुक्काम हातीं न येतां त्यांचा काळ झाला. आतां अन्नपूर्णा जी तेथून निघाली, ती नीट हेळ-

वांकासच आली. त्यामुळें तिला फार दिवस प्रवास करावा लागला नाहीं. थोडक्याच दिवसांत ती हेळवांकास आली. गाडी अगदीं वाऱ्यांच्या दाराजवळ येतांच अन्नपूर्णेला उतरून घेण्यासाठीं ताराबाई पुढें धांवत आली. पण अन्नपूर्णेला आपल्या आईबापां-ची आठवण होतांच रडें आलें. लहानपणीं मौजेनें उड्या मारलेलीं ठिकाणें व झाडें तिच्या दृष्टीस पडतांच तिला पूर्वीचें स्मरण झालें आणि त्यामुळें तिचें हृदय भरून आलें. ताराबाई बरोबर जरी ती आपल्या ओटीवर येऊन उभी राहिली; तरी दार उघडून घरांत पाय ठेवण्यास तिचें धैर्य होईना! शेवटीं ताराबाईनें तिच्या जवळच्या किल्या घेऊन तिला घर उघडून दिलें. तेव्हां मोठ्या हिमतीनें ती घरांत शिरून इकडे तिकडे फिरूं लागली. नंतर तिनें स्वतः धैर्य करून आपल्या बापाची पुस्तकशाळा उघ-डली. पण हें काय! अन्नपूर्णा दार उघडून पाहते तों खुर्चीवर तिचा बाप वाचीत बसला आहे! ती आपल्याकडून मोठ्यानें ओर-डली व भीतीनें त्या खुर्चीजवळच जाऊन पडली. पण तितक्या अवकाशांत तो आकार उठून खिडकींतून खालीं उडी टाकून बाहेरच्या झाडींत गेला व गुप्त झाला! हा प्रकार पाहून ती उठ-ली व थोडा वेळ चित्राप्रमाणें स्तब्ध उभी राहून "हा काय प्रकार आहे!" असें ह्मणून विचार करूं लागली. इतक्यांत टेब-लावर उघडून ठेवलेल्या पुस्तकावर तिची नजर गेली. तों ज्या पुस्तकांतून धर्मनीतिपर वचनें शोधून काढून तिच्या बापानें तिला शिकविलीं होतीं, तेंच तें पुस्तक! तें पाहतांच तिचे हातपाय गळून पडल्यासारखे झाले व तिच्यानें उभें राहवेना; ह्मणून ती त्याच खुर्चीवर जाऊन बसली, आणि आसपासच्या गंभीर देखा-व्याकडे दृष्टि पोंचवूं लागली. इतक्यांत तिच्या खुर्चीच्या मागचा दरवाजा खडखडला आणि तिनें दचकून मागें पाहिलें, तों कोणी नाहीं. तेव्हां 'वाऱ्यानें दार वाजलें असेल,' असें मानून तिनें मनाला धीट करण्याचा प्रयत्न आरंभिला. पण एक पळ लोटलें नाहीं तों तिच्या खोलींत कोणाची पावलें वाजल्याचा तिला भास

झाला आणि मागल्या बाजूनें कोणी ती बसलेल्या खुर्चीवर चढून बसत असल्याबद्दल तिला चांगला संशय आला आणि त्यामुळें ती इतकी घाबरली कीं, तिचें ओरडण्याचें अवसान तर नाहींसेंच झालें आणि "कोणी छातीवर भार टाकून ती दाबीत आहे!" असेंही तिला वाटलें! इतका जरी प्रकार घडून आला तरी थोडक्याच वेळांत तिला कळलें कीं, तिच्या मागून हळूच तिच्या खुर्चीवर चढून बसणारा तिचा बाळपणांतील चिमुकला खेळगडी मोत्या कुत्रा आहे !!!

---

## प्रकरण सातवें.

आर्या.

गे प्रीति तूं पुत्रजनां, हंसवुनि रडवावया आलिस खरी ॥
बहुसाल आस लावुनि, लोटिसि नेवोनियां महा शिखरीं ॥ १ ॥

अन्नपूर्णा हेळवांकच्या वाड्यांत येऊन राहिल्यावर थोडक्याच दिवसांत तिला तिच्या आतेकडून आलेलें एक पत्र मिळालें. त्यांत उडत उडत शांतवनाचा प्रकार असून चिमा बाईनें तिला आपल्या घरीं येऊन राहण्याबद्दल लिहिलें होतें. पण अन्नपूर्णेला आपल्या बापाचें घर सोडून जावेंसें वाटेना. ह्मणून तिनें आपल्या आतेला जें उत्तर पाठविलें, त्यांत आणखी कांहीं दिवस तेथेंच राहण्याची परवानगी मागितली. नंतर थोडक्याच दिवसांत ती आपलें दुःख थोडथोडें विसरूं लगली, आणि सगळ्या घरांत बिनधास्त हिंडूं फिरूं लागली. नंतर एके दिवशीं ती आपली बांसरी हातांत घेऊन रानांतील हवा खाण्याच्या बंगल्यांत एकटीच गेली. ज्या बारीच्या खालच्या बाजूनें एक निर्मळ पाण्याचा झरा वहात होता, त्या बारींत जाऊन ती त्या वाहत्या पाण्याकडे दृष्टि देऊन दीर्घ विचार करीतच उभी राहिली. आसपासच्या झाडींतून येणाऱ्या शीत वायूमुळें जें नैसर्गिक अलगुजें वाजत होतें, तें ऐकण्यासाठीं तिनें आपल्या हातांतील अलगुजें बाजूस ठेवलें. अस्त पावणाऱ्या सूर्याचीं किरणें झऱ्यांतील पाण्याच्या सपाटीवर चमकत

होतीं, तीं पहात असतां बंगल्याच्याबाहेर कोणाचीं पावलें वाजलेलीं तिनें ऐकलीं आणि त्याबरोबर ती चपापली. तों बंगल्याचें दार उघडून कोणी परका पुरुष आंत आला. पण अन्नपूर्णेला पाहतांच तो मागें हटला व स्वत: बेअदबी केली असें मानून अन्नपूर्णेजवळ क्षमा मागूं लागला. तरी त्याचा शब्द ऐकतांच अन्नपूर्णेची धास्ती नाहींशी झाली, व कमलाप्रमाणें तिचें मुख एकाएकीं विकास पावलें! तो शब्द तिनें फारवेळ ऐकला होता. तरी काळोखामुळें त्या गृहस्थाचें तोंड बरोबर दिसत नव्हतें. त्यानें जेव्हां पुन: तिच्याजवळ क्षमा मागितली, तेव्हां अन्नपूर्णेनें त्याला उत्तर दिलें. तिचा शब्द ऐकतांच त्या आलेल्या गृहस्थासही आनंद झाला आणि तो तिच्या अगदीं जवळ येऊन आश्चर्यानें ह्मणाला, " हे ईश्वरा! काय हें? आज ह्या वेळेस अन्नपूर्णा या ठिकाणीं असें कसें व्हावें? अन्नपूर्णे, खरोखर तूंच आहेस काय? बोल बोल! आणखी एकवेळ बोलून माझा संशय दूर कर!! अन्नपूर्णा तात्यांची प्रियकन्या ती तूंच काय?"

" होय, तीच मी आहें." अन्नपूर्णेच्या मनांत पहिल्यानें जी कल्पना आली होती, ती खरी ठरली. " हास्यवदन झालेला वामनराव आपल्या पुढें उभा आहे " असें निश्चयात्मक समजतांच नाना प्रकारचे तरंग तिच्या अंत:करणांत उद्भवले, आणि ती आश्चर्यचकित होत्साती तशीच उभी राहिली. वामनरावानें आधीं तिच्या प्रकृतीबद्दल तिला प्रश्न केला आणि मागून तात्यांविषयीं विचारलें. पण ते शब्द ऐकतांच अन्नपूर्णेच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागला. तिच्यानें उभें राहवत नाहीं, असें पाहतांच वामनरावानें तिला बाजूस नेऊन बसविलें, तरी ती रडतच होती. शेवटीं तें गंभीरस्थान सोडून जाण्याची आपली इच्छा तिनें उघड केली. तेव्हां वामनरावानें मोठ्या प्रेमानें तिचा हात धरून तिला बाहेर आणलें. नंतर चालतां चालतां तात्यांच्या मरणाबद्दलची सगळी हकीकत वामनरावानें ऐकली आणि अन्नपूर्णेचें दु:ख कमी करावें, अशा उद्देशानें वामनराव तात्यांच्यापासून सुटल्यानं-

तरच्या प्रवासाचें वर्णन सांगूं लागला. तो इतिहास ऐकत असतां अन्नपूर्णा आपलें दुःख खरोखरच विसरली! वामनरावाचें भाषण संपल्यावर दोघेंही कांहीं न बोलतां एकमेकांच्या मागून चालत चालत तात्यांच्या वाड्यापर्यंत आलीं. वाड्याचा दरवाजा दृष्टीस पडतांच वामनराव उभा राहिला, आणि त्यानें आपल्या घरीं जाण्यासाठीं अन्नपूर्णेजवळ निरोप मागितला. दुसऱ्या दिवशीं त्याचा परगांवीं जाण्याचा बेत होता, तो त्यानें तिला कळविला आणि तिची इच्छा असल्यास उदयिक आणखी एकवेळ तिची भेट घेऊन जाण्याची आपली इच्छा त्यानें तिला कळवितांच तिनें अनुकूलता दाखविली. तेव्हां अत्यानंदानें तिच्या हाताचें चुंबन घेऊन वामनराव त्या वेळेस तिला सोडून आपल्या घरीं चालता झाला.

नंतर अन्नपूर्णेस आपल्या बापाला दिलेलें वचन आठवलें आणि तिनें दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळींच त्यांतून पार पडण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें रात्र संपताच तिनें आपल्या बापाच्या पुस्तकशाळेंत शेगडी पेटवून घेऊन येण्यासाठीं ताराबाईला हुकूम केला. तो ऐकतांच तिनें शेगडी पेटवून आणून ठेवली. नंतर आपलें कृत्य संपेपर्यंत आपणास कोणाचाही उपसर्ग लागूं नये, अशा हेतूनें तिनें पुस्तकशाळेंत जाऊन पहिल्यानें दार आंतून लावून घेतलें. इतक्यांत मागील व पुढील सर्व गोष्टी ध्यानांत येऊन तिच्या अंगाला कंप सुटला, तरी ती बापानें सांगितलेल्या खिडकीजवळ गेली. नंतर तात्यांनीं ज्याप्रमाणें तिला सांगितलें होतें, त्याप्रमाणें तिनें पायानें दाबून फळी उघडली. त्याबरोबर कागदांचे पुडकें, ऐवजाची पिशवी आणि कांहीं विस्कटलेले कागद तिला दिसले, ते तिनें बाहेर काढले व पुन्हा ती फळी जागच्याजागीं बसविली. नंतर ती जों उठून मागें पाहूं लागली, तों तिचा बाप खुर्चीवर बसलेला तिच्या दृष्टीस पडला. त्याला पाहतांच ती भिऊन ओरडली व मूर्छित पडली. तरी कांहीं वेळानें आपोआप शुद्धीवर आली, तों खुर्चीवर कोणी नाहीं. तिच्या

हातांतून कागदांचें पुडकें पडून जे कागद विस्कटले होते ते तिनें गोळा केले. तों एका कागदावरील एक दोन वाक्यें तिच्या सहज दृष्टीस पडलीं आणि त्यांतील आशय मनांत येतांच ती चपापून राहिली. तिनें त्या कागदावरून नजर फिरविली. कारण ते कागद 'तूं वाचूं नयेस' अशी तिच्या बापाची तिला सक्त ताकीद होती. तरी दृष्टीस पडलेल्या वाक्यावरून तिला बापाची आज्ञा भंग करण्याची लालुच उत्पन्न झाली. तरी तिला बापाला दिलेल्या वचनाचें स्मरण झालें आणि तिनें तें पुडकें एकदम शेगडींत टाकून दिलें. ते कागद वाचून जो भ्रम उघडा होणार होता. त्यावर अक्षय्य काळोख झाला, असें मनांत येतांच ती त्या जळत असलेल्या कागदांकडे एक सारखी दृष्टि देऊन बसली, तरी त्याचा काय उपयोग !

नंतर तिला त्या ऐवजाच्या थैलीचें स्मरण झालें आणि तिनें त्या रेशमी पिशवीची गांठ सोडिली. त्यांतून रोकडे दोन हजार रुपये आणि बाकीचे दागिने तिनें बाहेर काढले. तरी थैलीच्या तळाशीं कांहीं वसविल्यासारखें तिला वाटलें, ह्मणून तींत हात घालून तिनें जें काय होतें, तें जोरानें ओढून बाहेर काढलें. ती एक थैलीच्या तळाबरोबर बसणारी हस्तिदंती पेटी होती. ती बाहेर काढून तिनें उघडली तों एक सुंदर स्त्रीची तसबीर तिच्या दृष्टीस पडली. तिच्याकडे पाहतांच अन्नपूर्णा चपापली, आणि आपल्याशींच ह्मणाली, "होय, हीच तसबीर हातांत घेऊन माझा बाप रडत होता!" त्या तसबिरीकडे तिनें फार वेळपर्यंत लक्ष्यपूर्वक पाहिलें. पण ती स्त्री तिच्या ओळखीची आहे असें तिला वाटेना. ती फारच सुंदर व सुहास्यवदना असून तिच्या मुखावर दिलगिरीची छाया पडलेली दिसत होती. तात्यांनीं ह्या तसबिरीबद्दल कांहींच सांगून ठेवलें नव्हतें. तेव्हां तिनें तिला आपल्याजवळ जपून ठेवण्याचा निश्चय केला. मारुतीराव जाहगीरदारांच्या बायकोचें नांव ऐकतांच तात्या चपापत असत आणि ह्या तसबिरीकडे पाहून तर रडतच होते; त्यावरून ही तसबीर त्या जहागीरदारणीचीच असेल असें तिनें निश्चयात्मक ठरविलें.

तरी आपल्या बापानें त्या बाईची तसबीर आपल्याजवळ कां ठेवावी? आणि तिला हृदयाजवळ धरून विलाप कां करावा? याबद्दलचा भ्रम तिच्या मनाला स्पष्ट कळेना आणि त्याबद्दल तिला बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें.

ती तसबीर हातांत घेऊन अन्नपूर्णा विचार करीत बसली होती; तों दरवाजा उघडून वामनराव आंत आला. त्या तसबिरीनें जरी तिचें चित्त अगदीं आकर्षण करून घेतलें होतें, तरी वामनराव आंत येतांच तिनें सर्व जागच्या जागीं ठेवलें आणि त्याला भेटण्यासाठीं ती पुस्तकशाळेंतून बाहेर आली. नंतर दोघेंही सुखदुःखाच्या गोष्टी बोलत बागेंत निघून गेलीं आणि नाना प्रकारची नैसर्गिक शोभा मोठ्या प्रेमानें पहात असतां त्याच विषयावर त्यांचीं भाषणें चालू झालीं. फिरतां फिरतां दोघेंही एका झाडाखालीं बांधलेल्या दगडी चवुऱ्यावर बसलीं, तेव्हां वामनराव बोलूं लागला:—"आतां ही सर्व मनोरंजक व स्वभावसिद्ध शोभा मी सोडून जाणार आहें! अन्नपूर्णे, तुझ्यासाठीं कदाचित् हा देखावा मला अक्षयीं सोडून द्यावा लागेल. आतां असा आनंदाचा वेळ पुनः आपणांस लाभेल काय; सुंदरी, तूं सत्कुलोत्पन्ना व सुशीला आहेस, असा जो माझ्या मनाचा ग्रह आहे, तो कधींही बदलणार नाहीं. अन्नपूर्णे, तुझी प्रत्येक खुबी व लीला आठवून मी अहोरात्र आश्चर्यचकित होऊन राहीन आणि त्याच आश्चर्याला कांहीं कालानें मी प्रेमानेंही पाहीन!"

अन्नपूर्णा यावर कांहींच बोलली नाहीं. तेव्हां वामनराव पुनः ह्मणाला, "सुंदरी, ह्या गोष्टी इतक्यांतच मी तुझ्या कानावर घालण्यास जरी उत्सुक नव्हतों, तरी आतां आपला वियोग होणार आहे, ह्मणून अशा समयीं मला तुजकडून इतकेंच कळलें तरी पुरे आहे. तें हेंच कीं, हल्लीं मी जी आशा ठेवितों, ती पुढें तुजकडून पूर्ण होईल! बस, हें तूं 'होय' ह्मण, ह्मणजे तुला सोडून जाण्याचें मला जें दुःख आहे, तें अर्धें नाहींसें झालें!"

ह्या वेळेस अन्नपूर्णेनें आपल्या मनांतील उत्कट इच्छा दाबुन

ठेवण्याचा प्रयत्न आरंभिला. जरी मनापासून ती वामनरावालाच पसंत करीत होती, व त्या तिच्या पसंतीला तिच्या कैलासवासी बापाचेंही अनुकूल मत होतें, तरी आपला भावी सखा शोधून पसंत ठरविण्यांत धिम्मेपणा ठेवणेंच तिला योग्य दिसलें. पण इकडे वामनरावाला एकदम ' नाहीं ' असें सांगण्याचेंही तिच्या जिवावर आलें. त्याच्या कुलशीलाची माहिती तात्यांना चांगली होती. "याचें घराणें अनूदार आहे आणि तोही पुढें मोठा नामांकित होण्याची आशा आहे;" असें तात्या वारंवार ह्मणत असत. शिवाय वामनरावानें आपल्या दौलतीबद्दल तिला पुष्कळ वेळां असें सांगितलें होतें कीं, "एक प्रीतीनें पूर्ण भरलेल्या अंतःकरणाशिवाय मजपाशीं दुसरें कांहीं नाहीं." यावाक्यांतील भोळेपणावर तर ती फारच फिदा झालेली होती. अशा अनेक प्रकारांमुळें ' आतां याला काय सांगावें ? ' असें तिनें दहापांच वेळ मनांत आणलें व शेवटीं त्यानें अगदीं निराश होऊं नये, अशा उद्देशानें ती त्याला ह्मणालीः—" ज्या तरुणाविषयीं माझ्या बापाचें मन शुद्ध होतें, तो स्वतः जर मला वाखाणील, तर त्यांत मला मोठा मानच मिळाला असें मानणें योग्य होईल !"

हे शब्द तिच्या तोंडातून बाहेर पडतांच वामनराव अत्यंत आतुर होत्साता तिला विचारूं लागलाः—" अरे, तात्या आपल्या मनापासून मला श्रेष्ठ मानीत असत ! धन्य आहें मी !" हें बोलत असतांना त्याला आपल्या उतावळ्या स्वभावाची लाज वाटल्यासारखें दिसलें. तरी तो मनोविकार अन्नपूर्णेस दिसूं न देतां पुनः तो तिला ह्मणालाः—"अन्नपूर्णे आतां मी दूर जाणार आहें, ह्मणून वरचेवर पत्र पाठवून तुझा क्षेमसमाचार विचारण्याबद्दल मला तुझ्याकडून परवानगी असावीः—"

असें ऐकतांच थोडा वेळ विचार करून अन्नपूर्णा ह्मणालीः— "वामनरावजी, तुमच्यासारख्या भोळ्या स्वभावाच्या सद्गृहस्थाजवळ भोळेपणानेंच वागलें पाहिजे, ह्मणजे तें न्यायाचें होईल. तुह्मी माझी सर्व स्थिति चांगल्या प्रकारानें जाणत आहां.

जरी हल्लीं मी ह्या माझ्या आईबापांच्या घरांत राहतें, तरी एकटी आहें. ही मोठ्याच दुःखाची गोष्ट आहे कीं, तुह्मीं मजपाशीं येऊन बसावें, बोलावें आणि मला पत्रें पाठवून माझा समाचारही विचारावा, अशाबद्दल परवानगी देणारीं मनुष्यें ईश्वरानें मला नाहींशीं केलीं; तर अशा प्रसंगीं तुमची भेट घेण्याचें व तुमचा घरोबा ठेवण्याचें जर मीं नाकारलें, तर तें फारच दुःखपरिणामी होईल असा माझा समज आहे. हा शेवटपर्यंत खेदकर झाला नाहीं, ह्मणजे दोघांनींही जगांत येऊन मिळवायाचें तें मिळविलें! असें ह्मणण्याला कोणती अडचण आहे बरें? ”

“ सुंदरी, तुझीं हीं भाषणें ऐकून माझ्यानें तुझे उपकार मानल्याशिवाय राहवत नाहीं. आतां मी अशी आशा करितों कीं, थोडक्याच कालांत तूं आपल्या आप्तसंबंधीयांत माझी ओळख पाडून देशील. ”

आतां मात्र अन्नपूर्णा स्तब्ध झाली आणि यावर काय बोलावें ? हें तिला सुचेना. त्यामुळें तिची घाबरल्यासारखी अवस्था झाली. फारवेळपर्यंत तिनें स्तब्धपणाच स्वीकारिला. तेव्हां वामनरावही घाबरल्यासारखा झाला आणि ह्मणाला:—

“ हाय हाय ! माझ्या मनांत आज कित्येक दिवस जो संशय होता, तोच खरा होऊन मला दुःखसागरांत लोटण्यासाठीं ह्या वेळेस माझ्यापुढें येऊन उभा राहिला आहे. सुंदरी, ‘ हा तुला योग्य पुरुष आहे ’ असें तूं मानीत नाहींस, हें तुझ्या स्तब्धपणानें सिद्ध करून दाखविलें. अरेरे! ते प्रवासांतील दिवस ! ज्या वेळीं आपण निर्मळ अंतःकरणानें एकमेकांच्या बरोबर फिरत होतों, ते माझ्या आयुष्यांतील खऱ्या सुखाचे दिवस ! त्या दिवसांनीं माझ्या मनांत अनेक आशातरंग उत्पन्न केले होते. ज्या दिवसांत मी आपल्या भविष्यांतील सार्थदाराबद्दलच विचार करीत होतों ! तेच दिवस, ज्यांनीं माझें चित्त आनंदपूरित केलें होतें, तेच आज अक्षय्य दुःख देणाऱ्यांत निवडले गेले ! ”

यांप्रमाणें बोलत असतां वामनरावाचें हृदय भरलें व स्वर अ-

गदी घोंगरा झाला, तेव्हां तो आवेशानें अन्नपूर्णेच्या समोर जो होता तो उठला, आणि इकडे तिकडे फिरूं लागला. त्याच्या मुखावर खिन्नतेचा ठसा उमटलेला ढळढळीत दिसूं लागला! पण त्याची तशी स्थिति पाहतांच अन्नपूर्णेच्या पोटांत भडभडून आलें. तिचें अंतःकरण जें वामनरावाच्या प्रीतिपाशांत गुंडाळून राहिलेलें होतें, त्याच्यापुढें तिनें ओढुन आणलेल्या धिम्मेपणाचें कांहीं चालेना! तिच्या मनाची चलविचल तिच्या चेहऱ्यावर उघड होत होती, ती धूर्तपणानें जाणून वामनराव पुनः येऊन तिच्यासमोर बसला. तेव्हां ती ज्या शब्दांत प्रीतीचाच मोठा भरणा, असे कोमल व मृदु शब्द उच्चारीत असतां ह्मणालीः—

" वामनराव, मी तुह्मांला योग्य पुरुष मानीत नाहीं, असें ह्मणून तुह्मी मला व आपल्याला एकदम अन्यायकूपांत लोटून देत आहां! ह्या वेळेस मला कबूल करणें भाग आहे कीं, मी तुमच्यावर फार दिवसांपासून आपली प्रीति ठेवली आहे, आणि तुमच्याबद्दल मी आपल्या मनांत फारच मोठा मान बाळगून आहें! पण— "

हें शेवटचें वाक्य पूर्ण ऐकण्यासाठीं वामनराव फारच उत्सुक होता, परंतु बोलतां बोलतां त्या कोमल अबलेचें हृदय दाटून आलें व पुढें तिच्यानें बोलवेनासें झालें. तरी प्रीति कधीं दडून राहत नाहीं. त्याचप्रमाणें आषकाचे नेत्र आपल्या माषुकाच्या मुखावरील बारीक खुणाही तपाशीत असतात. त्याप्रमाणें वामनरावानें अन्नपूर्णेच्या मुखावरील प्रीतीची सगळी चिन्हें ओळखलीं. आणि तो आपली दिलगिरी अगदीं विसरून गेला. नंतर एकदम आनंदाच्या भरांत येऊन तो तिला ह्मणालाः—

" अन्नपूर्णे, प्रियसखे अन्नपूर्णे, आतां ही आनंदाची लहर मीं कशी जिरवावी, हें तूंच मला शिकीव! माझ्या उमेदींतील हा समय पूर्ण सुखाचा शिरोमणि होऊन राहिला!!! "

त्यानें तिचा हात आपल्या हातांत धरून त्यावर प्रीतीच्या उष्णतेमुळें सुकून गेलेले आपले ओंठ दाबले. या वेळेस त्याच्या सगळ्या शरीराला गारवा येऊन कंप सुटला होता. अन्नपूर्णेचा

वदनेंदु पूर्ण कलांनीं प्रकाशत असून त्यांतून प्रीतिरूप अमृताचा स्राव होऊं लागला! नंतर ती स्मित वदन करून ह्मणाली:—

" ह्या गोष्टी पुढें अशाच चालविण्याची या वेळीं माझ्यांत शक्ति राहिली नाहीं, ह्मणून आतां मी आपणांजवळ क्षमा मागतें!"

**वामनराव** ह्मणाला:—" सुंदरी, आधीं मी ह्या गोष्टी तुझ्याजवळ बोलूं लागलों, यासाठीं मींच तुजपाशीं क्षमा मागितली पाहिजे. तरी असो. तुझी इच्छा नाहीं तर मीही या संबंधानें आणखीं बोलत नाहीं." याप्रमाणें जरी तो बोलला आणि क्षणभर स्वस्थही बसला, तरी पुनः प्रेमभरानें तें बोलणें विसरला आणि पुढें होऊन तिला सांगूं लागला:—

" सुंदरी, मी तुझ्या शेजारीं गुप्तपणानें बसून आजपर्यंत किती कालक्रमण केला आहे ह्मणून सांगूं? सर्वांनीं विश्रांति देणारी निद्रा घेत घोरत पडावें आणि तशा वेळीं मी तुझ्या ह्या वाड्याच्या आसपास फिरून " तुझ्या शब्दाच्या टप्यांत आहें " एवढ्याच गोष्टीचा आनंद मानीत असावें. ह्या जागा पुष्कळवेळ फिरल्यामुळें माझ्या परिचयाच्या झालेल्या आहेत!"

असें ऐकतांच " माझी व तुमची ओळख नसतांना तुह्मी येथें किती वेळ आला आहां?" असें जेव्हां **अन्नपूर्णेनें** त्याला विचारलें, तेव्हां तो प्रेमवृद्धीनें सांगूं लागला:—

" तुझ्या पित्यानें मला तुझ्या ह्या बागेंत येण्याजाण्याची परवानगी देऊन ठेवलेली होती. त्यामुळें तुला पहावें, भेटावें आणि तुजपाशीं बोलावें, अशा उद्देशानें येथें राहून कित्येक आठवडे घालवीत असें; तरी आजपर्यंत कांहीं तुला भेटावें आणि प्रेमानें बोलत बसावें, असा समय आला नाहीं. मी नित्य सायंकाळीं तूं आपल्या बापाबरोबर फिरण्यासाठीं बाहेर पडलीस, ह्मणजे तुझ्याबरोबर असें. तरी चमत्कार असा कीं, तुझ्याजवळ येऊन बोलण्यास माझें धैर्यच होत नसे. मग त्यांत काय कारण असेल तें असो." याप्रमाणें बोलत असतां पुष्कळ वेळ निघून गेला असें **वामनरावास** वाटलें आणि तो पहिल्या गोष्टी सोडून ह्मणाला:—

" आता मला येथून गेलें पाहिजे. तरी मी परगांवीं जाण्याचे आधीं पुन: एकवेळ येऊन तुझी भेट घेईन. तरी आतां तूं आपल्या कुटुंबांतील माणसांची आणि माझी ओळख कधीं करून देशील तें एक वेळ निश्चयानें मला सांग, ह्मणजे मी सुखी झालों. " असें ऐकतांच अन्नपूर्णा ह्मणाली:–" माझ्या बापाच्या अनूदार अशा कोणत्याही मित्राची ओळख माझें कुटुंब अत्यानंदानें करून घेईल. " हें ऐकतांच वामनरावानें तिच्या हाताचें चुंबन घेतलें आणि जाण्याची तयारी करून " हें सुहास्यवदन आतां मला केव्हां दिसेल ? " असें मनांत आणलें, तों पाठीमागें झाडांत कोणाची पावलें वाजल्याचा भास झाला !

---

## प्रकरण आठवें.

आर्या.

स्त्रीजिव्हा कातरशी, चालुनि तुकडे करीत हृदयाचे ॥
क्षोभवि सज्जन मानस, धनलोभें धनिक पाहतां नाचे ॥

अन्नपूर्णा चपापून मागें पाहते तों तिची आत चिमाबाई येत असलेली तिच्या दृष्टीस पडली. तेव्हां आपल्या आतेला आदरानें घरांत आणण्यासाठीं अन्नपूर्णा पुढें झाली.

आश्चर्यचकित दृष्टीनें वामनरावास नखशिखांत तपासून मग अन्नपूर्णेच्या ह्या डौलदार आत्याबाईनें आपल्या भाचीजवळ बोलण्यास आरंभ केला:–

" कां बाई, कसं काय आहे ! अरे पण हो ? मला हें विचारण्याचं आतां कांहीं कारण आहे असं वाटत नाहीं. तुझें दुःख मागें पडलें, असें तुझ्या मुखाकृतीवरून मला कळतंच आहे ! मी समजत होतें कीं, तुझा फार मोठा तोटा झाला आहे; पण तो सगळा भरून आला असें तुझा तोंडवळा मला स्पष्ट सांगत आहे. "

" आत्याबाई, माझा तोंडवळा तुह्मांला ठकवीत आहे, असंच या वेळेस मला मानलं पाहिजे. माझा जो तोटा झाला आहे, तो कधींही भरून येणार नाहीं. "

" बरं, बरं, तसेंही असेल. मी तुझ्याजवळ तक्रार करूं इच्छित नाहीं. तरी तुझ्या बापाचे सगळे गुणावगुण तुझ्यांत पूर्ण भरून राहिले आहेत, हें पाहून मला आश्चर्य वाटतें. "

आपल्या कैलासवासी पित्याबद्दलची अशी विलक्षण निंदा ऐकल्यामुळें अन्नपूर्णेच्या मुखावर जो दिलगिरीचा ठसा उमटला, तो पाहणारास तिची दया आल्याशिवाय राहणार नाहीं. तरी ह्या गोष्टी बंद होण्याच्या हेतूनें तिनें वामनराव आणि चिमाबाई यांची परस्पर ओळख करून दिली. नंतर थोडक्याच वेळानें वामनरावानें जाण्याची तयारी करून त्या दोघींचाही निरोप घेतला. त्या वेळेस अन्नपूर्णेला सोडून जाण्याचें त्याला फार वाईट वाटलें, असें त्याच्या तोंडावर स्पष्ट दिसत होतें. तो गेल्यावर चिमाबाईनें मोठ्या तोऱ्यानें अन्नपूर्णेस विचारलें:—

" हा तरुण पुरुष कोण आहे ? मला तर असें दिसलें कीं, तो तुझा भावी प्रियकर आहे ! बाई साहेब, आपल्या अशा ह्या नाजुक दिवसांत आपण जे हे ढंग करीत आहां, हे सगळ्या गांवभर तुमची कीर्ति गावितील."

ह्या बेढंग्या भाषणांनीं अन्नपूर्णेचें पित्त उसळलें. तिनें मध्यें उत्तर देण्याचा प्रयत्न केला, पण त्या वस्ताद चिमाबाईनें चालूं दिला नाहीं. तिची जीभ कातरी प्रमाणें चरचर चालूं लागली:—

" तुझ्यासारख्या मोठ्या मुलीला पालनकर्त्याची काय गरज आहे ? मी काहीं अशा स्वतंत्र पोरीला संभाळण्यावांचून अडलें आहे असें नाहीं. तरी ज्यापेक्षां तुझ्या पित्यानें विश्वास ठेवून मरतांना मजवर हें काम सोंपविलें आहे, त्यापेक्षां मला तें करणें आहे, तरी बाईसाहेब, मी आपणांस असं सांगतें कीं, आपण जोंपर्यंत माझ्या सांगण्या प्रमाणें वागणार नाहीं, तों पर्यंत मी आपणांस माझ्या आश्रयास ठेवणार नाहीं. "

अन्नपूर्णेनें दुसऱ्या वेळेसही बोलण्याची खटपट केली; पण ती सगळी व्यर्थ गेली.

" मी आतां आपल्याबरोबर तुला तुळशीस नेण्यासाठीं आलें

आहे." चिमाबाईनें आपलीच गाडी पुढें ढकलली—"अशा रीतीनें तुझा पिता स्वर्गवासी झाला, त्यामुळें मला फार दुःख होत आहे. गरीब बिचारा! त्यानें जर आपला पैसा परोपकारांत उधळला नसता, तर आज तुला कांहीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची गरज नव्हती."

अन्नपूर्णा आतां शांतपणा धरून बोलूं लागली:—"आत्याबाई, आपण बोलतां त्याप्रमाणें माझ्या पित्यानें केलें आहे, असें मला मुळींच वाटत नाहीं. त्याचप्रमाणें ज्या परोपकारांबद्दल लोक त्याला वाखाणतात, ते त्यानें दुसऱ्याच्या जिवावर कधींच केलेले नाहींत. त्याचें येणें अजून पुष्कळांकडे आहे, आणि तेंही कर्जाच्या चौपट आहे. त्याचें देणें फिटेतोंपर्यंत मी येथेंच राहीन. माझ्यासाठीं तो जी पूंजी ठेऊन गेला, तीच मला पुष्कळ आहे!"

हें ऐकतांच चिमाबाई थट्टेनें हंसून ह्मणाली:—"हो हो; तूं याच ठिकाणीं रहा, ह्मणजे तुझ्या जिवाला शांति, आराम आणि करमणुक होईल! तुझ्यांत इतकी अक्कल असेल असें मला वाटलें नव्हतें. तूं एथेंच राहण्याचें काढलेंस, या गोष्टीला मी परवानगी दिली असती. पण तो तुझा साथीदार वामन, हो वामनच. मेल्याचें नांवही लौकर ध्यानांत येत नाहीं!"

हें लागून बोलणें अन्नपूर्णेच्यानें ऐकवेना! ती ह्मणाली:—"आत्याबाई, मी आपल्या सुखासाठीं येथें राहण्याची परवानगी आपणांजवळ मागितली, असं आपण मनांतही आणूं नये. येथें येऊन आपल्या भावाच्या मुलीच्या दुःखांत भर टाकावी, असाच जर तुमचा मतलब होता, तर आपल्या येण्यावांचून माझें कांहीं अडलं नव्हतं." हें बोलत असतां अन्नपूर्णेच्या डोळ्यांतून पाण्याची धार लागली!

चिमाबाईला तर हे शब्द ऐकून फारच राग आला आणि तापून ह्मणाली:—"हें एक माझ्यावर संकटच आलें आहे, असें मला वाटतें."

अन्नपूर्णा आपले डोळे पुसून ह्मणाली:—"माझ्या बापानें

तुह्मांला संकटांत टाकलें आहे, असें मला मुळींच वाटत नाहीं. त्याच्या दृष्टीनें मी इतकी चांगली होतें कीं, तो वारंवार मला वाखाणीतच असे. आतां त्याच्या पश्चात् त्याच्या हेतूप्रमाणें जर मी त्याच्या बहिणीच्या आश्रयास राहण्याचें नाकबूल केलें, तर तें शोभत नाहीं."

"बरं आहे! अशा तुझ्या शहाणपणाच्या भाषणांनीं कांहीं वळणार नाहीं. या वेळेस मला तुझ्या चालीरीतीबद्दल डोळेझांक केलीच पाहिजे, असा हा वेळ आहे! पुढें पाहतां येईल त्याचें."

"मी अशा कोणत्या वाईट मार्गानें गेलें, कीं आपणांस त्याबद्दल डोळे झांकूनच असलं पाहिजे?"

"कोणता वाईट मार्ग? एका तरुण मुलीनें अनोळखी तरुणाबरोबर एकांतांत असणें, याला सन्मार्ग कोण ह्मणेल?"

या बोलण्याचा तर अन्नपूर्णेला फारच राग आला. तरी तिनें विचार केला कीं, ह्या वेळची वामनरावाची भेट पाहणाराच्या मनांत संशय उत्पन्न करण्यासारखीच आहे. असें मनांत येतांच तिनें तात्यांची आणि वामनरावाची ओळख कशी पडली आणि त्याला तात्यांच्या हातानें अकस्मात् गोळी लागल्यामुळें त्यानें आपल्याबरोबर किती प्रवास केला होता, इत्यादि सर्व गोष्टींची चिमाबाईला माहिती करून दिली. याशिवाय त्यानें तिला पत्रोंपत्रीं तिचा समाचार घेण्याबद्दलही विचारलें होतें आणि अन्नपूर्णेनें त्याला पत्रें पाठविण्याची मोकळीक दिली होती, हेंही तिनें आपल्या आतेला सांगितलें. तेव्हां ती आत्याबाई ती गोष्ट आपल्याला रुचत नाहीं, असें दाखवून ह्मणाली:—

"हा असा इतका धीट कोण आहे? आणि त्याला आमच्या कुटुंबांतील पोरीजवळ इतकी मोकळीक घेण्याचें कारण काय?"

"आत्याबाई, हें आपणच त्याला विचारावें." अन्नपूर्णा जरा तोऱ्यानेंच ह्मणाली:—"त्याच्या कुलशीलाविषयीं तात्यांना चांगली माहिती होती व त्यांनींच त्याला येथें येण्याची परवानगी दिली होती. तो खरोखर एका मोठ्या कुलांतील कुलदीपक आहे." असें ला

बोलून तिला माहिती होती तितकी हकीकत तिनें त्याच्या कुळाबद्दलचीही चिमाबाईला सांगितली.

"अग, तर तो त्याचा धाकटा भाऊ असेल!" चिमाबाई नाक उडवीत बोलूं लागली. "तें तर भिकारी कूळ! मला ठाऊक आहे. आतां ह्यांत हा एक चमत्कारच आहे कीं, माझ्या भावानें त्याला दोन दिवसांच्या ओळखींत अगदीं अभ्रूच्या शिखरावर नेऊन बसविलें! पण तो त्याचा स्वभावच होता. त्यांत कांहीं अधिक आहे असें नाहीं."

अन्नपूर्णेला ही कर्मकटकट बंद करण्याची इच्छा झाली, ह्मणून ती तिला आंग धुण्यासाठीं स्नानागारांत घेऊन गेली. तरी तिची जीभ सारखी चाललीच होती.

"आपल्या बापाचा सगळा स्वभाव तूं उचलला आहेस. त्यांत अधिक हें कीं, एकाद्या मनुष्याला पाहतांच त्याची परीक्षा करून त्याच्याबद्दल आपलें मत स्थापित करायाचें! थोडक्याच दिवसांच्या संगतींत त्या तरूण पोरानें तुला आपल्या प्रीतिपाशांत गोंवून ठेवलं, आणि तूंही त्याच्यावरच खुष झालीस! तो बोलत असतां तुझे जे चाळे होत असत, ते काय मला समजले नाहींत?"

"आत्याबाई, मजवर दोषारोप करणं जर तुह्मांला योग्य वाटत असलं तर करा. पण ह्या वेळेस तरी अशी टीका करून माझें काळीज करपवूं नका. केवळ दयेस्तव तरी विचारानें बोला! मी आपल्या आईबापाच्या पश्चात् तुमच्याशिवाय कोणाकडे पाहून सुख मानावें बरें!"

याप्रमाणें बोलत असतां अन्नपूर्णेच्या नेत्रांतून दुःखाश्रूंचा प्रवाह वाहूं लागला. आपल्या आईबापांच्या वेळीं घालविलेल्या सुखवर्धक काळाचें तिला स्मरण झालें. तरी तिचें दुःख कमी करण्यासाठीं त्या घातकी आत्याबाईच्या तोंडांतून एकही शब्द बाहेर पडला नाहीं. चिमाबाईच्या स्वभावाला कोणावरही मालकी चालविणें फार आवडत असे. तिनें ह्या पोरक्या पोरीला आपल्या घरीं नेऊन वाळगण्याचा निश्चय केला होता; त्याला त्याला अनु-

सरून तिनें त्याच दिवशीं सायंकाळीं अन्नपूर्णेला घेऊन आपल्या गांवीं ( तुळशीस ) जाण्याचा विचार अन्नपूर्णेला कळवून " तुला काय व्यवस्था करायाची असेल ती चार घटकांत कर." असें सांगितलें. तरी अन्नपूर्णेनें पुष्कळच भानगडी पुढें करून तो बेत दुसऱ्या दिवसावर लोटून दिला.

आपल्या बापाचें वतन सोडून जाण्याचें अन्नपूर्णेच्या जिवावर आलें! " कदाचित् परत येणेंही होणार नाहीं," असें मनांत आणून ती विचार करूं लागली. दुसऱ्या दिवशीं त्या दोघींचीही तुळशीस निघून जाण्याची तयारी झाली; तेव्हां अन्नपूर्णेनें त्या घरदाराकडे पाहून पुनः एक वेळ डोळ्यांतून पाणी काढलें.

गाडींत बसल्यावर त्या जुलमी आत्याबाईनें अन्नपूर्णेच्या दुर्वर्तनाबद्दल लांबच लांब भाषणें करून टीका आरंभिली. पण त्या सुशील मुलीनें खालीं मान करून सगळें ऐकून घेतलें.

शेवटीं त्या दोघीही तुळशी गांवांत दाखल झाल्या. चिमाबाईनें आपलें घर डौलदार दिसावें ह्मणून बरेंच शृंगारलें होतें, इतकेंच नव्हे, पण आपली श्रीमंती उघड दाखविण्यासाठीं तिनें घरांतील चाकर माणसेंही झळझळीत पोषाख अंगावर घालून घरांत हिंडतील अशी व्यवस्था मोठ्या कसोशीनें करून ठेवली होती."

घरीं जातांच चिमाबाई बऱ्याच थकल्या आहेत, असें दाखविण्यासाठीं अंगावरील शाल एका दोरीवर टाकून देऊन त्या एका बाजल्यावर पडून राहिल्या, आणि त्यांनीं घरांतील सैंपाकिणीस लौकर जेवणाची तयारी करण्याचा हुकूम केला.

" मी आपल्या घरांत आलें आणि आपल्या चाकरमाणसांस आनंदानें हिंडतां फिरतांना पाहिलें, तेव्हां मला खरोखरीचा संतोष अनुभवास आला!" त्या वृद्धाबाई थोडासा दम खाल्यावर बोलल्या. " जरी प्रवास करण्यांत सुख आहे असें ह्मणतात, तरी मी त्याचा धिःकार करीत असतें. अन्नपूर्णे, कां? तुमच्या कपाळाला आंठ्या कां? "

अन्नपूर्णेनें जरी तिला उत्तर दिलें नाहीं, तरी "माझ्या बापाची बहीण अशी पोकळ डामडौल दाखविणारी असेल काय?" असें वारंवार तिच्या मनांत आलें, आणि त्याबद्दल तिला वाईटही वाटलें.

आपला मोठेपणा व श्रीमंती आपल्या भाचीच्या मनांत भरावी अशा इच्छेनें चिमाबाई आतां शांतपणानें अन्नपूर्णेला आपली स्थावर मिळकत, शेतवाडी, घरांतील सामानसुमान इत्यादिकांच्या गोष्टी सांगूं लागली. तिनें घरांतील प्रत्येक खोली व पेटी उघडून अन्नपूर्णेस आपले दागिने व चीजवस्त दाखविली आणि आपल्या घरांत वारंवार मेजवान्या वगैरे होत असतात इत्यादि अनेक प्रकार तिनें मोठ्या डौलानें सांगितले; पण त्यापासून अन्नपूर्णेस मुळींच आश्चर्य वाटेना! तेव्हां ती बाई पुनः चौंचून बोलूं लागली, तरी उत्तर न देतां अन्नपूर्णेनें तें सगळें ऐकून घेतलें.

रात्रौ भोजनोत्तर जेव्हां अन्नपूर्णा आपल्या निजण्याच्या ठिकाणीं गेली; तेव्हांमात्र या जुलमी आत्याबाईच्या हातांतून सुटल्यासारखें तिला वाटलें आणि नियमाप्रमाणें ईश्वरस्मरण करून ती निजली.

---

## प्रकरण नववें.

चिमाबाईचा वाडा तुळशीगांवापासून थोड्याशा अंतरावर एका बागांत होता आणि त्याच्यासभोंवतीं दुसरेही पुष्कळ बाग होते. प्रातःकालीं फराळ झाल्यानंतर अन्नपूर्णा बागेंत फिरण्यासाठीं गेली आणि तेथील मनोरंजक देखावा पहात बराच वेळ पर्यंत तेथें राहिली. पण जेव्हां दोन प्रहरीं ती जेवायासाठीं पानावर जाऊन बसली, तेव्हां चिमाबाईनें मोठ्या रागानें तिला विचारलें:–"तूं आज सकाळपासून कोणीकडे गेली होतीस? असें एकटेंच पाहिजे तिकडे रखडणें मला आवडणार नाहीं. बोल तूं कोणीकडे होतीस?"

अन्नपूर्णेनें तिला शांतपणानें कळविलें कीं, "मी कांहीं कोठें

दूर गेलें नव्हतें. ह्या तुमच्या महालाच्या आसपास बाग पहात सहज फिरत होतें."

हें सांगणें जरी खरें होतें तरी चिमाबाईला रुचलें नाहीं. ती बळेंच रागाचा आवेश दाखवून ह्मणाली:—"मी आज एक वेळ तुला निक्षून सांगून ठेवतें कीं, तुझा असा हा स्वतंत्र स्वभाव मला अगदीं आवडणार नाहीं. बरोबर चाकरमनुष्यें घेतल्याशिवाय तुला एकटीला जाण्याची माझ्याकडून मनाई आहे. आधीं माझ्या बागा अफाट आणि त्यांत तूं स्वतंत्र मुलगी, रात्रींही आपल्या आषकाला भेटण्यास चुकत नाहींस ती काय करशील व काय नाहीं? या गोष्टीचा मला विश्वास ठेववत नाहीं."

या भाषणानें अन्नपूर्णेच्या हृदयाला घरेच पडल्यासारखें झालें. "माझ्या आतेला असें बोलण्याचें कारण काय? हें तिच्या ध्यानांत येईना. त्या बापडीला थोडेंच ठाऊक होतें कीं, त्या दिवशीं वामनरावाला मार्गानें जात असतां तिनें पाहिलें होतें आणि त्यामुळें हें वादळ तिच्यावर आलें होतें. असो.

जेवण झाल्यावर चिमाबाईनें अन्नपूर्णेला सांगितलें कीं, "आज सायंकाळीं माझ्या घरीं पुष्कळ पाहुणे येणार आहेत. त्यांच्याबरोबर तुला मोठ्या सभ्यपणानें वागावें लागेल."

चिमाबाईच्या घरीं अशा प्रकारचे पाहुणे येणें हें अगदीं स्वाभाविक होतें. पण जे कोणी आले होते, त्यांत वामनरावासारखा सुशील व मनमिळाऊ एकही पुरुष दिसला नाहीं.

अन्नपूर्णेला जेव्हां मोकळीक सांपडत असे, तेव्हां ती बागेंत जाऊन मार्गावरील मौज पाहण्यासाठीं एक उंच जागा केलेली होती, तेथें बसत असे. त्याप्रमाणें एके दिवशीं त्या जाग्यावर बसून पुस्तक वाचीत होती, तों घोड्याचीं पावलें वाजल्यासारखें तिला वाटलें, ह्मणून ती मार्गाकडे पाहूं लागली; तों दिसण्यांत थेट वामनरावाप्रमाणें, असा एक गृहस्थ घोड्यावर बसून मोठ्या वेगानें निघून गेला. तिनें त्याबद्दल थोडासा विचार केला आणि रात्र होतांच ती घरांत निघून गेली.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं चिमाबाईनें अन्नपूर्णेला आपल्या-जवळ बोलावून आणलें. ती जाऊन तिच्या समोर उभी राहतांच तिला कळून आलें कीं, " कांहीं तरी बिघाड झाला आहे? ती दृष्टीस पडतांच तिच्या आत्याबाईनें एक कागद तिच्या हातांत दिला आणि दबावून विचारलें, " हें अक्षर तुझ्या ओळखीचें आहे कीं नाहीं ? "

अन्नपूर्णेनें अक्षराकडे पाहून " नाहीं ह्मणून सांगितलें. तेव्हां अधिक तापल्यासारखें करून ती आत्याबाई थोडासा स्वर चढवून ह्मणाली:—" तूं आतां मला अधिक चीड येण्यासारखें काम करूं नको. हें अक्षर तुझ्या ओळखीचें आहे, अशी माझी खात्री आहे. या-साठीं लौकर कबूल हो. बोल, तुला कबूल झालेंच पाहिजे. या वेळेस जें खरें असेल तेंच सांग. "

याप्रमाणें बोलत व ओरडत जेव्हां ती आक्काबाई अन्नपूर्णे-च्या अंगावर येऊं लागली, तेव्हां " मागल्या पायीं पळून जावें, " असें अन्नपूर्णेच्या मनांत आलें.

" अग सटव्ये, मी जाणतेंच तर! हें अक्षर तूं ओळखतेस! तूं खरोखर अपराधी आहेस. " असें बोलून चिमाबाईनें तिला अडविलें. तेव्हां अन्नपूर्णा शांतपणानें ह्मणाली:—" बाईसाहेब, एव-ढावेळ आपण संशयांत होतां आणि आतां एका क्षणांत अगदीं निः-संशय झालां हें कसें? "

हा काळजाला छिद्र पाडणारा प्रश्न चिमाबाईच्या ध्यानांत आला नाहीं. तें पत्र वामनरावाकडून आलें आहे, असें अन्नपूर्णेस कळवून क्रोधावेशांत आल्यासारखें करून ती ह्मणाली:—' आतां जरी तूं तें नाकबूल केलेंस, तरी मी ऐकणार नाहीं. तुझ्या चेहेऱ्या-वरूनच मला सगळें कळून आलें आहे. माझी पक्की खात्री आहे कीं, माझ्या घरांत माझ्या न कळत तूं अशी कित्येक पत्रें घेऊन वांचली आहेस. तुझ्या मताशिवाय कांहीं या पोरानें मला पत्र पाठ-विण्याची हिम्मत केली नाहीं; आणि आतां मला— मला— "

येथें अन्नपूर्णा मध्यें बोलण्याचा प्रयत्न करीत होती तों जि-

माबाई तिच्या अंगावर ओरडून ह्मणाली, " तूं-तूं-तूं माझ्या बोलण्याच्या आड येऊन एक शब्दही बोलूं नयेस. मी-मी-मी-मघाशीं काय बोलणार होतें तेंही विसरून गेलें ! असो. पण माझ्या नांवानें पत्र पाठविण्याबद्दल तूं त्याला मनाई कां केली नाहींस?"

हें बोलत असतां चिमाबाईनें जितकीं वाईट विशेषणें तिला सुचलीं, तितकीं वामनरावासाठीं वापरलीं. तेव्हां तें बोलणें बंद करावें ह्मणून अन्नपूर्णा संधि साधून ह्मणाली,-" त्याच्या कुलशीलाबद्दल माझ्या बापाला चांगली माहिती होती"

" तो तर जागोजागीं असाच फसत असे!" चिमाबाई अगदीं डोळे फिरवून बोलूं लागली.-" तो कोणत्याही मनुष्याला कधीं वाईट ह्मणाला नाहीं; आणि त्याचमुळें मरेपर्यंत फसला! " या वेळेस तर बोलण्याची शिकस्त करून चिमाबाईनें अन्नपूर्णेस रडविलें. शेवटीं रडतां रडतां ती गरीब मुलगी काकळूतवाण्या स्वरानें आपल्या आतेस ह्मणाली.-" अहो, आपण जो इतका मजवर दोषारोप करून बोलतां, याचें खरें कारण कांहीं माझ्या ध्यानांत येत नाहीं. माझ्या बापानें प्रतिष्ठितपणा आणि अब्रू यांचें प्रमेय मला चांगलें शिकविलें आहे. " आपण स्वत: अब्रूनें असलें, ह्मणजे सगळें जग आपल्याजवळ अब्रू राखूनच वागत असतें." ह्या वाक्याचा लक्ष्यार्थ त्यानें माझ्या मनांत चांगला भरवून दिलेला असल्यामुळें आपली अब्रू कशी संभाळावी, हें मी जाणतें; आणि त्याचसाठीं आपणांस एक वेळ शेवटचें सांगतें कीं, आजपर्यंत मी माझ्या अथवा माझ्या कुळाच्या नांवाला काळिमा येईल अशी कधींही वागलें नाहीं व याच्यापुढेंही वागणार नाहीं. असें असून केवळ आपला मोठेपणा दाखवून मजवर दाब बसविण्यासाठीं जर आपण माझ्यावर असें तोंड सोडाल, तर मला शेवटपर्यंत कौमार्यव्रत धारण करून एकाद्या मठांत राहण्याचेंच सुखाचें वाटेल. आपल्या आश्रयाची मी गरज ठेवणार नाहीं, आणि तसें करून लोकांत हंसें होण्यासारखेंही वागणार नाहीं. मला आपल्या स्वाधीन करण्यांत तात्यांचा असा हेतु नव्हता!"

या लांबलचक भाषणानें तर चिमाबाईची बोबडीच वळली; किंवा "अधिक बोलण्यांत लाभ नाहीं" असें तिच्या मनांत आलें. तें कसें ही असो. अन्नपूर्णेचें भाषण संपतांच ती ह्मणाली.—" बाई, तूं उगीच रडूं नको. " तुला सुख लागावें" ह्मणून तुझ्या बापानें तुझें पालन करण्याचें काम मजकडे सोंपविलें आहे. तर तुझ्या भावी सुखाबद्दलही मला योग्य विचार केला पाहिजे. ह्मणून असें बोलणें भाग येतें. आतां तूं मला असें वचन दे कीं, अशा तरुणां-च्याबरोबर कोणताही गुप्त व्यवहार करणार नाहीं. जें करणें तें तुह्मांला कळवून तुमच्या मतानें करीन."

अन्नपूर्णेनें असें ऐकतांच तिला वचन दिलें. नंतर जिवाला शांतता येण्यासाठीं चिमाबाईनीं आपली एकांत बसण्याची इच्छा दर्शविली तेव्हां अन्नपूर्णेनेंही " बरी पीडा टळली!" असें मनांत आणून तेथून आपला पाय काढला आणि स्वतः शांतता मिळवि-ण्यासाठीं ती पूर्वीं सांगितलेल्या बागेंतील उंच जाग्यावर जाऊन बसली व बागेंतील थंड हवेंत आपलें मन रमवूं लागली. पण तिचें मन कसें रमावें? तिला जन्मापासून आईबापांच्या सुशिक्षणांत व सौख्यांत असल्याचें स्मरण झालें व त्यांतच मूर्तिमंत वामनरावाचें प्रेमही येऊन पुढें उभें राहिलें. सारांश.—तेथें गेल्यावर तिच्या म-नांत विचारांचे अनेक तरंग उद्भवल्यामुळें ती अगदीं घोंटाळून गेली; व त्यांतच तिला असेंही वाटलें कीं," आतां त्या प्रियकरा-चें वदनारविंद माझ्या दृष्टीस पडेल काय?" हा विचार मनांत येतांच तिच्या नेत्रांतून अश्रुप्रवाह वाहूं लागला आणि एका पळांत बागेचा दरवाजा उघडून स्वतः वामनराव येऊन तिच्या पुढें उ-भा राहिला!

त्या वेळेस खुशाली आणि आश्चर्य यांचा प्रभाव अन्नपूर्णेच्या तोंडावर स्पष्ट दिसूं लागला. एकाएकीं सगळा फिक्कटपणा ना-हींसा होऊन तिचे गाल गुलाबीरंगाचे दिसूं लागले आणि फुलले-ल्या कमळाप्रमाणें तिचें तोंड खुलूं लागलें. तरी तितक्यांत चिमा-बाईला वचन दिल्याची तिला आठवण झाली आणि समोर असले-

त्या वामनरावाची प्रीति त्याला भेटण्यासाठीं तिच्या शरीराला वेगवान् करूं लागली. याप्रमाणें तिच्या अंतःकरणांत निरनिराळ्या दोन मनोविकारांचा झगडा लागला असतां त्यांत प्रीतिपक्षानें जय मिळविला! तिनें वामनरावाचें उभ्या उभ्या स्वागत आरंभिलें; तों चिमाबाईही सहज बागेंत फिरत होती, ती त्या दोघांच्या पुढें येऊन उभी राहिली. तेव्हां वामनरावास तिच्याच बरोबर बोलण्याची खूण करून अन्नपूर्णा जी तेथून निघाली ती दिवाणखान्यांत जाऊन बसली.

वामनरावानें आपल्या कुलशीलाविषयींची माहिती चिमाबाईस पहिल्यानें सांगितली आणि मग ह्मणाला,—"माझ्याजवळ कांहीं फार मोठी पुंजी आहे, असा अर्थ नाहीं. माझें पालनपोषण अजून माझा वडील भाऊच करीत असतो." इतकें ऐकून चिमाबाई दिवाणखान्यांत आली आणि वामनरावाबरोबर तिचें जें भाषण झालें होतें, व त्यानें तिला जें सांगितलें होतें तें तिनें थट्टेनें हंसतां हंसतां अन्नपूर्णेला सांगितलें. वामनरावाच्या भोळेपणाबद्दल संतोष व चिमाबाईच्या मगरूरीबद्दल खेद, असे दोन निरनिराळे विकार अन्नपूर्णेच्या मनांत एकेच वेळीं उत्पन्न झाले.

इतक्यांत चिमाबाई अधिक टवाळपणानें हंसून ह्मणूं लागलीः— "हः हः हः हः! अशा एका भिकाऱ्याला मी आपली भाची देणार! मीं तर एका शब्दांत त्याला उडवून दिलें. त्याचा वेडेपणा कसा पहा! तो जर माझ्याजवळ लग्नाचं बोलणं बोलण्यासाठीं आला होता, तर त्यानं आपली दरिद्रदशा तरी मला आधीं कळवायाची नव्हती. मीं त्याला माझ्या माझ्या घरांत वारंवार येण्याचीही मनाई केली. तेव्हां तर मेला असं ह्मणूं लागला कीं, "मला जर अन्नपूर्णाच नको येऊं ह्मणेल, तर मी येणार नाहीं." तर त्याला मी अशी मोकळीक कधींच देणार नाहीं; आणि तुलाही एक वेळ सांगून ठेवतें कीं, जर तूं ह्या भिकाऱ्या पोराची संगत, व त्याच्याबरोबर बोलण्याचालण्याचा व्यवहार ठेवशील तर मी तुला एकदम जोगनशाळेंत नेऊन अडकवीन."

मोठी फत्ते केल्याचा आव घालून ही निर्दय आत्याबाई अन्नपूर्णे जवळून चालती झाली; आणि स्वतः रात्रीं एका नाचांत जाणार होती, त्याबद्दल तयारी करण्यांत गुंतली. जातांना तिनें त्याबद्दल अन्नपूर्णेसही हुकूम केला होता व त्या वेळेस तिच्या मनांत "रात्रीं नाचाला जाऊं नये" असें आलें होतें. पण "नाहीं ह्मटल्यास चिमाबाई भलताच संशय घेऊन बडबडणार" हें जाणून तिनें येण्याचें कबूल केलें. "वामनरावाचा व आपला वियोग झाला!" असें ती खात्रीनें मानूं लागली. पण तिच्या पवित्र प्रीतीच्या विचारलहरींत पुनः त्याची मूर्ति तिला हुबेहुब डोळ्यांपुढें दिसूं लागली, आणि त्यामुळें शेवटीं ती आक्साबोक्शीं रडूं लागली. सायंकालपर्यंत तिनें आपला सगळा काळ खिन्नपणांत घालविला आणि दिवे लागतांच चिमाबाईच्या बरोबर नाचांत निघून गेली

कावेरीबाई या नांवाची एक विधवा थोड्या महिन्यांपूर्वी तुळशीगांवांत येऊन राहिली होती. ती आपल्या भ्रताराच्या मरणाच्या आधीं मुंबईंत रहात होती. तेथें तिनें आपलें तारुण्य नाटकें पाहण्यांत व नाचरंगांतच आपल्या नवऱ्याबरोबर घालविलें होतें. ती येथें आल्यावर तुळशींत लोकांनीं कधीं न पाहिलेल्या मेजवान्या लोकांस देऊं लागली; आणि त्यामुळें लोभी चिमाबाईचा लोभ तिचें मित्रत्व संपादन करण्यासाठीं वाढूं लागला. कोठें बोलण्याची संधि आल्यास "कावेरीबाईचा व आपला घरोबा आहे" असें दाखविण्याचा चिमाबाई प्रयत्नही करीत असे.

आज ती ज्या नाचांत जाणार होती, तो फारच थाटमाटाचा होता. एका मजेदार बागांत मांडव घालून त्यांत रंगीबेरंगी दिवे लावले होते, नाना प्रकारचे पुतळे उभे कले होते आणि सर्व प्रकारची शोभा आणलेली होती. त्या मंडपाला साजेल, असा चित्रविचित्र पोषाख करून तेथें येणारे लोकही मोठ्या डौलानें येत होते. तेथें जमलेल्या सर्वांच्या मुखावर आनंदाचा ठसा उमटलेला असून तो अधिकाधिक खुलत होता; पण अन्नपूर्णेच्या मुखाकडे

पाहतांच ती खिन्न आहे, असें दिसत होतें. त्यांतच जेव्हां तिनें **वामनरावाला** दुसऱ्या एका स्त्रीबरोबर नाचतानां पाहिलें, तेव्हां तिला किती दुःख झालें असेल? ह्या वेळेस **वामनरावाच्या** मुखावर जी खुशाली दिसत होती, तशी तिनें पूर्वी कधींच पाहिली नव्हती. तो देखावा तिच्यानें अधिक वेळ पाहवेना, ह्मणून ती तेथून उठून थोडी दूर गेली. जेथे तिची आते **केरोबा**—ज्याची व वाचकांची आह्मी पूर्वीच ओळख करून दिली आहे, त्याच **केरोबाबरोबर** गोष्टी सांगत बसली होती. **अन्नपूर्णा** त्यांच्यापासून थोडी दूर घांसावर जाऊन बसली. कारण तिच्यांत उभें राहण्याचें अवसान नव्हतें. आसपास बसलेले लोक **वामनराव** आणि तो नाचत असलेल्या **सुंदर** स्त्रीच्या नाचावर टीका करीत बसले होते. त्या टीका करणारांत **बोरबनकर** ह्मणून एक गृहस्थ मुख्य होता. थोडावेळ गेल्यावर **अन्नपूर्णेनें** वर नजर केली, तों **वामनरावाची** व तिची दृष्टि एक झाली. दोघांनींही दुसऱ्यांच्या लक्ष्यांत येण्याच्या आधींच आपल्या दृष्टि फिरविल्या, पण तितक्यांत **अन्नपूर्णेस** "**वामनराव** खिन्न आहे" असें दिसूं लागलें. इतक्यांत **वामनरावानें** आपलें नाचणें बंद केलें आणि तो **अन्नपूर्णेकडे** येऊं लागला, तेव्हां ती जाऊन आपल्या आतेजवळ उभी राहिली. तिनें त्याच्याविषयीं आपल्या आतेला सुचविलेंही होतें. पण ती पुनः जों समोर पाहते तों **वामनराव** तिच्या समोर येऊन उभा राहिला. त्यानें दोघींसही नमल्याप्रमाणें दाखवून **अन्नपूर्णेकडे** प्रेमदृष्टीनें पाहिलें. तरी **चिमाबाई** तेथें आहे, असें पाहतांच तो फार वेळ न थांबतां खिन्नवदनानें पुढें निघून गेला. तों **बोरबनकर** **अन्नपूर्णेजवळ** येऊन ह्मणाला:—

"बाई, माझ्या एका अवगुणाबद्दल मीं आपल्याजवळ क्षमा मागितली पाहिजे. **वामनरावाची** व तुमची ओळख आहे, हें मला ठाऊक नव्हतें"

हें ऐकून **अन्नपूर्णा** लज्जेनें स्मित व अधोवदन झाली. तरी ती त्याला उत्तर देणार तों **चिमाबाई** ह्मणाली:—

"जो तरुण नुक्ताच आमच्या पुढून गेला त्याच्याविषयींच जर तुम्ही हें बोलत असाल, तर मला सांगूं द्या कीं, तो अन्नपूर्णेच्या ओळखीचा नाहीं, व मीही त्याला जाणत नाहीं."

"कोण? अरे तो बहादर वामनराव! तुम्ही जाणत नाहीं त्यांला?" असें केरोबा मोठ्यानें बोलला.

"तुम्ही त्याला ओळखीत असाल." चिमाबाई म्हणाली:—"तो बेवकुबाप्रमाणें मजपाशीं येऊन आपल्या स्वतःसाठीं माझ्या भाचीची मागणी करीत होता, म्हणून मी त्याचा धिःकार करतें."

"अन्नपूर्णेचा हात मिळविण्याची इच्छा करणारास तुम्ही जर बेवकुब म्हणत असाल, तर या मंडपांत जमलेले सगळे तरुण बेवकुबीचा किताब हौसेनें घेण्यास तयार होतील. मीही त्यांतीलच एक आहें, असें समजा!" केरोबा अन्नपूर्णेकडे दृष्टि फेंकून हंसत बोलला.

आपल्या भाचीची वाखाणणी ऐकतांच चिमाबाई घाबरली आणि म्हणाली, "रावसाहेब, असं अज्ञान मुलींना झाडावर चढविणारं बोलणं बोलूं तरी नका! अशी मस्केदार वाखाणणी तुम्हीं कोठून शिकून आलेत?"

असें ऐकतांच केरोबा चिमाबाईकडे वळून म्हणाला, "अहो तर आज आपण कोणाला वाखाणावें? येथें जमलेल्या सगळ्या स्त्रियांत वाखाणण्याला योग्य, अशी एक आत्माराम तात्यांचीच मुलगी आहे, असें मी खात्रीनें बोलेन?"

"तें खरें आहे, पण—" चिमाबाई बोलली:—"वाखाणावें कोणाला? कीं जें वाखाणणी ऐकून चढणार नाहीं व जें लोकांनीं वाखाणावें, असें इच्छिणार नाहीं, त्याला."

असें ऐकतांच केरोबा म्हणाला, "अहो, मोरोबासुद्धां म्हणत होते कीं, येथें जमलेल्या स्त्रियांत एकच स्त्री वर्णन करण्यास योग्य अशी आहे!"

असें ऐकतांच उलट समजूत घेऊन चिमाबाई आपल्या मनांत

फारच खुष झाली आणि हंसत हंसत मुर्की मारून ह्मणाली, " बरं अशी ती स्त्री कोणती असेल? "

"त्या स्त्रीला मी तर कधींच विसरणार नाहीं. कारण—ह्या सगळ्या जगांत तीच एक स्त्री आहे! कीं जी वर्णन करण्याला योग्य, अशी असून गुणांनींही उत्तम, शहाणी तर अशी कीं, आपलें वर्णन कोणाला करूं देतच नाहीं. दुसऱ्या स्त्रियांहून मी ह्मणतों ही स्त्री निराळीच आहे! " असें बोलत असतां केरोबानें पुन:एक वेळ अन्नपूर्णेकडे पाहिलें आणि ती लाजून अधोवदन झाली.

अक्कलवान् चिमाबाई " हा माझ्यावरच खुष होऊन हें बोलतो" असें समजली; व कुलकुलीला आल्यासारखें करून ह्मणाली:—" आज मला वाखाणायाची तुह्मीं अगदीं नवी रीति शोधून काढली! मी असें समजत नाहीं कीं, दुसरा कोणी पुरुष दुसऱ्या कोणत्याही स्त्रीला अशा प्रकारें वाखाणील! "

केरोबा मिशींत हंसून ह्मणाला:—" असें तर खरेंच! पण जर मीं अशा रीतीनें दुसऱ्या कोणाला वाखाणलें असतें, तर त्याची कांहीं समजण्याची शक्ति नव्हती कीं, मी त्यालाच वाखाणीत आहे. हें समजणें तरी अक्कलवानाचें काम आहे!"

केरोबाबरोबर बोलतांना आपल्या आतेनें अशी कोती समजूत दाखविली, याबद्दल अन्नपूर्णेला वाईट वाटलें.

" पहा, ते मोरोबाही इकडेच येताहेत! " चिमाबाई मोठ्या डौलानें ह्मणाली:—" ह्या सगळ्या गोष्टी जेव्हां मी त्यांना सांगेन, तेव्हां त्यांनाही आनंदच होईल. "

पण तेथें येण्याचें सोडून मोरोबा दुसरीकडेच गेला. तेव्हां चिमाबाईला फार वाईट वाटलें. तरी तें केरोबाच्या ध्यानांत येऊं नये, अशा हेतूनें तिनें हंसून त्याला विचारलें:—" आज कोणत्या सुंदर साथीदारानें तुमच्या सोबत्याला रमविलें आहे, हें तुमच्या ध्यानांत आलें काय? "

केरोबानें या प्रश्नाचें उत्तर देत असतां चिमाबाईची चांगलीच मस्करी केली आणि त्यावरून अन्नपूर्णेस असें कळून आलें

कीं, तिची मगरूर आत्याबाई आपलें उतारवय झालें होतें तरी मोरोबाला वरण्याच्या खटपटींत आहे. तरी मोरोबा असल्या म्हातारीला आपली बायको करणार, या गोष्टीचें तिला त्याहून अधिक आश्चर्य वाटलें, तों मोरोबाही तेथें आला. नंतर चिमाबाई केरोबा आणि मोरोबा या तिघांच्या भाषणांवरून ते दोघेही चिमाबाईस वरण्याच्या खटपटींत आहेत, असें तिला दिसून आलें. नंतर तीं सगळींच भोजन करण्यासाठीं गेलीं. तों तेथें अन्नपूर्णेच्या आश्चर्याला पारच नाहींसा झाला ! तिनें आपल्यासमोरच त्या सुंदर स्त्रीसह गोष्टी सांगत बसलेल्या वामनरावाला पाहिलें ! चिमाबाईनें आपली धिःकारयुक्त दृष्टि दोनचार वेळां वामनरावावर फेंकून मग आपल्याजवळ बसलेल्या सोबतिणीला विचारलें:—"हा तरूण पोरटा कोण आहे बरें ? जरा मला सांगाल?"

"बहाद्दर वामनराव !" त्या बाईनें उत्तर दिलें.

"मला त्याचें नांव ठाऊक आहे." चिमाबाई ह्मणाली:—"पण यानें आज येथें प्रवेश कसा केला ? असं मी विचारतें."

चिमाबाई हें बोलण्याचे आधींच ज्या स्त्रीजवळ विचारीत होती, तिचें ध्यान दुसऱ्या गोष्टीकडे लागलें होतें. ह्मणून तिला तिनें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तरच मिळालें नाहीं. वामनराव अन्नपूर्णेपासून दूर बसला होता, ह्मणून त्यानें तिला पाहिलें नव्हतें; पण अन्नपूर्णेच्यानें वामनरावाकडे पाहवत नव्हतें, तरी एकादे वेळेस जेव्हां तो तिच्या दृष्टीस पडे, तेव्हां त्या सुंदर स्त्रीजवळ गोष्टी सांगत असलेला दिसे, आणि त्यामुळें तिच्या अंतःकरणाची वृत्ति पालटत असे.

चिमाबाईनें पुन्हा वामनरावाची चर्चा चालविली." वामनराव एक अगदीं साधारण मनुष्य; त्याच्यावरोबर त्या सुंदर स्त्रीनें रंगांत येऊन गोष्टी सांगत बसणें मला कांहीं पसंत नाहीं." "अही बाई साहेब, वामनरावाप्रमाणें अनूदार मनुष्य या ठिकाणीं आलेल्या तरुण पुरुषांत दुसरा सांपडणें कठीण आहे ! तुह्मीं त्याची खुबी जाणत नाहीं. अशी बातमी आहे कीं, थोडक्याच दिवसांत

ती सुंदर स्त्री आपल्या पाणिग्रहणाबद्दल वामनरावाकडे मागणी करणार आहे, आणि तिची अफाट संपत्ति त्याला लाभणार आहे."

"असें तर कधींच होणार नाहीं!" ज्या स्त्रीनें वरील गर्मागरम गोष्ट चिमाबाईला सांगितली, त्या स्त्रीच्या सांगण्याच्या एकंदर झोंकावरून चिमाबाईचें धाबें गडगडल्यासारखें झालें आणि ती वामनरावाची बदछान करण्यासाठीं घाईघाईनें बोलूं लागली:—"अशा हलक्या कुळांतील पुरुषाबरोबर; अशा हलक्या अशा रखडणाऱ्या——" असें बोलत असतां चिमाबाईला उचकी लागली. तरी थोडा वेळ थांबून ती ह्मणाली:-"याला जर मी कावेरी बाईच्या घरीं पाहिलें नसतें, तर तुह्मी सांगतां यांपैकीं एक अक्षरही खरें मानलें नसतें; आणि अजून तरी मी मानतें असें नाहीं; तसें मानायाला मजपाशीं कारण आहे."

"होय बाई, असेल. त्यांत कांहीं संशय नाहीं." बोलत असलेल्या स्त्रीनें शांतपणानें जबाब देऊन आपली पीडा निवारण केली. पण त्यामुळें चिमाबाईला मोठा मान मिळाल्यासारखें वाटलें, व ती आणखी बोलूं लागली:—

"आज सकाळींच मीं त्याची एक लग्नाची मागणी नाकारली. चिमाबाई रसावर येऊन बोलूं लागली व त्यांत वामनरावाचा हेशा करण्याचा प्रयत्न तिनें आरंभिला. तों स्वतः कावेरीबाईच त्या ठिकाणीं आली, तेव्हां तर चिमाबाईनें आपल्या बोलण्याची कमाल केली. तें सुभाषित भाषण ऐकून केरोबाला जें हंसें आलें तें थांबेना, तेव्हां तो तेथून उठून गेला, आणि कावेरीबाईही सगळें ऐकून तेथून निघून गेली. कावेरीबाई चालती झाल्यावर चिमाबाईजवळ जी स्त्री बसली होती, ती ह्मणाली:—"तुमच्या बोलण्यावरून मला असें वाटतेंकीं, वामनराव कावेरीबाईचा भाचा आहे ही गोष्ट तुह्मांला ठाऊक नाहीं."

"काय! हें खरें आहे!" चिमाबाईला बावरून टाकण्याला एवढें सांगणें पुरें होतें. ती आपल्या अंतःकरणांत फारच थिजली आणि मग मोठ्यानें वामनरावाचें वर्णन करूं लागली.

अन्नपूर्णा जी एवढा वेळ खालीं पाहून जेवीत होती, ती आपली आते वामनरावाचें वर्णन करीत आहे असें ऐकून वर पाहूं लागली आणि त्यामुळें आश्चर्यचकित झाली.

ह्या आनंददायक देखाव्याचा आपण येथें शेवट करूं आणि चिमाबाई आणि अन्नपूर्णा यांस आपल्या घरीं गेलेल्या मानूं.

---

## प्रकरण १० वें.

### श्लोक

धनाचेनियोगें जगीं राव राणे, धनाचें धनी तेंच मोठें घराणें ॥
धनाच्याच गोष्टी कथाया पुराणें, नाह्यापुढें वाचिती जे पुराणें॥१॥
धनी मान पावे न तो पंडिताला, धनी बोलतां मान्य होतें नृपाला॥
धनी पुत्र संतोषदाता पित्याला, धनी मूर्खही पावतो मान्यतेला॥२॥
धनें सौख्य लाभे धनें प्रीतिवाढे, धनें ऐषआराम मित्रत्व जोडे ॥
धनें शौर्य बाणे धनी सर्व जाणे, धनावांचुनी मानवीं दीनवाणें॥३॥

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं अन्नपूर्णा व चिमाबाई ह्या दोघींही तोंड धुवून एकमेकींची वेणीफणी करीत बसल्या असतां एक पत्र आलें, तें कांपऱ्या हातानें घेऊन त्यावरील पत्त्याचें अन्नपूर्णा मनन करीत आहे, तों चिमाबाईनें तें कोणाकडून आलें आहे? असा प्रश्न केला. तेव्हां त्या बापडीनें आपल्या आत्याबाईचा हुकूम घेऊन तें उघडलें आणि त्यावर वामनरावाची सही पाहतांच न वाचतां तें चिमाबाईच्या हातांत दिलें. तें हातीं येतांच चिमाबाई फारच अधीर होऊन वाचूं लागली, आणि पुरें वाचून मग तिनें तें अन्नपूर्णेच्या हातीं दिलें आणि तिला वाचण्याची परवानगी दिली. तेव्हां तिनें तें वाचलें. त्या पत्रांत वामनरावानें अन्नपूर्णेस लिहिलें होतें कीं, "जर तूं स्वतः आपल्या तोंडानें मला" "तुह्मीं पुनः माझ्या भेटीस येऊं नका!" असें सांगशील, तर मात्र मी तुझी भेट घेण्यास येणार नाहीं."

"आत्याबाई, आतां याचें उत्तर मी कसें व काय द्यावें?" अन्नपूर्णा मोठ्या उत्सुकतेनें ह्मणाली:-'मला तर कांहीं सुचत नाहीं!"

" त्यांत न सुचण्यासारखें काय आहे ? त्याला सायंकाळीं आपआपल्या भेटीसाठीं बोलाव आणि त्याची भेट घे. आपल्याला तसें करणें अगत्याचेंच आहे!" चिमाबाई हास्यमुखानें बोलली.

पण चिमाबाईचे शब्द ऐकतांच अन्नपूर्णेस:-" मी स्वप्नांत आहें " असें वाटूं लागलें, तो चिमाबाई ह्मणाली " तसें कशाला हवें ! मीच त्याला उत्तर लिहितें. " असें बोलून चिमाबाई घाईघाईनें दऊतलेखणी व कागद घेऊन पत्र लिहित बसली.

अरे, पण हा केवढा व कोणत्या प्रकारचा फेरफार ! वाचकहो, या प्रकरणाच्या आरंभीं ज्या ओळी लिहिल्या आहेत, त्यांवरून याचें कारण तुमच्या ध्यानांत आलें असेल. पण गरीब बिचारी अन्नपूर्णा! ती थोडेंच समजत होती कीं, " वामनराव कावेरीबाईचा भाचा आहे, " असें ऐकल्यावरून त्याच्या मावशीच्या संपत्तीवर दृष्टि गेल्यामुळें चिमाबाईच्या विचारांत असा फरक पडला होता.

चिमाबाईनें वामनरावाला जें उत्तर पाठविलें त्यांत काय लिहिलें होतें, हें अन्नपूर्णेला कळलें नाहीं. तरी सायंकाळ होतांच तेथें वामनराव येऊन उभा राहिला. त्यावरून त्याला बोलावलें असेल अशी तिच्या जिवाची खात्री झाली. अन्नपूर्णा दिवाणखान्यांत येण्याचेआधींच वामनराव बराच वेळ येऊन बसला होता व त्यानें आपली सगळी हकीकत चिमाबाईजवळ सांगितली होती. अन्नपूर्णा दिवाणखान्यांत येतांच दोघांचीही दृष्टि एक झाली. वामनराव हास्यवदनानें उभा राहिला आणि त्यानें मोठ्या प्रीतीनें अन्नपूर्णेचा हात धरून तिला तिच्या अतिजवळ बसविलें.

नंतर चिमाबाई अन्नपूर्णेस ह्मणाली:-" एवढा वेळपर्यंत वामनरावाचें व माझें जें बोलणें झालें, त्यावरून मला असें कळलें आहे कीं, वामनराव हा दुमाळे इनामदारांचा मुलगा व कावेरीबाईचा भाचा आहे. हेंच जर यांनीं मला पहिल्यानें सांगितलें असतें, तर मी यांना माझ्या घरांत येऊं नका असें ह्मटलें नसतें. तरी आतां ते

वारंवार या ठिकाणीं येऊन तुझी भेट घेतील. मीं त्यांना सांगून ठेवलें आहे. फक्त तुझें व त्यांचें लग्न मात्र माझ्या मतानें व्हावें, अशी माझी इच्छा आहे." असें बोलून ती त्या दोघांस तेथेंच सोडून चालली तेव्हां, वामनराव आणि अन्नपूर्णा यांस बोलण्यास एकांत मिळाला.

त्या दोघांचें बोलणें जें काय झालें, तें येथें सांगत बसण्याची कांहीं गरज नाहीं. पवित्र प्रीतीच्या आरंभींचीं भाषणें कशीं गोड असतात, याबद्दल ज्याला प्रीतीचा सुगंध ठाऊक आहे, त्याच्या ध्यानांत सहज येईल; आणि ज्याला प्रीतीचा मुळींच वास नाहीं त्याच्या ती उपयोगी नाहींत.

यानंतर वामनराव वारंवार तेथें येऊं जाऊं लागला व त्यामुळें अन्नपूर्णा सुखानुभव घेऊं लागली. आपल्या भाचीचें लग्न एवढ्या मोठ्या श्रीमंताबरोबर झालें, ह्मणजे आपली योग्यता किती वाढेल? याबद्दलचे विचार मनांत आणून चिमाबाई त्यांत दंग राहूं लागली. तिला तर आकाशही ठेंगणें भासूं लागलें! कारण कीं, तिचा व कावेरीबाईचा स्नेह दिवसेंदिवस वाढत चालला. मोरोबा वारंवार घरीं येत असल्यामुळें चिमाबाई व मोरोबा हीं दोघेंही 'आषकमाषुक आहेत' असें अन्नपूर्णेच्या ध्यानांत आलें.

---

## प्रकरण ११ वें.

श्लोक—वैश्वदेवी.

आशा होती भ्रष्ट या मानवाच्या। केव्हां देती दुःख केव्हां सुखाच्या॥
रंकाचा हो राव एका क्षणानें। राजा भोगी आपदा दुर्मदानें॥१॥
जेव्हां जैसें दैव हें नाचवील। तेव्हां तैसें वागणें हें सुशील॥
ध्यावा कित्ता पाहुनी लोकरीति। दुःखें येतां आदरावी सुनीति॥२॥

चिमाबाईचा लोभ दिवसेंदिवस वाढूं लागला. कावेरीबाईच्या मेजवानींत मोठमोठाले अब्रूदार लोक सामील होत असत, त्यामुळें तिच्याबरोबर सोयरसंबंध जितका लौकर होईल, तितकें लाभाचें असें मानून तिनें एके दिवशीं वामनराव आणि अन्नपूर्णा यांच्या

लग्नाबद्दल गोष्ट काढतांच कावेरीबाईनें आपली अनुकूलता दाखविली. तेव्हां चिमाबाईनें लग्नाच्या साहित्याची तयारी चालविली; व अन्नपूर्णेलाही तयारी करण्याचा हुकूम केला. तेव्हां तिनें पहिल्यानें उतावळी करण्याचें नाकारलें आणि " याबद्दल वामनरावानें अजून एक शब्दही उच्चारला नाहीं. " असें सांगितलें. पण जी चिमाबाई उतावळी बद्दल अन्नपूर्णेला बोलत असे; तीच आतां तिला याबद्दल घाई करूं लागली. कावेरीबाईनेंही वामनरावास ती गोष्ट सांगितल्यावरून तो अन्नपूर्णेची संमति विचारण्यासाठीं आला.

होतां होतां चिमाबाईनें उघडपणानें अन्नपूर्णा व वामनराव यांच्या लग्नाची धामधूम चालू केली. लग्नाचें साहित्य पक्वान्नें वगैरे करण्यासाठीं गावांतील आप्तसंबंधाच्या बायका जमूं लागल्या. चिमाबाईनें आपला वाडा रंगवून त्याच्यासमोर भव्य मंडप घातला. त्यामुळें गांवभर अन्नपूर्णा आणि वामनराव यांच्या लग्नाची चर्चा होऊं लागली. हें लग्न इतक्या लौकर जमवून त्याची धामधूम करविण्यांत मुख्यत्वें मोरोबाच प्रमुख होता.

एके दिवशीं वामनराव आणि अन्नपूर्णा हीं दोघें त्या मंडपांत बसून तेथें होत असलेल्या धामधुमीवरून आपल्या भावी सुखाबद्दल विचार करीत आहेत, तों अन्नपूर्णेस चिमाबाईकडून बोलावणें आलें. तेव्हां मोठ्या प्रीतीनें वामनरावांचा निरोप घेऊन ती आपल्या आतेकडे गेली. ती तिच्या समोर जाऊन उभी राहिल्यावर थोड्या वेळानें चिमाबाई बोलूं लागली:—

" अन्नपूर्णे, कसेंकाय? " ( कांहीं थांबून ) "तुला कळलें कां? तुला मीं इकडे कशासाठीं बोलाविलें हें " ( पुनः दम खाऊन ) " मीं तुला कांहीं एक नवी गोष्ट सांगण्यासाठीं येथें बोलाविलें आहे, समजलीस? "( पुनः जरा थांबून) " ऐकलेंस कां हें तूं? आजपासून मोरोबाला तूं आपल्या चुलत्याप्रमाणें मानावेंस. " येथेंतर तिची छाती भरून आली. " तर काय? आतां तूं समजलीसना? आम्ही

दोघांनीं आज प्रातःकालच्या मुहूर्तावर उपाध्यायांच्याच घरीं जाऊन आपलें पुनः लग्न (पाट) लाविलें ! ”

कसें गुप्तपणाचें लग्न हें? आणि त्याविषयींची बातमी तरी कशी आनाकानीची ( घोटाळत सांगणें ) ही ! पण एकंदरीनें तिच्या त्या सांगण्याच्या झोंकावरून अन्नपूर्णेच्या ध्यानांत आलें कीं, “ हें लग्न तिच्या आतेच्या मर्जीविरुद्ध झालें असावें. ” खरा प्रकार तसाच होता. मोरोबाला तर अन्नपूर्णा पहिल्यापासूनच धिःकारीत होती. त्याचप्रमाणें वामनरावालाही त्याच्या खराब रीतिभातींचा कंटाळा व संशय होता. त्यांतच ह्या गुप्त लग्नानें भर टाकली, आणि ‘तो वाईट चालीचा आहे ’ असा पुरावा हें लग्न करून देऊं लागलें. या लग्नाबद्दल अन्नपूर्णेला जरी खरोखर वाईट वाटलें, तरी बळेंच हास्यवदनानें तिनें आपली संतोषित मर्जी आपल्या आतेला जाणविली. नंतर चिमाबाई ह्मणाली:—

“ आतां या लग्नाच्या संबंधानें आपल्या सोयऱ्याधायऱ्यांस एक मेजवानी देणें भागच आहे! आणि तीही लौकरच दिली पाहिजे. यासाठीं तुझ्या लग्नाला जें साहित्य तयार केलें आहे, त्याचा उपयोग करूं. कारण तुमचें लग्न आतां थोड्याशा मुदतीवर लांबविणें हेंच हिताचें आहे. ह्या मेजवानीच्या वेळीं तुझ्या लग्नासाठीं ह्मणून जे मूल्यवान् पोषाख केले आहेत, ते मला मान देण्यासाठीं तूं वापरावे आमच्या लग्नाची बातमी तूं वामनरावाला कळीव, ह्मणजे तोच कावेरीबाईला कळवील. त्या मेजवानींत त्यांनाही बोलवावें लागेल. ”

वरील हास्यमुखी भाषणामुळें अन्नपूर्णेला जें आश्चर्य वाटलें, त्यांत काय उत्तर द्यावें! हें तिच्या ध्यानांत येईना. तिनें हें वर्तमान वामनरावाला कळविलें. तेव्हां त्याला जें दुःख झालें, त्याहून ह्या वृद्धविवाहाबद्दलच्या आश्चर्याचा भाग मोठा होता. तरी त्याच्या प्रिय अन्नपूर्णेच्या लग्नासाठीं तयार झालेलें साहित्य ह्या वुढ्या लग्नाच्या नांवानें खलड जोडण्याच्या संतोषासाठीं खर्च होणार, हा विचारच त्याला दुःखी करीत होता. तो प्रकार त्याला अन्नपूर्णे-

पुढें लपवितां आला नाहीं कारण जेथें प्रीतीनें दोन अंतःकरणांतील द्वैत नाहींसें करून ऐक्य केलेलें असतें; तेथें शब्दाचें कारणच लागत नाहीं. ‘ मनोमन साक्ष ’ असें जें ह्मणतात, त्याचा अनुभव घेणारानें प्रीतीचे ठिकाणीं घ्यावा, ह्मणजे सहज मिळेल. अन्नपूर्णा व वामनराव यांचा मनोरथपर्वत ढांसळून पडल्यामुळें त्या दिवशीं एकमेकांचा निरोप घेत व देत असतां त्या दोघांच्याही डोळ्यांला पाणी आलें.

दुसऱ्या दिवशीं मोरोबानें येऊन धन्याप्रमाणें चिमाबाईच्या वाड्याचा कबजा आपल्याकडे घेतला आणि केरोबा आपला मित्र, ह्मणून त्याच्यासाठीं एक स्वतंत्र खोली रिकामी करून त्यांत त्याचें बिऱ्हाड आणून लावलें.

पुढें थोड्याच दिवसांत चिमाबाईच्या लग्नाबद्दल बडी मेजवानी व नाचरंग वगैरे आनंद करण्यांत आला. या मेजवानीबद्दल अधिक न बोलतां आपण आपली गोष्ट पुढें चालवूं.

लग्नाला थोडे आठवडेही लोटले नाहींत, तोंच मोरोबानें स्वदेशीं जाण्याची तयारी केली. ती बातमी चिमाबाईनें अन्नपूर्णेला सांगितली आणि “ तुलाही मी माझ्याबरोबर नेणार. ” असें सक्तीनें कळविलें.

“आत्याबाई, तिकडे माझें काय काम आहे?” अन्नपूर्णा खिन्न होऊन ह्मणाली.

“अग वेडे पोरी, तुला जर मी तिकडे न न्यावं तर काय येथें वाऱ्यावर मोकळं सोडावं! तुला हें कळत कसें नाहीं? हं! आतां माझ्या ध्यानांत आलें!” चिमाबाई ह्मणाली:—“ तूं आपल्या मनांत वामनरावाबद्दल विचार करीत असशील. आमच्या ह्या प्रवासाचें वर्तमान त्याला कळलें नसेल, तरी चिंता नाहीं. थोडक्याच वेळांत त्याला तें कळेल. मोरोबा कावेरीबाईला कळविण्यासाठीं जेव्हां जातील, तेव्हां तुमचें लग्न तूर्त रहित करण्याचा विचारटी तिला सांगतील आणि मग त्याच द्वारानें वामनरावालाही कळेल. त्याबद्दल तुला काळजी नको.”

या वेळेस अन्नपूर्णेच्या चित्ताची काय स्थिति होईल, याबद्दलचा विचार न करितां चिमाबाईनें पूर्ण निर्दयपणा अंगीकारून त्या बिचारीला हें सर्व सांगितलें. जेव्हां अन्नपूर्णेनें मोठ्या दुःखानें "लग्नाचा बेत रहित कां केला?" असें विचारलें; तेव्हां ती म्हणाली, "आधीं तो वामनराव कांहीं मला पसंत नव्हता, तरी तुझी ओढपाहून मीं तें कबूल केलें होतें. पण आतां मोरोबाला तर तो अगदीच पसंत नाहीं. तेव्हां त्यांच्यापुढें माझें काय चालणार आहे बरें? तूंच विचार कर."

अन्नपूर्णा व वामनराव हीं दोघें उमेदीच्या उंच किल्यावर जाऊन बसलीं असतां तेथून त्यांना खालीं लोटून देण्यास त्या निर्दय आत्याबाईला अगदीच शंका वाटली नाहीं! 'त्यांच्या हाडकांचा चुराडा होईल' असें तिनें मनांतही आणलें नाहीं.

अन्नपूर्णा तेथून डोळे पुशीतच जी निघाली ती आपल्या खोलींत जाऊन बसली. तेथें तिला पुढें होणारे सगळे भयंकर परिणाम मूर्तिमंत तिच्यापुढें येऊन उभे राहिलेसे दिसूं लागले. त्यांतच मोरोबाच्या देशांतील देखावा तिच्या कल्पनासृष्टींत हुबेहुब भासूं लागला. त्या वेळेस हिंदुस्थानांत मोठमोठ्या राजकीय खटपटी चालल्या होत्या. लहान मोठे सरदार व जहागीरदार आपापसांत लढाया उपस्थित करून झगडत असत. प्रत्येक किल्यावर हल्ले चालू असत. त्यांतच मोरोबाच्या मालकीच्या एका किल्याबद्दल तिनें गोष्टी ऐकलेल्या होत्या. त्यामुळें तो किल्ला व त्यांत मोरोबासारख्या नीच मनुष्याच्या हाताखालीं—आपल्या देशापासून शेंकडों कोस दूर ती आपल्याला कैदेंत असल्याप्रमाणें पाहूं लागली आणि त्यांतही शेवटचा देखावा तिच्या प्रिय वामनरावाचा तिला दिसूं लागला. तो आपल्या विरहानें झुरत असल्याप्रमाणें तिला दिसला व तिच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. नंतर हें सगळें जग तिला भयंकर नरककुंडाप्रमाणें दिसूं लागलें. किंवा जिकडे तिकडे दुष्कृतीचा अंधःकार आहे असें भासलें आणि त्यामुळें ती सुशील मुलगी संशयांत पडली.

याप्रमाणें ती पुष्कळ वेळपर्यंत विचारांत निमग्न होत्साती पडून राहिली आहे, तों चिमाबाईनें तिला जेवायाला बोलावणें पाठविलें. त्या वेळेस तर तिनें न जाण्याचाच निश्चय केला होता; परंतु त्या दिवशीं मोरोबा कांहीं कामांत गुंतल्यामुळें घरांत आला नव्हता आणि त्यामुळें चिमाबाई चिडली होती. ह्मणून अन्नपूर्णेला जावें लागलें. तरी जेवण होईपर्यंत ती मान खालीं घालून बसली होती. त्यांत एकवेळ तिनें वामनरावाची गोष्ट काढली होती. तरी घातकी चिमाबाईला कांहीं तिची दया आली नाहीं.

पानावरून उठल्यावर मोठ्या वेगानें ती आपल्या खोलींत चालली होती, तों दारांतून कोणी येत आहे असें तिला वाटलें. पहिल्यानें तर तिला तो मोरोबा असेल असें वाटलें आणि ती झडपीनें आपल्या खोलींत पळून जाणार होती; पण तितक्यांत तिच्या प्रिय वामनरावाचा मुखडा तिच्या दृष्टीस पडला.

" अन्नपूर्णे ! अन्नपूर्णे ! " त्याचा स्वर कांपत होता व तो बोलण्यास फारच उत्सुक आहे असें दिसत होतें. "अन्नपूर्णे, तुझ्याजवळ मला थोडेंसें बोलायाचें आहे. माझी गोष्ट ऐकण्यासाठीं या वेळेस तूं गुप्त ठिकाण शोधून काढ. (तिच्याकडे पाहून) होय, तुझ्या शरीराला कंप सुटला आहे! तुला उभें राहण्याची शक्ति नाहीं; यासाठीं या जवळच्या खोलींत जाऊन क्षणभर बैस."

असें बोलून तो तिला जवळच्या खोलींत नेत होता; पण तिनें त्याच्या हातांतून आपला हात सोडवून घेण्याचा प्रयत्न केला व त्याला सांगितलें,—" मला कांहीं होत नाहीं. माझी प्रकृति फार चांगली आहे. तुह्मांला जर कांहीं बोलायाचें असेल तर माझी आते स्वयंपाकघरांत बसली आहे, तिच्याजवळ जाऊन बोला "

"अरेरे, हें काय इतक्यांतच सगळा कारभार आटपला ? अन्नपूर्णे, तूं खरोखर मला सोडून जाणार ? तूं त्या गोष्टीला कबूल आहेस? नाहीं नाहीं अन्नपूर्णे, याच ठिकाणीं मी तुझ्या जवळ बोलूं इच्छित नाहीं. आपल्या गोष्टी कोणी ऐकतही असेल. मी तुझ्या-

जवळ एक दोन पळांत दोन चारच शब्द बोलण्याची इच्छा करतों." "माझ्या आतेच्या परवानगीवांचून नाहीं." असें अन्नपूर्णा रडत रडत बोलली. पण तें ऐकतांच वामनराव आपल्यालाच धिःकारून ह्मणाला:-"हा मूर्खा वामन्या! कशाला मुद्दाम या ठिकाणीं आलास? अन्नपूर्णे, आतां ह्या जळत्या हृदयाला तूं अधिक जाळूं नको."

हें शेवटचें वाक्य ऐकतांच अन्नपूर्णेच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागला. तरी तिची आते जोंपर्यंत परवानगी देणार नाहीं, तोंपर्यंत ती वामनरावाचें बोलणें न ऐकण्याच्या निश्चयानेंच होती. "बरें आहे. मोरोबा कोठें आहे? मी मोरोबाजवळच बोलण्याची इच्छा करतों; दुसऱ्याजवळ नाहीं." हें बोलत असतांना त्याच्या नेत्रांतून क्रोधाग्नीच्या ठिणग्या पडताहेत असें अन्नपूर्णेस वाटलें, आणि कांहीं भलताच खराब परिणाम होण्याची तिला धास्ती पडली. तेव्हां पहिल्यानें तिनें वामनरावाचें शांतवन केलें आणि "मोरोबा घरांत नाहीं." असें सांगितलें.

अन्नपूर्णेच्या शांत भाषणानें वामनरावाचा धडकत असलेला क्रोधाग्नि शांत झाला. नंतर तो ह्मणाला:-"अन्नपूर्णे, मला क्षमा कर. तुझ्या अस्खलित प्रेमाबद्दल म्यां मूर्खानें विनाकारण संशय घेतला, ह्मणून तूं मला क्षमा कर."

तो जरी असें बोलला, तरी त्या वेळेस त्याच्यापुढें अन्नपूर्णेच्यानें अधिक बोलवलें नाहीं. दोघेंही जवळ असलेल्या एका खोलींत जाऊन बसलीं. अन्नपूर्णेनें पाहिलें कीं, मोरोबावर जो तो रागावला होता, तें बरोबर होतें. तरी त्या क्रोधाचा विपरीत परिणाम होऊं नये, असें मनांत आणून तिनें त्याला शांत करण्याची तजवीज केली. त्यानें आपल्या मनांतील संताप दूर करावा, अशा हेतूनें ती त्याला आर्जवूं लागली आणि डोळ्यांत पाणी आणून ह्मणाली:- "वामनराव, ह्या वेळेस तुह्मी माझ्याकडे पहा आणि केवळ माझ्यासाठीं आपल्या मनांतील कोप नाहींसा करा. आपण जर कोप कराल, तर त्याबद्दल मला किती सोसावें लागेल? या गो-

ष्टीचा विचार करा." असें ऐकतांच त्याचे नेत्र क्रोधाश्रूंनीं भरून आले आणि तो तिला ह्मणालाः—"काय? तुझ्यासाठीं मी आपला कोप गिळून जाऊं? प्रिये, तूं असें पुरेपणीं समज, कीं मी जरी इतका क्रोधाधीन झालों आहें, तरी कांहीं त्याच्या ताब्यांत सांपडण्यासाठीं आलों आहे, असें नाहीं. तो कोठपर्यंत तुझा नि माझा वियोग करील? तुला इकडे परत येण्याला किती काळ लोटेल? याविषयीं कांहीं तरी विचार कर." अन्नपूर्णेनें हें त्याचें भाषण ऐकतांच त्याचें दुःख कमी करण्यासाठीं अनेक उपाय योजले. ती ह्मणालीः—"मी थोडक्याच दिवसांत तिकडून परत येईन. आपल्याबद्दल जी माझ्या मनांत प्रीति आहे, ती कधींही कमती होणार नाहीं." याप्रमाणें जरी ती बोलली, तरी त्याचें दुःख कांहीं कमती झालें नाहीं. तीं दोघें बसून आणखीही भाषणें करणार होतीं; पण तितक्यांत चिमाबाई त्या ठिकाणीं अकस्मात् येऊन उभी राहिली; आणि तिला पाहतांच अन्नपूर्णा ती खोली सोडून चालती झाली.

"रावसाहेब, तुमची चाल व रीत अशी असेल, असें मला वाटलें नव्हतें." चिमाबाई क्रोधानें ह्मणाली.—"माझ्या भाचीच्या अशा गुप्त भेटी घेण्याबद्दल मीं तुह्मांला मनाई केलेली आहे, ती तुह्मीं विसरलां, असें मला वाटतें."

याप्रमाणें ती कोपून जरी अनेक प्रकारें बोलत होती, तरी अबलांच्याबरोबर जितक्या मृदु स्वभावानें बोलावें, तितक्याच, किंबहुना त्याहूनही अधिक मृदु शब्दांनीं तो तिच्याजवळ बोलूं लागला आणि तिला सर्व प्रकार समजावूं लागला. तरी चिमाबाई कांहीं तें समजली नाहीं. तेव्हां शेवटीं निरुपायानें वामनराव तिचा धिःकार करून चालता झाला. आपल्या घरीं गेल्यावर त्यानें मोरोबाच्या नांवानें कित्येक पत्रें लिहून पाठविलीं. पण त्यांतील एकाचेंही त्याला उत्तर मिळालें नाहीं. पुढें त्याची पत्रें जीं येत असत, तीं मोरोबा परत करी, किंवा वाचल्यावांचूनच फाडून टाकीत असे. शेवटीं वामनराव कंटाळला आणि "अन्नपूर्णेबरोबर गुप्तपणानें लग्न करून घ्यावें." अशा उद्देशानें तो

अन्नपूर्णेस पत्रें पाठवूं लागला, पण तीं सारीं चिमाबाईच्या हातीं लागत आणि अग्निकुंडांत जाऊन बसत. शेवटीं " ती निघून जाते वेळीं तरी तिची व आपली भेट व्हावी. " अशा हेतूचीही त्यानें कित्येक पत्रें पाठविलीं. पण त्याला तशीही परवानगी मिळाली नाहीं.

वामनरावाची शेवटची मागणीही नामंजुर झाली; असें कळतांच अन्नपूर्णेला फारच दुःख झालें.तिला चैन पडेना. सगळा दिवसभर वामनरावाचें हास्यवदन तिच्या नेत्रांसमोर दिसूं लागलें. तिच्यावर जो एकटाच खरें प्रेम करीत होता; तीही ज्या एकट्या-लाच प्रेमदृष्टीनें पहात होती; त्याचा वियोग होण्याचा समय येतांच ती अतिशय दुःखांत पडली. ज्या दिवशीं प्रातःकालीं तीं सर्व मनुष्यें महाराष्ट्रदेश सोडून हिंदुस्थानांत जाणार होतीं, त्याच्या आदल्या दिवशींच्या रात्रीं तिला अगदीं चैन पडेना व झोंप येईना, " वामनरावाचें सुहास्यवदन आतां पुन्हा कधींही मला दिसणार नाहीं. " असें तिच्या मनांत आलें व त्या वियोगविचारांनीं तिचें मस्तक भ्रमल्यासारखें झालें. शेवटीं " थोडी तरी विश्रांति मिळ-वावी, " असें मनांत आणून ती खुली हवा घेण्यासाठीं बाहेर येऊन मार्गांत क्षणभर उभी राहिली, तरीही विश्रांति वाटेना; तेव्हां हळूहळू फिरूं लागली.

मध्यान रात्र होऊन गेलेली असल्यामुळें सर्व शांत होतें. आका-शांत चंद्र पूर्ण प्रकाशमान झालेला होता.झाडांचीं छाया भूमीवर दूर पावेतों पसरली होती आणि त्यांच्या पानांच्या हालण्यामुळें अन्नपूर्णेला क्षणोंक्षणीं भय वाटत असे आणि दोन पावलें मागें फिरून ती पुन्हा पुढें जाण्याचा प्रयत्न करीत असे. रात्र इतकी शांत होती कीं, दुरून वहात असलेल्या पाण्याच्या प्रवाहाचा व झाडांच्या पानांचा मधुर शब्द मात्र स्पष्ट ऐकूं येत असे. अन्नपूर्णा मनांत धास्ती बाळगून हळू हळू एकेक पाऊल पुढें चालूं लागली. तिच्या प्रत्येक पाव-लाचा ध्वनिही तिला भयप्रद होऊं लागला. थोड्याशा अंतरावर जाऊन ती उभी राहिली आणि " महालापासून किती दूर आलें ? "

असें मनांत आणून मागें पाहूं लागली. तेव्हां "महाल जवळ आहे." असें तिला वाटलें आणि ती पुढें चालूं लागली. तों आकाशांत चंद्रावरून जाण्याऱ्या ढगानें तिला पुन्हा भिवविलें. तरी पळभर थांबून पुढें चालली असें करीत असतां ती मांडवाजवळ येऊन उभी राहिली. नंतर ती त्या माळ्यावर चढून रोजच्याप्रमाणें वर जाऊन बसली. आसपासच्या देखाव्याकडे नजर पोंचवितांच तिला पुन्हां वामनरावाचें स्मरण झालें आणि ती आपल्याशीं विलाप करीत ह्मणाली:—"हाय हाय! वामनराव, आपण दोघांनीं या जाग्यावर बसून या चंद्राची शांत किरणें प्रकाशमान झाल्यामुळें समोरच्या पर्वतांची व अरण्याची शोभा किती वेळां पाहिली आहे बरें? आतां पुनः बरोबर बसून ही शोभा पाहण्याचा प्रसंग आपणांस कधींही येणार नाहींना? नाहीं, नाहीं, तें सुख आतां आपणां दोघांस कधींही लाभणार नाहीं! हायरे दैवा? कसा प्रसंग आणलास? प्रियकरा, आतां तूं कोठें असशील? वामनराव तुमची आठवण करूनच आतां मी रडत असावें ना? वामनराव, कांहो आपण येत नाहीं? आपण ह्या वेळेस कोठें असाल!"

याप्रमाणें एकांतीं बसून ती मनसोक्त विलाप करीत आहे, तों मागें कोणाचीं पावलें वाजल्याचा तिला भास झाला आणि ती मागें पाहतांच भयानें ओरडली व बेशुद्ध झाली व पडणार, इतक्यांत एका तरुणानें येऊन प्रेमानें तिला सांवरून धरलें. तरी ती शुद्धींत नाहीं, असें जाणून तिच्या मुखाजवळ मुख नेऊन तो "अन्नपूर्णे, प्रिये अन्नपूर्णे तूं सावध कां बरें होत नाहींस!" असें बोलला. वामनरावाचा शब्द कर्णरंध्रांत शिरतांच तिच्या हृदयांतील भय नाहींसें झालें आणि ती सावध झाली. तरी वामनरावाच्यानें पुढें बोलवेना. तो क्षणभर स्तब्धच राहिला आणि प्रेमोद्गाराचा घुटका गिळून मग तिला ह्मणाला "प्रियसखे अन्नपूर्णे, दैवयोगानें आज मी तुला पुन्हा पहात आहें आणि तुझा आनंदजनक मुखचंद्र माझ्या पुन्हा दृष्टीस पडत आहे. आतां हे मधुर शब्द पुन्हा माझ्या कानीं येतील

असें माझ्या दैवांत असेल काय? कित्येक रात्री मी या ठिकाणीं फिरून फिरून नाउमेदींत घालविलेल्या आहेत! तरी त्या जगज्जनकाचे मी आभार मानतों, कीं, त्यानें पुन्हा तुझी व माझी एकांतीं भेट होण्याचा प्रसंग आणून मला क्षणभर तरी सुखी केलें आहे."

याप्रमाणें बोलून तीं दोघें आषकमाषुक–एकमेकांस घटकाभर मुकाट्यानें लपेटूनच राहिलीं. प्रीतीवर दिलगिरी व दिलगीरीवर प्रीति चालून जाऊन एकमेकांवर सरदारी मिळविण्याचा प्रयत्न करीत असत. शेवटीं वामनरावानें बोलण्याचा उपक्रम केला.

"शेवटीं तूं जातेस! अन्नपूर्णे, शेवटीं तुझा व माझा वियोग होणार, असा अगदीं निश्चय ठरला! आतां पुनः आपली भेट केव्हां होईल? कोणत्या दूर देशांत, नव्या नव्या मित्रांत व मैत्रिणींत, किंवा तरुणांत तूं जाऊन राहणार! हाय हाय! ईश्वरा, कोण जाणे? आतां कोणत्या सुखी कुटुंबांतील दैववान तरुण तुझा–" असें बोलत असतां वामनरावाचा श्वास घोटाळून आंतल्या आंतच राहिला!

पण इतकें ऐकल्यावर अन्नपूर्णेस बोलणें भाग आलें. ती अधीरपणानें ह्मणाली:–"या भाषणावरून मला असें वाटतें कीं, आपल्यासाठीं आजपर्यंत मी भ्रमांत राहून विनाकारण दुःखी झालें, असें आपण मानतां! हाय हाय! दैवा! कायरे हें?"

वामनराव ह्मणाला "काय? माझ्यासाठीं तूं दुःखी झालीस! अन्नपूर्णे, हे तुझे शब्द किती गोड आहेत ह्मणून सांगूं! अगे, विषासारखे किती कडू आहेत! ह्मणून बोलून दाखवूं? अरेरे, या शब्दांनीं मला किती सुख व किती दुःख होत आहे? अन्नपूर्णे, प्रिये, तूं मला क्षमा कर! मीं असा संशय घेतला, ह्मणून खरोखर अपराधी आहें; क्षमा कर, प्रिये, प्रसन्न हो! केवळ नव्या रीतीनें तुझ्या हृदयाची परीक्षा करावी, असें मनांत आणून मी हें बोललों." असें बोलून तो क्षणभर थांबला आणि पुन्हा बोलूं लागला.

"अन्नपूर्णे, प्रियसखे, आतां हें दुःख माझ्यानें अधिक वेळ-

पर्यंत सोसवणार नाहीं ! नाहीं नाहीं, मी तुला आतां कधींही सोडणार नाहीं ! देवा ! थोडक्याच वेळांत हें सुहास्यवदन माझ्या नेत्रांस दुर्लभ होणार काय ? प्रिये, ह्या वेळीं तूं माझ्या जरी हातांत आहेस, तरी थोडक्याच वेळांत हा सर्व प्रकार स्वप्नवत् होणार ! प्रिये, खरोखर जर विचार केला, तर हें असें कां व्हावें बरें ? आपल्या भावी सुखांत परक्यांकडून कां अडचण यावी ? प्रिये, **अन्नपूर्णे**, एक वेळ तूं हिम्मत धर. ह्मणजे अक्षयीं माझी होऊन राहशील ? "

असें बोलून तो पुन्हा स्तब्ध झाला. त्याच्या धडधडत असलेल्या छातीवर डोकें टेकून **अन्नपूर्णा** इतका वेळ एकसारखी रडतच होती. थोडा वेळ त्यांचा त्या स्तब्धपणांतच गेला. नंतर गुप्तपणानें लग्नविधि उरकून घेण्याबद्दल **वामनराव** तिला समजावूं लागला. पण त्याबद्दल तिनें साफ नाखुषी दाखविली आणि गुप्त लग्न केल्यामुळें आपणांवर किती संकटें येतील, हें **अन्नपूर्णेनें** त्याला समजाविलें. त्यामुळें शेवटीं **वामनरावास** निरूपायास्तव तिचें बोलणें कबूल करणें भाग पडलें.

रात्र फार होऊन गेली होती. त्यामुळें **अन्नपूर्णेनें** "**वामनरावाचा** शेवटचा निरोप घ्यावा," असें मनांत आणलें. पण तो तिला आणखीं अडवून **मोरोबा**विषयीं विचारूं लागला. तो तिला ह्मणाला कीं, "एका हिंदुस्थानी मनुष्याकडून मी **मोरोबा**विषयीं फार वाईट गोष्टी ऐकल्या आहेत. त्याच्या बोलण्यावरून मला असें कळलें आहे कीं, हिंदुस्थानांत **मोरोबाच्या** मालकीचा एक डोंगरी किल्ला आहे. तरी तो कोणत्याही प्रकारें चांगल्या वर्तणुकीचा आहे, असें नाहीं. आपल्या अदमासाप्रमाणेंच त्याच्याजवळ कांहीं विशेष संपत्ति आहे असेंही नाहीं." ह्या गोष्टी ऐकून त्या भोळ्या **अन्नपूर्णेस** फारच दुःख वाटलें. तरी हें ऐकण्याच्या आधींच तिनें "**मोरोबा** कांहीं चांगला मनुष्य नाहीं," असें आपल्या मनांत ठरवून ठेवलें होतें. "अशा दुर्गुणी मनुष्याच्या संगतीनें परदेशांत आऊन व त्याच्या ताब्यांत राहून अगदीं

फसण्याचा प्रसंग आला आहे," या गोष्टीबद्दल तिला फारच वाईट वाटलें. तरी तिनें वामनरावास अनेक रीतीनें समजाविलें. त्यामुळें वामनरावाच्या मनांत पुन्हा संशय उत्पन्न झाला आणि तो तिला ह्मणालाः—"अन्नपूर्णे, ज्यापेक्षां इतके प्रकार तुला कळूनही तूं जाण्याचा हट्ट करतेस, त्यापेक्षां तुझी मजवर प्रीति नाहीं, असें मला ह्मणावें लागतें. आपल्या उभयतांच्या वियोगाचें दुःख नाहींसें करण्याचें तुझ्या हातांत असून तूं मुद्दाम मला वाऱ्यावर उडवितेस. यावरून मी निश्चयानें असें ह्मणतों कीं, जर तुझी प्रीति खरोखर माझ्यावर असती, तर तूं याप्रमाणें करण्याचें मनांतही आणलें नसतेंस."

असें ऐकतांच अन्नपूर्णा ह्मणालीः-"प्रियकरा, प्रीतीची परीक्षा करण्यासाठीं कांहीं आतां आपणांस वेळ उरला नाहीं. मला आपण किती प्रिय आहां; आणि याच्या पुढेंही आपली प्रीति किती व कशी राहील, याविषयीं माझें हृदय जितकें जाणतें जितकें कांहीं मला बोलून दाखवितां येत नाहीं. "मनोमनसाक्ष" ही वृद्धोक्ति जर खरी असेल, तर त्याविषयीं आगेमागें आपले मनानेंच आपणापाशीं साक्ष दिली पाहिजे व आपल्या मनाजवळच आपणही विचारलें पाहिजे. ह्या सद्विचाराच्या गोष्टी म्यां अबलेनें आपल्यासारख्या सुजाणाला किती व कशा सांगाव्या बरें?" हीं शेवटचीं अक्षरें तिच्या ओंठांतून गडबडून पडल्याप्रमाणें बाहेर पडलीं आणि त्या बोलण्यामुळें तिचे डोळे पाण्यानें भरून आले. वामनरावाच्या नेत्रांतही हें ऐकतांच पाणी आलें आणि "अन्नपूर्णे, प्रियसखे अन्नपूर्णे," इतकेंच शब्द उच्चारून त्यानें तिचे कोमल कर आपल्या ओंठाजवळ नेऊन रुदनास आरंभ केला. त्या वेळेस दोघेंही एकमेकांकडे पाहून खऱ्या प्रेमाश्रूंचा वर्षाव करीत होतीं. दोघांतून एकाच्यानेंही शेवटचा निरोप मागवेना !

तरी शेवटीं अन्नपूर्णा ह्मणालीः—"प्रियसख्या, आतां मला येथून घरांत निघून गेलें पाहिजे. वेळ होऊन गेला आहे. आपणां दोघांस जर अशा अपरात्रीं येऊन कोणी पाहील; तर त्यांत

आपल्या भन्नूची हानि आहे. आतां आपला दीर्घ कालाचा वियोग होणार, हें कांहीं चुकत नाहीं. तरीही प्रियकरा, जरी मी दूर असलें, तरी तूं नित्य माझी आठवण कर. मजवर प्रीतिच कर. आजपर्यंत जें प्रेम सारखें वाढतच आलें आहे, त्याची वाढ खुंटवूं नको. मीही तुजवांचून इतर पुरुष मनांत आणणार नाहीं, याबद्दल आपल्या मनाजवळ खात्री बाळगून रहा. तूं दूर देशीं आहेस तरी मजवर प्रीति करतोस, असें मनांत येतांच जी माझ्या मनाला शांतता येईल, ती दुसऱ्या कोणत्याही प्रकारानें येणार नाहीं. ”

“ काय काय ! तुझें स्मरण करूं ! तुझ्यावर प्रीति करूं ! ” वामनराव मोठ्या गडबडीनें तिला विचारूं लागला. तेव्हां ती त्याची अधीर मुद्रा ओळखून, ती कोमल अबला ह्मणालीः—“खरोखर, माझ्यासाठींच तूं आपले मनोविकार कांहीं दिवसपर्यंत दाबून ठेव. ” वामनराव तशाच स्थितींत पुन्हा बोललाः—“ काय प्रिये तुझ्यासाठीं? ” “ होय होय.” अन्नपूर्णा पुनः ह्मणालीः—“माझ्याच साठीं. तुला अशा नाजुक स्थितींत एकटें सोडून जावें असें माझ्या मनांतही येत नाहीं, तरी काय करूं? ” अन्नपूर्णा कांपऱ्या आवाजानें पुढें बोलूं लागलीः—“ ह्या वेळेस काय करावें, हें मला अगदी सुचेनासें झालें आहे! ” “ असें आहे तर तूं मला सोडून जाण्यास कां तयार झालीस?” वामनराव मोठ्याच गडबडीनें बोलूं लागलाः— “ आपणांस हें वियोगदुःख काय ह्मणून सोसलें पाहिजे ! अथवा ह्या वेळेस जरी आपण एकमेकांपासून दूर झालों, तरी उदयीक आपली पुन्हां भेट कां होणार नाहीं ? हें सगळें तुझ्या एकटीच्या हातीं आहे प्रिय सखे. ”

“ वामनराव! ” अन्नपूर्णा भरून आलेल्या गळ्यानेंच बोलूं लागलीः—“ प्रियसख्या, खरोखर अशा प्रसंगीं ज्या धैर्याची आपणांस गरज आहे, तें कांहीं माझ्या संग्रहास नाहीं; आणि हें दुःखही आतां मला सोसत नाहीं. ह्मणून तूं मला क्षमा कर आणि याविषयीं पुन्हां एकही प्रश्न तूं मला विचारूं नको, अशी मी हात जोडून प्रार्थना करितें. ”

" काय! तूं माझी प्रार्थना करितेस! आणि मी तुला क्षमा करूं? वाहवा! " वामनराव ह्मणालाः—" असें असेल तर पहिल्यानें मींच तुझी प्रार्थना करून तुजपाशीं क्षमा मागितली पाहिजे. सगळा अन्याय माझा आहे! मीच अविचारानें चुकलों आहे. तुझ्यापासून दूर होते वेळीं तुला धीर देण्याचें सोडून असें दुःखी करणें हें मला अगदींच शोभत नाहीं. सखे, ह्या वेळेस जरी नाहीं, तरी तूं निघून गेलीस ह्मणजे माझें हें आचरण, स्मरणा बरोबर मला फारच दुःख देणारें होईल. तुझ्या प्रीतीच्या योग्य जें धैर्य तें माझ्या हृदयांत आहे, असेंच मीं तुला दाखविलें पाहिजे. तर अन्नपूर्णे, माझे प्रिय सखे अन्नपूर्णे, आतां तूं मला विसरूं नको. आपली भेट पुन्हां कोणत्यावेळीं होईल! हें एका ईश्वराशिवाय आतां दुसऱ्याला कळणार नाहीं. यासाठीं त्या भगवंताच्या छायेखालींच मी तुला " जा " असें ह्मणतों. तो ईश्वरच आतां तुझें सर्वस्वी रक्षण करो! [आकाशाकडे] पाहून " हे जगज्जनका ईश्वरा! माझ्या ह्या कोमल पुष्पाचें आतां तूंच रक्षण कर. तुझा आशीर्वाद सदोदित हिला मनेप्सित फल देणारा असो! "

याप्रमाणें बोलत असतां त्यानें तिचा हात आपल्या हातांत दृढ प्रेमानें घट्ट धरून ठेविला होता आणि तीही त्याच्याच छातीवर मस्तक टेंकून रुदन करीत होती. तरी वामनरावाबरोबर हळू हळू ती आपल्या महालाजवळ आली आणि दार दृष्टीस पडतांच ह्मणालीः—" प्रियकरा, आतां आपणांस एकमेकांपासून वेगळें झालेंच पाहिजे. तर एकवेळ तूं आपल्या प्रिय व मधुर शब्दांनीं माझी नाहींशी झालेली हिम्मत एक वेळ मला बक्षीस कर. "

ह्या वेळेस वामनरावानें आपलें मन शांत राखण्याबद्दल पुष्कळ श्रम केले, नंतर अर्धे प्रेम व अर्धे धैर्य मिश्रित करून तो तिला ह्मणालाः—"प्रिये, ये बरें, आतां काळजी करूं नको. ईश्वराच्या कृपेनें पुन्हां आपण एकमेकांस भेटूं आणि अक्षयीं एकत्र होऊन पूर्ण सुखानुभव घेऊं, तरी तुझ्या खुशालीचें पत्र दृष्टीस पडेपर्यंत मला सुख होणार नाहीं, हें ध्यानांत ठेव. मीहीतुला पत्र पोंचवि-

ण्याबद्दल खबरदारी राखीन; आणि तुला पुन्हां पाहण्याच्या आशेनें मात्र जिवंत राहीन."

बस, इतकेंच शब्द त्याच्या मुखांतून निघाले; तों त्याचा कंठ दाटून आला. अन्नपूर्णेच्या शोकास तर पारच नव्हता. तरी "एकमेकांपासून दूर झालेंच पाहिजे" अशा समजुतीनें त्यांनीं एकमेकांचें चुंबन घेऊन एकमेकांस सोडलें!

---

## प्रकरण १२ वें.

### श्लोक.

पडो नभ कडाडुनी चपल चंचला या शिरीं ॥
जळो अबल देह हा ज्वलित पावकाभीतरीं ॥
गिळो धरणि भंगुनीं "प्रियकरा तुझ्या-वांचुनी ॥
न राग मन हें धरी तुज बघे दिवा यामिनी" ॥१॥

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं तीं सर्व माणसें ठरविलेला प्रवास अंगिकारून निघालीं. गाडी हळू हळू नदीच्या किनाऱ्यावरून असलेल्या राजमार्गानें चालली होती. तों अन्नपूर्णेची दृष्टि नदीच्या तीरावर असलेल्या वामनरावापर्यंत पोंचली! तिला पाहतांच त्यानें बळेंच हास्यवदन केलें आणि नेत्रांच्या इशाऱ्यानें शेवटचा निरोप देऊन धांवत असलेल्या गाडींतच त्यानें अन्नपूर्णेच्या हातीं स्वतः लिहून आणलेलें एक प्रेमपत्र दिलें. शेवटच्या वियोगाच्या वेळीं हातांत पत्र देत असतां वामनरावानें जें हास्य वदन केलें, तेंच चित्र अन्नपूर्णेच्या हत्पटावर अक्षय्य कोरल्याप्रमाणें जडून राहिलें. तिनें गाडींतून डोकें बाहेर काढून पुनः एकवेळ त्याला पाहिलें आणि त्यानंतर जोंपर्यंत तीं दोघें एकमेकांस दिसत होतीं तोंपर्यंत नेत्रपल्लवीनें[१] त्यांचीं प्रेमभाषणें एकसारखीं चाललीं होतीं. वामनराव दिसेनासा झाला आणि अन्नपूर्णेनें आपलें डोकें जें गाडीच्या बाहेर काढलें होतें, तें आंत घेतलें. नंतर त्यानें दिलेलें प्रीतिपत्र वाचून पाहण्यासाठीं ती तळमळूं लागली;

१ टीपः—एका प्रकारची सांकेतिक भाषा.

परंतु त्या कामाला कांहीं योग्य संधि तिला त्या गाडींत मिळेना. कारण कीं, गाडींत तिच्याजवळच घरांतील मोलकरीण बसलेली होती; तिचा डोळा चुकवून त्या पत्रांतील आशय पाहण्यासाठीं तिनें दहापांच वेळां प्रयत्न केला. शेवटीं जेव्हां तीं सर्व माणसें, एका खेडे गांवांतील टप्यावर घोडे बदलण्यासाठीं उतरलीं, तेव्हां तिला तें शांतपणानें वाचायाला वेळ मिळाला. वामनरावाची व अन्नपूर्णेची प्रीति जमल्यादिवसापासून वामनरावाकडून अन्नपूर्णेस जरी अनेक वेळीं धैर्य देण्याचा प्रयत्न झाला होता; तरी ह्या शेवटच्या प्रीतिपत्रामुळें तिला फारच सुख वाटलें. तिनें तें पत्र उलगडून वाचल्यानंतर तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंचे, मोत्यांसारखे थेंब त्या पत्रावर पडूं लागले. त्या पत्रांत वामनरावानें अन्नपूर्णेस आर्जवून जें कांहीं लिहिलें होतें, त्यांत एक असें सांगणें होतें कीं, नित्य सूर्यास्तसमयीं तिनें त्याचें स्मरण करावें. त्यानें त्यांत असें लिहिलें होतें कीं, " मीही नित्य सूर्यास्तसमयीं सूर्यमंडलाकडे पाहीन आणि असें मनांत आणीन कीं, ह्यावेळेस ज्या वस्तूकडे मी पाहतों, तीच वस्तु ह्यावेळेस माझी प्रियाही पहात आहे, व अशा प्रकाशाच्या संयोगानें हें कोमल सूर्यबिंब नव्हे, तर मी आपल्या प्रियेचेंच हें कोमल मुखकमल पहात आहें. ह्या योगानें आपणांत जरी पुष्कळ कोसांचें अंतर असलें; तरी आपण आपल्या मनोविचारांनीं ऐक्यसंबंधाच्या सुखाचा लेश तरी अनुभवूं, अशी माझी समजूत आहे."

वाचकहो, त्या दिवशीं सूर्यास्तसमयीं अन्नपूर्णेनें सूर्यमंडळाकडे किती प्रेमानें पाहिलें असेल बरें ? या गोष्टीचा तुह्मींच अदमास करा. आह्मांला कांहीं तो प्रकार सांगत बसण्याची फारशी गरज दिसत नाहीं.

त्यानंतर आमचीं प्रवासी माणसें कोणकोणत्या ठिकाणीं थांबलीं त्यांनीं कसे कसे मुक्काम केले ? हेंही आह्मी तुह्मांला सांगत बसत नाहीं. आपण आतां त्या सर्वांस महूच्या छावणींत असलेलीं पाहूं. ह्या मुक्कामास येत तोंपावतों मार्गांत मोरोबाची तब्यत

फारच कडक झालेली दिसत असे. चिमाबाईजवळ तर तो मोठ्याच गंभीरपणानें वागत आला. तिची तो मुळींच पर्वा करीत नाहीं, असें पाहणारास दिसत असे. त्याचप्रमाणें मार्गांत तो अन्नपूर्णेसही विचारीत नसे. केरोबाबरोबर अहोरात्र त्याच्या राजदरबारी गोष्टी चालत असत. जेव्हां जेव्हां कांहीं पराक्रमाची गोष्ट चाले. तेव्हां तेव्हां तर त्याचें सर्व रक्त तापल्याप्रमाणें दिसत असे. पुढें इंदूरच्या हद्दींत शिरतांच मोरोबा व केरोबा या दोघांनीं लश्करी पोषाख केले. नंतर प्रवास करीत करीत त्यांचा तो सगळा जमाव एके दिवशीं ग्वालेर शहरांत जाऊन दाखल झाला. ग्वालेरींतील घरें, मोठमोठाले राजकीय वाडे, देवालयें, इमारती, गाड्या, घोडे, आणि प्रशस्त बांधींव रस्ते, हा सर्व थाट पाहतांच अन्नपूर्णेस आश्चर्य वाटलें. ग्वालेरींत शिरतेवेळीं मोरोबानें जी गाडी आणली होती, ती फारच भपकेदार व श्रीमंती थाटाची होती. त्या एकाच गाडींत बसून आलेलीं सर्व माणसें एका सुशोभित महालांत जाऊन उतरलीं. महालाची शोभा साधारण नेत्रांस दिपविण्यासारखी होती.

तो सुशोभित महाल पाहतांच चिमाबाईला असें वाटलें कीं, मी ह्या राजकीय महालांतलि एक महाराणीच आहे. परंतु त्या घरांत गेल्यावर मोरोबा तिच्याशीं बोलत न बसतां ऐटीनें इकडे तिकडे फिरतच होता. आपल्या नव्या बायकोला आपल्या नांदत्या घरांत आणल्याबद्दल त्यानें तिला नुस्ता एक सुखाचा शब्दही दिला नाहीं.

सर्व माणसें त्या महालांत उतरून स्थिरस्थावर होतांच मोरोबानें आपल्यासाठीं एक गाडी बोलाविली व चिमाबाईजवळ एक शब्दही न बोलतां केरोबास बरोबर घेऊन कांहीं कामासाठीं बाहेर निघून गेला. रात्र झाली, तरीही तो परत आला नाहीं. तेव्हां कंटाळून चिमाबाईनें भोजनास बसण्याची तयारी करविली. जेवतां जेवतां अन्नपूर्णेनें आपल्या आतेस धीर देण्याचा प्रयत्न केला, पण तो अगदीं फुकट गेला! भोजन झाल्यावरही चिमाबाई मोरोबाची वाट बघत, बसून राहिली. पण मध्यरात्रीपर्यंतही तो

आला नाहीं; तेव्हां ती तडफडत आपल्या बिछान्यावर जाऊन पडली.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं मोरोबा व केरोबा हे घरीं आले. सगळी रात्र तो आपल्या मित्रांबरोबर एका जुगारखान्यांत जाऊन खेळत बसला होता. प्रातःकालीं घरीं आल्यावर कोणत्याही प्रकारानें किंवा कोणत्याही गोष्टीपासून त्याला चैन पडेना. त्याची अशी स्थिति होती कीं, जेव्हां तो नैसर्गिक आनंदास कंटाळे, तेव्हां जुगारासारख्या नीच कर्मणुकींत जाऊन बसत असे. अशा वागणुकींतच त्यानें आपल्या संपत्तीचा बहुतेक भाग नाहींसा केला होता; व जो कांहीं त्याला कमाई होत असे, त्यांतलि पैशाचा मोठा भाग तो या खेळासच अर्पण करीत असे. मित्रापेक्षां त्याला शत्रु पुष्कळ होते, व लोकांत त्याच्या वागणुकीची टीकाच होत असे.

त्याच्या मित्रांत बळवंतराव, आनंदराव आणि वामनराव हे तिघे मुख्य होते. बळवंतराव खुषमिजासी, रंगेल व उडाऊ, पण बहादर आणि उदारचित्त-दाता होता. तो कधीं कोणाविषयीं संशय घेऊन धुमसत बसणारा नव्हता. आनंदराव मिजासखोर, लुच्चा, पातकी, संशयी, कोणीं थट्टा केली तर ती न सोसणारा आणि कपटी स्वभावाचा होता. तो लोकांवर खोटीनाटीं कुलंगडीं उभीं करण्याच्या कामांत फार वाखाणलेला होता. शिवाय हातीं घेतलेलें काम तडीस पोंचविणें, हा त्याच्यांत एक गुण होता, असें ह्मटलें तरी चालेल. हा मनुष्य मोरोबाचा मुख्य साथीदार होता. वामनराव हिम्मतवान्, मौजी, जें तोंडीं येईल तें बोलणारा, भडभड्या, रागाचा गुलामच, एकलकोंड्या, खटपटींच्याशिवाय व मगरूर स्वभावाचा होता. त्याच्या स्वभावाविषयीं वाकबगार मनुष्य, एकाद्या अजाण पोराप्रमाणें त्याच्याकडून पाहिजे तें काम करून घेत असे.

ग्वालेरींत आल्यापासून मोरोबाच्या घरीं येणाऱ्या बहुतेक लोकांचे मागें सांगितल्याप्रमाणें स्वभाव असत. कधीं मोरोबा आपल्या घरीं नाचरंग, खाणेंपिणें, वगैरे विशेष आनंदोत्साह करीत असे; त्यांत मागें सांगितलेले बळवंतराव आदिकरून मुख्य

आणि इतरही लोक सामील होऊन, बहुतकरून नित्य रागरंग उडवीत. त्यांत विशेषेंकरून मोहनराव नामक एक उमराव आणि एका सरदाराची कन्या, हीं दोघें हर हम्मेश येणारीं पाहुणीं होतीं.

या येणाऱ्या लोकांपासून चिमाबाईच्या चित्ताला कधींही आनंद झाला नाहीं. ती त्या सर्वांचा धिःकार करीत असे. कारण, त्यांच्या संगतीमुळेंच मोरोबा सदोदित तिच्या पासून दूर रहात असे. ती त्याचा तिरस्कारही करीत असे. कारण कीं, मोरोबा तिच्या बरोबरचें हंसणें खेळणें सोडून त्यांच्याच बरोबर रात्रंदिवस आनंदांत काढी. असा प्रकार जरी होता, तरी चिमाबाई मोहनरावाकडे मोठ्या सन्मानदृष्टीनें पहात असे. त्याचा भपकेदार पोषाख आणि उमरावाची पदवी, हे दोनच प्रकार तिला दिपविण्याला पुष्कळ होते.

एके दिवशीं वनभोजनाच्या निमित्तानें मोरोबा, चिमाबाई, अन्नपूर्णा, मोहनराव आणि बळवंतराव आदिकरून मोरोबाचे मित्र एका रमणीय बागेंत जाऊन तेथें प्रातःकालपासून तिसरा प्रहरपर्यंत सर्व प्रकारच्या मौजा मारण्यांत दंग झालेले होते. तिसरा प्रहर उलटून गेल्यानंतर बागेच्या झाडांपानांवर सूर्याचीं सोनेरी किरणें पडलीं आहेत; मंद सुगंध वारा वहात आहे. विपुल फलपुष्पदर्शनामुळें आनंद पावलेले पक्षी आपआपल्या परी चारा मिळविण्याचें काम संपवून सुस्वर गायनांत निमग्न आहेत; अशा वेळेस तीं सगळीं माणसें एका अंब्याच्या झाडाखालीं बैठक टाकून बसलीं व त्यांत मोहनराव आपलें अलगुजें काढून वाजवूं लागला. त्यांत जीं गायनें तो वाजवी, तींच तोंडानेंही ह्मणून दाखवी. तो अन्नपूर्णेच्या शेजारींच बसलेला होता. ती जेव्हां आपल्या प्रियकराच्या इच्छेप्रमाणें अस्त पावणाऱ्या सूर्यबिंबाकडे पाहून त्याचें चिंतन करीत होती, तेव्हां तर तो एकसारखा तिच्याकडेच पहात होता, आणि तिच्या चेहऱ्यावरील वारंवार होणाऱ्या फेरफारानें तर त्याला दंगच केलें होतें. तरी त्याचें अलगुजें वाजविणें चाललेंच होतें; व गाण्यानें तर त्यानें तेथें असलेल्या सर्व मनुष्यांस वेडें करून

त्यांच्या तोंडातून "वाहवा ! वाहवा !" हेंच चालविलें होतें, तो जें गायन ह्मणत होता, तें स्त्रीपुरुषांच्या प्रीतिसंबंधाचें असून नायक आपल्या प्रियकरणीचें वर्णन करून तिला आर्जवीत आहे; असा भावार्थ स्पष्ट होता. अशा प्रकारचें गायन योग्यांशिवाय इतरांस आवडणारच. कांहीं वेळानें तें पूर्ण झालें, आणि मोहनरावानें आपल्या हातांतील अलगुजें अन्नपूर्णेच्या हातीं दिलें. अन्नपूर्णा आपल्या बापाजवळच गाणें, नाचणें व बांसरी वाजविणें शिकलेली होती. तिनें तें अलगुजें हातीं येतांच अनमान न करतां फारच छानदार वाजविलें व त्यांतच नृत्य आणि गायन चालूं केलें. त्यामुळें ऐकणारांची तर लुटपुट उडाली व जो तो तिला वाखाणूं लागला. त्यांतही पहिला नंबर मोहनरावानें ठेवला होता. सायंकालपर्यंत अन्नपूर्णेनेंच गायन केलें आणि मग तीं सर्व मनुष्यें पुनः शहराकडे वळलीं. शहरांत शिरतांच एका मोठ्या हवेलीजवळ येऊन मोरोबानें आपलीं माणसें आपल्या मित्रांच्या हवालीं केलीं आणि तो आनंदरावासह त्या वाड्यांत शिरला. मोरोबा गेल्याबद्दल त्या वेळेस अन्नपूर्णेला वाईट वाटलें. कारण, जरी ती सर्वांच्याबरोबर एका मोठ्या रथांत बसून चालली होती, तरी बरोबर असलेले सर्व परकी व अनोळखी पुरुष असून मोहनरावानें मोरोबा गेल्यापासून सारखी अन्नपूर्णेवरच दृष्टि ठेविली होती; आणि ती कपटदृष्टि तिच्या ध्यानांत आलेली होती. फार काय सांगावें ! त्यानें तितक्या अवकाशांत आपलें प्रेम तुजवर आहे, असें त्या भोळ्या पोरीला उघडही दर्शविलें. तरीही अन्नपूर्णेनें आपल्याला "त्यांतलें कांहींच कळलें नाहीं" असें दाखवून त्याची गोष्ट उडवून दिल्यासारखेंच केलें. मोहनरावानें मनांत आणलें कीं, चिमाबाईला राजी ठेवल्याशिवाय हें काम वळणार नाहीं. त्यानें हरएक बाबतींत चिमाबाईला खुष करण्याचा निश्चय केला, आणि त्याप्रमाणें तिला मोठ्या आदरसत्कारानें आपल्या घरीं बोलाविलें. चिमाबाई तर त्या पोकळ सन्मानें राजी झाली व त्यानें चला ह्मणतांच त्याच्या घरीं जाण्यास तयार झाली.

मोहनरावानें चिमाबाईला आपल्या घरीं नेऊन फारच खुष केलें व तिची बाजु आपल्या तर्फेला पक्की करून सोडली. तो जें बोलेल तें तिनें कबूल करावें, अशा प्रकारची स्थिति होऊन राहिली.

---

## प्रकरण १३ वें.

पद्य—"वीरा भ्रमरा जन्मुनि सार्थक केलें तूं या जनीं." ही चाल.

माझा प्रिय श्रीमंत नसे परि पूर्ण गुणें दिनमणी ॥
महात्मा पवित्र मन तो धनी ॥
पाहुनियां मज मानितसे सुख मीहि जशी कमलिनी ॥
मानितें दिनकर तो या मनीं ॥
विचार त्याचे सौख्य देति मज हृदय तया अर्पुनी ॥
झाहलें धन्य खचित या जनीं ॥
त्याचें धन हें न देववे तुज मनहि तया चिंतुनी ॥
कथितसे तोच सुखद जनिं वनीं ॥ १ ॥

अन्नपूर्णेनें पूर्णपणें पाहिलें होतें कीं, महाराष्ट्र देश सोडून पुढें झाल्या दिवसापासून मोरोबा कांहीं चिमाबाईजवळ बसून घटकाभर आनंदानें बोलला, असें कधींच झालें नाहीं. मोरोबानें तिच्या नादीं असावें, असें तिचें रूप तर नव्हतेंच, पण त्यानें नुसतें तिच्या सल्ल्यानें वागावें तशी तिच्यांत अक्कलही नव्हती. मोरोबा स्त्रियांच्या भुलथापांस वठणारा होता, असें मुळींच नव्हतें. तरी "माझ्यापाशीं मोठी मिळकत आहे." असें त्याला दाखविण्याविषयीं चिमाबाईनें पहिल्यापासून खबरदारी ठेविली होती. (त्याप्रमाणें तिची दौलत मोठी होती, हेंही खरेंच आहे.) ह्मणून मोरोबानें फसून तिच्याशीं पुनर्लग्न केलें, तरी तें केवळ "तिची मिळकत आपल्या हातीं यावी" अशाच हेतूनें हें उघडच आहे. परंतु त्याचा तो विचार फलद्रूप झाला नाहीं. कारण कीं, चिमाबाईनें आपल्या संपत्तीची अशी कांहीं व्यवस्था केली होती कीं, तिनें पुनर्लग्न केल्यावर ती मालमत्ता कोणाच्याही ता-

ंस्थात जाऊं नये. तरीही जें मोरोबाच्या हातीं लागलें, त्याचा त्यानें विकून फडशा उडविला आणि त्याचा जो पैसा हातीं आला, तो घेऊन तो पुनः हिंदुस्थानांत गेला. ( त्या वेळेल हिंदुस्थानांतील बहुतेक थोर घराण्यांस जुगाराचा छंद लागलेला होता. ) मोरोबाच्या हातीं थोडा बहुत पैका लागतांच त्यानें "आपल्या नशीबाचा फांसा टाकून पहावा!" असें मनांत आणलें. तें त्यावेळच्या स्थितीकडे व त्याच्या वर्तणुकीकडे पाहतां फारसें गैरशिस्त होतें असें नाहीं.

वामनरावानें मोरोबाविषयीं अन्नपूर्णेस जें कांहीं सांगितलें होतें, तें तिच्या दृष्टीला प्रत्यक्ष खरेंच दिसूं लागलें. तरीही त्याची पूर्ण स्थिति काय आहे? हें कांहीं तिच्या ध्यानांत आलें नव्हतें. तथापि "चिंता नाहीं, त्याची काय बडेजाव आहे ती आपण शोधून काढूं," असा तिनें विचार केला.

चिमाबाई कांहीं मोरोबाच्या दबावण्यानें दबकून राहणारी बायको नव्हती. ती आपल्या स्वतःच्या मिळकतीवरच मगरूर असे. मोरोबाला ठकविण्यांत जय पावल्याबद्दल मात्र तिला एका प्रकारचा आनंद होत असे. मोरोबा गुप्तपणें आपला धिःकार करतो, हें तिच्या ध्यानांत आलें होतें; तरी त्याची मालमिळकत काय आहे, हें कांहीं तिच्या ध्यानांत आलें नव्हतें. ज्या घरांत ती राहिली होती, तें राजकीय थाटमाटाचें शृंगारलेलें जरी होतें, तरी त्यावरून कोणतेंही अनुमान बांधता येत नव्हतें. चिमाबाई आपल्या मनांत आपल्याला एक महाराणीच मानून राहिली होती. मोरोबा एकादे वेळीं आपल्या थोरल्या किल्याविषयींच्या जेव्हां गोष्टी सांगे, तेव्हां त्या ऐकण्यांत चिमाबाईचें चित्त घटकाभर रमत असे; आणि "आपण लौकर त्या किल्यांत जाऊन रहावें," अशी तिची उत्कट इच्छाही होती. त्याचप्रमाणें मोरोबानें आपल्या जंगली व डोंगरी किल्याची दुरुस्ती चालविलीच होती व थोडक्याच दिवसांत त्यांत जाऊन राहण्याची त्याची मर्जी होती.

किल्यांत जाऊन राहण्याची तयारी मोठ्या झपाट्यानें होऊं

लागली; आणि त्यामुळें अन्नपूर्णेच्या चित्ताला समाधान वाटूं लागलें. ती आपल्या मनांत असें समजत होती कीं, तेथें गेल्यावर मी मोहनरायाच्या मागणींतून मुक्त होईन. ही तिची समजूत अगदीं चुकीची होती. मोहनराय कांहीं फार दिवसपर्यंत स्वस्थ बसून राहिला असे नाहीं. त्यानें एके दिवशीं अन्नपूर्णेला स्पष्ट सांगितलें कीं, "माझें तुजवर प्रेम आहे; आणि मी तुझ्या करग्रहणास्तव उत्सुक आहें." त्याचप्रमाणें मोरोबाजवळ तर त्यानें अन्नपूर्णेविषयीं पुष्कळ वेळां मागणी केली. त्यांत अन्नपूर्णा जरी त्याला उघड नाकारीत होती, तरी मोरोबा त्याविषयीं गुळमुळित बोलून त्याला आशेवर ठेवीत असे; व त्याला प्रेमवृद्धि करण्यालाही उत्तेजन देत असे. त्यामुळें पुढें पुढें मोहनराय रात्रंदिवस मोरोबाच्या घरीं असूं लागला, आणि जेथें चिमाबाई किंवा अन्नपूर्णा जात असत, तेथें तोही त्यांच्याबरोबरच चिकटून असल्यासारखा राहूं लागला.

नंतर ज्या किल्ल्यांत जाऊन राहण्याची अन्नपूर्णेस चटपट लागली होती, त्याबद्दल मोरोबा एकेक दिवस लांबणीवर टाकूं लागला. तो अहोरात्र आनंदरावाच्याचबरोबर फिरून काढूं लागला. केरोबाजवळ जरी तो बोलत असे, तरी त्यांत फारच शांतपणाचा समावेश करीत असे. आनंदरावाबरोबर मात्र प्रहरप्रहर एकांतीं खलबत करीत असे. या एकांतामुळें आलीकडे त्याचा जुगारखानाही सुटला होता. आनंदरावाची वर्तणूक अन्नपूर्णेच्या ध्यानांत थोडी थोडी येऊं लागली आणि त्यांतच मोरोबाच्या एकांतामुळें त्यांच्या सद्वर्तनाविषयीं तिच्या मनांत संशय उत्पन्न झाला. गोष्टी सांगून बाहेर आल्यानंतर मोरोबा कधीं कधीं क्रोधांत व कधीं कधीं खोल विचारांत असलेला तिच्या दृष्टीस पडत असे.

याप्रमाणें इकडे विचार चालला असतां महाराष्ट्र देशांतून अन्नपूर्णेच्या मामानें मोरोबास एक पत्र पाठविलें. त्यांत त्यानें आपल्या भरभराटीविषयींच बहुतेक लिहिलें होतें. शिवाय तो इंदुरासच येऊन राहणार असें कळवून अन्नपूर्णा आणि चिमाबाई यांसह मोरोबानें कांहीं दिवस आपल्या घरीं येऊन रहावें, ह्मणून आमंत्रणही केलें होतें.

त्याच सुमारास वामनरावाकडील एक पत्र अन्नपूर्णेच्या हातीं आलें. ती अजून ग्वालेरींतच असेल अशा समजुतीनें त्यानें तें लिहिलें असून प्रीतिवचनांनीं भरलेलें होतें. तरी त्यांत मुख्य लक्ष्य पुरविण्यासारखी गोष्ट हेळवांकच्या महालाविषयीं होती. हेळवांकचा महाल अन्नपूर्णेच्या मामानें कोणाला भाड्यानें दिला होता आणि अन्नपूर्णेच्या घरांतील वृद्ध कुळंबिणीस त्यानें रजा दिली होती. वामनरावानें या गोष्टीचें आपणास फार दुःख झालें ह्मणून लिहिलें होतें. हें पत्र वाचतांच अन्नपूर्णेस फारच दुःख झालें, तरी आपल्यावर अजून वामनरावाचें प्रेम आहे, असें कळल्यामुळें तिला त्यांतल्या त्यांत सुख झालें. तिच्या मामानें तिचें घर तिला न विचारतां भाड्यानें दिलें, या गोष्टीचें तिला फारच आश्चर्य वाटलें. कारण पहिल्यानेंच तिच्या मामानें तिला तिचा फायदा दाखवून जरी तो महाल भाड्यानें देण्याबद्दल आग्रह केला होता; तरी तिच्या बापाची कांहीं तशी इच्छा नव्हती आणि प्रसंगोपात अन्नपूर्णेलाही आपलें घर ह्मणायाला तेंच होतें. आणखीं दुसरें दुःख अन्नपूर्णेला असें वाटूं लागलें कीं, ताराबाईच्या वार्धक्याकडे न पाहतां मामानें तिला घरांतून काढून लावलें. या दासीनें अन्नपूर्णेची बाळपणापासून चाकरी केलेली होती; व तिचा सगळा जन्म त्या महालांतच गेला होता. असो. आतां अन्नपूर्णा असा विचार करूं लागली कीं, आपल्या मामाला एक पत्र पाठवून त्याच्याकडून ताराबाईला पुनः आपल्या घरांत ठेववावें आणि मला कळविल्याशिवाय माझें घर तुह्मीं भाड्यानें कां दिलें? असें त्याला विचारावें. याप्रमाणें तिच्या मनांत मात्र आलें, तों मोरोबानें तिला बोलवायाला मनुष्य पाठविलें. तेव्हां पहिल्यानेंच ती त्याच्याकडे निघाली. ती जों दिवाणखान्यांत गेली, तों मोरोबा एकटाच तेथें बसलेला होता.

तो ह्मणाला:—" अन्नपूर्णे, तुझ्या मामाकडून आह्मांला एक पत्र आलें आहे आणि त्यांतील एका सूचनेप्रमाणें मला तुझ्याजवळ कांहीं बोलणें अवश्य आहे. तुझें व माझें बोलणें होईल त्याप्रमाणें मी तुझ्या मामाकडे लिहून कळवीन. तर बोल, तुझा काय विचार आहे?"

अन्नपूर्णा ह्मणाली:–"आपण ज्याविषयीं बोलणार आहां, त्या-विषयीं मलाही आतां स्पष्ट बोललेंच पाहिजे."

"खचितच." मोरोबानें बोलण्यास आरंभ केला:–"ती गोष्ट अशी आहे कीं, तुझा विचार घेतल्यावांचून चालायाचीच नाहीं. तरी मी आशा करतों कीं, तूं माझ्या विचाराबाहेर वागणार नाहींस. त्यांत तुझ्या संबंधानें तोट्यांहून फायदेच अधिक आहेत."

"ते फायदे मी कबूल केले." अन्नपूर्णा ह्मणाली:–"तरीही माणसांच्या चालीरीतिबद्दल आपणांला पूर्ण विचार केलाच पाहिजे. तरी सांप्रत मला असें वाटतें कीं, सगळ्या गोष्टी होऊन गेल्या आहेत आणि त्यांत आतां मी तक्रार करावी असें माझ्या हातीं कांहीं राहिलें नाहीं."

"खरें आहे. विचार केलास तर आतां सगळें होऊन गेलें आहे. आतां कोणत्याही प्रकारची तक्रार न करतां तूं ही गोष्ट कबूल केलीस; या तुझ्या सद्गुणाबद्दल मी तुला वाखाणतों. शाबास! शहाणी व समजूतदार मुलगी आहेस! अशा पोक्त समजुतीच्या मुली फार थोड्या. पहा अजून मी तुझ्या **मामास** लिहिलेलें पत्र बंद केलें नाहीं. तूं ही गोष्ट कबूल केलीस, असें आपल्या मामाला याच पत्रावर लिहून कळीव. आतां थोडक्याच दिवसांत तुला बरोबर घेऊन मी त्याच्या भेटीस जावें अशा विचारांत आहें. त्या वेळीं मग या गोष्टीबद्दल त्याच्याजवळ तूं पाहिजे तितकें बोल."

असें ऐकतांच अन्नपूर्णेनें मोरोबाच्या पत्राच्या पाठीवर खालीं दर्शविल्याप्रमाणें लिहिलें:–

"ती० **मामासाहेब** यांस:–ज्या गोष्टीविषयीं मोरोबानीं ह्याच पत्रांत आपणांस लिहिलें आहे; त्या गोष्टीबद्दल आतां मी तक्रार करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं; असें मला वाटतें. तरीही जी गोष्ट झाली, तीच थोड्या अवकाशानें झाली असती तर ठीक झालें असतें. तितक्या अवकाशांत मला माझ्या मनाप्रमाणें कांहींतरी करितां आलें असतें. आतां असो. जें झालें तें मला कबूल आहे. ज्या शहाणपणानें ही गोष्ट झाली, त्याविषयीं कुरकुर

करण्यास मला आतां जागा नाहीं. आणि ह्मणूनच तें मी कबूल करतें. तरीही त्या गोष्टीबद्दल मला तुमच्याजवळ पुष्कळ बोलायाचें आहे. तें बोलणें आपली व माझी समक्ष भेट होईल त्या वेळेस बोलेन. माझ्यासाठीं आपण ताराबाईचामात्र वारंवार समाचार घेत असाल अशी आशा आहे. कळावें."

आपली प्रियकर भाची,

**अन्नपूर्णा—आत्मारामतात्यांची कन्या.**

अन्नपूर्णेनें आपला मजकूर लिहिल्यावर तो मोरोबानें वाचून पाहिला आणि तो जरासा हंसला. अन्नपूर्णा तेथून आपल्या बसण्याच्या जागीं जाऊन वामनरावास पत्र लिहीत बसली. त्यांत तिनें मोरोबाच्या वर्तणुकीबद्दल त्याला पुष्कळ लिहिलें होतें. तरी मोहनरायाबद्दल तिनें त्याला एक अक्षरही लिहिलें नाहीं. ती समजत होती कीं, अशा गोष्टी कळतांच वामनराव दुःखित होईल.

दुसऱ्या दिवशीं मोहनराय मोरोबाकडे जेवण्यासाठीं आला. त्या दिवशीं तो एका प्रकारच्या आनंदांतच होता, आणि पूर्वीपेक्षां अन्नपूर्णेजवळ फारच सलगी दाखवीत होता. त्यामुळें आपल्या अब्रूस्तव अन्नपूर्णेला फार वजनांतच रहावें लागलें. दोन तीन वेळां त्यानें तिच्याजवळ एकांतीं बोलण्याची आपली इच्छा दर्शविली. तेव्हां तर तिनें त्याला साफ सांगितलें कीं, "ज्याचा माझ्या मनाला तिरस्कार आहे, त्याजपाशीं एकांतीं बोलण्याचें मला कारण नाहीं.' सायंकाळीं चिमाबाई आणि घरांतील सर्व मनुष्यें फिरण्यासाठीं बाहेर निघतांच मोहनराय अन्नपूर्णेचा हात धरून तिला गाडींत बसण्यासाठीं आग्रह करूं लागला. पण तिनें तें नाकबूल केलें आणि चिमाबाई ज्या गाडींत बसली होती, त्या गाडींत जाऊन बसली. तरी मोरोबानें तिचा हात धरला आणि पुनः तिला आणून मोहनरायाच्या गाडींत बसविलें. तेव्हां मात्र तिनें "स्तब्ध रहाणें चांगलें नाहीं." असें मनांत आणून मोरोबाला अनेक प्रकारें समजाविलें, पण तो कांहीं समजला नाहीं.

आतां तर ती मोहनरायाला फारच धिःकारूं लागली. "तरी

जोपर्यंत मोरोबा त्याला अनुकूल आहे तोंपर्यंत आपलें कांहीं चालणार नाहीं" असें तिच्या मनांत आलें.

गाडी पुढें चालूं लागली आणि तिघेंही कांहीं वेळ स्तब्ध होतीं. शेवटीं मोहनराय बोलूं लागला:—

" अन्नपूर्णे, मी तुझे पुष्कळ उपकार मानले पाहिजेत, आणि त्याबरोबरच मोरोबाचेही ! "

असें ऐकतांच अन्नपूर्णा त्याच्याकडे आश्चर्यचकित व क्रुद्ध मुद्रेनें पाहूं लागली.

"अशा आनंदाच्या प्रसंगीं रागावणें काय कामाचें आहे बरें?!!" मोहनराय अन्नपूर्णेकडे वळून बोलला:—" मनांत आनंदित असून क्रोध दाखविण्यांत काय अर्थ आहे? माझें प्रेम किती खरें आहे? हें तुझ्या ध्यानांत आलें असून आतां तूं आपली प्रीति कां बरें झांकून ठेवतेस ? "

अन्नपूर्णा ह्मणाली:—" महाराज, माझी प्रीति मला उघड करण्याचें किंवा झांकण्याचें मुळींच कारण दिसत नाहीं. मी आजपर्यंत अशी आशा राखून होतें कीं, आपण शहाणपणानें समजून मजविषयीं मागणी करण्याचें कंटाळवाणें कृत्य बंद कराल तरीही जर तुह्मी मुळींच समजत नाहीं, तर मला समजाविणें भाग आहे कीं, आजपर्यंत मी आपली जी योग्यता समजत होतें, ती आतां माझ्या मनांतून नाहींशी झाली आहे."

" फारच आश्चर्याची गोष्ट आहे ! " मोरोबा मोठ्या आवेशानें बोलूं लागला:—" स्त्रीजातीच्या समजुतीपुढें आजपर्यंत जरी मी एक शब्दही उच्चारला नाहीं; तरी अन्नपूर्णे, तुला सांगून ठेवतों कीं, माझ्या अब्रूवर गोष्ट आली ह्मणजे मी कोणालाही सोडणार नाहीं. मी कांहीं मोहनरायाप्रमाणें तुझा आषक नव्हे, ह्मणून तुझे हे डामडौलाचे विचार ऐकेन. तुझ्या करग्रहणासाठीं जो पुरुष मागणी करीत आहे, तो तुझ्या पितृकुटुंबाचाही लौकिक वाढविल. तो लौकिक मिळविण्याला तुझ्या समजुतीप्रमाणें तुझे

कुटुंब योग्य नसतांही ह्या उमरावास माझ्या मार्फत तूं सांगितलें आहेस; ते तुला खरें केलेंच पाहिजे."

"आपण चुकतां मोरोबा." अन्नपूर्णा ह्मणाली:—"मी माझे विचार कोणत्याही वेळीं फिरवीत नसतें. पहिल्यापासून माझा जो विचार आहे, तोच अजून कायम आहे. तुह्मीं मोहनरायास मजकडून जो मान मिळावा असें इच्छितां त्याबद्दल मी पहिल्यापासून नाकबूल आहें, आणि या वेळेसही शेवटचें सांगतें कीं, माझ्या करग्रहणाची मोहनरायानीं इच्छा सोडून द्यावी. ह्या उमरावाबद्दल मी जें कांहीं बोललें आहे, तेंच आतां हें स्पष्ट सांगितलें."

अन्नपूर्णेचें भाषण ऐकतांच मोहनराय आश्चर्यानें मोरोबाकडे पाहूं लागला. परंतु तो कांहीं बोलणार तों त्याच्या आधींच मोरोबा बोलूं लागला.

"काय ? तूं आपल्या कबुलायती आतां नाकबूल करशील ! एका घटकेच्याच आधीं तूं कबूल करून आपल्या मामाला काय लिहिलेंस ? कीं ठरलेल्या गोष्टींत तक्रार करण्यांत आतां अर्थ नाहीं आणि मी मोहनरायाच्या करग्रहणास कबूल आहें ह्मणून."

"आपण आपल्या मोठेपणावर विश्वासून मला फसवीत आहां महाराज! आपण ह्मणतां असें तर मीं कधींच कबूल केलें नाहीं, आणि या पुढेंही प्राणांत झाला तरी कबूल करणार नाहीं."

"किती खोटेपणा हा ! किती खोटसाळपणा ! अगे, एका घटकेच्या आधीं तूं आपल्या मामाला लिहिलेला मजकूर नाकबूल करशील? बरें आहे; जरी तूं नाकबूल केलेंस, तरी एकाच घटकेच्या आंत तूं जें लिहून दिलें आहेस, तेंच या गोष्टीस तूं कबूल होतीस असा पुरावा करील. तर बोल आतां, तुझें काय ह्मणणें आहे ?"

"आतां माझें ह्मणणें हेंच कीं, तुह्मी व मी भ्रमांत पडूनच एवढा वेळ मनांत मांडे खात बसलों आहों. जर अशा प्रकारचा मजकूर आहे, असें मला कळलें असतें, तर मीं तसें कधींच लिहून दिलें नसतें."

"अन्नपूर्णे, जें कांहीं झालें असेल, तें आतां तूं स्पष्ट सांग;

अशी मी तुजपाशीं विनंति करितों. " असें मोहनराय मोठी उत्सुकता दर्शित करून बोलला.

. " महाराज, मी सदोदित स्पष्टच बोलणारी आहे. मी आपल्या बोलण्यानें कोणाला भ्रमांत रहावें लागेल असें कधींच बोलत नाहीं. "

" काय मोरोबा ? हा काय विचार आहे ? " मोहनराय मोरोबाकडे पाहून जरा जोरानें विचारूं लागलाः—"यांत तुह्मीं मला फसविलें, असें उघड दिसतें! "

" मोहनराय, या वेळेस तुमचे प्रश्न शिलकींत राहूं द्या. एका कपटी स्त्रीचें कापट्य समजून घेण्यासाठीं बरेच श्रम केले पाहिजेत, हें आज माझ्या ध्यानांत आलें. आतां तुह्मीं क्षणभर स्वस्थ असा, आणि अन्नपूर्णाबाई, आपण आपल्या चुकीची दुरुस्ती कशी करणार हें पहिल्यानें सांगा ? " असें मोरोबा मोठ्या क्रोधदृष्टीनें विचारूं लागला. तेव्हां अन्नपूर्णा ह्मणालीः—

" आपण जें विचारतां तें मी मोठ्या आनंदानें सांगतें. पण त्याच्यापूर्वीं मी आपणांस एक प्रश्न करणार आहे; त्याचें उत्तर आपण स्पष्ट दिलें पाहिजे. "

" ठीक आहे, पण एकच कां ? तूं मला पाहिजे तितके प्रश्न कर; मी त्याची तुला स्पष्ट उत्तरें देतों. "

" माझ्या मामाला आपण जें पत्र लिहिलें, त्यांत कोणती बाबद लिहिली होती. "

" तूं ज्या बाबतीविषयीं त्याला लिहून कळविलेंस; तीच होती."

" स्पष्ट सांगा. त्यांत तुह्मीं काय लिहिलें होतें ? "

" उमराव मोहनरायांच्या मागणीशिवाय दुसरी कोणती बाबद असणार होती, असें तुला वाटतें ? "

" असें आहे तर महाराज, आपण दोघेंही चुकलों आहों. "

"हः हः हः! माझ्या हुशार मुली, आपण दोघेंही चुकलों आं ! एकावर एक बाहणा तयार ! शाबास ! तूं आपल्या चारित्रानें मला फारच छकविण्याचा विचार मांडला आहेस; पण असें बोलणें तुझा

जो आषक असेल, त्याला ऐकावेसें वाटेल. माझ्या इतराजीबद्दल तुला फारच सोसावें लागेल. विचार कर."

अन्नपूर्णा आपल्या नेत्रांतून होणारा अश्रुपात थांबवून ह्मणाली:— "माझा खरा विचार तुह्मांला ऐकायाचा असेल तर ऐका. नाहीं तर मुळींच ऐकूं नका."

"बयासाहेब, आतां तुह्मीं आपले विचार झांकून ठेवा. तुमचे सगळे विचार आमच्या ध्यानांत आले आहेत, आणि सगळ्या गोष्टींचा खुलासाही होऊन गेला आहे. आतां यापुढें कदाचित् तुझा हा आषक तुझें ऐकेल, माझ्या इतराजीचें फळ चाखण्यास तयार असा, इतकेंच तुह्मांला आतां सांगणें आहे."

मोहनराय एवढा वेळ जो स्वस्थ बसून दोघांचीं भाषणें ऐकत होता, तो आतां बोलूं लागला:—"मोरोबा, तुह्मी फार घाई करीत आहां. तिच्या मनाचा खुलासा आपणांस ऐकलाच पाहिजे. अन्नपूर्णे, या गोष्टीचा निकाल कर, अशी मी तुझी प्रार्थना करतों."

"मोरोबा ह्मणतात त्याप्रमाणें सगळा निकाल झालेलाच आहे." अन्नपूर्णा ह्मणाली:—"तरी मी माझ्याविषयीं व तुमच्याविषयीं हें शेवटचें सांगतें कीं, तुह्मांला वरावें, असें कधींही माझ्या मनांत येणार नाहीं. मग या गोष्टींत हा प्राण जावो कीं राहो!"

"अन्नपूर्णे, प्रिये अन्नपूर्णे!" मोहनराय फारच काकळुतीनें बोलूं लागला:—"प्रिये मोरोबांनीं तुझा अपराध केला ह्मणून तूं माझ्या संबंधांत अन्याय करूं नको."

"मीं अपराध केला?" मोरोबा रागावून मोठ्यानें बोलूं लागला:— "मोहनराय, हें बोलणें एकाद्या पांच वर्षांच्या पोराला, किंवा जो रूपवान् तरुणीचा गुलाम बनला असेल त्याला शोभेल. जो हिम्मतवान् मर्दबच्चा आहे, त्याला शोभणार नाहीं."

"मोरोबा, आतां तुह्मी मला अधिक दुःख देण्याच्या विचारांत राहूं नका. मला माझ्या स्वतःच्या हितासाठीं आतां बोललें पाहिजे." असें मोहनराय ह्मणाला. तें ऐकतांच मोरोबा बोलला:—

" महाराज, आतां विनाकारण तक्रार करीत बसण्यांत आपणां दोघांचीही हानि आहे. "

" तरीही ज्या वस्तूंत माझ्या सगळ्या आयुष्याच्या सुखाचा समावेश होत आहे, ज्या वस्तूच्या लाभानें मी अक्षय्य सुखोपभोग घेईन अशी आशा बाळगून आहें; ती वस्तु मी सहज सोडून देणें ह्मणजे अगदीच मूर्खपणाचा विचार आहे. तर प्रिये अन्नपूर्णे, मी सदोदित तुझ्यावरच प्रीति करीन, तुलाच इच्छीन आणि तुझ्याचसाठीं विरहानें झुरत राहून आपल्या शोकस्वरांनीं हें अवाढव्य जग नादित करीन !! " असें मोहनराय ह्मणाला. तेव्हां मोरोबानें त्याला सांगितलें:—

" हें बोलणें तुमच्या शौर्याला आणि लौकिकाला उघड कालिमा आणणारें आहे. हें भाषण तुमची योग्यता राखून ठेवण्याला उपयोगी पडेल, असा तुमचा विचार आहे कीं काय ? "

" बस, बस ! मोरोबा, आतां फार झालें. तरी तूं खूप समज, या गोष्टीबद्दल मला तूं जबाबदार आहेस. "

" मी तुह्मांला हजारवेळ जबाब देईन. आणि बाई, तूं हें ध्यानांत ठेव कीं, जी चाल तूं माझ्यासारख्या अव्रूदार मनुष्याला दाखविलीस, ती अशा एकाद्या तरण्या पोराजवळ चालली असती; मी चालूं देणार नाहीं. " असें मोरोबानें तिला दाबून सांगितलें. पण तें ऐकतांच मोहनरायाचा कोपाग्नि प्रदीप्त झाल्यासारखा दिसला; आणि तो मोठ्या आवेशानें ह्मणालाः—

" मोरोबा ! अन्नपूर्णेचें बोलणें माझ्यासारख्या पोराजवळ चालेल आणि तूं ऐकणार नाहींस, आं ! बरें आहे ! याद राख. या बोलण्याबद्दल मी तुला मोकळा सोडणार नाहीं. तुला जबाब द्यावाच लागेल, तूं असें समज कीं, एका अज्ञान स्त्रीपेक्षां हजारपटीनें श्रेष्ठ व बलवान् शत्रु आजपासून हात धुवून तुझ्या पाठीस लागला आहे. तुझ्या ह्या धमकींतून मी अन्नपूर्णेचा बचाव करीन. जरी हिनें मला न वरलें, तरी ह्या निर्दोष अबलेवर मी तुझा डाव साधूं देणार नाहीं. "

मोहनरायाच्या मुखातून अन्नपूर्णेच्या पक्षाचें भाषण ऐकतांच मोरोबा मनांतल्या मनांत अगदीं चपापून राहिला. त्यानें केलेली लुच्चेगिरी त्याच्यासमोर मूर्तिमंत उभी राहिली; आणि ती खुद्द मोहनरायानेंच शोधून काढली, ह्मणून त्याला भयही वाटलें. नंतर पुढें लिहिलेल्या भाषणांत त्याच्या मनांतील क्रोध, भय, आणि मतलबी मार्दव हीं स्पष्ट दिसूं लागलीं:–

" मोहनराय, तुमच्या तोंडांतून मला अशीं भाषणें ऐकावीं लागतील, असें कधींही वाटलें नव्हतें. तरीही समजुतीच्याविरुद्ध भाषणें, हीं एका अल्लड पोराच्या तोंडांतून निघालीं आहेत, असें जाणून मी धिःकारानें क्षमा करतों ! "

" धिःकारानें ! "

" माझ्या मानासाठीं मोहनराय." मोरोबा मध्यें न थांबतां बोलतच राहिलाः–" मी तुह्मांला सांगतों कीं, या गोष्टीबद्दल आपण घटकाभर शांत चित्तानें बसून विचार केला पाहिजे. यासाठीं आपण घरीं चला. नंतर मी तुमची चूक तुह्मांला दाखविण्याची तुमच्यावर आणखी एकवेळ मेहेरबानी करीन. "

" मेहेरबानी करशील ! आणि ती माझ्यावर ? पण आतां तुझ्या बरोबर भाषण करणें ह्मणजे आपली योग्यता गमाविणें आहे; असें मला वाटतें आणि तेंच खरें आहे. "

असें ऐकतांच मोरोबा धिःकारानें त्याच्याकडे पाहून हंसला. इतक्यांत भांडण वाढूं देऊं नये, असें मनांत आणून अन्नपूर्णेनें त्यांत तोंड घातलें; आणि तिच्या मामाकडे पाठविलेल्या पत्रांत कसा घोंटाळा झाला आहे, तें दोघांसही तिनें समजावून सांगितलें. पण मोरोबानें त्या सगळ्या गोष्टी नाकबूलच केल्या. तरीही मध्यें शांतपणाची भाषणें चालू झाल्यामुळें कलहाग्नि जो पेटला होता, तो शांत झाला. मोरोबानें मोहनरायास " मेहेरबानी करून पुनः एक वेळ आमच्या घरीं चला, " असें सांगितलें. तेव्हां तो निकाल ऐकण्यास उत्सुक असल्यामुळें त्याच्या घरीं चलण्यास कबूल झाला आणि गाडी पुनः मोरोबाच्या घराजवळ येऊन उभी

राहिली. गाडींतून उतरते वेळीं मोरोबानें मोहनरायाच्या कानांत कांहीं सांगितलें, तें ऐकताच त्यानें अन्नपूर्णेची जरी खुषी नव्हती, तरी तिचा हात धरून त्याचें चुंबन घेतलें, आणि प्रसन्नमुद्रा दाखविली. अन्नपूर्णेला घरांत घालवून दोघेही पुनः गाडींत येऊन बसले आणि कांहीं बोलत बोलत निघून गेले.

घरीं आल्यावर अन्नपूर्णेनें मोहनरायांबद्दल आपल्या आतेजवळ पुष्कळच सांगितलें, परंतु ती त्याच्या श्रीमंतीडौलावर भाळलेली होती; त्यामुळें तिनें त्यालाच वरावें, ह्मणून ती तिला बोध करूं लागली. तेव्हां जरी चूक झालेली आहे, तरी ती वेळींच आपल्या मामाला कळवून ठेवावी, असा अन्नपूर्णेनें मनांत बेत केला.

---

## प्रकरण १४ वें.

नंतर थोड्याच दिवसांनीं मोरोबा, चिमाबाई व अन्नपूर्णा यांस बरोबर घेउन, केशवरावांस भेटण्यासाठीं गेला. गाडींतील भांडणापासून मोहनराय मोरोबाच्या घरीं मुळींच आला नाहीं; त्यामुळें अन्नपूर्णेच्या मनांत अनेक विचार उद्भवले. कदाचित् मोरोबा व मोहनराय, यांचें भांडण होऊन मोहनराय मारला गेला असेल–किंवा मोहनराय स्वतःच समजून मागणीचा नाद सोडून स्वस्थ बसला असेल. असे अनेक विचार तिच्या मनांत घोळत असत.

तरी अन्नपूर्णा आपल्या मामाच्या घरीं जाऊन उभी राहतांच मोहनराय त्यांच्या मंडळींत मिसळून आहे, असें तिनें पाहिलें. तरीही पहिल्यानें आपल्या मामाजवळ आपणच एकांतीं बोलत बसण्याची वेळ अन्नपूर्णेनें बरोबर साधली. पण तिनें त्याला जें जें विचारलें, त्याचीं उत्तरें त्यानें मोठ्या डौलांत व कुऱ्यांतच दिलीं. त्यानें तिला सांगितलें:–"तुझें हेळवांकचें घर आह्मीं भाड्यानें दिलें आहे, तर त्यांत तुझाच फायदा आहे. तरीही जेव्हां तूं ह्या उमरावाबरोबर लग्न करशील, तेव्हां तुला कोणत्याही गोष्टीची कमताई पडणार नाहीं आणि त्या कमाईवरच बसावेंही लागणार

नाहीं. ह्या संबंधामुळें मी तुझा एक आप्त आहे; एवढ्याच गोष्टीनें मी मगरूर राहीन व तें शोभेलही! आणि आजपर्यंत तुझ्या आप्तांच्या किंवा मैत्रिणींच्या स्वप्नांतही जें सुख आलें नव्हतें, तें तूं अनुभविशील. शाबास! तुझें दैव पूर्ण उदयास आलें यांत संशय नाहीं."

हीं भाषणें ऐकतांच अन्नपूर्णेची अशी स्थिति झाली कीं, कांहीं वेळपर्यंत तिच्या तोंडांतून एका अक्षराचाही उच्चार होण्याची मारामार पडली. परंतु घटकाभऱ्यानें जेव्हां तिनें " ह्या पत्रांतील लिहिणें अगदीं चुकीचें व न समजून लिहिलेलें आहे. माझी इच्छा तशी अगदीं नाहीं. " असें आपल्या मामाला सांगितलें; तेव्हां तें ऐकतां ऐकतांच त्याला क्रोध आला, आणि त्यानें तिची मूर्खांत गणना केली. कारण, तोही चिमाबाईप्रमाणेंच खोट्या इतमामाचा आणि लौकिकांतील डामडौलाचा भुकेलेला होता. एका उमरावाचा मामेसासरा होण्यांत आपली योग्यता अधिक वाढणार आहे, असें त्याला वाटत होतें.

परंतु अन्नपूर्णेला, " आपल्या मामाचाही आपल्या समजुतीला आधार नाहीं " असें वाटूं लागलें. तिच्या लग्नाबद्दल काय व्यवस्था करावयाची? हें मोरोबानें तिच्या मामाचें ह्मणजे केशवरावाचें मत घेऊन निश्चित केलें. केशवरावांकडून परत आल्यावर मोरोबानें अन्नपूर्णेला आपल्यासमोर बोलावून सांगितलें कीं, " जर तूं मोहनरायाची मागणी मानपासून कबूल न करशील, तर आह्मी तुला न विचारतां जबरीनें मोहनरायाचें व तुझें लग्न करूं."

याप्रमाणें कळल्यावर त्या अबलेच्या मनाची स्थिति काय झाली असेल ! हें केवळ विस्तारानें सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. तिला आपल्या अंगावर पर्वताचा कडाच कोसळून पडतो असें वाटूं लागलें, व तिच्या खिन्नतेला पार नाहींसा झाला. तरी ईश्वराच्या इच्छेनें असा कांहीं प्रकार घडून आला कीं, मोरोबाचें मन ह्या लग्नाच्या बाबतींतून अगदीं बहकलें! आनंदरावाचीं गुप्त खलबतें पुन: उद्भवलीं आणि त्यांत केरोबा व वासुदेवराव हे दोघे सामील होऊं लागले.

एके रात्रीं मोरोबा जुगारखान्यांत जाऊन खेळत बसलेला असतां आनंदराव घाबरून मोठ्या घाईनें त्याच्या घरीं आला व त्यानें तेथें येतांच मोरोबाला बोलावणें पाठविलें. त्याप्रमाणें तो येतांच जो कांहीं प्रकार घडून आला होता, तो सर्व आनंदरावानें मोरोबाला सांगितला.

एक हिंदुस्थानी सरदार, ज्यानें थोड्याच दिवसांच्या मुदतींत आनंदरावाचा द्वेष संपादन केला होता; त्याला रस्त्यांत गांठून कांहीं दगलबाज व खुनी लोकांनीं ठार मारलें. तो उमराव मोठा राजकारणी पुरुष ह्मणून वाखाणलेला होता; ह्मणून त्याच्या खुनाचा शोध लावण्याची दरबारांतून मोठ्या झपाट्यानें व वारकाईनें तजवीज चालू झाली; त्यामुळें शहरांत जिकडे तिकडे त्याच गोष्टी लोक बोलूं लागले. त्याप्रमाणें चार दोन दिवसांत सरकारानें त्या खुनी लोकांचा शोध लावून त्यांस धरलें. इतका प्रकार झाल्यानंतर त्या खुनी लोकांतील एकानें आमच्यांत आनंदराव सामील होता, असें कबूल केलें. पण तितक्यांत ती बातमी आनंदरावाच्या कानावर आल्या कारणानें आतां पुढें काय करावें? ह्मणून तो मोरोबाजवळ मसलत विचारण्यासाठीं आला होता; तरी तो जाणत होता कीं, इतक्या वेळांत सरकारी माणसांनीं सगळे मार्ग अडवून त्याचा शोध करण्याचें कामही चालू केलें असेल. अशा संकटसमयीं त्यानें मोरोबाच्या घराचा आश्रय पसंत केला, आणि त्यासाठींच तो तें कळतांच आधीं मोरोबाकडे धांवत आला होता. त्याप्रमाणें मोरोबानेंही त्याला छपवून ठेवण्याचें कबूल केलें. तेंही अशासाठीं कीं, ह्या खुनी आनंदरावानें पूर्वीं मोरोबावर पुष्कळ उपकार केले होते. असो. अशा मोठ्या अपराधी मनुष्याला दडवून घरांत ठेवल्यामुळें लग्नाचा बेत लांबणीवर ठेवणें ओघासच आलें, तरीही या अपराध्याला परगांवीं पळून जाण्याची सवड येतांच मोरोबानें त्याबद्दलचीही सगळी तयारी केली, आणि तशा घाईंतच अन्नपूर्णेस कळविलें कीं, "उद्यां प्रातःकालीं एक धर्माधिकारी व मोहनराय तुला बोलावण्यासाठीं येतील. जाण्याच्या तयारींत रहा.

आतां तुझें नाहीं होय आह्मीं ऐकणार नाहीं." असें ऐकतांच बिचारी अन्नपूर्णा संकटांत पडून तळमळूं लागली. तरी जेव्हां लग्न लावण्याच्या आधीं उपध्याय कबुलायतीबद्दल विचारील, तेव्हां "मी या मोहनरायाबरोबर लग्न करून घेण्यास खुषी नाहीं," असें साफ सांगावें; असा तिनें आपल्या मनांत निश्चय केला. तरी इतक्यांत तिचा प्रियकर वामनराव तिला नेत्रांसमोर प्रत्यक्ष दिसूं लागला आणि बेइमान झाल्याबद्दल तो धि:कारीत आहे, असेंही तिला भासलें.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं अन्नपूर्णा जों जागी होते, तों तिच्या खोलीच्या दारावर कोणी थाप दिली, ती ऐकतांच ती बिचारी कांपत उभी राहिली आणि मोहनराय लग्नाच्या तयारीनें आला! असें मानून दु:खांत निमग्न झाली. तरी तिनें कांपत कांपत जाऊन दार उघडलें, तों चिमाबाईची कुळंबीण नानीबाई तिच्या दृष्टीस पडली.

"कां? उजाडण्याचे आधीं तुह्मी माझ्याकडे कां आलां?" असें अन्नपूर्णेनें चिडून तिला विचारलें.

"बाईसाहेब, लौकर पोषाख करून तुह्मांला खालीं बोलावताहेत. चला आणि काय धामधुमीची गडबड उडाली आहे ती पहा तरी!"

"अरे देवा! तरकाय इतक्यांत मोहनराय तयारी करून आला ह्मणतेस?" अन्नपूर्णा भयभीत मुद्रेनें विचारूं लागली.

"नाहीं बाईसाहेब, मोहनराय कांहीं खालीं नाहीं, याबद्दल माझी खात्री आहे. मोरोबा मोठ्या रागानें बाहेरून इतक्यांत घरीं आले आणि सगळ्या माणसांना उठवून सामानसुमान बांधाबांधीची तयारी चालविली आहे. त्यांच्याबरोबर दहापांच गाडीवालेही आहेत. मला असें वाटतें कीं, आपण सगळीं माणसें घटका दोन घटकेच्या आंत हें शहर सोडून दुसऱ्या ठिकाणीं जाणार आहों."

"बरें, पण आपल्याबरोबर मोहनराय येणार आहेत कीं काय? आतां आजच्या आज आपण कोणत्या ठिकाणीं जाणार आहों?"

याप्रमाणें गोंधळलेल्या अन्नपूर्णेनें विचारलें. पण त्या दासीच्या सांगण्यांत तिला विश्वास ठेवण्यासारखें कांहींच कळलें नाहीं. तरी त्या दासीनें मोरोबाच्या एका चाकराचें बोलणें ऐकलें होतें आणि पहाडी किल्ल्यांत जाऊन राहण्याचा बेत तिच्या ध्यानांत आला होता, तोही तिनें अन्नपूर्णेस कळविला. पण तो ऐकतांच "आतां मात्र सगळें झालें! माझें दैव फुटणार!" असें अन्नपूर्णेला वाटलें. इतक्यांत दुसरें बोलावणें आलें. तेव्हां निरुपायास्तव ती आपलें सगळें सामानसुमान घेऊन खालीं उतरली. तो तिची आते तिला भेटली आणि "आतां कोणीकडे जायाचें?" असें तिनें तिला विचारलें. पण खरोखर विचार काय होता तो तिलाही ठाऊक नव्हताच. एकाएकीं चालू झालेल्या तयारीकडे बघून तीही विचारांतच पडलेली होती.

परंतु जेव्हां तीं सगळीं मनुष्यें शहरांतून बाहेर पडलीं आणि मोहनराव व केरोबा हे दोघे त्यांत नाहींत, असें जेव्हां अन्नपूर्णेनें पाहिलें; तेव्हां तिच्या पोटांत जी धडकी भरली होती ती कमी झाली. तरी जेव्हां त्या ओसाड, जंगली व पहाडी किल्ल्याविषयींचे विचार तिच्या मनांत घोळूं लागले, तेव्हां तिला दुसरेंच एक भय उत्पन्न झालें. तें असें कीं, "मोरोबानें त्या ओसाड किल्ल्यांत नेऊन एकाद्या भलत्याच पुरुषाबरोबर जबरदस्तीनें जर आपलें लग्न लावलें, तर काय करावें?" त्या किल्ल्याविषयींच्या पुष्कळ भयंकर गोष्टी तिच्या कानावर आल्या होत्या, आणि ज्या मार्गानें त्यांच्या गाड्या चालल्या होत्या त्याच्या भयंकरपणानेंही अन्नपूर्णेच्या धास्तींत अधिक भर घातली. तीं सर्व मनुष्यें कित्येक दिवसपर्यंत मोठमोठालीं अरण्यें, पर्वताचे कडे, दरेखोरे इत्यादि ओलांडून जातां जातां एके दिवशीं तो अवाढव्य किल्ला त्यांच्या दृष्टीस पडला, तेव्हां "हा आमचा यशस्वी किल्ला!" असें मोरोबा मोठ्या आनंदानें बोलला.

ते मोरोबाचे शब्द ऐकून व किल्याचा भयंकरपणा पाहून अन्नपूर्णेच्या अंगांत कांपरें भरलें. त्या किल्ल्याचा प्रत्येक बुरुज

दृष्टीस पडतांच तिच्या मनांत नवी धास्ती उत्पन्न होत असे. ज्या डोंगरावर तो बांधलेला होता, त्याचीं उंच शिखरें आकाशापर्यंत पोंचून मेघमालेंत मिसळलीं आहेत, असें तिला वाटलें; आणि सर्व प्रकारें त्यांचा भयंकरपणाच तिच्या मनांत मूर्तिमंत उभा राहिला.

शेवटीं तीं सर्व मनुष्यें डोंगर चढतां चढतां किल्ल्याच्या थोरल्या दरवाजाजवळ जाऊन उभीं राहिलीं. दार उघडण्याला किंचित् अवकाश लागला व तितक्याच अवकाशांत अन्नपूर्णेनें त्याच्या बाह्यस्वरूपावर लक्ष्य पुरविलें. शेंकडों वर्षें वाऱ्याच्या व पावसाच्या तुफानांत उभ्या राहून त्यांच्याबरोबर टक्कर मारणाऱ्या त्या किल्ल्याच्या काळ्या आणि भयंकर भिंतींतून जंगली व क्रूर जनावरांनीं आपापलीं घरें केलीं होतीं. किल्ल्याच्या बुरुजावरून कित्येक तोफा व्यवस्थेनें मांडल्या होत्या, आणि जिकडे तिकडे भयंकर तयारीचीं चिन्हें जाणवत होतीं.

तांबेरा लागून काटलेला दरवाजा चुंउंउंउं करीत आंतून उघडतांक्षणींच तीं सर्व मनुष्यें आंत शिरलीं. त्या वेळेस "मी जीवंत असून प्रत्यक्ष यमाच्या बंदिखान्यांत चाललें !" असें अन्नपूर्णेच्या मनांत आलें. एक चौक ओलांडून जातांच आंत शिरण्यासाठीं दुसरा एक दरवाजा होता तो दृष्टीस पडला. तो तर पहिल्याहून फारच मोठा आणि अधिक गंजलेला होता. मोरोबा व त्याच्याबरोबरच्या सगळ्या लोकांनीं एकदम जोर लावून तो एकदम उघडला. त्यावेळेस किल्ल्यावरील सगळ्या तोफा एकदम सुटल्याप्रमाणें भयंकर कडकडाट उडाला ! आणि सगळा किल्ला गाजून राहिला.

नंतर तीं सगळीं मनुष्यें आंत शिरून एका मोठ्या चाळींत दाखल झालीं. फार दिवस बंद असल्यामुळें त्या चाळीच्या या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंत तुफानी वारा वहात होता. त्या चाळीच्या उजव्या व डाव्या बाजूला ओळीनेंच हजारों खोल्या असून त्या सगळ्या कुलपें लावून बंद केलेल्या होत्या. त्याचप्रमाणें त्या चाळीच्या दोन्ही टोंकांवरून पाहिलें ह्मणजे शेंकडों लहान लहान

गल्या दिसत असत. ह्या किल्ल्यांत जो किल्लेकरी किंवा रखवालदार होता, त्याला मोरोबा येण्याबद्दलची वर्दी फार उशिरानें मिळा-ल्यामुळें त्याच्या हातून पाहण्या किंवा सांगण्यासारखी कांहींच तयारी झालेली नव्हती.

तो एक वृद्ध मनुष्य असून हातांत एक दिवा घेऊन आपल्या मालकाला मार्ग दाखविण्यासाठीं तेथें हजर झालेला होता. त्याच्या-मागून मोरोबा व त्याच्यामागें चिमाबाई, अन्नपूर्णा इत्यादि त्या किल्ल्याच्या भयंकर देखाव्यानें चपापलेलीं मनुष्यें चालूं लागलीं. तेथें एक उंच घुमट असून त्यांत एक कंदील टांगून ठेवलेला होता व त्याला एक चाकर पेटवीत होता.

ह्या घुमटाचा व त्यांतून वर गेलेल्या जिन्याचा देखावा इतर भागाहून कांहीं निराळ्याच प्रकारचा व अत्यंत रम्य होता. त्या घुमटांतून वर चढून तीं सर्व मनुष्यें एका सुशोभित दिवाणखान्यांत आलीं. हा राहत्या वाड्यांतील मुख्य भाग असावा; असें पाहतांच ध्यानांत येत होतें येथें येऊन बसल्यावर मोरोबानें अधिक उजेड करण्याची तजवीज केली. त्याचप्रमाणें चिमाबाईनें थंडी बद्दल कुरकुर करतांच त्यानें दोन शेगड्याही तयार करवून तेथें आण-विल्या.

नंतर शेकतां शेकतां किल्ल्याचे कोणकोणते भाग नीट करण्या-सारखे आहेत? हें मोरोबानें त्या रखवालदाराला विचारलें आणि मग त्याला जाण्याचा हुकूम केला. सगळीं चाकरमाणसें आपापल्या कामाला लागल्यानंतर चिमाबाईनें मोरोबाजवळ बोलण्याचा उपक्रम केला. परंतु त्याच्या क्रोधपूरित उत्तरांनीं पुढें बोलण्याचें तिला धैर्य होईना. तरी अन्नपूर्णेनें त्याला प्रश्न केला:—"महाराज, आपण सगळीं माणसें या ठिकाणीं येऊन राहण्याचें कारण काय? हें कृपा करून मला सांगाल?"

"अशा गैरसमजुतींच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास कांहीं तूर्त मला फुरसत नाहीं, आणि असे प्रश्न करण्याचें तुला कारणही नाहीं. त्याचप्रमाणें मी आणखी अशी आशा करतों कीं, पुनः अशा

प्रकारचे प्रश्न करून तूं माझ्या चित्ताला त्रास देणार नाहींस. शिवाय तूं आपल्या मनांतील सर्व भ्रांति दूर करून आनंदानें राहशील असेंही मी इच्छितें. आतां तूं आपल्या निजण्याच्या ठिकाणीं जा आणि मीं सांगितलेल्या गोष्टींचा पुरता विचार कर."

असें ऐकतांच अन्नपूर्णा उठली व जाण्यासाठीं आपल्या आतेची आज्ञा मागूं लागली. त्या वेळेस चिमाबाईनें तिला इतक्या नम्रपणानें निरोप दिला कीं, तिची ती स्थिति पाहतांच अन्नपूर्णेला वाईट वाटलें. मोरोबानें अन्नपूर्णेची खोली दाखविण्यासाठीं जाण्याबद्दल नानीबाईला हुकूम केला आणि तिला तिच्याबरोबर पाठवून दिलें.

जेव्हां त्या दोघी दिवाणखान्यांतून बाहेर पडल्या तेव्हां अन्नपूर्णेनें नानीला विचारलें:—"तुला माझी खोली कोणत्या ठिकाणीं आहे हें माहित आहे का?"

"होय. पण बाई, येथें अशा चमत्कारिक वाटा आहेत कीं, इतक्यांत मला दोन तीन वेळ चुकल्याचा भ्रम पडला. तुमची खोली आपण बसलों होतों त्या दिवाणखान्याच्या माडीवरच आहे; चला, मी ती तुह्मांला दाखवितें."

असें बोलून ती दगडी जिन्यानें वर चढूं लागली. तेव्हां अन्नपूर्णाही तिच्या मागें चालली. तों नानी पुन्हा बोलूं लागली:—

"अहो बाई, ही जागा इतकी विशाळ आणि शांत आहे कीं, माझा प्राण गेला तरी मी येथें एकटी राहणार नाहीं. हा एक भूतखाना आहे; असा माझा समज आहे. त्यांत त्या मोठ्या चाळींत तर फारच भुतें भरलीं आहेत. त्या चाळीचे मोठमोठे खांब पाहूनच माझा श्वास कोंडून जात असतो. त्या चाळींत भरदिवसां भुतें नाचत असतात, हें मला ठाऊक आहे."

"नानी, अशा मूर्खपणाच्या गोष्टी तूं माझ्यापाशीं उगीच सांगत जाऊं नको."

"अहो बाई साहेब, तुह्मांला ठाऊक नाहीं. येथें राहणारीं माणसें सांगतात कीं, या किल्ल्यांत भुतांचें मोठें ठाणें आहे. असो.

पण आतां संभाळून या बरें. या ठिकाणीं खालीं उतरायाचें आहे. हा एथून एकमार्ग मागल्या जिन्याकडे चालला आहे. अरे, मला वाटतें कीं, आपण मार्ग चुकलों आहों. अगदीं अनोळखी जागीं आपण येऊन उभ्या राहिलों आहों."

अर्से बोलून ती तेथूनच दुसऱ्या चाकरांस मोठ्यानें हांका मारूं लागली. पण तेथून चाकरमाणसें इतकीं दूर होतीं कीं, त्याना तिचा आवाजही ऐकूं गेला नाहीं. शेवटीं अन्नपूर्णेनें तिला तिच्या चुकीबद्दल दोष दिला आणि जवळ असलेली एक खोली उघडून त्या दोघी त्या खोलींत शिरल्या. तरी तेथें जातांच नानी ह्मणाली:— "बाई साहेब, आपण जर या ठिकाणीं फारवेळ उभ्या राहिलों, तर अधिक संकटांत पडूं." अन्नपूर्णा ह्मणाली:—"तूं दिवा नीटकर; मला पाहूं दे, कदाचित् येथून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यास मार्ग सांपडेल."

अन्नपूर्णा तिच्या हातांतील दिवा घेऊन पाहूं लागली आणि नानी लटलट कांपत तिच्या मागून निघाली. त्या खोलींतून निघून त्या दोघी पुनः एका मोठ्या चाळींत जेल्या. त्या चाळींत डाव्या व उजव्या हाताकडे असंख्यात खोल्या लागलेल्या होत्या, व त्यांतून सगळें लढाईचें सामान भरलेलें होतें. नानी ह्मणाली:— "बाई, या चाळीची हवा फारच वाईट आहे. वर्षानवर्ष ओसाड पडलेलीं हीं ठिकाणें आहेत. माझें ऐकत असाल, तर आपण दोघी-ही आतां परत दिवाणखान्यांत जाऊं."

असें बोलतां बोलतां त्या दोघी एका रंगमहाला सारख्या ठि-काणांत आल्या. तेथील भिंती रंगवून त्यांवर सुबक चित्रें काढ-लेलीं होतीं. अन्नपूर्णा हातांतील दिवा वर करून प्रत्येक चित्र तपासूं लागली. पाहतां पाहतां ती एका मोठ्या तसबिरीजवळ येऊन उभी राहिली. त्या तसबिरीवर काळा रेशमी अभ्रा झांकलेला होता. तो आश्चर्यजनक देखावा पाहतांच ती थांबली, पण तो अभ्रा उचलून तसबीर पाहण्याचें कांहीं धैर्य तिला होईना.

"अरे देवा! काय हें?" नानी घाबरल्यासारखें करून ह्मणाली:—

"आह्मी ग्वाल्हेरींत असतां ज्या तसबिरीविषयीं गोष्टी ऐकत होतों, तीच ही तसबीर आहे!"

"कोणती तसबीर?" अन्नपूर्णेनें विचारलें.

"तें चित्र—तें चित्र कीं जें—पण बाई, मला त्या गोष्टीची आतां अगदीं आठवण राहिली नाहीं."

"बरें नानी, हा अभ्रा उचल. आपण पाहूं काय आहे तें?"

"काय? अभ्रा उचलूं? माझा प्राण गेला तरी मी याला शिवणार नाहीं." हें बोलतांना नानीनें फारच भीति दाखविली.

"तुला जर इतकें भय वाटलें आहे, तर तूं ह्या चित्राविषयीं काय ऐकलें आहेस तें सांग?" अन्नपूर्णा विचारूं लागली.

"बाई, कांहीं नाहीं. मीं कांहीं ऐकलें नाहीं. आपण आधीं बाहेर जाऊं चला."

"पण मला हें चित्र पहायाचें आहे. हा दिवा तूं आपल्या हातांत धर, ह्मणजे मी हा बुरखा वर करून पाहीन." असें ऐकतांचा नानीनें तिच्या हातांतील दिवा घेतला, पण तो हातीं येताच ती त्या छोट्या रंगमहालाच्या बाहेर निघून गेली.

तेव्हां तें चित्र न पाहतां अन्नपूर्णेलाही बाहेर यावें लागलें, तरी नानीजवळ जाऊन तिनें तिला पुनः विचारलें:—"बाई, तूं त्या चित्राबद्दल कसल्या गोष्टी ऐकल्या आहेस?"

"बाईसाहेब, त्याबद्दल मला कांहीं अधिक ठाऊक नाहीं. तरी एवढें खरें कीं, त्या चित्राचा व एका भयंकर गोष्टीचा संबंध आहे. ती गोष्ट घडल्या दिवसापासून तें चित्र असें झांकून ठेवलें आहे. आजपर्यंत हें पाहण्याची कोणालाही हिम्मत झाली नाहीं. मोगलांच्या आधीं या किल्ल्याचा जो धनी होता, त्याच्याबरोबर या चित्राचा विशेष संबंध आहे."

अन्नपूर्णेला ही गोष्ट सविस्तर ऐकावी असें वाटलें; ह्मणून ती नानीला उलट सुलट प्रश्न करून बोलवूं लागली.

"तुझ्या बोलण्यावरून उघड दिसतें कीं, तुला ह्याबद्दल विशेष कांहीं ठाऊक असावें."

" नाहीं बाई. कांहींच ठाऊक नाहीं. ज्यांनीं यांविषयीं मला कांहीं थोडें सांगितलें आहे, त्यांनीं त्या गोष्टी मी कोणाजवळही बोलूं नयेत ह्मणून मजपासून शपथ घेतली आहे. "

" असें आहे तर मीही तुला कांहीं विचारीत नाहीं. "

" दुसऱ्या एकाद्या वेळेस गोष्टी काढून काय भ्रम आहे तो समजून घ्यावा. " असें अन्नपूर्णेनें मनांत आणलें व त्या दोघी तेथून निघाल्या व पहिल्या जिन्याजवळ आल्या. ती तसबीर पाहण्याविषयीं अन्नपूर्णेला उतावळी झाली. तरी तें काम उजाडल्यावर करावें, असा तिनें आपल्या मनांत निश्चय केला. पहिल्या जागीं येतांच नानीला अन्नपूर्णेच्या खोलीचा मार्ग सहज सापडला. तरी तिनें किल्ल्याच्या रखवालदाराच्या बायकोला बरोबर घेतलें आणि दोघींनीं जाऊन अन्नपूर्णेला तिची निजायाची खोली दाखविली. ज्या जिन्यावरून उतरून अन्नपूर्णा पहिल्यानें चित्रदर्शनमहालांत गेली होती, त्या जिन्याच्या शेवटालाच अन्नपूर्णेची खोली होती. त्यामुळें त्या किल्ल्याच्या अगदीं एकांत भागात राहण्याची अन्नपूर्णेला धास्ती वाटूं लागली. तिनें नानीला आपल्या सोबतीसाठीं ठेवावें असें मनांत आणलें, आणि दुसऱ्या बाईला " शेकण्यासाठीं शेगडी व कोळसे घेऊन ये. " असें सांगितलें. त्याप्रमाणें ती रात्रभर पुरतील इतके कोळसे घालून शेगडी तयार करून त्या ठिकाणीं घेऊन आली. तिनें नानीला सांगितलें:-" चिमाबाई तुला हांक मारताहेत. " असें ऐकतांच ती अन्नपूर्णेला एकटी सोडून आपल्या धनिणीकडे निघून गेली.

नंतर अन्नपूर्णा आपली खोली कशी आहे ? याचा तपास करूं लागली. इतर खोल्यांप्रमाणेंच ती खोलीही मोठी प्रशस्त होती. आणि आंतील सामानही मोठ्या किमतीचें होतें. ती जी पहात पहात निघाली, ती एका किंचित् उघड्या अशा दरवाजाजवळ आली. पण ज्या दारानें ती ह्या खोलींत आली होती, तें दार हें नव्हे, हें दुसरेंच होतें. ती तें दार उघडून पुढें झाली, तों दोन

उंच भिंतींच्या मधून एक जिना वर गेलेला तिला दिसला. ह्या जिन्यानें कोणीकडे जाण्याचा मार्ग असेल ? याचा तपास करण्याची तिला इच्छा झाली. तरी धास्तीमुळें तें काम तिनें प्रातःकालपर्यंत तसेंच शिलक ठेविलें. ती पुढें गेलेल्या दारांतून परत आली आणि तें बंद करून आंतून लावण्यासाठीं कडी पाहूं लागली, ती कांहीं तिला सांपडेना. त्याला बाहेरूनच दोन अडसर होते. तेव्हां आंतून खुर्च्या ठेवून बंद करून घ्यावें, असें तिनें मनांत आणलें. तरी ही जी एक मोठी खोली, सगळ्यांच्या खोली पासून दूर आणि तिला कच्च्या बंदोबस्ताचीं दोन दोन दारें. अशा संशयाच्या ठिकाणीं एकटें राहण्याचें तिला भय वाटूं लागलें. त्या भिंतींतील जिन्यानें कोणीकडे जाण्याचा मार्ग असावा. असें मनांत आणून ती विचार करीत होती, तों कोणाचीं पावलें वाजल्याचा तिला भास झाला आणि नानी बाई तिचें ताट वाढून घेऊन आली. अन्नपूर्णेनें तिला आपल्या बरोबर जेवायाला बसविलें. जेवण झाल्यावर नानीनें अन्नपूर्णेस विचारलें:—

"हा किल्ला मोरोबाला कसा मिळाला? याविषयीं तुह्मीं कांहीं ऐकलें आहे काय?"

"त्यांत ऐकण्यासारखें काय असणार ?" अन्नपूर्णेनें आश्चर्ययुक्त मुद्रा दाखवून विचारलें.

"बाई, त्यासंबंधानें मीं पुष्कळ गोष्टी ऐकल्या आहेत." नानी खोलीच्या आसपास नजर फिरवून बोलूं लागली:—"आणि त्या खरोखर आश्चर्य मानण्यासारख्याच आहेत. तुह्मीं जर "मी कोणाजवळ बोलणार नाहीं." असें वचन देत असाल; तर त्या सगळ्या मी तुह्मांला सांगतें." असें ऐकतांच अन्नपूर्णेनें कोणाजवळ न बोलण्याबद्दल खात्रीपूर्वक वचन दिलें. तेव्हां नानी पुढें सरकून सांगूं लागली:—

"ताई साहेब, हा किल्ला फार जुना आणि मजबूत आहे. यानें आजपर्यंत पुष्कळ लढाया मारलेल्या आहेत. हा कांहीं मोरोबाचा किंवा त्याच्या वडिलोपार्जित मालकीचा होता, असें नाहीं. तरी

कांहीं कारणामुळें एक बाई लग्न न करितां जर मरण पावेल; तर हा मोरोबाच्या हातीं लागेल; असें होतें."

"कोणती बाई मरण पावली तर?" अन्नपूर्णेनें विचारलें.

"त्या बाईविषयींच आतां मी सांगतें. ती या किल्ल्यांत रहात होती. तिचें कुळ मोठें नामांकित व अब्रूदार होतें. मोरोबा तिची भेट घेण्यासाठीं वारंवार या ठिकाणीं येत असत, आणि तिच्याबरोबर लग्न करण्याचाही त्यांचा हेतु होता. पण ती दुसऱ्याच कोणा एकाच्या प्रीतिपाशांत बद्ध झालेली होती; त्यामुळें मोरोबाला ती नाकारीत असे. ती हातीं लागत नाहीं, असें निश्चयात्मक कळल्यावर मोरोबा अतिशय चिडून राहिले होते आणि ती तर आपल्या प्रियकरासाठीं रात्रंदिवस विरहानें झुरून खिन्न रहात असे. (एकाएकीं दचल्यासारखें करून) अगबाई! ही गडबड आणि खडखडाट कसला ऐकूं येतो? (अन्नपूर्णेस) ताईसाहेब, तुह्मांला कांहीं ऐकूं आलें?"

" अग वाऱ्याच्या सोसाट्यामुळें त्या बारीच्या खिडक्या वाजल्या असतील. तूं आपली गोष्ट पुढें चालीव."

"ती बाई नित्य सायंकालीं खिन्नवदनानें त्या पलीकडच्या झाडींत फिरत असे. ही गोष्ट घडल्याला फार वर्षें झालीं आहेत. त्या वेळेस मोरोबा तारुण्याच्या अगदीं भरांत होते. त्या बाईचें नांव "लक्ष्मीबाई" होतें. ती अति रूपवती, पण हट्टी स्वभावाची होती. ती दाद लागूं देत नाहीं, असें पाहिल्यावर मोरोबा हा किल्ला सोडून चालते झाले आणि फार दिवसपर्यंत इकडे परत. (दचकून व भिऊन) ताईसाहेब! पहा पहा! आपल्या दिव्यांतली वात एकाएकी निस्तेज होत चालली आहे!"

अन्नपूर्णेनें जेमतेम करून पुनः तिची समजूत केली, धीर दिला आणि 'गोष्ट पुढें चालीव' ह्मणून सांगितलें.

"हिंवाळ्याच्या दिवसांत एके दिवशीं सायंकालीं ती बाई फिरण्यासाठीं बाहेर निघाली. वारा ? तेशय गार असून जोरानें वहात होता, आणि त्या पलीकडच [illegible]च झाडांतून पलीकडे निघून

जात होता, झाडांची पिकलेलीं पानें आसपास विखरून पडत होतीं आणि प्राणिमात्र सर्व थंडीनें कांकडून जात होते. तरी ती बाई विरहसंतापांत असल्यामुळें फिरतच होती. तिच्या दासीनें तिनें परत किल्ल्यांत चलावें ह्मणून तिची अनेक प्रकारें समजूत केली; पण ती न ऐकतां ती अरण्यांतून फिरूं लागली. रात्र झाली, तरीही ती परत फिरली नाहीं. नऊ, दहा, अकरा आणि बारा वाजले! बाईचा कांहीं शोध नाहीं! सगळीं माणसें तिला शोधूं लागलीं. परंतु आजपतर्यंत कांहीं कोणालाही तिचा शोध लागला नाहीं."

"अगबाई! खरेंचका असें झालें?"

"खरें हो खरें ताईसाहेब! अगदीं सगळें खरें आहे. आतां लोक असें बोलतात कीं,(नानी पुढें सरून अगदीं हळूच सांगूं लागली) रात्रीं या किल्ल्याच्या आसपास व अरण्यांत ती फिरत असते. या किल्ल्यांत राहणाऱ्या कित्येक लोकांनीं तिला पाहिलें आहे. ती नाहींशी झाल्यानंतर आमचे धनी मोरोबा या किल्ल्याचे मालक झाले आणि त्यांनीं हा फार जलदीनें आपल्या कबज्यांत घेतला. पुढें त्या बाईविषयींच्या गोष्टी लोकांच्या ध्यानांतून नाहींशा झाल्या."

"अगे, जर त्या लक्ष्मीबाईला लोकांनीं फिरतांना पाहिलें आहे, तर तिला कांहींच विचारलें नाहीं, हें कसें?"

"काय! तिला विचारतील! काय विचारतील लोक?"

"कांबरें विचारणार नाहींत?"

"पण कोणाला विचारतील? भुताला? पिशाचाला!"

"अग नानी, जर तिच्याजवळ कोणी कांहीं बोललें नाहीं, तर ती भूत झाली आहे, असें लोकांना कसें कळलें?"

"ताईसाहेब, आपण मला असे उलटे प्रश्न करूं नका. ती कोणत्या वेळेस किल्ल्यांत येत असे आणि कोणत्या वेळीं जात असे; हें कोणाही मनुष्याच्या ध्यानांत येईनासें झालें. क्षणांत या भागांत तर क्षणांत अगदीं पलीकडे! आणि ती जीवंत असती तर—त्या-

मुळेंच तर या किल्ल्यांतील कित्येक ठिकाणें हल्लीं बंद आहेत. त्यांत कोणी जात नाहीं. कारण कीं त्यांत नाना प्रकारचे भयंकर देखावे अजून दिसतात. कोणी कोणी असें सांगतात कीं, या किल्ल्याच्याबाहेर एक जुनें देऊळ आहे, त्या देवळांतून रात्रीं भयंकर ध्वनि ऐकूं येत असतात."

इतकें बोलून नानी पुनः दचकली आणि "ऐका! कांहीं वाजल्यासारखें वाटलें!" असें बोलून भिऊं लागली.

ह्या वेळेस अन्नपूर्णेलाही भय वाटलें आणि "काय वाजतें?" ह्मणून लक्ष्यपूर्वक ऐकूं लागली. पण फारवेळपर्यंत कांहीं ऐकूं आलें नाहीं. तेव्हां नानी पुढें बोलूं लागली:—

"त्या देवळांतून कोणाच्या किंकाळ्या आणि हुंदके—देवा! पुनः कांहीं वाजल्यासारखें वाटतें?" असें बोलून नानी कांपूं लागली.

नंतर दोघी स्वस्थ चित्तानें ऐकूं लागल्या- तों एक दोन पळांत त्या खोलीचें दार उघडलें आणि रखवालदारीण नानीला बोलवण्यासाठीं ह्मणून आंत आली. आतां अन्नपूर्णेनें तिला कसें पाठवावें बरें? तिला तर भय वाटत होतें. तरी उपाय नाहीं ह्मणून "जा बाई" असें बोलून तिनें तिला जाण्याची रजा दिली.

---

## प्रकरण १५ वें.

बिचारी अन्नपूर्णा त्या कच्या बंदोबस्ताच्या अफाट खोलींत अपरात्रीं भुतांच्या गोष्टी ऐकून शेवटीं एकटी पडली. तिला त्या उघड्या दाराचें फार भय वाटत होतें. तरी कोणताही उपाय चालेल, असें तिला वाटत नव्हतें. शेवटीं निद्रा लागल्यावर कांहीं भय नाहीं, असें मनांत आणून ती तयार असलेल्या बिछान्यावर जाऊन नियमपाठाप्रमाणें ईश्वराचे उपकार आठवीत निद्रावश झाली.

सकाळीं उठतांक्षणीं तिनें त्या पलीकडच्या जीन्यांतून कोणीकडे जाण्याचा मार्ग आहे? हें शोधून काढण्याचा विचार केला. तिनें ज्या खुर्च्या दाराला अडकवणें ह्मणून लावून ठेवल्या होत्या;

ह्या आपेंआप जागच्याजागीं जाऊन बसलेल्या तिला दिसल्या. नंतर ती तें दार उघडायाला गेली, तों तेंही बाहेरून बंद झालेलें तिला दिसलें! ह्या चमत्कारिक प्रकाराचें तिला भय वाटलें. तिनें आपल्यासाठीं दुसरी खोली पसंत करण्याचा निश्चय केला आणि ती गोष्ट आपल्या आतेला सांगितली. तरी मोरोबापुढें तिचें कांहीं चालत नव्हतें. ह्मणून अन्नपूर्णेनें स्वतः त्याविषयीं मोरोबाला सांगितलें. पण त्यानें तें खोट्या धास्तीवर टाकून हशांत काढलें आणि पुन्हा असलीं निर्जीव कारणें पुढें आणून तिनें त्याला त्रास देऊं नये, असा मोठ्या मगरूरपणानें हुकूम केला.

मोरोबाच्या क्रूर स्वभावाबद्दल अन्नपूर्णेला फार वाईट वाटलें. तरी मनांतील धास्ती दूर करण्यासाठीं किल्ल्याच्या आसपास फिरून मनाला रमविण्याचा तिनें बेत केला. किल्ल्याचे उंच उंच बुरूज व त्यावरील मनोरे; त्याच्या भयंकर काळ्या भिंती मजबूत बांधणी, आणि त्याच्या आसपास असलेल्या डोंगराच्या टेंकड्या त्याचप्रमाणें किर्र झाडी, भयंकर दरडी इत्यादिक प्रकार पाहून ती आपलें मन रमवीत होती. इतक्यांत खालच्या खडकावर दोन माणसांसह मोरोबा तिच्या दृष्टीस पडला. तो सगळी किल्लेबंदी तपाशीत होता आणि जें जें नीट करण्याजोगें होतें तें नीट करण्याचा हुकूम करीत होता. त्या दोन माणसांत एक किल्ल्याचा रखवालदार व दुसरा काम करणारा गवंडी होता. तो ते हुकूम ऐकत होता.

अन्नपूर्णा त्यांच्यापासून दूर निघून गेली. पण थोड्याच अंतरावर जाते तों गाडीचा खडखडाट तिला ऐकूं आला. तो ऐकतांच मोहनरायाविषयींचे विचार तिच्या मनांत उत्पन्न झाले. ती मागल्या रस्त्यानें पुनः किल्ल्यांत आली. तों दुसऱ्या बाजूनें कित्येक माणसें आंत आलेलीं तिच्या दृष्टीस पडलीं. ती आपल्या खोलींत जाऊन बसली आणि "मोहनराय खचित आला!" असें मनांत आणून भयानें कांपूं लागली. इतक्यांत खालीं कांहीं माणसें गडब-

ड करताहेत, असें तिला वाटलें; आणि काय आहे तें पहावें ह्मणून ती बारींत आली.

खालीं मोरोबा आणि केरोबा हे किल्ल्याच्या भिंतींवर चालत असलेले तिच्या दृष्टीस पडले. ते कांहीं अगत्याच्या बाबतीवर गोष्टी बोलत होते. किल्ल्यांत जे लोक आले होते; त्यांत एक केरोबामात्र तिच्या दृष्टीस पडला.

इतक्यांत नानीदासी धांवत धांवत, सगळी गोष्ट तिला सांगण्यासाठीं तेथें आली आणि तिच्या सांगण्यावरून अन्नपूर्णेला कळलें कीं, मोहनराय कांहीं तेथें आला नव्हता. केरोबा, वासुदेवराव आणि लक्ष्मण नांवाचा मोरोबाचा एक चाकर व त्याच्याबरोबर दुसरीं थोडींशीं मनुष्यें मात्र आलीं होतीं. नानी लक्ष्मणाची गोष्ट जेव्हां तेव्हां मोठ्या प्रेमांत येऊन सांगत असे, आणि त्यावरून ती त्याच्यावर प्रीति करीत होती हेंही उघड आहे. अन्नपूर्णेनें त्याबद्दल तिला जरा हिंणावल्यासारखें करतांच त्या हुशार पोरीनें ती गोष्ट फिरविली आणि मोठ्या शिताफीनें अन्नपूर्णेला विचारूं लागली:—

"अरे पण हो, बाई, मी तुह्मांला विचारायाला विसरलें. रात्रीं तुह्मांला झोंप कशी काय लागली?" "फार चांगली!" "बाई, तुह्मांला कांहींच ऐकूं आलें नाहीं?" "नाहीं." "बरें, कांहीं दिसलेंही नाहीं?" "नाहीं, कां बरें?" "ताई साहेब, ही मोठ्याच आश्चर्याची गोष्ट आहे?" "कां बरें? कसलें आश्चर्य ह्मणतेस? तुला इतके प्रश्न करण्याचें कारण काय? हें तरी सांग?"

"अहो ताई साहेब, ह्या तुमच्या खोलीच्या संबंधानें अशा कांहीं गोष्टी ऐकल्या आहेत कीं—"

"काय काय गोष्टी ऐकल्या आहेसग!"

"तुह्मीं त्या मला विचारूं नयेत आणि मीही त्या कधीं तुह्मांला सांगणार नाहीं. ताई साहेब, तुमची ही खोली सोडा, पण—(तिच्या कानाशीं तोंड नेऊन) या किल्ल्यांत भुतखाना आहे!"

"हो हो! तूं ह्मणतेस तें अगदीं बरोबर आहे." अन्नपूर्णेनें ती गोष्ट थट्टेवर घालविण्याचा बेत केला, आणि तिला सांगितलें—"अगबाई, काल रात्रीं भुतानें येथें येऊन या खोलीचा दरवाजा बंद केला आणि मग तें निघून गेलें."

हे शब्द ऐकतांच नानी धास्तीमुळें फिकी पडली. तेव्हां तिची धास्ती दूर करावी ह्मणून अन्नपूर्णा ह्मणाली, नाने, तें भूत ह्मणजे वारावारा तर नसेल ना? तरी पण तें वाऱ्यानें बंद होण्यासारखें नव्हतें. अडसराला तांबेरा लागलेला होता व ते हालतही नव्हते. तर नानी बाई, कोणी चाकर आला व दरवाजा बंद करून गेला कीं काय? याविषयीं तुला कांहीं ठाऊक आहे"?

"नाहीं. मी खात्रीनें सांगतें कीं, तें माणसाचें काम नव्हे. तुह्मी सांगत असाल तर मी शोध करून येतें." असें बोलून नानी जायाला निघाली ती कांहीं केल्या परत फिरेना.

अन्नपूर्णा एकटी पडतांच तिला काळ्या बुरख्यानें झांकलेल्या त्या चित्राची आठवण झाली. त्या चित्राचा व मोरोबाचा संबंध आहे. त्याचप्रमाणें किल्ल्याची मालकीण गुप्त होणें व तें तसें झांकलें जाणें यांतही कांहीं गुप्त संबंध आहे. इत्यादि प्रकार मनांत आल्यामुळें तिला तें चित्र पाहण्याची उत्कट इच्छा उत्पन्न झाली ह्मणून धैर्य करून ती त्या खोलीकडे गेली.

त्या चित्रदर्शनरंगमहालाचें दार उघडतांक्षणींच अन्नपूर्णेस भय वाटलें. तरी पुन्हा धैर्य धरून ती त्या तसबिरीजवळ जाऊन उभी राहिली. त्या महालाच्या अंधारी जागेंत, तें चित्र एका मोठ्या आरशींत बसवून ठेवलें होतें व त्याजवर काळा रेशमी अभ्रा घातलेला होता. कांहीं वेळ ती त्याच्याकडे पहात उभी राहिली व तो बुरखा उघडावा कीं नाहीं? याबद्दल विचार करूं लागली. तो बुरखा उघडावा, तर किल्ल्यातील रहिवाशांच्या समजुतीप्रमाणें संकटाला आमंत्रण देणें होय; आणि न उघडावा तर मनाची मळमळ कांहीं जात नाहीं. याप्रमाणें अनेक प्रकार तिनें मनांत आणले, तरी शेवटीं "कांहीं असो, मी हें पाहणार" असें बो-

लून तिनें तो अभ्रा उघडला; आणि एका पळांत भयानें मूर्छित होऊन बेशुद्ध पडली.

तिला पुन: शुद्धीवर येण्याला बराच वेळ लागला. जेव्हां ती हुशार झाली, तेव्हां अगदीं शक्ति नाहींशी झाल्यासारखें तिला वाटलें. तरी त्या भयंकर महालांतून ती जशीतशी बाहेर पडली, त्या चित्रदर्शनसंबधानें कोणाजवळही बोलायाचें नाहीं, असा तिनें निश्चय केला.

त्या रात्रीं अन्नपूर्णेनें आपल्या सोबतीसाठीं चिमाबाईला विचारून नानीला ठेवून घेतलें. चिमाबाईनें तरी आनाकानी करूनच तिला तिच्याजवळ ठेवलें. अन्नपूर्णेजवळ येतांच नानीनें दरवाजा बंद झाल्याबद्दल गोष्ट काढली. ती गोष्ट ऐकून किल्ल्यांतील सगळे चाकर भिऊन गेल्याबद्दल तिनें अन्नपूर्णेला सांगितलें. नंतर ती ह्मणाली—

"ताईसाहेब, ज्याप्रमाणें त्या थोरल्या तोफेवर निजण्याचें मी प्राण गेला तरी कबूल करणार नाहीं; त्याप्रमाणेंच या खोलींतही कधीं निजणार नाहीं."

"कां बरें? तोफेजवळ कसलें भय आहे?"

"अहो ताईसाहेब, तुह्मांला अजून ठाऊक नाहीं! त्या तोफेजवळ उभें राहून रोज कोणी पाहरा करीत असतें."

अन्नपूर्णेनें ती गोष्टही थट्टेवर घालविण्याचा उपाय केला. तरी नानी त्या काळ्या बुरख्या खालच्या चित्राबद्दल बोलूं लागली व त्यावरून अन्नपूर्णेला कळलें कीं जेव्हां ती त्या महालावरून गेली, तेव्हां त्याला कुलुप लावलेलें होतें. ती केव्हां गेली होती? याचा जेव्हां अन्नपूर्णेनें तिला विचारून शोध केला, तेव्हां तिला कळलें कीं, ती तें चित्र तपाशीत होती, त्याच वेळेस ती तिकडून गेली व तिनें दाराला कुलुप लागलेलें पाहिलें. यावरून अन्नपूर्णेला समजलें कीं, तें चित्र तपाशीत असतां तिला कोणीं पाहिलें असावें.

त्यांच्या गोष्टी चालल्या आहेत, तों दरवाजा उघडल्याचा खडखडाट झालेला ऐकूं आला व घोड्यांच्या टांचा वाजल्यासारखेंही

वाटलें. तेव्हां कोण आलें? याचा शोध करण्यासाठीं तिनें नानीला पाठविलें. तिनें येऊन मोहनराय आणि त्याच्याबरोबर कित्येक स्वार आल्याचें सांगितलें.

नंतर रात्र फार झाल्यामुळें तिनें निजण्याची तयारी केली, पण नानीनें "मी येथें निजणार नाहीं." असें साफ सांगितलें. तेव्हां निरुपायास्तव तिनें तिला जा ह्मणून सांगितलें. तरी तिला भय वाटूं लागलें. त्या बाहेरून बंद असलेल्या दाराबद्दल तिला धास्ती उत्पन्न झाली. तेव्हां निजण्यासाठीं वस्त्रें न बदलतां ती बाहेर फिरण्याच्या पोषाखानें तशीच निजून राहिली.

ती थोडावेळ निजली नाहीं, तों दाराचा खडखडाट ऐकूं येऊं लागला. ती अंगावरील पांघरुणांतून पाहूं लागली, तों बाहेरून बंद असलेला दरवाजा हळूच उघडला व एक अनोळखी पुरुष आंत आल्यासारखें तिला वाटलें व भयानें ओरडण्याचीही शक्ति नाहींशी झाल्यामुळें ती जागच्याजागीं बेशुद्ध होऊन पडली.

---

## प्रकरण १६ वें.

आंत आलेला पुरुष पहिल्यानें तेथें तयार असलेल्या शेगडी-जवळ गेला आणि मग अन्नपूर्णेच्या बिछान्याजवळ जाऊन अगदीं हालचाल न करितां उभा राहिला. थोडा वेळ राहून तो पुन्हां शेगडीजवळ गेला व तेथें असलेला दिवा हातांत घेऊन त्यानें सगळी खोली पाहिली. नंतर पुन्हा तो अन्नपूर्णेच्या बिछान्याजवळ येऊन त्याच्यावर बसला. पण तो जवळ येऊन बसल्याबरोबर अन्नपूर्णा जरी निजली होती, तरी उठून बाजूला होऊन उभी राहिली; आणि पाहूं लागली, तों तो दुसरा कोणीच नव्हे, पण मोहनराय होता.

तिच्या अंगावर त्या रात्रीं बाहेर फिरण्याचाच पोषाख होता, त्यामुळें ती उठतांच दरवाजाच्या बाहेर पळाली. तों जिन्यावर दुसरा एक मनुष्य उभा असलेला तिनें पाहिला. मोहनराय तिच्या

मागून आला होता; त्यानें ही मागून तिला गांठलें. असें पाहतांच ती भयानें ओरडली.

मोहनरायानें तिला ओढून पुनः खोलींत नेलें आणि तिला सांगितलें:—" प्रिये, कां बरें तूं विनाकारण गडबड करतेस ? तूं हें खरें मान कीं, मी तुला कधींही दुःख देणार नाहीं. मी तुला खऱ्या प्रेमानें चाहतों. मी आपल्या अब्रूला ज्याप्रमाणें प्रिय मानतों, त्याप्रमाणें तुलाही प्रिय मानतों. "

" असें जर आहे, तर लौकर मला सोडून चालते व्हा. "

" ऐक. अन्नपूर्णे, तूं माझी एक गोष्ट ऐक. मी तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही स्त्रीला चहात नाहीं. तूं मला निराश करूं नको. प्रिये, मोरोबाचें भय मला मुळींच नाहीं. त्याची लबाडी मीं सगळी शोधून काढली आहे. त्यानें जरी आतां मला नाहीं ह्मटलें, तरी मी तुला सोडणार नाहीं. "

" मोरोबा नाहीं ह्मणतो ? " अन्नपूर्णेनें आश्चर्य दाखवून विचारलें.

" मोरोबा एक ठग मनुष्य आहे. " मोहनराय आवेशानें बोलूं लागला:—" त्यानें मजपाशीं तुझी विक्री केली होती. त्या चांडालाचें कसब तुला कळत नाहीं, तुझ्या ध्यानांत येत नाहीं. "

" अहो, पण जो मला विकत घेण्याचा यत्न करतो; त्याला तरी मी अब्रूदार कसें ह्मणावें ? " हे दोघे आपसांत भांडूं लागल्याबद्दल तिला थोडासा संतोष झाला, व ती ह्मणाली:—" महाराज, आतां तुह्मी हें ठिकाण सोडून लौकर चालते व्हा. नाहीं तर मी ओरडून सगळा किल्ला गाजवीन आणि मोरोबा आल्यावर तुह्मांला फार दुःख सोसावें लागेल. "

" मोरोबाच्या आश्रयांत तुझें कल्याण होणार नाहीं. त्यानें माझ्याजवळ फारच हरामीपणा केला आहे, त्याबद्दल मीं ह्याचा सूड उगविल्याशिवाय राहणार नाहीं. अन्नपूर्णे त्यानें तुझ्यासाठीं कित्येकांस नादीं लावून त्यांचे पैसे खाऊन टाकले आहेत.शिवाय त्याचें तें काम अजून जारीनें चाललें आहे.मला तुझी दया

येते, ह्मणून सांगतों कीं, सुख पाहण्याची इच्छा असेल तर तूं अगदीं आळस न करितां माझा आश्रय धर."

ह्या शेवटच्या शब्दांनीं अन्नपूर्णेला कांहीं बरें वाटलें व त्यामुळें तिची मुद्रा आनंदित दिसूं लागली. त्या स्थित्यंतराचा लाभ मानून मोहनराय पुन्हा बोलूं लागला:—

"अन्नपूर्णे, मी तुजपाशीं मोरोबाबद्दल गाऱ्हाणें सांगण्यासाठीं आलों असें नाहीं. या वेळेस तुला घेऊन जाण्यासाठीं तयारीनें आलों आहें. 'या चांडाळचौकडींतून तुला मुक्त करावें' एवढीच माझी इच्छा आहे. तूं खात्रीनें असें समज कीं, तो मोरोबा केवळ पैशाचा गुलाम आहे आणि त्याची हौस पुरवायासाठीं तूं एक हत्यार होऊन राहिलेली आहेस. विचार कर. मी तुजवर प्रीति करीत असतां तुला नीचाश्रयास राहूं देणें मला बरें वाटत नाहीं. प्रिये, चल, ऊठ. ह्या भयंकर बंदिखान्यासारख्या किल्ल्यांतून मोकळी हो. मी तुझा चांगला मान राखीन. देहांत जीव आहे तोंपावेतों खरी प्रीति तुझ्यावरच ठेवीन. मी मनापासून फिदा आहे. तर चल. प्रिये, खरोखर आपण उभयतां एकत्र होऊन जगांतील पवित्र प्रीतीचा लाभ घेऊं. या वेळेस मी किल्ल्यांतलि सगळ्या पाहरेकऱ्यांस लांच देऊन फितूर करून ठेवले आहेत. आपल्यासाठीं ह्या वेळेस किल्ल्याचे दरवाजे मोकळे आहेत! तर अगदीं वेळ फुकट न घालवितां चल."

मोहनरायाचें सगळें बोलणें अन्नपूर्णा स्तब्ध राहून ऐकत होती. त्याच्या बोलण्यावरून तिला वाटलें कीं, आतां मोरोबानें दुसऱ्या कोणा जवळून पैका खाऊन माझें लग्न करण्याचा विचार केला असावा. आतां तर तिला मोरोबाविषयीं फारच धास्ती उत्पन्न झाली आणि तोंड अगदीं गोरेंमोरें दिसूं लागलें. त्याच स्थित्यंतराचा लाभदायक अवकाश मानून मोहनराय तिला मथविण्याच्या उद्देशानें आणखी बोलूं लागला:—

"प्रिये, आतां वेळ फुकट घालविणें चांगलें नाहीं. एकेक पळ आपल्या धास्तीला बळ देत आहे."

" महाराज, क्षमा करा. मी आपणांस विनंती करितें कीं, आपण मला क्षमा करा. मी दुर्दैवी आहें आणि यापुढेंही दैव उघडण्याची इच्छा करीत नाहीं. ईश्वर ज्या स्थितींत ठेवील, तीच सुखकर मानणें, असा माझ्या मनाचा धर्म आहे. ह्मणून हात जोडून सांगतें कीं, आपण मला सोडून चालते व्हा. "

"कधीं जाणार नाहीं. मला पाहिजे तर तुझ्या पायांजवळ प्राण सोडायाला सांग! मी तुला अशा दु:खांत ठेवणार नाहीं. तूं सुखी हो, आणि मलाही सुखी कर, नाहींतर "माझ्या वियोगानें मर" असें तूं मला सांग. "

याप्रमाणें बोलतां बोलतां त्याला कांहीं गोष्ट आठवल्याप्रमाणें त्याची मुद्रा दिसूं लागली आणि तो ह्मणाला:–

" अरे होय. मला ठाऊक आहे. पण तसें कसें होईल? नाहीं नाहीं. मी तसें घडूं देणार नाहीं. होय, तेंच. तूं कांपतेस व तुझी मुद्राही फिक्कट झाली. अन्नपूर्णे, तूं–तूं मोरोबावर प्रीति करतेस कां? अगे, हें माझ्या फार दिवसांपासून ध्यानांत आलें, पण याद राख! मी त्याला साधूं देणार नाहीं. याच वेळेस तुला आपल्याबरोबर घेऊन जातों. माझें तुझ्यावर प्रेम आहे. "

असें बोलून त्यानें जोरानें तिचा हात धरला व " सीताराम, सीताराम, इकडे ये. " अशी हांक मारिली. ती ऐकतांच जिन्यावर उभा असलेला मनुष्य आंत आला. त्याला पाहतांच अन्नपूर्णा घाबरून विक्राळपणें ओरडली. तरी ते दोघे तिला उचलून बाहेर निघाले. तों खोलीचें दुसरें दार जोरानें उघडलें आणि कित्येक हत्यारबंद लोकांसह मोरोबा मोठ्या रागानें धांवून आला. अर्थात् चकमक झडण्याची वेळ आली.

" चल ये समोर! " म्यानांतून तलवार खेंचून मोरोबा मोहनरायाच्या अंगावर चालून आला. तेव्हां मागें पुढें न पाहतां त्यानें अन्नपूर्णेला सीतारामाच्या हवालीं केलें आणि आपलें हत्यार खेंचलें. सीतारामानें शीट वाजवितांच मोहनरायाच्या मदतीसाठीं कित्येक हत्यारबंद लोक धांवून आले, पण ते त्याला साह्य होण्याचे आ·

धींच मोहनराय जखमी होऊन जमिनीवर पडला! मोरोबाच्या हातानें त्याला सख्त जखम झाली व तो बेशुद्ध झाला. मोरोबा त्याच्यावर दुसरा हात करणार, तों केरोबानें त्याला धरलें. तेव्हां धिःकारपूर्वक त्याच्याकडे पाहून त्याला लौकर "किल्ल्याच्या-बाहेर घेऊन जा." असा मोरोबानें त्याच्या माणसांना हुकूम केला.

मोरोबाचे साथीदार त्याला दिवाणखान्यांत घेऊन गेले. त्याच्या हातावरही मोहनरायानें मोठाच फटका मारला होता; त्यामुळें त्यांतून रक्तस्राव होत होता. मोहनरायानें त्या किल्ल्यांतून लौकर निघून जाण्याची इच्छा केली. पण त्याच्या जखमा अशा भयंकर होत्या कीं, तो जर थोडी हालचाल करील तर जिवावर प्रसंग येईल. त्यामुळें आसपास जंगलांत कोठें आश्रयायोग्य जागा किंवा झोंपडें तरी सांपडेपर्यंत त्याच्या माणसांनीं त्याला तेथून न हालविण्याचा निश्चय केला. त्याचा चाकर सीताराम जागा शोधण्यासाठीं निघून गेला आणि तितक्या वेळांत त्याची सुश्रुषा करण्याचें काम अन्नपूर्णेवर आलें. एका दुःखी जिवाला सुंदर, तरूण व कोमल स्त्रीच्या नाजूक हातांपेक्षां दुसरें उत्तम मलम कोणतें असत्याचें आहे? नाहींच. मोहनराय थोडक्याच वेळांत आपलें सगळें दुःख विसरला! अजूनही तो "अन्नपूर्णेनें आपल्याबरोबर चलावें," अशा इच्छेनें तिला आर्जवूं लागला. तो मोरोबाच्या ठकपणाबद्दल अजूनही तिला सांगतच होता, आणि आपल्या प्रीतीचे तरंग उघड दर्शवीत होता. पण तितक्या वेळांत अन्नपूर्णेला मोरोबाकडून दोनदां बोलावणें येऊन गेलें. तेव्हां त्या जखमी मोहनरायाला सोडून अन्नपूर्णेला मोरोबाकडे जावें लागलें.

मोरोबा आपल्या दिवाणखान्यांत एका कोंचावर पडला होता, बळवंतराव आणि काशीनाथ हे दोघे त्याच्याजवळ उभे होते. तरी चिमाबाई कांहीं त्या ठिकाणीं नव्हती. मोरोबाच्या मुद्रेवरून त्याच्या हृदयांत क्रोधाग्नि पेटलेला आहे, असें दिसत होतें. त्याला झालेल्या जखमा जरी खोल व भयंकर होत्या तरी त्यांचें दुःख तो दाबून ठेवीत होता, असेंही ओळखतां येत होतें.

अन्नपूर्णा मंदगतीनें त्याच्याजवळ जाऊन उभी राहिली. तेव्हां तिला लागण्यासारखें मोरोबा बोलूं लागला:—"स्त्रीचरित्राचा अपूर्व मासला तूं आज मला दाखविलास! जोंपर्यंत मी त्याला आश्रय देत होतों, तोंपर्यंत तूं त्याला धिःकारीत होतीस; आणि मी त्याचा धिःकार करूं लागलों, तों तूं त्याच्यावर प्रीति करूं लागलीस!"

हें ऐकतांच अन्नपूर्णा बुचकळ्यांत पडली आणि ह्मणाली:—"आपण काय बोलतां हें मला मुळींच कळत नाहीं. मी कधींही त्याला आपल्या खोलींत येण्याची परवानगी दिली नव्हती."

"मी त्याबद्दल तुला कांहीं ह्मणत नाहीं. तुझ्या वर्तणुकीवरून मला असें बोलावें लागलें. नाहीं तर तुला त्याच्याजवळ इतका वेळ थांबून त्याच्या जखमा बांधण्याचें कारण काय? मी तुझ्याकडे तीन वेळां बोलावणें पाठविलें, तेव्हां तुला येण्याची सवड झाली."

अन्नपूर्णा ह्मणाली:—"महाराज, कितीही कठोर मनाचें मनुष्य असलें तरी त्याला दुःखानें तळमळत असलेल्याची दया येईल आणि तो त्याच्या हातून होण्यासारखे असतील तेवढे उपाय करून त्या दुःखी मनुष्याला सुखी करील, असा मनुष्यजातीचा साधारण धर्म आहे. त्यांत मी कोमल हृदयाची अबला; माझ्यानें काय होणार होतें? तरी मला त्याची दया आली, यांत कांहीं अधिक नाहीं."

"बरें, बरें, तुझें चतुरपणाचें भाषण पुरें कर. मी सगळें समजतों. तूं आपल्या एका असत्याला झांकण्यासाठीं दुसरीं अनेक उभीं करशील; तरी आतां मी तें फार दिवस चालूं देईन, असें समजूं नको." असें बोलून तो काशीनाथाकडे वळला आणि "मोहन गेला कीं नाहीं, हें पाहून ये." असें बोलला. जेव्हां त्यानें येऊन "तो तेथून गेला आहे." असें सांगितलें; तेव्हां मोरोबानें अन्नपूर्णेला "आपल्या खोलींत जा" असें सांगितलें. तें ऐकतांच ती मोठ्या आनंदानें तेथून निघाली; ती आधीं चिमाबाईकडे गेली; व "मोरोबाला जखम झाली आहे" असें तिला सांगूं लागली. पण तें तिला माहित असतांही त्याच्याजवळ गेली

नाहीं; त्याचें कारण ती त्याला धिःकारित होती हें होय. तरी तें बिचाऱ्या अन्नपूर्णेला कोठें ठाऊक होतें? ती पहांटेची प्रहर रात्र उरल्यावर नानीला सोबतीसाठीं बरोबर घेऊन निजण्यासाठीं पुनः आपल्या खोलींत गेली आणि सगळी रात्र गडबडींत, श्रमांत व त्रासांत गेलेली असल्यामुळें लौकरच निद्रादेवीला वश झाली.

---

## प्रकरण १७ वें.

आतां मोहनराय एकाएकीं किल्ल्यांत कसा आला? व मोरोबाला तरी ग्वाल्हेरींतून एकदम किल्ल्यांत पळून येण्याचें कारण काय? याविषयीं विचार करूं.

आपण पाहिलेंच आहे कीं, मोरोबा पैशांच्या तंगींत होता. जो त्याला अधिक पैसा देईल, त्याच्याबरोबर अन्नपूर्णेचें लग्न करण्यास तो तयार होता. मोहनरायास अन्नपूर्णा द्यावी, असा त्याचा इरादा! पण जेव्हां त्याला दुसरा अधिक पैका देणारा भेटला; तेव्हां मोहनरायाच्या हातावर तुरी देण्याचा त्यानें बेत केला. त्यानें असें एक खत तयार केलें कीं, ज्यांतील कित्येक कलमें मोहनरायास प्रतिकूल होतीं. त्यावर जर तो सही करील, तर अन्नपूर्णा त्याला वरील. असें जेव्हां झालें, तेव्हां तो सही करीना; व त्या मुळें मोहनरायाचें आणि मोरोबाचें वांकडें पडलें. तरी त्याला फसवावें ह्मणून मोरोबा एकदम किल्ल्यांत येऊन राहिला.

पुढें मोरोबा निघून गेला, असें जेव्हां मोहनरायास कळलें; तेव्हां तोही त्याच्या पाठोपाठ किल्ल्यांत निघुन आला. तेव्हां मोरोबाला वाटलें कीं, तो खतावर सही करायाला आला असेल. ह्मणूनच त्यानें त्याला किल्ल्यांत आश्रय दिला, त्या वेळेस रात्र पडली होती, ह्मणून त्या बाबतीच्या गोष्टी सकाळीं बोलण्याचा विचार झाला.

नंतर मोहनरायानें मोरोबाच्या एका चाकराला लांच देऊन अन्नपूर्णेच्या खोलीपर्यंत रस्ता मोकळा करून घेतला. पण

जीं माणसें त्यानें जिन्याखालीं उभीं करून ठेवलीं होती, त्यांचें बोलणें काशिनाथानें ऐकलें; पण त्याच वेळेस मोरोबाकडे जाऊन न कळवितां तो परिणामाकडे पहात राहिला. तरी शेवटीं जेव्हा अन्नपूर्णेनें किंकाळी ठोकली, तेव्हां त्यानें मोरोबाकडे जाऊन कळविलें आणि ऐन प्रसंगीं येऊन मोरोबानें अन्नपूर्णेचें रक्षण केलें, हें आपण पाहिलेंच आहे.

---

## प्रकरण १८ वें.

दुसऱ्या दिवशीं किल्ल्यांत पुष्कळ पाहुणे आले होते; व त्यांच्याबरोबर खाण्यापिण्याच्या बैठकींत गोष्टी सांगत मोरोबा पुष्कळ रात्र होईपर्यंत आनंदानें बसला होता. त्याच्या बैठकींत बसलेले सगळे लोक दारूच्या कैफांत चूर झालेले होते. आणि प्रत्येक मनुष्य अन्नपूर्णेच्या रूपाचें वर्णन करीत होता, मोरोबा तर मोहनरायाचा पाडाव केल्याच्या आनंदांत निमग्न होता. त्यांतच हा एवढा अवाढव्य किल्ला आपल्या ताब्यांत कसा आला! हें लोकांनीं विचारल्यावरून मोरोबा सांगूं लागला:—

"आज सुमारें वीस वर्षें होत आलीं," रंगीत मद्यानें पेला भरून व वाचेला तेज येण्यासाठीं तो घटकोघटकीं तोंडाला लावून खुब मिजासींत मोरोबा सांगूं लागला:—"आज सुमारें वीस वर्षें होत आलीं; ह्या भव्य किल्ल्याचा मी मालक झालों व हा माझ्या ताब्यांत आला आहे. जी बाई माझ्या आधीं या किल्ल्याची मालकीण होती; ती माझ्या मामाची मुलगी. माझ्याशिवाय तिचे आप्त दुसरें कोणी नव्हतें. ती सौंदर्यवान् व द्रव्यवान् होती आणि तिच्यावर माझें प्रेम होतें. परंतु ती दुसऱ्याच्याच नादीं होती. माझ्या प्रीतीची ती मुळींच दरकार करीत नसे. पण त्याबद्दल ईश्वरानें तिला लौकरच चांगली शिक्षा केली. ज्या पुरुषावर तिचें मन होतें; तो दुसऱ्याच स्त्रीच्या नादीं लागून तिला सोडून चालता झाला. तेव्हां ती त्याच्यासाठीं झुरूं लागली. फार काय सांगावें! त्याच्या विरहसंतापांतच ती शेवटीं मरण पावली. मी

त्या वेळेस कांहीं किल्ल्यांत हजर नवतों. तरी तिच्या मरणाबद्दल ज्या कांहीं चमत्कारिक गोष्टी ऐकल्या आहेत त्या सगळ्या मी आतां तुह्मांला सांगतों."

"मी आतां तुह्मांला सांगतों!" असा एक चमत्कारिक प्रतिध्वनि त्या खोलींत उत्पन्न झाला!

मोरोबा तो ध्वनि ऐकतांच अगदी स्तब्ध झाला व तेथें असलेला प्रत्येक मनुष्य "कोण बोललें?" ह्मणून शोध करूं लागला. पण कोणीच नाहीं. तेव्हां मोरोबा ह्मणालाः—

"मला वाटतें कीं, कोणीतरी लपून बसून आपल्या गोष्टी ऐकत आहे. तरी चिंता नाहीं. ही गोष्ट आपण दुसऱ्यावेळीं सांगूं."

सगळे पाहुणे उठून खोलीच्या आंत बाहेर पाहूं लागले. नंतर वासुदेवराव बोललाः—"आपणांशिवाय येथें दुसरें कोणी नाहीं."

"बरें पण तुह्मीं कांहीं ऐकलें?" मोरोबानें विचारलें, तेव्हां "होय." असें बळवंतरावानें सांगितलें.

"मी समजतों कीं, तो ध्वनि या खोलींतूनच उत्पन्न झाला. आपणांशिवाय येथें दुसरें कोणि नाहीं, हें दिसतेंच आहे. तर मोरोबा, तुमची गोष्ट पुढें चालवा." असें सगळे पाहुणे ह्मणाले. तेव्हां कांहीं थांबून मोरोबा सांगूं लागला.

"ह्या किल्ल्याची पहिली मालकीण लक्ष्मीबाई जेव्हां मरण पावली, तेव्हां तिचें मस्तक भ्रमलें होतें. तिचा स्वभाव घटकोघटकीं पालटत असे व अगदीं वेड्यासारखी कृती करीत असे. एकादेवेळीं खिन्नतेमुळें तिनें स्वस्थ पडूनच रहावें, आणि एकाद्या वेळीं किल्ल्यासभोंवतालच्या अरण्यांत बडबडत फिरत असे. एके वेळीं थंडीच्या दिवसांत तिचें मस्तक अधिकच फिरलें आणि ती अतिशय बडबडूं लागली; ती कांहीं केल्या कोणाचेंही ऐकेना. तरी सायंकाळच्या वेळीं थोडी शांत झाली आणि आपल्या खोलींत निघून गेली. त्या वेळेस आंत कोणी येऊं नये ह्मणून तिनें आपल्या दासींना हुकूम केला. ज्या खोलींत कालरात्रीं आमची मारामारी झाली. तीच ती खोली होय. त्या खोलींत गेल्यावर ती कोठें गुप्त झाली!"

"गुप्त झाली?" असा पुनः गुप्त ध्वनि उत्पन्न झाला.

मोरोबाची जीभ तर या वेळेस लडबडूं लागली, बळवंतरावानें पाहिलें कीं, कोण बोलतें? याचा शोध करण्याची जर ह्या वेळेस गडबड केली ;तर रंगावर आलेली गोष्ट तशीच राहील. तेव्हां सगळ्यांच्या मनावरील धास्ती दूर करण्यासाठीं तो ह्मणालाः–

" काय! ती कोठें गुप्त झाली! खोलींत कांहींच मिळालें नाहीं?"

" तिचें शरीरही कोठें मिळालें नाहीं!" असें सगळ्या पाव्हण्यांनीं एका आवाजानें विचारलें. तेव्हां "नाहीं." या एका शब्दांतच मोरोबानें त्यांना उत्तर दिलें.

" तर तिनें अपघात करून घेतला!" असें ह्मणण्याचें कारण काय?" असा बळवंतरावानें पुनः प्रश्न केला.

" खरेंच. लोकांत असें पसरण्याला कांहीं तरी कारण पाहिजे." वासुदेवरावानें बळवंतरावाचाच प्रश्न उचलला आणि बोलणें पुढें चालविलेः–" तिचें शरीरही खोलींतून नाहींसें होणें ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे! तिनें आपल्या हातानें आपला खून करून घेतला असें जरी मानलें; तरी आपल्याच हातानें जागच्याजागीं गाडून तर घेतलें नाहीं!" असें ऐकतांच मोरोबाला राग आला व त्यानें वासुदेवरावाकडे पाहिलें; तेव्हां अशा कठोर भाषणाबद्दल त्यानें त्याजपाशीं क्षमा मागितली. नंतर मोरोबा शांत झाला व पुढें बोलूं लागला. तेव्हां तें कारण विचारण्याचें सगळ्यांनींच तहकूब ठेवलें आणि सगळे त्याचेंच भाषण ऐकूं लागले.

" आतां या गोष्टीपेक्षां दुसरीच एक चमत्कारिक गोष्ट मी तुह्मांला सांगतों. ती लक्ष्यपूर्वक ऐका."

" लक्ष्यपूर्वक ऐका!" असा पुनः प्रतिशब्द उत्पन्न झाला आणि त्या वेळेस मात्र प्रत्येक असामीच्या अंगावर कांटा उभा राहिला. जरी ते सगळे शूर सरदार ह्मणून वाखाणलेले होते, तरी त्या ध्वनीनें त्या सगळ्यांची लटपट उडवून दिली. सगळ्यांचे चेहरे फिक्के पडले. मोरोबा तर एक उडी मारून जाग्यावरून उ-

ठला व उभा राहिला. त्याच्या चेहऱ्याचा रंग बदलून गेला व एकाद्यानें वाचा बांधल्याप्रमाणें तो स्तब्ध उभा राहिला. सगळे एकमेकांच्या तोंडाकडे पहात उभे राहिले. तेव्हां केरोबा धैर्य धरून ह्मणालाः—

"आपली कोणी तरी मस्करी करीत आहे, हेंच खरें. नाहीं तर मी स्वतः चोहोंकडे फिरून पाहिलें आहे. या ठिकाणीं आपण बसलों आहों; यांच्याशिवाय दुसरें कोणी नाहीं."

मोरोबानें आपलीं सगळीं चाकरमाणसें बोलावलीं आणि आजूबाजूच्या सगळ्या खोल्या शोधल्या, पण कांहीं कोणी परकें आढळलें नाहीं. तेव्हां ती खोली सोडून दुसऱ्या खोलींत जाऊन बसणें चांगलें, असें त्याला वाटलें. दुसऱ्या खोलींत जाऊन बसल्यावर सगळ्यांनीं त्याला गोष्ट पुरी करण्याचा आग्रह केला; पण तें कांहीं त्यानें मनावर घेतलें नाहीं. तेव्हां सगळे आपापल्या जागीं जाऊन त्या प्रतिध्वनीबद्दल आश्चर्य करीत निजून राहिले.

---

## प्रकरण १९ वें.

ह्या पहाडी किल्याचा भयंकर देखावा क्षणभर बाजूस टाकून आपण आतां महाराष्ट्र देशांत वामनराव काय करीत आहे ? हें पाहूं या. अन्नपूर्णेचा व त्याचा वियोग झाल्यादिवसापासून तो काय करीत आहे ? या गोष्टीकडे मुळींच लक्ष्य पुरविलें नाहीं. वाचकहो, तुह्मीं कधीं प्रियकरांचा वियोग अनुभविला आहे! तो जर अनुभविला असला, तर वामनरावाच्या दुःखाची कल्पना तुमच्या ध्यानांत येईल. विरहाच्या विषारी जखमा हुबेहुब वठवून दाखविण्यास लेखणी अशक्त आहे. दिलदाराच्या दर्दाचें दुःख दिलदाराशिवाय दुसऱ्याला कळणार नाहीं. आपल्या वामनरावाला विरहाग्नि भाजून रात्रंदिवस तळमळवीत होता. त्या दुःखी मनाला सुखी करणारें हास्यवदन त्याच्या दृष्टीस पडत नव्हतें.

रात्रंदिवस अन्नपूर्णा त्याला दिसत असे व त्यामुळें त्याचें दुःख कमी न होतां उलट त्यांत भर पडत असे. हेळवांकच्या महाला-

सभोंवतीं त्यानें अहोरात्र फिरत असावें आणि अन्नपूर्णेसह ज्या ज्या वृक्षांच्या छायेंत बसून त्यानें आनंदानें गोष्टी सांगितल्या होत्या, त्यांच्या खालीं बसून तो वेळ घालवावा. पाहिजे तशा मंडळींत जरी तो जाऊन बसला, तरी त्याच्या मनाची करमणूक होत नसे. उलट तो विरहानें झुरतो असें पाहून लोकांनीं त्याची मस्करी करावी. त्यानें लोकांचें उणें बोलणें कधीं सहन केलें नव्हतें. त्याला कोणी लागून बोललें, ह्मणजे त्याचा ठसा त्याच्या हृदयावर लौकर उमटत असे. शेवटीं तो लोकांच्या बोलण्याला कंटाळला आणि अन्नपूर्णेला विसरावें असें मनांत आणूं लागला; पण जों जों तो तिला विसरण्याचा प्रयत्न करी; तों तों ती त्याला अधिक आठवे. सारांश; तो वामनराव ह्या प्रीतिसंबंधामुळें दिवसेंदिवस अगदीं वेड्यासारखा बनत चालला.

वामनराव तरुण, देखणा व शहाणा असल्यामुळें प्रत्येक मनुष्य त्याच्या संगतीला झटून पडत असे. बहुतेक तरुण त्याच्या मित्रत्वसंबंधासाठीं प्रयत्न करीत असत. त्याची खिन्नता दूर व्हावी, ह्मणून त्याच्या थोरल्या भावानें त्याला पत्रें वगैरे देऊन मुंबईस पाठविलें. त्या वेळेस त्याच्या आप्तसंबंधाचे व शिवाय त्याच्या कुळाच्या लौकिकावरून त्याला ओळखणारे लोक मुंबईंत पुष्कळ होते. त्यांच्या ओळखीनें तेथेंही पुष्कळ मंडळी त्याच्याशीं मित्रत्वानें वागूं लागली.

आह्मीं ही कथा ज्या काळची ह्मणून लिहीत आहों, तो मराठी बुडून इंग्रजी होण्याचा संधिकाळ होय. शिवाय या कथेंतील बहुतेक पात्रें ब्राह्मणेतर असून त्यांच्या जातींत प्रीतिविवाह होत होते. ह्या गोष्टी वाचकांनीं ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

वामनराव मुंबईंत जाऊन राहिल्यावर त्याला पुष्कळ लोकांकडे नाचरंग, खाणेंपिणें, इत्यादि संबंधानें जावें लागत असे; आणि तशा ठिकाणीं गेल्यावर कित्येक रूपयौवनसंपन्न तरुणी त्याला आपल्या मोहजालांत अडकविण्याचा प्रयत्न करीत असत.

यांतून त्याचा बचाव करणारा एकही खरा मित्र कांहीं त्या वेळेस त्याच्याजवळ नव्हता.

जर अन्नपूर्णा असती, तर तिनें त्याचा बचाव केला असता; पण ती त्याच्यापासून किती दूर देशांत जाऊन पडलेली! ती ज्या वेळेस त्या भयंकर किल्यांत आपला एकेक दिवस युगाप्रमाणें घालवीत होती; त्याच वेळेस वामनराव मुंबईत असून खरेंच पाहिलें तर मजा मारीत होता. तरी त्याला अन्नपूर्णेची आठवण अगदींच होत नव्हती असें नाहीं. तो कधीं कधीं तिच्या स्मरणानें झुरत होता. बाकी बहुतेक वेळ त्याचा हास्य व विनोद यांच्यांतच निघून जाऊं लागला.

---

## प्रकरण २० वें.

बरें, पण ज्या वेळेस वामनराव याप्रमाणें अन्नपूर्णेला विसरत होता; त्या वेळेस अन्नपूर्णा त्याला अधिकाधिक चहात होती. अशा दूर देशांत व त्या भयंकर जाग्यांत त्याचे विचारच तिला कांहीं सुख देत असत. एकादे वेळीं ती त्याचीं सगळीं पत्रें उलगडून वाचीत बसत असे आणि प्रत्येक पत्र वाचल्यावर प्रीतीचा वाढणारा झरा नेत्रद्वारें खालीं करीत असे.

मोरोबाच्या त्या यशवंत किल्यांत नित्य नवे पाहुणे येऊं लागले आणि ते बहुतेक लष्करी पोषाखाचे. वासुदेवराव, बळवंतराव आणि केरोबा हे कधीं कधीं त्यांच्यावर सरदार बनून खालीं जात; पण ते कोणाबरोबर लढाई करण्यासाठीं जात होते, हें कांहीं ध्यानांत येत नव्हतें. किल्लाही हल्लीं दुरुस्त करून त्याजवर लढाईची तयारी करून ठेवली होती; त्याच्यावर नव्या नव्या तोफा मांडल्या व नित्य रात्रीं चौकी पहारा होऊं लागला.

ह्या तयारीबद्दल चिमाबाईनें मोरोबाला वारंवार विचारावें. कारण तिनें असें ऐकलें होतें कीं, मोरोबा आसपासच्या किल्यासभोंवतालच्या गांवांतून लुटालुटीचा उद्योग करीत असतो. चिमाबाईनें जरी विचारलें तरी मोरोबानें तिला कधींही सरळ जबाब

दिला नाहीं. तो तिच्याजवळ नित्य एका खतावर सही करून मागत असे. तें खत असें तयार केलेलें होतें कीं, त्याच्यावर चिमाबाईनें सही करतांच तिची सगळी मिळकत मोरोबाच्या ताब्यांत यावी. पण चिमाबाई कांहीं त्याला बधत नसे. तिनें त्या खतावर सही न करण्याची शपथ वाहिली होती. पण दिवसेंदिवस त्याबद्दल मोरोबा तिला अधिकाधिक छळूं लागला. किल्ल्याच्या पूर्वबाजूस एक भयंकर बंदिशाळा होती. चिमाबाई जर सही न करील, तर तिला त्या बंदिखान्यांत जावें लागेल, असेंही मोरोबानें तिला सांगितलें व धाक घातला. त्या बंदिशाळेबद्दल किल्ल्यांतील लोक पुष्कळ भयंकर गोष्टी सांगत असत. त्यामुळें चिमाबाई-लाही धास्ती उत्पन्न झाली; पण तिनें आपला हट्ट कांहीं सोडला नाहीं. अन्नपूर्णेनेंही तिला पुष्कळ सांगून पाहिलें, पण ती ऐकेना. तिनें आपली सगळी मालमिळकत अन्नपूर्णेच्या नांवावर चढविली होती. तरी स्वसंरक्षणास्तव अन्नपूर्णा ती मिळकत मोरोबाला देण्यास राजी होती. पण चिमाबाई जिवावर वेळ आली तरी आपला विचार न फिरविण्याबद्दलचा निश्चय केला होता.

एके दिवशीं अन्नपूर्णा चिमाबाईजवळ बोलत बसली होती, ती फार रात्र झाल्यावर आपल्या खोलींत निजण्यासाठीं निघाली. तिला त्या भयंकर व मोठ्या चाळींतून जायाचें होतें, ह्मणून कांहीं चमत्कारिक दर्शनाबद्दल धास्ती उत्पन्न झाली. तरी जेव्हां ती त्या चाळींतून जाऊं लागली, तेव्हां सर्वत्र शांतता होती. कसलाही ध्वनि ऐकू येत नव्हता, असें असतांही ती सगळ्या बंद खोल्यांवर दृष्टि टाकीत व मनांत धास्ती करीत चालली होती. पण ती आपल्या खोलींत पोंचण्याचे आधीं जी खोली फार दिवस बंद करून ठेवलेली असे, तींत कोणी कांहीं बोलत आहे, असा तिला भास झाला. ह्मणून ती त्याविषयीं विचार करूं लागली, तों ती खोली उघडून एक पुरुष बाहेर आला. पण अन्नपूर्णेला पाहतांच चमकून तो पुनः खोलींत शिरला आणि दार लावून घेऊन स्वस्थ बसला. तरी तितक्यांत अन्नपूर्णेनें पाहिलें कीं, खोलींत दुसरें एक

मनुष्य खुर्चीवर बसलेलें आहे. अन्नपूर्णेला वाटलें कीं, बाहेर आलेला जो पुरुष तो मोरोबाच असावा.

परंतु अशा अपरात्रीं एका परकी मनुष्याबरोबर मोरोबाला एकांतांत असण्याचें कारण काय? हें कांहीं तिच्या ध्यानांत येईना. ती त्याबद्दल विचार करीत होती, तों दार पुनः उघडलें आणि पहिल्याप्रमाणेंच पुनः झडपेंत बंद झालें. तेव्हां तेथें अधिकवेळ उभें राहणें चांगलें नाहीं, असें अन्नपूर्णेच्या मनांत आलें व ती आपल्या खोलींत निघून गेली. तिच्या व ह्या खोलीच्या मध्यांत एकच खोली होती. तेव्हां आपल्या खोलींतूनच काय होईल तें पहावें, असें तिला वाटलें; आणि त्याप्रमाणें ती गुप्तपणानें पहात उभी राहिली. पण तिला कांहीं फार वेळ पहात उभें रहावें लागलें असें नाहीं. तें दार तिसऱ्यानें उघडून मोरोबा बाहेर आला आणि इकडेतिकडे नजर फेंकून दरवाजा लावून घेऊन चालता झाला. तेव्हां अपरात्र झालेली असल्यामुळें अन्नपूर्णाही आपल्या बिछान्यावर जाऊन निजली.

---

## प्रकरण २१ वें.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं अन्नपूर्णा जेव्हां चिमाबाईकडे गेली तेव्हां त्या दोघींत त्या खताच्या संबंधानें बरेंच बोलणें झालें, तरी त्यावर सही न करण्याचा चिमाबाईनें आपला निश्चय प्रगट केला; आणि त्या किल्यांतून पळून जाण्याची आपली इच्छा आहे असेंही तिनें अन्नपूर्णेला सांगितलें; तरी तसें घडणें मुष्किलीचें आहे, असें दोघींच्याही मनांत आलें. शिवाय तसें जर मोरोबाला कळलें तर कोणता प्रसंग येईल, याचाही कांहीं नेम नाहीं. याप्रमाणें त्यांचा विचार चालला आहे, तों खुद्द मोरोबाच त्या ठिकाणीं आला आणि त्या खतावर सही करण्याबद्दल धमकी देऊन सांगूं लागला. तरी चिमाबाई वस्ताद होती. ती मोरोबाची पर्वाच करीत नसे, असें असतांही त्यानें सही न केलीस तर काय परिणाम होईल? हें सांगितलें; आणि पुन्हां विचार करण्यास वेळ दिला. नंतर

त्यानें तिला सांगितलें—"आज किल्यांत माझी भेट घेण्यासाठीं कित्येक अम्रूदार पाहुणे येणार आहेत. त्यांचें आगतस्वागत करण्यासाठीं अन्नपूर्णेसह तुला चांगला पोषाख करून तयार असलें पाहिजे. आतां तुला पुनः सांगण्याला मला वेळ मिळणार नाहीं." असें बोलून तो तेथून चालता झाला.

त्या दिवशीं सायंकालपर्यंत अन्नपूर्णेला फारच धास्ती पडली होती. तिला वाटूं लागलें कीं, आज कोण अम्रूदार लोक येणार आहेत? आणि कोणाकडून काय सोसावें लागणार आहे! हें कांहीं तिच्या ध्यानांत येईना. सायंकाल होतांच ती अगदीं साधा पोषाख करून चिमाबाईकडे गेली. तों तिच्या खोलींत मोरोबानें अन्नपूर्णेसाठीं एक उत्तम पोषाख पाठवून दिला होता. मोहनरायाबरोबर अन्नपूर्णेचें लग्न ठरल्यावर त्यानें आपल्या प्रियेसाठीं जो पोषाख तयार करून मोरोबाच्या हवालीं केला होता, तो किती उत्तम असेल? हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्या दिवशीं मोरोबानें "तो पोषाख अन्नपूर्णेनें अंगावर घालावा" अशा हेतूनेंच तो पाठविला होता. तो पोषाख अंगावर चढविणें अन्नपूर्णेला भाग पडलें. पण त्यामुळें त्या दिवशीं ती त्या भयंकर किल्यांत एका परीप्रमाणें चमकूं लागली. ज्या दिवाणखान्यांत मेजवानीचा थाट केलेला होता, त्यांत अन्नपूर्णा मुद्दाम सर्वांच्या शेवटीं आली व आपल्या आतेजवळ बसणार होती, पण ती येतांच मोरोबानें तिला दोन तरुणांच्या मध्यभागीं बसायाला जागा दाखविली आणि त्या दोघांनीं उठून तिला आपल्या मध्यभागीं बसविलें.

त्या दिवशीं मेजवानींत आठ गृहस्थ बसलेले असून त्या सगळ्यांचे पोषाख एकसारखेच होते. जेवायाला बसल्यावर ज्या गोष्टी चालू झाल्या, त्या सगळ्या लढाईच्या संबंधाच्याच होत्या व त्यांच्या भाषणावरून ते सगळे राजदरबारी लोक होते, असें ध्यानांत येत असे. असो. जेवतां जेवतां मद्याचे पेले भरून मोरोबानें एकेकाच्या जयजयकार चालू केला. त्यांत आरंभीं त्या दोघां तरुणांस छपरावर चढविण्यासाठीं त्यांच्या कामाची फत्ते व्हावी, असा उच्चार

करून जयजयकार उडविला. सगळ्यांनीं आपापले पेले हातांत घेतले. त्याप्रमाणें मोरोबानेंही आपला उचलला. पण तितक्यांत मोरोबाच्या हातांतील पेल्यांतून भरभर भरभर फेंस वर आला आणि तो कांचेचा पेला एकदम फुटून त्याचे हजारों तुकडे झाले!

तो प्रकार पाहतांच मोरोबा एक उड्डाण मारून उठला. त्याच्या नेत्रांत क्रोधाग्नि भडकलेला स्पष्ट दिसूं लागला व तो अत्यंत क्रोधानें ह्मणालाः—

"येथें कोणी तरी घातकी माझा प्राण घेण्याच्या उद्देशांत आहे; पण तो माझ्या हातांतून आतां सुटून जाईल, असें त्यानें समजूं नये. जर त्याच्यांत हिम्मत असेल तर त्यानें छाती ठोकून पुढें यावें आणि तो जर पुढें न येईल, तर येथें जे निर्दोष असतील, त्यांनीं त्या दुष्टाला पकडण्यासाठीं मला मदत करावी."

इतकें ऐकतांच प्रत्येक पाहुण्यानें अपापल्या तलवारीस हात घातला. चिमाबाई धास्तीनें खोलींतून जाऊं लागली, पण मोरोबानें तिला दबावून तेथेंच राहण्याचा हुकूम केला. त्यानें आपलीं सगळीं चाकरमाणसें बोलावून तें काम कोणीं केलें ह्मणून चौकशी चालविली. पण कोणीच कांहीं कबूल करीना. तेव्हां त्यानें चिमाबाई व अन्नपूर्णा यांस निघून जाण्याचा हुकूम केला.

नंतर अर्ध्या घटकेंत तो चिमाबाईच्या खोलींत आला आणि मोठ्या क्रोधाची मुद्रा दाखवून ह्मणालाः—

"अशा कृत्यांनीं तुझें कांहीं वळणार नाहीं. तूंच अपराधी आहेस, अशाबद्दल मी चांगला पुरावा मिळविला आहे. ज्याला तूं तें करायाला सांगितलेंस, त्यानें माझ्याजवळ सगळें कबूल केलें आहे. आतां तुझ्या जीविताचा आधार केवळ माझ्या दयेवर अवलंबून आहे. यासाठीं आतां जें खरें असेल, तेंच पदरांत घे."

चिमाबाई अगदीं फिक्की पडली व एकही शब्द बोलली नाहीं. पण तें धास्तीमुळेंच कीं काय ? हें कांहीं ध्यानांत आलें नाहीं. तरी ती धीर धरून बोलणार तों मोरोबा तिला थांबवून ह्मणालाः—

"ऐक; तुझ्यापासून समजून घेण्यासारखें आतां कांहीं उरलें नाहीं. तुझा चेहराच तूं अपराधी आहेस ह्मणून साक्ष देत आहे. आतां लौकरच तुला त्या बंदिखान्यांत जाऊन रहावें लागेल."

असें बोलून खोलीला कुलूप घालून तो तेथून निघून गेला. तेव्हां दोघींच्याही पोटांत धास्ती उत्पन्न होणें स्वाभाविक होतें. त्याप्रमाणें त्या आतां काय होईल? अशा विवंचनेंत आहेत तों बाहेरून गलबला व तलवारींचा खणखणाट ऐकूं येऊं लागला. थोडा वेळपर्यंत ती गडबड तशीच चालली आहे, तों बाहेरून कोणी दरवाजा ठोकूं लागलें आणि अन्नपूर्णेनें तशांतही नानीचा आवाज ओळखला.

"बाई, दरवाजा उघडा. मला तुमच्या जवळ कांहीं सांगायाचें आहे." नानी असें बोलून एकसारखी दरवाजा गडबडवूं लागली. तेव्हां चिमाबाईनें सांगितलें:–"अगे दरवाजा बंद आहे!"

"होय, बंद आहे ह्मणूनच मी उघडा असें ह्मणतें." असें नानी बावरत घाबरत ह्मणाली.

"अगे, दाराची किल्ली तुझ्या मालकाजवळ आहे."

"अरे देवा! तर आतां माझें कसें होईल?" नानी आक्रोश करीत ह्मणाली.

"तूं किल्ली आणून दार उघड. लक्ष्मण कोठें आहे?"

"अहो बाई, लक्ष्मण आणि सगळे खालीं मारामारींत गुंतले-ले आहेत."

"मारामारींत गुंतले आहेत? कोण?" चिमाबाईनें अतिश-य घाबरून विचारलें."

"कोणाला अधिक लागलें आहे कीं काय?" अन्नपूर्णेनें मोठ्या आतुरतेनें विचारलें."

"अहो बाई, खालीं मोठें रण माजलें आहे! आपण कसें कां-हीं जाणत नाहीं! कित्येकांच्या लोथी पडल्या आहेत! अरे देवा! अहो बाई साहेब, मला आंत घ्या! ते सगळे इकडेच येत आहेत."

" पळ, पळ, नान्ये! आमच्यानें दार उघडवत नाहीं."

याप्रमाणें अन्नपूर्णा नानीला पळ ह्मणून सांगत आहे, तों ती मोठ्यानें किंकाळी फोडून धांवत निघून गेली आणि चिमाबाई व अन्नपूर्णा ह्या बाहेर चाललेली गडबड ऐकूं लागल्या.

इतक्यांत दरवाजाला लावलेल्या कुलपांत किल्ली वाजूं लागली आणि तिघां विक्राळ मनुष्यांसह मोरोबा त्या खोलींत आला व " तुह्मांला सांगितल्याप्रमाणें काम करा;" असें चिमाबाईकडे बोट दाखवून बोलला. तें ऐकतांच चिमाबाई तर बेशुद्धच झाली. तरी त्या तिघांनीं तिला उचललें. अन्नपूर्णेच्यानें कांहीं तें पाहवे-ना, तेव्हां तीही घाबरून भूमीवर मूर्छित पडली.

जेव्हां ती शुद्धीवर आली, तेव्हां खोलींत एकही मनुष्य तिला दिसलें नाहीं. रात्र फार झाली होती तरी किल्यांत जिकडे तिकडे गडबड व गोंगाट चालला होता. ती त्या खोलींतून निघाली आणि आपल्या खोलींत जाऊन चिमाबाईचें काय झालें असेल? ह्मणून विचार करूं लागली.

नंतर रात्रीं सर्व शांतता झाल्यावर अन्नपूर्णेनें नानीला आपल्या-जवळ बोलाविलें व चिमाबाई कोठें आहे? असें विचारलें. पण तिला कांहींच ठाऊक नव्हतें. शेवटीं तो विशाळ बंदिखाना कोण-त्या ठिकाणीं आहे? याचाच शोध करून सुखी झाली.

अपरात्र झाल्यावर ती अन्नपूर्णा हातांत दिवा घेऊन बाहेर पडली. नानीनें तिला जो मार्ग सांगितला होता, त्याच मार्गानें ती तपाशीत जातां जातां बंदिखान्याच्या दाराजवळ जाऊन पोंच-ली. तो बंदिखाना किल्यांतील सर्व भागांहून उंच ठिकाणावर बांधलेला होता. ती त्याच्या जिन्याजवळ दम खाण्यासाठीं बसली आणि आसपासच्या भयंकर देखाव्याकडे नजर पोंचवून भय मावली. तिच्या हातांत दिवा होताच. त्याच्या प्रकाशानें त्या ठि-काणीं कित्येक रक्ताचे डागही दिसूं लागले आणि त्यामुळें तिला फारच भय वाटलें आणि ती तेथें न थांबतां व मागेंपुढें न पाहतां आपल्या खोलींत येऊन नाना प्रकारचे विचार करीत आंथरुणावर

पडली. पण झोंप येईना. तेव्हां ती खिडकीजवळ जाऊन उभी राहिली. तों गायनाचा ध्वनि व त्याच्याबरोबर अलगुज्याचा स्वर तिनें ऐकला. त्यांत विशेष हा कीं, तें गायन ऐकूं येतां येतां तिच्या अगदीं खिडकीखालून ऐकूं येऊं लागलें आणि तें अन्नपूर्णेच्या देशचें मराठी गायन. तिला तें कोण गातें तें पाहण्याची व तें गायन पूर्ण ऐकण्याची इच्छा होती, परंतु एकही हेतु पूर्ण करून घेण्याचे आधींच तिला बिछान्यावर जाऊन पडावें लागलें व त्या विचारांतच तिला निद्रा लागली.

---

## प्रकरण २२ वें.

परंतु ज्या मनुष्याला अन्नपूर्णेनें त्या दिवशीं अपरात्रीं तिच्या शेजारच्या खोलींत पाहिलें होतें व ज्या खोलींतून मोरोबा रात्रीं दबकत दबकत निघून गेला होता आणि ज्याच्याविषयीं आह्मीं एकोणिसाव्या प्रकरणांत बोलून गेलों आहों; तो मनुष्य कोण होता? अन्नपूर्णेला वाटलें कीं, तें गाणें गाणारा मनुष्य तोच असावा. अशा संशयावरून तिनें नानीजवळ तो मनुष्य कोण असावा? ह्मणून चौकशी करण्याचें योजलें. त्याप्रमाणें तिनें चौकशी करून तो खुनी आनंदराव होता, असा तिनें शोध आणला. ज्याला मोरोबानें आश्रय दिलेला होता. असो. पण त्यावरून अन्नपूर्णेनें ठरविलें कीं, तें गाणें गाणारा कोणी दुसराच असला पाहिजे.

पुन: अन्नपूर्णेनें चिमाबाईबद्दल नानीजवळ चौकशी चालविली. पण तिला कांहीं ठाऊकच नव्हतें. तरीही त्याविषयीं ती कांहीं बोलणार तों तिला कांहीं दुसरेंच आठवलें व ती ह्मणाली:—

"बाई, या किल्यांतील एक पाहरेकरी तुह्माला भेटण्याची इच्छा करीत आहे. तो ह्मणतो कीं, मला त्यांच्याजवळ कांहीं अगत्याचें बोलणें बोलायाचें आहे. तरी तें असें आहे कीं, त्यांतील एक अक्षरही मोरोबाला कळतां कामा नये. ती गुप्त गोष्ट ऐकण्याची जर तुमची इच्छा असेल, तर सायंकाळीं माणसाला माणूस

दिसेनासें झाल्यावर त्यानें त्या तुरुंगाजवळच्या मनोऱ्याखालीं बोलाविलें आहे, तेथें गेल्यावर तो तुह्मांला सगळें सांगेल."

हा पाहरेकरी, ज्याला ती मुळींच ओळखीत नव्हती, तो तिच्याजवळ काय बोलणार आहे? हें समजण्यासाठीं तिला फार घटपट लागली. तिला वाटलें कीं, "आपल्यावर येणाऱ्या एकाद्या संकटाविषयीं तो कांहीं सूचना करणार असेल."

"पण सायंकालीं तर तेथें शिपायांचा पाहरा असतो. तर तो तेथें कसा येईल?" असें अन्नपूर्णेनें नानीला विचारलें. तेव्हां नानी ह्मणाली:—". त्याच्याजवळ किल्याच्या एका गुप्त दरवाज्याची किल्ली आहे. तिच्या मदतीनें तो कोणालाही न कळतां तेथें येईल."

"अगे, पण तो जर नियमित वेळीं आला नाहीं, तर आपणांस मोरोबाचें भय बाळगलें पाहिजे. बरें, पण नानीबाई, आज किल्यांत कोणी परके पाहुणे येणार आहेत कीं काय?"

"नाहीं बाई. आज कोणी येण्याबद्दलची बातमी नाहीं. पण मोहनराय जो किल्याच्या आसपास रानांत राहिलेला होता; तोही ग्वालेरीकडे निघून गेला, अशी बातमी आहे."

असें ऐकतांच अन्नपूर्णेला आनंद झाला आणि तिनें सायंकालीं त्या पाहरेकऱ्याची भेट घेण्याचा निश्चय ठरविला. दिवस केव्हां मावळतो? असें दहा वेळ त्या दिवशीं तिच्या मनांत आलें, आणि संध्याकाळ होतांच नानीला बरोबर घेऊन ती त्या ठरविलेल्या जागीं जाऊन उभी राहिली. पण पाहरेकरी कांहीं त्या ठिकाणीं नव्हता. तरी क्षणभर उभें रहावें, असें अन्नपूर्णेनें मनांत आणलें व ती उभी राहिली. तों मनोऱ्याजवळच्या भिंतीचा एक गुप्त दरवाजा उघडून तो पाहरेकरी तेथें येऊन उभा राहिला. तेव्हां "तुला काय सांगायाचें आहे?" ह्मणून अन्नपूर्णेनें बोलण्याचा उपक्रम केला. तेव्हां तो आधीं नानीला दूर करण्याबद्दल सांगूं लागला. तेव्हां थोड्याशा आनाकानीनेंच तिनें नानीला दूर केलें. नंतर क्षणभर स्तब्ध राहून तो बोलूं लागला:—

"आतां मी तुझ्यापाशीं जें बोलणार आहें, तें जर मोरोबाच्या

कानीं गेलें, तर मला फारच दुःख सोसावें लागेल. या साठीं मी यापैकीं एकही शब्द तोंडाबाहेर काढणार नाहीं, अशी तुला पहिल्यानें शपथ वहावी लागेल. या गुप्त मसलतींत मी आहें, हें जर कोणाला कळलें, तर माझ्या जिवाची जोखीम मला सोसावी लागेल."

असें बोलून तो थांबतांच अन्नपूर्णेनें शपथ वाहून त्याबद्दल त्याची खात्री केली. तेव्हां तो ह्मणालाः—

"चिमाबाईचा समाचार ऐकण्यासाठीं तूं किती उत्सुक आहेस? हें नानीच्या तोंडानें मला कळलें आहे."

"खरेंच. ती आतां कोणत्या ठिकाणीं आहे? हें तूं मला सांगशील? जें खरें असेल, तेंच सांग. कसली चांगली किंवा वाईट गोष्ट असली, तरी मी ती ऐकायाला तयार आहें."

"असें आहे काय? ऐक तर. आमच्या मालकाजवळ चिमाबाई वारंवार भांडत असे. हें तुला ठाऊक असलेंच पाहिजे."

"होय. ठाऊक आहे. पण पुढें?"

"थोडक्या दिवसांमागें मोरोबा त्यांच्यावर फारच रागावले होते. मी सगळें पहात होतों, व समजतही होतों; पण तें कोणी जाणत नव्हतें. थोडक्या दिवसांवर मोरोबांनीं मला आपल्याजवळ बोलावलें. माझ्यावर त्यांचा चांगला विश्वास आहे, ह्मणून त्यांनीं माझी एका गुप्त कृत्याकडे योजना केली. तें कृत्य कोणतें? हें तुला समजाविण्याची कांहीं गरज नाहीं. तरी एवढें खरें कीं, तें काम चिमाबाईच्या संबंधाचेंच होतें."

"हायरे दैवा! अरे, तूं कोणतें काम केलेस?" अन्नपूर्णा मोठ्या दुःखानें बोलली. तरी तो पाहरेकरी स्वस्थ उभाच होता. तें पाहून तर अन्नपूर्णेला चिमाबाईच्या अस्तित्वाबद्दल संशय आला आणि ती अक्रोश करीत ह्मणालीः—

"अरे, कोणत्या चांडालानें तुला तें काम करायाला सांगितलें, एकवेळ सांग बाबा?"

"खरोखर, तो चांडालच होता. मोरोबा घातकी व चांडा-

लच आहे, असें मी कबूल करतों. पण त्याचा हुकूम आह्मांला ऐकलाच पाहिजे, असें होतें. मी नाहीं ह्मटलें असतें, तरी काय? त्यानें तें काम दुसऱ्या कोणाकडून करवून माझें मात्र फुकट अतिशय हाल केले असते."

"तर काय तूं तिला मारून टाकलेंस?" अन्नपूर्णा धास्तीनें कांपत असतां घोगऱ्या स्वरानें ह्मणाली:—"देवा! मी कोणाजवळ बोलतें? एका खून करणाराजवळ!"

पाहरेकरी स्तब्ध उभाच राहिला. असें पाहून अन्नपूर्णा तेथून जाण्याची इच्छा करूं लागली. तेव्हां तो ह्मणाला:—

"थांब. जर तूं माझ्याबद्दल असा दुर्विचार करशील, तर खुशाल कर. मी अडवीत नाहीं. पण—"

"पण काय? तूं जर निर्दोष असशील, तर तसें सांग. मी आतां या ठिकाणीं फार वेळ उभी राहणार नाहीं."

"असें आहे तर मीही तुला अधिक सांगत नाहीं." असें बोलून तो निघाला; पण अन्नपूर्णेला अधिक खुलासेवार ऐकायाचें होतें ह्मणून तिनें त्याला हांक मारली. तेव्हां तो ह्मणाला:—

"मी तुझ्या आतेला अजून वांचविलें आहे. हल्लीं ती एका बंदिवानाप्रमाणें माझ्या कबज्यांत आहे. मी तुला तिच्याकडेच घेऊन जाणार होतों. पण त्याचें आतां कांहीं उरलें नाहीं."

अन्नपूर्णेला हें ऐकतांच थोडासा धीर आला आणि तिनें आपल्या अल्लडपणाबद्दल त्या पाहरेकऱ्याजवळ क्षमा मागितली, व आपल्या आतेला पाहण्याची इच्छा त्याला स्पष्ट दर्शविली. तेव्हां त्यानें दुसऱ्या दिवशीं रात्रीं मोरोबा निजल्यावर त्या जाग्यावर ये ह्मणून तिला सांगितलें व अन्नपूर्णेनें तें कबूल केलें. नंतर ती त्या पाहरेकऱ्याच्या गुणावगुणांविषयीं विचार करीत नानीसह आपल्या खोलींत जाऊन निजली.

दुसऱ्या दिवशीं मध्यान रात्र उलटून गेल्यावर अन्नपूर्णा नानीला बरोबर घेऊन मुकरर केलेल्या जाग्याकडे निघाली. तरी त्या पाहरेकऱ्यानें नानीला बरोबर आणूं नको ह्मणून सांगितलें होतें;

ह्मणून तिनें तिच्या हातांत दिवा देऊन तिला दूर उभें केलें. तें अशा बेतानें कीं, लांबपर्यंत उजेड दिसावा आणि प्रसंगीं हांक मारल्यास तिला मदत मिळावी.

अन्नपूर्णा थोड्याशा अंधारांतून ठरविलेल्या ठिकाणावर जाऊन उभी राहिली. तिच्या आधींच तो पाहरेकरी तेथें येऊन उभा राहिलेला होता. अन्नपूर्णा येतांच त्यानें एक चोरदार उघडलें आणि अन्नपूर्णेला आंत शिरायाला सांगितलें. पण अन्नपूर्णेनें साफ सांगितलें कीं, " तूं जर नानीला बरोबर नको ह्मणतोस, तर अशा भयंकर जाग्यांत मी शिरणार नाहीं. " याप्रमाणें जरी ती बोलली, तरी त्यानें तें नाकबूलच केलें आणि निरुपायास्तव अन्नपूर्णेला त्या दारांत शिरावें लागलें. त्या पाहरेकऱ्यानें आपल्याजवळ असलेला कंदील पेटविला व तो स्वतः आंत आला. थोडेसें चालतांच दुसरा एक दरवाजा दिसला, तोही त्यानें उघडला आणि त्यांतून पुढें जातांच एक पडकी व मोडकी खोली त्यांच्या दृष्टीस पडली. त्या अव्यवस्थित जाग्यांतून पुढें गेल्यावर एका भुयारांत उतरण्याचा जिना दिसला आणि तो पाहतांच अन्नपूर्णेला पुनः धास्ती उत्पन्न झाली. त्यानें तिला त्या भुयारांत उतरायाला सांगितलें; तेव्हां तर ती फारच भय पावली. तितक्यांत कंदील जाण्याच्या बेतांत आला. ह्मणून तो त्याची वात कातरण्यासाठीं उभा राहिला. तितक्या अवकाशांत अन्नपूर्णेनें पाहिलें, तों तेथें जवळच एकादें मनुष्य पुरलें असावें; असें चिन्ह तिच्या दृष्टीस पडलें. तों त्याची वात नीट झाली व तो पुढें चालूं लागला. अन्नपूर्णेनें त्याला " आपण कोणीकडे जाणार आहों? " असें विचारलें. पण तो उत्तर न देतां तोंडानें शीळ वाजवीत तडाक्यानें पुढें चालूं लागला. तेव्हां अंधारांत एकटें पडण्याच्या धास्तीमुळें अन्नपूर्णाही त्याच्यामागून भराभर पाय उचलूं लागली.

याप्रमाणें त्या अंधाऱ्या व कोंडलेल्या हवेच्या भुयारांत कांहीं वेळ चालून तीं दोघेंही बाहेर पडलीं आणि एका चढायाच्या जिन्याजवळ येऊन उभीं राहिलीं. मोकळी हवा लागतांच अन्नपूर्णेला

थोडासा धीर आला. आणि ती त्या पाहरेकऱ्यामागून त्या जिन्यानें वर चढूं लागली. तीन मजलेपर्यंत जिना चढल्यावर तो उभा राहिला आणि आपल्याजवळचे किल्ल्यांचें जुडगें काढून त्यांतील किल्लीनें त्यानें जवळच बंद असलेल्या एका खोलीचें कुलुप काढलें.

"तूं आतां या खोलींत बैस." तो पाहरेकरी कुलुप काढीत असतां ह्मणाला:—"आणि मी वर जाऊन तुझ्या आतेला तुझी वर्दी देऊन तुला घेऊन जाण्यासाठीं परत येतों."

"तिला पहिल्यानें जाऊन कळविण्याचें कांहीं कारण नाहीं." अन्नपूर्णा ह्मणाली:—"मला पाहतांच तिला आनंद होईल."

"आनंद होवो, किंवा कसेंही असो. मला माझ्या रितीप्रमाणें वागलेंच पाहिजे." पाहरेकरी दार उघडून बोलला.

तेव्हां अन्नपूर्णेला त्या खोलींत जाऊन बसणें भाग आलें. ती बसल्यावर तो हातांतील दिव्यासह निघाला. तेव्हां अन्नपूर्णेनें "दिवा तरी ठेवून जा." असें सांगितलें. तें ऐकतांच त्यानें तेथें एक दिवा होता तो लावला. तेव्हां तो दिवा हातांत घेऊन अन्नपूर्णा ती खोली तपासूं लागली, पण तितक्या अवकाशांत त्या पाहरेकऱ्यानें खोलीच्याबाहेर जाऊन दाराला बाहेरून कुलूप लावलें. कुलूप लागलेलें ध्यानांत येतांच अन्नपूर्णेच्या पोटांत पुनः धास्ती उत्पन्न झाली. तों तो पाहरेकरी वर जाण्याचें सोडून खालींच निघून गेला, असेंही त्याच्या पावलांवरून अन्नपूर्णेनें ताडलें. त्याचीं पावलें ऐकूं येत होतीं, तींही बंद झालीं आणि खालीं तो कोणाजवळ कांहीं बोलत आहे, असें तिला वाटलें. तरी मनांत धास्ती उत्पन्न झाली होती ती दूर होईना. बाहेर जायाला मार्ग नाहीं, हें तिला ठाऊकच होतें आणि त्याचमुळें तिच्या मनांत अनेक कुतर्क उभे राहिले. एकदां तिला वाटलें कीं, "ज्याप्रमाणें चिमाबाईला कोणीकडे नेऊन कैद करून ठेवलें आहे, त्याप्रमाणेंच येथें आणून मला कैद तर केलें नसेल? किंवा तिला ठार मारलें असलें तर तिच्याप्रमाणें मलाही मारून टाकण्याचा त्याचा विचार नसेल असें

कशावरून मानावें?" असो. याप्रमाणें ती अनेक गोष्टी मनांत आणून त्याविषयीं "भवति न भवति" असें आपल्या मनाजवळच चालवीत आहे तों "येथून पळून जाण्यासाठीं दुसरा एकादा दरवाजा असेल तर पहावा." असें तिला वाटलें; आणि ती खोलीच्या भिंती तपाशीत चालली. तों एका रुंदीच्या भिंतीवर काळा अभ्रा झांकलेला आहे, असें तिला वाटलें आणि त्याला हात लावून तो उघडावा कीं, उघडूं नये? अशा विचारानेंच ती कांहीं वेळ घोंटाळ्यांत पडली. असाच काळा अभ्रा उघडून एक वेळ ती भय पावली होती. त्यामुळें तसाच दुसरा प्रकार पाहून कांहीं वेळ ती विचार रहित झाली. तरी "या पडद्या मागेंच माझ्या आतेला मारून टाकलें नसेल कशावरून?" असें तिच्या मनाला वाटलें आणि पुन: धैर्य धरून तिनें तो पडदा बाजूला सारला. तों दूर अंधारांत एक पलंग असून त्यावर एक प्रेत पडलें आहे; असा तिला भास झाला. तरी ती धैर्य धरून पुढें गेली; तों जिकडे तिकडे रक्ताचे डाग तिला दिसूं लागले. तिनें पलंगाजवळ जाऊन त्या प्रेताकडे पाहिलें, तों त्याचें तोंड अगदीं छिन्नभिन्न झालेलें असून त्याच्यावर ताजे वार आहेत आणि पलंगावरही रक्ताचा सडा झालेला आहे असें दिसलें. असा हा भयंकर देखावा जरी अन्नपूर्णेनें पाहिला, तरी तें कोण मनुष्य असावें? ह्मणून त्याच्याकडे ती कांहीं वेळ बारीक दृष्टीनें पहात राहिली. तरी कोमल अंत:करणाचीच अबला ती! तिच्यानें फारवेळ तें पाहणें झालें नाहीं. पाहिल्यानें तिच्या अंगाला कंप सुटला आणि एका पळांत हातांतील दिवा खालीं पडला व तीही मूर्छित होऊन त्या पलंगाच्याजवळच निश्चेष्ट होत्साती पडून राहिली.

---

## प्रकरण २३ वें.

अन्नपूर्णा पुन: जेव्हां शुद्धीवर आली, तेव्हां तिनें आपल्या सभोंवतीं कित्येक माणसें उभीं असलेलीं पाहिलीं. त्यांतील कित्येकांनीं पेटविलेल्या मशाली हातांत धरल्या होत्या. थोडक्याच

वेळांत त्यांतील कित्येक लोकांनीं तिला जमिनीवरून उचललें आणि ते जिन्यानें खालीं उतरूं लागले. अगदीं खालीं गेल्यावर त्यांनीं एक चोरदरवाजा उघडला आणि ते सर्व किल्याच्याबाहेर पडले. आपल्या सभोंवतीं काय चाललें आहे, हें अन्नपूर्णा जाणत होती; तरी तिच्यांत त्या वेळीं नुस्तें ओरडण्याचीही शक्ति नव्हती. तिच्याबरोबरच्या माणसांत तिला काढून आणणारा पाहरे करीही होता, हें तिच्या ध्यानांत आलें होतें. किल्यापासून कांहीं अंतरावर कित्येक मनुष्यें घोडे तयार करण्याच्या कामांत गुंतलेलीं होतीं. पण ते घोडे तयार होण्याचे आधींच किल्याच्या दुसऱ्या एका भागांतून कित्येक हत्यारबंद लोक धांवत आले व ते सर्व ह्या घोडे तयार करणारांवर तुटून पडले. त्या आलेल्या मनुष्यांत नानीचा आवाज अन्नपूर्णेनें ओळखला. ते लोक बाहेर येतांच तलवारीची चकमक झडूं लागली. घोडे तयार करीत असणारांपैकीं कित्येक घोडे टाकून आपला जीव घेऊन पळाले व कित्येक जखमी होऊन जागच्या जागींच प्रेतस्थितींत पेंचून पडून राहिले. किल्यांतून चालून आलेल्या लोकांत मोरोबा, केरोबा इत्यादि मुख्य होते, हेंही अन्नपूर्णेच्या ध्यानांत आलेलेंच होतें. शेवटीं मोरोबाचे लोक विजयी झाले आणि ते अन्नपूर्णेला किल्यांत परत घेऊन गेले. मोरोबा असें समजत होता कीं, अन्नपूर्णेनेंच पळून जाण्याची ही अशी खटपट केली असेल. त्यानें तिला आपल्यासमोर बोलावून अनेक प्रकारांनीं विचारलें आणि तिचा तसा मनोदय नव्हता, अशी आपल्या मनाची खात्री करून घेतली.

जेव्हां दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं नानी अन्नपूर्णेकडे आली; तेव्हां तिनें रात्रीच्या सर्व प्रकारांबद्दल तिला उलगडून सविस्तर सांगितलें.

तिनें पाहिलें कीं, ज्यापेक्षां तो पाहरेकरी आपल्याला बरोबर नको ह्मणतो, त्यापेक्षां त्याचा कांहीं तरी दग्याचा मतलब असावा. हें मनांत येतांच ती त्या पाहरेकऱ्याला न कळत त्याच्या पाठीमागून चालूं लागली. त्यानें अन्नपूर्णेला खोलींत कोंडलें तों-

पर्यंत ती त्याच्या मागोमाग होती. पण जेव्हां तिनें पाहिलें कीं, अन्नपूर्णेला त्यानें दग्यानें काढून ठेवलें; तेव्हां तिची खात्री झाली कीं, आतां अन्नपूर्णेला खास दगा पोंचणार. तिनें तो खालीं उतरतो, असें पाहतांच ती झटकन् परत फिरली. खालीं येतांच तिला असेंही समजलें कीं, कित्येक दुसरीं मनुष्येंही तेथें तयार आहेत. तीं माणसें आपसांत बोलत होतीं, त्यावरून तिला पुनः असेंही कळलें कीं, अन्नपूर्णेला कोठें फसवून नेण्याच्या विचारांतच ते सर्व आहेत. हें कळतांच तिनें जाऊन मोरोबाला कळविलें. नंतर आपण पाहिलेंच कीं, अन्नपूर्णेला परत आणण्यांत मोरोबा विजयी होऊन तिच्यासह परत किल्यांत आला.

पुढें तपास करीत असतां मोरोबाला असें कळलें कीं, अन्नपूर्णेला पळवून नेण्यासाठीं ही सगळी तजवीज मोहनरायाकडून झालेली होती. या कृत्याबद्दल त्यानें मोरोबाच्या कित्येक मनुष्यांस लांच दिली होती.

दुसऱ्या रात्रीं अन्नपूर्णा सहज बारीजवळ बसली असतां तिला त्या गायनाची आठवण झाली आणि तें पुनः ऐकायाला यावें, अशी तिला इच्छा उत्पन्न झाली, ह्मणून ती मध्यरात्रीपर्यंत त्या आशेनें तशीच तेथें बसून राहिली. तेव्हां मध्यरात्रीनंतर तें गायन थोडथोडें ऐकूं येऊं लागलें. पण मधून मधून जेव्हां गायन बंद होत असे; तेव्हां कोणी शोकामुळें "हाय हाय!" करीत आहे; असें तिला वाटत असे.

अन्नपूर्णेनें खालीं वांकून पाहण्याचा प्रयत्न केला, पण तिला खालीं कोणीच दिसलें नाहीं; तरी आवाज खालच्याच बाजूनें येत होता. शेवटीं ताऱ्यांच्या मंद प्रकाशांत तिला समोरच्या भिंतीजवळ कांहीं हालल्याचा भास झाला, पण तें काय आहे, हें तिला कळेना. जें कांहीं हालल्यासारखें भासलें होतें; तें जरी चालूं लागलें, तरी त्याचीं पावलें वाजलेलीं ऐकूं येईनात. तेव्हां तो कांहीं पाहराकरणारा मनुष्य नव्हे; असें तिनें ठरविलें. शेवटीं दिसतां दिसतां तो मनुष्याचा आकार तिला स्पष्ट दिसला आणि तो तिच्या त्या बारी-

च्या अगदीं खालीं येऊन उभा राहिला. तरी त्याची पावलें वाजलेलीं ऐकूं येत नव्हतीं. त्यामुळें अन्नपूर्णेला भय वाटलें आणि तिनें त्या वारींतून आंत जाण्याचें मनांत आणलें. परंतु तो आकार जसें कांहीं तिच्या मनांतलें समजलाच असें दाखवून, तिच्याकडे पाठ करून समोरच्या भिंती ओलांडीत चालता झाला. पण तो विलक्षण प्रकार पाहतांच अन्नपूर्णा दंग होऊन राहिली आणि तो आकार ज्या जागीं होता, त्याच जागेवर पहात राहिली. तरी शेवटीं धास्तीनें ती कांपूं लागली; व अगदीं घामाघुम होऊन आपल्या बिछान्यावर जाऊन पाहिलेल्या प्रकाराचा विचार करीत पडली.

## प्रकरण २४ वें.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालींच अन्नपूर्णा जी उठली, ती मोरोबाकडे गेली आणि आपल्या गांवीं निघून जाण्याबद्दल रजा मागूं लागली.

"नाहीं. तुला याच ठिकाणीं रहावें लागेल." मोरोबा मोठ्या रागानें बोलला. तरी त्याचें भय न धरतां अन्नपूर्णा ह्मणाली:—

"आपण मला या ठिकाणीं कोणत्या हक्कानें अडवून ठेवणार आहां? जोंपर्यंत माझी आते जिवंत होती, तोंपर्यंत मी या ठिकाणीं राहिलें. आतां येथें राहण्याचें मला काय कारण आहे?"

"आणि ती मेली, असें तुला कोणीं सांगितलें?"

हें ऐकतांच अन्नपूर्णेला त्या खोलींत पाहिलेल्या देखाव्याचें स्मरण झालें आणि कांपऱ्या आवाजानें ती ह्मणाली:—

"महाराज, त्याविषयीं आपण मला विचारूं नये, आपणाला तें सगळें ठाऊक असलेंच पाहिजे, असा माझा जो समज आहे, तो खरा आहे."

"छे छे! हा तुझा व्यर्थ भ्रम आहे. तुझ्या मनांत आपल्या आतेला भेटायाचें असेल, तर मी परवानगी देतों."

इतकें बोलून मोरोबा तेथून निघून गेला आणि आपली आते जिवंत कशी असेल? ह्मणून अन्नपूर्णा आश्चर्यांत पडली. पण

तितक्यांत मोरोबानें एक मनुष्य तिला बंदिखाना दाखविण्यासाठीं पाठविला आणि त्याच्याबरोबर ती नानीसह, चिमाबाईला भेटण्यासाठीं मोठ्या औत्सुक्यानें निघाली. त्या मनुष्यानें ह्या दोघींस चिमाबाई ज्या खोलींत होती, ती खोली दाखविली आणि ती उघडूनही दिली.

अन्नपूर्णा आणि नानी ह्या दोघीही बरोबरच त्या खोलींत शिरल्या, तों एक मळका बिछाना त्यांच्या दृष्टीस पडला; त्यावर चिमाबाई एकाद्या प्रेताप्रमाणें पडली होती. त्या दोघींची पायचळ लागतांच तिनें आपले थिजलेले डोळे त्यांच्याकडे फिरविले, आणि आपला अगदीं सुकून गेलेला चेहरा जरासा हंसरा केला. अन्नपूर्णेनें तिचा हात घेऊन आपल्या नेत्रांवर ठेविला.

"मुली, तूं इतके दिवस कोठें होतीस?" जरी बोलवत नव्हतें, तरी चिमाबाई मोठ्या कष्टानें बोलली:—"मला तर असें वाटलें होतें कीं, तूं मला अगदींच विसरून राहिलीस!"

अन्नपूर्णेच्यानें उत्तर देववलें नाहीं. तिचा गळा दुःखानें भरून आला होता. त्याचप्रमाणें नानीही उभी असून रडतच होती. तेव्हां शेवटीं चिमाबाईच बोलूं लागली:—"अन्नपूर्णे बाई आतां माझी घटका भरत चालली आहे. जें पळ चाललें, तें माझ्या मरणकालास जवळ करण्यासाठींच चाललें आहे, असें निश्चयानें तूं समज."

आपल्या आतेचें असें भाषण ऐकतांच ती चपापली आणि तिला कांहीं विचारूं लागली.

मोरोबाला विष देण्याचा प्रयत्न कसा झाला होता, हें आपण पाहिलेंच आहे. त्याचा दोष चिमाबाईवर स्थापन करून तो तिला कोणत्या प्रकारें हैराण करीत आहे, हेंही आपण पहातच आहों. चिमाबाईला कैद केल्यावर तिला अन्नपाणी न देण्याबद्दल मोरोबानें आपल्या माणसांना सक्त ताकीद दिली होती. असें करण्यांत त्याचा मतलब इतकाच होता कीं, चिमाबाईनें भुकेला त्रासून आपली सगळी मिळकत त्याच्या हवालीं करावी. पण

चिमाबाई त्याच्याहून हट्टी होती. ती जरी अगदीं मरणाच्या स्थितीला आली होती, तरी तिनें आपला हट्ट सोडला नव्हता.

असो. चिमाबाईनें आपल्या संबंधाच्या ज्या कांहीं गोष्टी होत्या, त्या सगळ्या अन्नपूर्णेला सांगितल्या; आणि आपल्या मरणासन्न आतेच्या बचावासाठीं अन्नपूर्णेला जे उपाय सुचले ते तिनें सांगितले.

मोरोबाजवळ जाऊन अन्नपूर्णेनें आधीं त्याला तिची सगळी स्थिति सांगितली आणि पहिल्यानें तिला अन्नपाणी पोंचविण्याबद्दल त्याच्याकडून परवानगी घेतली. तरी ती त्यानें फारच आडेवेढे घेऊन दिली. पण आतां सगळें पूर्ण झालें होतें. ती चिमाबाई फार दिवस वांचेल असा भरंवसाही उरला नव्हता.

असें जरी होतें, तरी मोरोबा तिच्याजवळ गेला आणि आपल्या रोजच्या निर्दयपणाला अनुसरून त्यानें तिच्यापाशीं त्या खतावर सही करून मागितली, आणि त्या हट्टी चिमाबाईनें पुनः त्याला नाहीं ह्मणून सांगितलें. शेवटीं फार बोलण्याच्या श्रमामुळें चिमाबाई मूर्च्छित झाली व तेव्हांच मोरोबाही तिच्या पुढें उभा राहिलेला होता तो चालता झाला.

नंतर पुष्कळ वेळानें चिमाबाई शुद्धीवर आली आणि तिनें अन्नपूर्णेला आपल्याजवळ बोलावून तिच्याजवळ आपल्या मालमिळकतीची व्यवस्था जी काय होती, ती सांगितली. आपल्या मिळकतीचे कागद कोठें लपविले होते, तेही तिनें तिला सांगितले आणि मग थोडक्याच वेळानें तिनें या मृत्युलोकांत राहाण्याची मुदत पुरी केली.

चिमाबाई मरण पावल्यानंतर कांहीं दिवसांनीं मोरोबानें अन्नपूर्णेला कांहीं कामाच्या निमित्तानें आपल्याजवळ बोलाविलें. हें बोलावणें येतांच अन्नपूर्णेला आनंद झाला. तिला वाटलें कीं, आतां मोरोबा आपल्याला या किल्यांत अधिक दिवस कैद करील, असें वाटत नाहीं. तो आपणास आपल्या देशांत लौकरच पाठवील. असें तिला मात्र वाटलें. पण मोरोबाचें धोरण कांहीं निराळेंच

होतें. तो आतां अन्नपूर्णेपासून एका खतावर सही करून घेण्याची इच्छा करीत होता; कीं ज्याच्यावर सही केली, ह्मणजे चिमाबाईनें अन्नपूर्णेला जें कांहीं दिलें असेल, तें मोरोबाच्या ताब्यांत जावें. त्या खतावर सही करण्याचें अन्नपूर्णेनेंही पाहिल्यानें नाकबूलच केलें. आपल्या प्रिय वामनरावासाठीं ती मिळकत राखून ठेवावी असें तिच्या मनांत होतें. तरी मोरोबानें तिला पुष्कळ प्रकारानें समजावून सांगितलें आणि ती जर सही करील, तर तिची तेथून मुक्तता होईल; असेंही त्यानें तिला वचन दिलें. तेव्हां आपल्या देशांत जाण्याच्या इच्छेनें तिनें त्या खतावर सही करून दिली.

परंतु अन्नपूर्णा जितकी भोळी होती; तितकाच मोरोबा कपटी होता. त्यानें आपलें वचन मोडलें. अन्नपूर्णेनें त्याचीं आर्जवें जरी केलीं, तरी त्यानें मनावर घेतलें नाहीं.

ती निराश होऊन आपल्या खोलींत गेली व रोज बसावयाच्या त्या बारींत बसून पुष्कळवेळ पर्यंत रडली. चंद्र हळू हळू आकाशांगणांत प्रकाशत होता आणि त्याचीं पुसट पुसट किरणें तिच्या समोरच्या भिंतीवर पडलीं होतीं. अन्नपूर्णेनें पुष्कळ वेळ रडून रुमालनें आपले डोळे पुसले आणि तो रुमाल डोळ्यावरून बाजूला काढून जों समोर पाहते, तों मागें दृष्टीस पडलेला आकार तिच्या समोर येऊन उभा राहिला. तरी त्याचा चेहरा कांहीं बरोबर दिसत नव्हता. तो एकाद्या चित्राप्रमाणें कांहीं वेळ स्तब्ध होता. त्याच्याकडे पाहतां पाहतां अन्नपूर्णेच्या मनांत धास्ती उत्पन्न झाली. तरी कांहीं वेळ ती तशीच स्तब्ध उभी राहिली. तों तो आकार हालतो आहे, असें तिला वाटलें आणि तो आपला हात वर करून तिला आपल्याकडे बोलावीत आहे, असाही तिला भास झाला. पण आतां तर तिला फारच भय वाटलें आणि ती आपल्या खोलींत चालती झाली. तों कोणी मनुष्य "हाय!" करून सुस्कारा टाकीत आहे, असें तिला ऐकूं आलें. तरी पुनः बारीजवळ जाण्याचें धैर्य तिला झालें नाहीं. इतक्यांत दुसरा स्पष्ट शोकाचा ध्वनि ऐकू आला तेव्हांः—

"अरे देवा! तें कोण असेल?" असें ती आपल्या मनाशींच बोलली. शेवटीं "तें मनुष्यच असावें." असें मनांत आणून ती पुनः बारीजवळ गेली आणि त्या आकारानें पुनः तिला आपल्याजवळ येण्याची खूण केली, पण तिच्यानें काय जाववतें? तशीच उभी राहिली; तों त्यानें तिसऱ्यानें तिला आपला शोकध्वनि ऐकविला. तो ऐकतांच:-

"खचित, हा कोणी मनुष्यच आहे. तरी प्रत्यंतर पाहण्यासाठीं विचारून पहावें." असें मनांत आणून तिनें मोठ्या धैर्यानें त्याला विचारलें:-"कोण आहे तें उभें?"

तो आकार उत्तर देणार होता, पण तितक्यांत कोणी त्याचें तोंड बांधल्याप्रमाणें स्थिति झाली आणि थोडक्यांच वेळांत तिच्याकडे पाठ करून किल्ल्याच्या मोठमोठाल्या भिंती ओलांडित तो आकार चालता झाला. इतक्यांत किल्ल्याच्या तटबंदीवर कोणी तरी चालत असावें, असें तिला वाटलें आणि तें कोण असावें?, ह्मणून ती विचार करीत आहे, तों एक पाहरेकरी शिपाई तेथें आला व अन्नपूर्णेस पाहतांच ह्मणाला:-"बाईसाहेब कोणा मनुष्याला इतक्यांत इकडून पळून जातांनां तुह्मीं पाहिलें आहे काय?" अन्नपूर्णा "होय" ह्मणाली व तें ऐकतांच तो सिपाई धांवतच त्याच्या मागून निघून गेला.

वरील गोष्ट घडल्यानंतर कित्येक दिवसांनीं अन्नपूर्णेस पुनः आपल्या बारी खालींच तें गायन होत आहे, असें वाटलें. तेव्हां तिच्या मनांत आलें कीं, आपल्या खोलींच्या खालच्या भागांत एकादा कैदी आणून ठेवला असेल आणि तो दक्षिणी असल्यामुळें मराठी गाणें गाऊन आपली करमणूक करून घेत आहे. तर तो कोण असावा? "वामनराव, माझ्या शोधासाठीं येऊन कैदेंत पडला, असें होणें स्वाभाविक आहे. देवा! काय असेल तें तुला ठाऊक!"

या विचारांनीं अन्नपूर्णेस पुनः शोध करण्याची इच्छा झाली. तिनें नानीला आपल्या जवळ बोलावून "माझ्या खोलीच्या खालच्या भागांत कोणी कैदी रहात आहे काय?" असें विचारिलें.

तेव्हां तिनें तिलाच सांगून लक्ष्मणाला आपल्याजवळ बोलाविलें आणि त्याच्याजवळ विचारपूस करितां तिला कळलें कीं, तिच्या खोलीखालीं हल्लीं नवीन आणलेले बंदिवान ठेवले आहेत. एवढेंच कळल्यामुळें अन्नपूर्णेला कांहीं बरें वाटलें. नंतर बोलतां बोलतां अन्नपूर्णेला असें कळलें कीं, "लक्ष्मण मोरोबाच्या चाकरीला फारच कंटाळला असून साधल्यास त्या किल्ल्यांतून पळून जाण्याची वेळ साधीत आहे." त्यानें अन्नपूर्णेला वचन दिलें कीं, "साधल्यास तुझी मुक्तता करण्याचा पहिल्यानें मी प्रयत्न करीन." हें ऐकतांच अन्नपूर्णेला अत्यानंद झाला आणि तिनें त्याचे आभार मानले. नंतर तेथील बंदिवानांत कोणी वामनराव या नांवाचा जर असेल; तर शोध करून येण्यासाठीं अन्नपूर्णेनें त्याला सांगितलें व त्यानें तें कबूल केलें. नंतर अनेक सुखदु:खाच्या गोष्टी बोलत असतां फार वेळ झाला असें जाणून लक्ष्मणानें अन्नपूर्णेचा निरोप घेतला.

---

## प्रकरण २५ वें.

नंतर लक्ष्मण त्या बंदिवानाची भेट घेण्यासाठीं संधि पाहूं लागला. तेव्हां थोडक्याच दिवसांत त्याला तसा वेळ मिळाला. त्या बंदिवानावर पाहरा करणाऱ्यांपैकीं एक शिपाई लक्ष्मणाच्या ओळखीचा होता. त्याच्या मदतीनें तो त्या बंदिवानापर्यंत पोंचला. तेथें गेल्यावर त्याला असें कळलें कीं, एक बंदिवान अन्नपूर्णेच्याच गांवचा असून तो तिला ओळखीतही होता. त्यानें आपलें खरें नांव लक्ष्मणाला सांगितलें नाहीं; तरी अन्नपूर्णेला भेटण्यासाठीं त्यानें आपली इच्छा त्याला कळविली आणि एक पोंहोंची व एक तसबीर त्यानें लक्ष्मणाजवळ देऊन सांगितलें—"ह्या दोन्हीं वस्तु तूं अन्नपूर्णेला नेऊन दे आणि असें सांग कीं, ह्या दोन्ही जिनसा मी आजपर्यंत प्राणांप्रमाणें जतन करून ठेवल्या होत्या, त्या आज माझ्या प्रेमाची खरी खूण ह्मणून तुझ्याकडे पाठविल्या आहेत व अशी आशा करीत आहें कीं, तूं ह्या पाहून मला बक्षीस ह्मणून

परत करशील. अन्नपूर्णेकडे पाठविण्यासाठींच मी ह्या दोन्ही जिनसा आपल्यापासून दूर करीत आहें." याप्रमाणें तो कैदी लक्ष्मणाजवळ सांगत आहे, तों पाहऱ्याचा शिपाई त्या ठिकाणी आल्यामुळें त्याच्याजवळ आणखी बोलण्यास लक्ष्मणास वेळ मिळाला नाहीं. तो त्या दोन्हीं वस्तु घेऊन अन्नपूर्णेकडे आला आणि झालेली गोष्ट अक्षरशः तिला सांगूं लागला. नंतर तें सांगणें संपतांच त्यानें ती पोहोंची व तसबीर अन्नपूर्णेच्यापुढें ठेवली. ती तसबीर व पोंहोंची पाहतांच अन्नपूर्णेनें ओळखली. जी तिच्या शिकारी बंगल्यांतून चोरीस गेली होती; (पहा प्रकरण १ लें.) तीच ती पोंहोंची व तसबीर होय. अन्नपूर्णेला त्या वस्तु पाहतांच आनंद झाला, पण तो किती? हें तिच्याही ध्यानांत न येण्यासारखा अपरंपार होता. "ह्या दोन्ही वस्तु जिवापलीकडे बाळगणारा वामनरावच असावा; असें मनांत ठरवून ती त्याला भेटण्याची तजवीज करूं लागली. तेव्हां लक्ष्मणानें तिला सांगितलें—"बाईसाहेब, आतां धीर धरा. आणखी कांहीं दिवसांनीं मी त्याची व तुमची भेट आपल्या खोली खालच्या थोरल्या चाळींतच करून देईन. तोंपर्यंत आपण स्वस्थ असा ह्मणजे झालें."

एक अठवडा गेल्यानंतर नव्या बंदिवानांवर पाहरा करण्याची पाळी पुन्हा त्या लक्ष्मणाच्या ओळखीच्याच शिपायावर आली, आणि त्या दिवशीं त्यानें त्या बंदिवानास अन्नपूर्णेजवळ ठरविलेल्या चाळींत आणलें व अन्नपूर्णेकडे जाऊन तिलाही त्याबद्दल सुचविलें. तें ऐकतांच हर्षामुळें तिची छाती धडकूं लागली. ती तो वामनरावच आहे, असें मानून आपल्या खोलीतून जी मोठ्या वेगानें निघाली, ती एकदम त्या कैद्याजवळ जाऊन त्याला भेटली. पण खरें पाहतां त्या वेळेस ती शुद्धीवरच नव्हती. त्याला भेटून शुद्धीवर आल्यानंतर तिनें जेव्हां त्याला पाहिलें, तेव्हां हा वामनराव नव्हे, असें तिच्या ध्यानांत आलें. ती त्याच्यापासून दूर मागें सरली आणि रडूं लागली. तो कैदीही फारच आश्चर्य आणि दुःख करीत आहे, असें दिसूं लागलें. तेव्हां—

" अहो, ज्या वामनरावास भेटण्यासाठीं आह्मी उत्सुक होतों, ते तुह्मी नव्हे, असें आतां आमच्या ध्यानांत आलें." असें तानी थोडें आश्चर्य दाखवून त्याच्यावर दोष स्थापन करीत ह्मणाली.— " लक्ष्मणा, तूंही इतका घातकी कसा झालास? आह्मांला फसवितांना तुला मुळींच शंका वाटली नाहीं."

तो बंदिवान, ज्याच्या नेत्रांतून अश्रुपात होत होता, त्यानें बोलण्याची इच्छा केली, पण त्याच्यानें बोलवेना. तेव्हां तो दूर होऊन कपाळावर हात मारून निराश होत्साता उभा राहिला.

" अहो महाराज, तुह्मीं आपलें नांव पहिल्यानेंच मेहरबानीनें आह्मांला सांगितलें असतें, ह्मणजे असें उभयपक्षीं दुःखानुभव घेण्याचें कांहीं कारण राहिलें नसतें." लक्ष्मण कैद्याकडे वळून ह्मणाला.

" हें मी कबूल करतों कीं, त्यांत माझी थोडी चूक झाली खरी. तरी माझें नांव मोरोबाला कळावें, अशी माझी इच्छा नव्हती आणि त्यासाठींच मी आपलें नांव गुप्त राखलें. तरी हे सुंदरी " आतां तो अन्नपूर्णेकडे वळून बोलूं लागला:—" जर तुझी परवानगी असेल, तर याबद्दल सगळा खुलासा करण्यास मी तयार आहें." असें ऐकतांच अन्नपूर्णेनें त्याला बोलण्याची मोकळीक दिली. बाहेरून कोणी येईल, तर कळविण्यासाठीं लक्ष्मणास दारावर बसविलें. नंतर तो कैदी बोलूं लागला.

" अन्नपूर्णे, तूं जरी मला ओळखीत नाहींस, तरी मी तुला फार चांगल्या प्रकारानें ओळखतों. मी एक दक्षिणचाच रहिवासी आहें. माझें नांव दामोदर आहे. हेळवांकांतच माझा जन्म झालेला असल्यामुळें तुला मी लहानपणापासून ओळखतों. आणखी मला आतां असेंही सांगणें भाग आहे कीं, फार दिवस झाले, मी तुझ्यावर मनापासून प्रेम करीत आहें. तुझ्या नादानें शेवटीं मी इतका वेडा झालों होतों कीं, अष्टौप्रहर तुझ्या घरासभोंवतीं मीं हिंडावें. त्या हिंडण्यांतच एके दिवशीं तुझ्या शिकारी बंगल्यांतून मी ती तसबीर व पोंहोंची चोरण्याचेंही धैर्य केलें. जीं मीं थोड्या दिवसांवर तुला

पाहण्यासाठीं पाठविली, तीच ती तसवीर, व पोंहोंची हें मी तुला सांगावें असें नाहीं. तरी त्या अपराधाबद्दल तूं मला क्षमा करशील, या आशेनें हें सर्व खरेंच होतें तें तुला सांगितलें. आतां माझा चोरलेला माल तूं आपल्या हातानें मला बक्षीस करशील, असें मी इच्छितों. कारण परमेश्वरानें त्या अपराधाबद्दल मला चांगली शिक्षा केली ! त्या वस्तूनीं आजपर्यंत रात्रंदिवस मला प्रीतिरूप जो प्रखर अग्नि, त्यांत जाळण्याचें काम चालविलें आहे. तरीही त्याविषयीं आतां अधिक बोलावें, अशी कांहीं माझी इच्छा नाहीं. मात्र एवढें हें सांगणें भागच आहे कीं, जरी तूं मला शुद्ध प्रेमदृष्टीनें पहात नाहींस, तरी तुझें कोणत्या तरी प्रकारानें कल्याण करावें आणि तुला सुखांत पहावें अशी माझी उत्कट इच्छा आहे. कशाही प्रकारानें माझ्या हातून तुझें थोडेंसें काम व्हावें, अशी माझी फारच इच्छा आहे, तें फुकट घालविणार नाहींस. तसें घडलें तर मला मोठा मान मिळाला, असे मी मानीन. तर मला म्हणतें कीं, असा मान मिळविण्याच्या कामांत "मी दुर्दैवी आहे !" असें कांहीं तूं मला वाटूं देणार नाहींस !"

"तुमच्या त्या सद्गुणांनींच माझ्याकडून पूर्णपणें सन्मान मिळविला आहे. माझा एक हितेच्छु देशबांधव अशा संकटांतही मला साह्य करण्यास तयार आहे; हे विचारच तुमच्याकडे सन्मान दृष्टीनें पाहवितात. आतां तुमच्याकडून मला मदत मिळो कीं न मिळो. माझ्या गांवांतील एक सुशील पुरुष ह्या किल्ल्यांत आहे. ह्या विचारानीं तर मला या वेळेस पूर्ण सुखानुभव प्रत्यक्ष दाखविला!"

याप्रमाणें अन्नपूर्णा बोलत आहे, तों त्याच चाळींतील एका खोलीचा दरवाजा एकाएकीं उघडला, आणि हातांत खंजीर घेऊन वासुदेवराव दामोदराच्या अंगावर चालून आला. पण दामोदर जेथें उभा होता तेथून जरा बाजूला झाला, आणि वासुदेवरावाच्या हातांतील खंजीर हिसकावून घेऊन तो त्याच्या अंगावर गेला. अन्नपूर्णा व नानी ह्या दोघीही भयानें तेथून निघून गेल्या, त्या लक्ष्मणाला शोधूं लागल्या. लक्ष्मण जो दारावर उभा

राहिला होता, तो तेथूनच कोणीकडे गेला होता हें त्या दोघींसही ठाऊक नव्हतें. नानीला लक्ष्मणाच्या शोधाला पाठवून अन्नपूर्णा पुनः त्या ठिकाणीं आली, तों दामोदरानें वासुदेवरावास घायाळ करून भुईवर पाडलें आहे आणि दुसरा कोणी येईल तर त्याला सामना देण्यासाठीं हातांत खंजीर घेऊन उभा आहे. अन्नपूर्णेनें त्याला तेथून निघून जा ह्मणून सांगितलें, पण तो एक पाऊलही हटेना. इतक्यांत बाहेर कोणाचीं पावलें वाजलीं असें वाटतांच मोरोबा आला असें अन्नपूर्णेला वाटलें. तरी दामोदर तिला धीर देऊन तयारीनें उभा राहिला. परंतु मोरोबाबद्दल त्या ठिकाणीं एकटाच लक्ष्मण आला आणि चोहोंकडे दृष्टि फिरवून ह्मणाला, " जर तुह्मी आपला जीव वाचविण्याची इच्छा करीत असाल, तर एक शब्द बोलण्याचाही अवकाश न घेतां माझ्या पाठीमागून चला. आतां आपण एक पळ फुकट घालविणें ह्मणजे धोक्याचें आहे. "

" काय झालें ! " असें अन्नपूर्णा लक्ष्मणाजवळ विचारीत होती. पण " एकही शब्द सांगण्याची तूर्त सवड नाहीं. " असें सांगून तो वेगानें पुढें चालला, तेव्हां अन्नपूर्णा व दामोदर हीं दोघें त्याच्या पाठीमागून चालूं लागलीं. किल्ल्याच्या दाराजवळ जातांच अन्नपूर्णेला नानीची आठवण झाली. पण लक्ष्मणानें तिला आधींच किल्ल्याच्या बाहेर नेऊन बसविलें होतें. तीं तिघेंही किल्ल्याच्याबाहेर पडलीं तों एका आड मार्गावर दोन तयार घोड्यांसह नानी उभी असलेली त्यांच्या दृष्टीस पडली. ती यांच्याकडे पाहून जरी हंसत होती, तरी हें काय चाललें आहे ? हें कांहीं अन्नपूर्णेला कळत नव्हतें. दामोदर व अन्नपूर्णा एका घोड्यावर आणि नानी व लक्ष्मण दुसऱ्या घोड्यावर बसून चौघेंही अरण्यांत निघून गेलीं. सुमारें प्रहरभर घोडे सारखे फेंकीत चालल्यामुळें दैवयोगानें एक शहर त्यांच्या दृष्टीस पडलें. तेव्हां प्रातःकाळपर्यंत त्याच शहरांत विसावा घेण्याचें त्यांनीं ठरविलें. नंतर किल्ल्यांतून एकाएकीं सुटका कशी झाली ? याबद्दल लक्ष्मण सांगूं लागलाः—

"मी जेव्हां तुमच्यापासून दूर होऊन पाहऱ्यावर जाऊन उभा राहिलों, तेव्हां बाहेर फारच गडबड झालेली माझ्या ऐकण्यांत आली आणि काय आहे तें पहावें असें वाटल्यामुळें पुढें झालों. तों असें पाहण्यांत आलें कीं, मोरोबानें कांहीं लष्करी लोक लूट करण्यासाठीं पाठविले होते, ते मोठी थोरली लूट हस्तगत करून आलेले होते. त्या लुटींत कित्येक पिण्याच्या दारूचीं पिपें होतीं. तीं सर्व किल्यांत येतांच आंतील सगळे शिपाई त्या दारूच्या पिपावर तुटून पडले आणि लुटालूट करून, दारू पिऊन पूर्ण छाकटे बनले होते. त्यांतच किल्याच्या थोरल्या दाराचा पाहरेकरी असून, तो "पीत्वा पीत्वा" करून अगदीं बेशुद्ध पडला होता. तो सगळा प्रकार पूर्णपणें माझ्या ध्यानांत येतांच मला वाटलें कीं, "हीच वेळ आपल्या मुक्तपणास योग्य आहे." तितक्यांत स्वारांनीं चौकांत घोडे सामानासह मोकळे सोडून दिलेले मला दिसले आणि आनंदच झाला. त्यापैकीं हे दोन उत्तम घोडे मीं निवडून काढले आणि किल्याच्या बाहेर न्यावे, असें मनांत आणलें; तों ही नानी दृष्टीस पडली. तेव्हां तिलाही बरोबर घेऊन त्या दोन घोड्यांसह किल्याच्या बाहेर नेऊन उभी केली आणि तुह्मांला बोलाविण्यासाठीं परत आलों; तुमची गांठ घेतली आणि ईश्वराच्या पूर्ण कृपाबलानें या शहरापर्यंत सुरक्षित येऊन पोंचलों आहों."

हा वृत्तांत ऐकतांच दामोदरराव आणि अन्नपूर्णा या दोघांनींही लक्ष्मणाचे पूर्ण आभार मानले. नंतर लक्ष्मणाजवळ व नानीजवळ थोडीशी शिलक होती, ती आणि अन्नपूर्णेच्या अंगावरील एक मूल्यवान दागिना मोडून दामोदररावानें त्याच शहरांत आणखी दोन घोडे व प्रवासोपयोगी अगत्याचें साहित्य खरेदी केलें. नंतर चौघे चार घोड्यांवर स्वार होऊन त्यांनीं दक्षिणेचा मार्ग सुधारला. त्यांत जरी दोन बायका होत्या, तरी दामोदरराव आणि लक्ष्मण हे प्रवासाच्या कामांत हुशार होते. जरी सात पुड्यासारखे मोठमोठाले डोंगर आणि नर्मदेसारख्या महान नद्या ओलांडून त्यांना महाराष्ट्र देश गांठायाचा होता, तरी त्या भयंकर

किल्ल्यांतील जिवंतपणच्या नरकवासांतून अकल्पित प्रसंगानें सुट-ल्याबद्दल सर्वांस अत्यानंद झालेला होता. त्या आनंदांत सुख-दुःखाच्या गोष्टी बोलत प्रवास करणारीं आमचीं चारी माणसें कित्येक दिवसपर्यंत प्रवास करून शेवटीं सुरतेस आलीं. पण त्या शहरांत येत तोंपावेतों तीं सर्व प्रवासाला व त्यांत मुख्यत्वें घोड्यावरच्या बसण्याला कंटाळलीं होतीं. ह्मणून सुरतेंत येतांच त्यांनीं चारी घोडे विकले आणि पहिल्यानें दामोदररावाच्या घरीं ह्मणजे कोंकणांत जाण्याचें ठरवून त्यांनीं एका जहाजावर पांय ठेवला आणि सुमुहूर्तानें जलमार्गांतून प्रवास आरंभिला.

---

## प्रकरण २६ वें.

चौघेही तारवांत बसल्यानंतर अन्नपूर्णेनें करमणूक व्हावी, असें मनांत आणलें आणि दामोदररावास विचारलें:--

"पण आपण त्या किल्ल्यांत येऊन कैदेंत कसे पडलां?"

असें ऐकतांच दामोदरराव सांगूं लागला. त्यांतील आशय असा कीं, तो अन्नपूर्णेच्या गांवचाच राहणारा असून त्याच्या देशांतील लश्कराबरोबर तो हिंदुस्थानांत आला आणि मोरोबा-बरोबर लढाई करीत असतां त्या लश्कराचा मोड झाल्यामुळें त्याला त्या किल्ल्यांत येऊन कैदेंत पडावें लागलें. हिंदुस्थानांत आल्याबर त्यानें मोरोबाविषयीं पुष्कळ ऐकलें होतें आणि अन्नपूर्णाही मोरोबाच्या ताब्यांत असून त्या किल्ल्यांत आहे, हें त्याला कळलें होतें. त्यानें किल्ल्यांत येऊन राहिल्यावर थोडक्याच दिवसांत पाहरे-कऱ्यांचा लोभ आणि विश्वास संपादन करून किल्ल्यांतल्या किल्ल्यांत हिंडण्याफिरण्याची परवानगी मिळविली. तो पहिल्यानें किल्ल्याचा-च प्रत्येक भाग तपासूं लागला आणि तसें करीत असतां किल्ल्यां-तील एक चोरदार त्याला सांपडलें, जें स्वतः मोरोबालाही ठाऊक नव्हतें. हें दार उघडून तो किल्ल्यांत आला आणि जवळच्याच खोलींत त्यानें मोरोबाचा शब्द ऐकला. कारण कीं, तेथें भिंत अगदीं पातळ होती.

त्याच वेळेस मोरोबा तो किल्ला आपल्या ताब्यांत कसा आला? याबद्दल आपल्या मित्रांजवळ मोठ्या फुशारकीनें गोष्ट सांगत होता. (पहा प्रकरण १८ वें.) दामोदररावानें त्या गोष्टींत त्याला भिवविण्याचें मनांत आणलें, आणि मध्यें मध्यें एकेक शब्द भयंकर स्वरानें उच्चारून त्या सर्वांस भिवविलें आणि ती गोष्ट बंद केली. नंतर थोडक्याच दिवसांत त्यानें किल्ल्याच्या बाहेर फिरण्याचीही परवानगी मिळविली आणि वारंवार अन्नपूर्णेच्या खोलीसमोर येऊन तो उभा राहूं लागला. पण त्यावरून किल्ल्यांतील चाकरमाणसें त्याला भूत समजूं लागलीं. ज्या आकाराकडे पाहून अन्नपूर्णा घाबरली होती, तो दामोदररावच होता.

असो. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी बोलत बोलत तीं सर्व जलमार्गानें प्रवास करीत आनंदानें चाललीं.

---

## प्रकरण २७ वें.

आतां अन्नपूर्णा, दामोदरराव, लक्ष्मण आणि नानी हीं चौघें दक्षिणेंत येण्याचे आधीं इकडे कांहीं विशेष प्रकार घडले होते, ते सांगणें अवश्य आहेत.

बिल्लोरी महालाचा मालक उमराव मारुतीराव विजापूरकर मरण पावल्यानंतर त्या महालाची मालकी त्याचा वारस उमराव विनायकराव यांजकडे आली होती. (पहा प्रकरण ९ वें आत्मारामतात्या आणि बोरकर नाना यांच्यांत झालेलीं भाषणें.)

जेव्हां अन्नपूर्णेचा बाप आत्मारामतात्या तेथें आला होता, तेव्हां तो महाल रिकामा पडलेला होता आणि त्याच्या रक्षणासाठीं एक वृद्ध मनुष्य व त्याची बायको मात्र त्याच्या शेजारीं झोंपडें बांधून त्यांत रहात होतीं. परंतु हल्लीं विनायकराव आपल्या बायकामुलांसह त्या वाड्यांत येऊन राहिला होता. त्याची एक चौदा वर्षांची आवडी या नांवाची मुलगी होती; तिलाही अन्नपूर्णेप्रमाणें नैसर्गिक शोभेचीच फार आवड होती. या महालांत येऊन राहतांच तिनें त्याच्या सभोंवतीं असलेला बाग अत्युत्तम तयार केला

होता. महालाच्या एका बाजूनें समुद्राचा देखावा स्पष्ट दिसत होता, आणि बाकीच्या तिन्ही बाजूंनीं मनोहर बाग दृष्टीस पडत असे. शिवाय डोंगराच्या पायथ्याजवळ वसलेलीं मनोहर खेडीं— ज्यांत नारळी, पोंफळी, रातांबी, इत्यादिकांची दाटी झालेली दिसत असे; आणि पर्वताच्या शिखरांवर दुरून दृष्टि पोंचल्या कारणानें त्यांची विचित्र शोभा दिसत असे. या सर्व कारणांमुळें त्या महालाला एके प्रकारची विचित्र शोभा आलेली होती. त्या महालांत आल्यावर आरंभीं आवडीला फार मौज वाटली, पण पुढें पुढें कंटाळा येऊं लागला. तिच्या योग्यतेची एकही सोबतीण त्या ठिकाणीं नसल्या कारणानें तिचें मन रमेनासें झालें. तिचा भाऊ हरि ज्याचें वय सुमारें वीस वर्षांचें असून जो फौजेंत शिपाईगिरी करीत असे. तो जरी त्या वेळीं तेथेंच होता, तरी आवडीला वाड्यांत एकटी सोडून स्वतः खांद्यावर बंदूक घेऊन रानांत शिकार करण्यासाठीं जात असे.

एके दिवशीं विनायकराव, आवडी, हरि इत्यादिक आनंदानें एकत्र बसून गोष्टी सांगताहेत; तों एक तोफेचा आवाज ऐकूं आला, आणि त्यामुळें सगळ्यांनाच भय वाटलें. तरी विनायकरावांनीं जिकडून तो आवाज ऐकूं आला, त्या बाजूची खिडकी उघडली; आणि पाहतात तों समुद्रांत फारच तुफान झालेलें आहे. तरी त्यांस कांहीं हालल्याप्रमाणें भास होत होता. वारा, पाऊस व धुकें इतकें पसरलें होतें कीं, बागेंत बसलेल्या अगदीं जवळ जवळच्या मनुष्यांस ही एकमेकांस ओळखण्याची पंचाईत पडत असे व अशा विलक्षण हवेमुळें समुद्रावर तर दृष्टि ठरत नव्हती. सगळीं माणसें समुद्राकडच्या खिडक्या उघडून मोठ्या प्रयासानें पाहताहेत, तों दुसरा एक तोफेचा आवाज झाला! पण तो आवाज कोणत्या जागीं होत होता हें कांहीं कळत नव्हतें. तरी विनायकरावानीं ओळखलें कीं, "एकादें तारूं तुफानांत सांपडलें आहे व तें मदत मिळविण्यासाठीं तोफा सोडीत आहे." इतक्यांत वीज चमकली आणि तिच्या त्या चकचकाटांत साफ दिसून आलें कीं, किनाऱ्यापासून अगदीं थोड्या अंतरावर एक तारूं डळमळून बुडण्याच्या बेतांत आहे. विनायकरा-

यांनीं आपलीं चाकरमाणसें त्या गलबतावरील लोकांस मदत करण्यासाठीं पाठविलीं. तेव्हां त्यांनीं त्या तारवाला गांठून त्यांतील सगळीं माणसें सलामत जमिनिवर उतरलीं. त्यांतच अन्नपूर्णा, दामोदरराव, लक्ष्मण आणि नानी हीं माणसें यांना आढळलीं. विनायकराव दामोदररावाला ओळखीत होता; ह्मणून या उमरावानें ह्या चारी माणसांना आपल्या महालांत आणून त्यांचा चांगला आदरसत्कार केला. दामोदररावांनीं अन्नपूर्णेची आणि विनायकरावांची ओळख करून दिली. तेव्हां आवडी मोठ्या आवडीनें तिला भेटली आणि तिचें बिऱ्हाड आपल्या खोलींत घेऊन गेली. नानी व लक्ष्मण चाकरांच्या बसण्याच्या ठिकाणीं जाऊन बसलीं. नंतर नानी तेथें स्वस्थ झाल्यावर किल्यांतील भुतांच्या एकेक चमत्कारिक गोष्टी सांगूं लागली.

दक्षिणेंत आल्याबद्दल अन्नपूर्णेला फारच सुख वाटलें. पुनः एकवेळ आपलें प्रिय वतन आणि वामनराव खास दृष्टीस पडणार, हे विचार मनांत येतांच तिनें पहिल्यानें ईश्वराचे आभार मानले. ती आपल्या मनांतलें सगळें दुःख विसरली. वामनरावाची व आपली फार दिवसांनीं भेट झाल्यानंतर उभयतांस किती आनंद होईल? या बद्दलचेच विचार तिच्या मनांत उद्भवूं लागले. आपण येथपर्यंत खुशाल आल्याबद्दल आपल्या आप्तांस व इष्टमित्रांस कळविण्याच्या तजविजीला ती लागली.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं अन्नपूर्णेनें केशवस्वामीच्या मठांत जाऊन राहण्याचा विचार मनांत आणला. पण तिला न जाऊं देण्याबद्दल आवडीनें आपल्या बापाची आर्जवें केलीं. अन्नपूर्णेच्या सभ्य वर्तणुकीबद्दल इतक्या थोडक्या अवकाशांतही विनायकरावांची खात्री झालेली होती; आणि तोही अन्नपूर्णेनें कांहीं दिवस तरी त्याच्या महालांत रहावें, अशी इच्छा करीत होता. त्यानें अन्नपूर्णेस व दामोदरराव यांस आणखी कांहीं दिवस आपल्या महालांत राहण्याबद्दलचा आग्रह केला. तो इतकाकीं, त्या दोघांस त्याचें आमंत्रण मान्य करावें लागले आणि दोघेंही तेथें राहिलीं.

नंतर अन्नपूर्णा व आवडी ह्या दोघी मिळून त्या महालाचा प्रत्येक भाग तपासून पाहूं लागल्या. जसा हिंदुस्थानांतील यशवंत किल्ला फार दिवसपर्यंत अगदीं ओसाड पडलेला होता; तसाच हा महालही कांहीं दिवस रिकामाच पडला होता. तरी त्यांत फरक इतकाच कीं, त्या किल्यांत जिकडे तिकडे लढाऊ सामान पडलेलें दिसत असे आणि या महालांत जिकडे तिकडे घरसंसारी सामानाची रेलचेल केलेली दिसत असे. प्रत्येक भिंतीवर देवादिकांचीं पूज्य चित्रें व रंगी बेरंगी पडदे दिसत असत. तरी तो महाल फार दिवसपर्यंत अगदीं रिकामा राहिलेला असल्यामुळें—जरी त्यांतील सगळें सामान एका उमरावाच्या पदवीला शोभा देणारें होतें; तरी त्यावर मण मण धूळ चढलेली होती. त्याचप्रमाणें जिकडे तिकडे मौल्यवान पडदे सुटलेले असून त्यावरील चित्रें भयंकर देखावा करून राहिलीं होतीं.

अन्नपूर्णेनें त्या महालाच्या खिडक्या उघडून बाहेरचा मनोरंजक देखावा पाहिला आणि मनांत आणलें कीं, " ज्या महालाचें नांव ऐकतांच आपला बाप चमकला होता, त्याच महालांत हल्लीं मी उभी आहें. " तरी " या महालाजवळ आपल्या बापाचा संबंध काय होता! आणि पूर्वीं रात्रीं नित्य जें गायन ऐकूं येत असे तें हल्लीं येतें कीं नाहीं! " याबद्दल शोध करण्याचा तिनें आपल्या मनांत निश्चय केला.

दुसऱ्या दिवशीं जेव्हां आवडी व अन्नपूर्णा ह्या त्या ओसाड भागाकडे आल्या, तेव्हां त्यांनीं आपल्या बरोबर त्या महालाच्या वृद्ध कारभारणीसही आणलें, तिच्यापासूनच सगळी माहिती मिळवावी, असा अन्नपूर्णेचा बेत होता. त्या वृद्धेचें नांव देऊबाई होतें. गोष्टीवरून गोष्टी काढतां काढतां अन्नपूर्णेनें तिला विचारलें:—
" बरें; बाई या ठिकाणीं नित्य रात्रीं गायन ऐकूं येत असे, तें अद्याप ऐकूं येत असतें काय? "

" होय बाई, तें अजूनही एकादे वेळीं ऐकायला येत असतें. " देऊबाईनें उत्तर दिलें.

" पण तें गाणें कोण गात असेल?" अन्नपूर्णेनें पुनः विचारलें.
" कोण गातें? याबद्दल आजपर्यंत जरी पुष्कळांनीं शोध केला, तरी कोणालाही त्या कामांत यश आलें नाहीं. ,,

ह्या गायनाच्या गोष्टी ऐकतांच आवडीला आश्चर्य वाटलें; आणि ती तर ती गोष्ट सविस्तर ऐकण्याची इच्छा करूं लागली.

" तें गायन कधींपासून ऐकायला येऊं लागलें? " असें आवडीनें देऊबाईला विचारलें.

" आमची पहिली मालकीण ज्या दिवशीं स्वर्गवासी झाली, त्या दिवसापासून. " देऊबाई ह्मणाली:-" त्या दिवसापासून आजपर्यंत आह्मी तें ऐकतच आहों. त्याच्या आधीं तें कधींही आह्मीं ऐकलें नव्हतें. हें असो. पण मी आणखी ज्या कांहीं चमत्कारिक व गुप्त गोष्टी ऐकल्या आहेत, त्या तुह्मांला मुळींच ठाऊक नसतील, असें मला वाटतें. "

" तुला आणखी काय ठाऊक आहे? " आवडीनें मोठ्या उत्सुकपणानें तिला विचारलें.

" बाईसाहेब, आह्मांला एवढा मोठा महाल सोडून, लहानसें झोंपडें बांधून त्यांत राहण्याचें कारण काय? हें तुह्मांला मुळींच ठाऊक नसेल? " देऊबाईनें विचारलें.

" नाहीं. " आवडीनें उत्तर दिलें.

" अथवा आमचे पूर्वींचे उमराव धनी-"

देऊबाई बोलतां बोलतां थांबली व त्यावरून ती गोष्ट गुप्त राखण्याची तिची इच्छा होती, हें उघड दिसलें. आवडीनें व अन्नपूर्णेनें ती गोष्ट सांगण्याबद्दल तिला पुष्कळ आग्रह केला; पण तिनें कांहीं ऐकलें नाहीं.

तरी बोलतां बोलतां त्या तिघी दुसऱ्या एका खोली जवळ आल्या. पण देऊबाईनें " मी ही खोली उघडणार नाहीं. " असें साफ सांगितलें. आणि बोलूं लागली:-

" माझी पहिली मालकीण गुजरल्या दिवसापासून आजपर्यंत ही खोली मीं कधींही उघडली नाहीं. ह्याच, ह्याच खोलींत त्या

माझ्या मायाळू बाई मरण पावल्या. आह्मां सर्वांस त्या दिवशीं फारच दिलगिरी उत्पन्न झाली होती. ती गोष्ट घडून जरी कित्येक वर्षें लोटलीं आहेत, तरी कालच घडल्याप्रमाणें माझ्या मनाला वाटत आहे. अरे देवा! हें असें कसें व्हावें? पहा, पहा बाई! तुमचा तोंडवळा हुबेहुब माझ्या मरणाऱ्या बाईसारखा दिसतो! अगदीं तीच सुरत!"

देऊबाई अन्नपूर्णेच्या तोंडाकडे वारंवार पाहूं लागली. तिच्या मरणाऱ्या मालकिणीच्या व अन्नपूर्णेच्या चेहऱ्याचा सारखेपणा पाहून तिला फारच आश्चर्य वाटलें.

"होय. मला चांगली आठवण आहे. त्याही याचप्रमाणें हंसत असत. गरीब विचारी माझी बाई! जेव्हां ती पहिल्यानेंच या ठिकाणीं आली, तेव्हां अशीच सुखी व आनंदी दिसत असे."

"आणि काय त्यानंतर ती सुखी नव्हती?" आवडीनें देऊबाईला विचारलें. पण तिनें डोकें हालवूनच "नाहीं" असें सुचविलें. अन्नपूर्णेनें पाहिलें तों त्या वृद्ध कुळंबिणीच्या नेत्रांतून अश्रुपात होत होता. तेव्हां ती गोष्ट फिरविण्याचा विचार तिनें मनांत आणला व त्या तिघीही तेथून दुसऱ्या ठिकाणीं गेल्या.

नंतर कांहीं दिवस तेथें राहिल्यावर अन्नपूर्णा केशवस्वामींच्या मठांतील मुख्य योगिनीस भेटण्यासाठीं गेली. त्या वृद्ध योगिनीनें तिला पाहतांच मातृप्रेम दाखवून पोटाशीं धरलें आणि तिचें चांगलें आगतस्वागत केलें. नंतर तेथून अन्नपूर्णा त्या पूर्वीच्या वृद्ध बोरकरनानाची भेट घेण्यासाठीं त्याच्या झोंपडींत गेली आणि त्याचा समाचार घेऊन मठांत परत आली. पण विनायकरावांकडून तिला बोलावण्यासाठीं आलेलें मनुष्य मठांत बसलेलेंच असल्यामुळें त्याच्या बरोबर तिला महालांत परत जावें लागलें.

बिलोरी महालांत आल्याच्या दुसऱ्याच दिवशीं अन्नपूर्णेनें आपल्या मामाला आणि वामनरावाला पत्रें लिहून पाठविलीं होतीं; पण अद्याप वामनरावाकडील पत्राचें उत्तर आलें नव्हतें. तिच्या मामानें मात्र आपल्या बेपर्वाईच्या रितीप्रमाणें तिला एक उत्तर

खरडून पाठविलें होतें. तिनें मोहनरावास वरलें नाहीं, ह्मणून पत्रांत त्यानें तिला फारच दोष देऊन लिहिलें होतें. कारण मोहनराव अब्रूदार आहे, असें तो समजत होता. तरी मोरोबाला जो आजपर्यंत सन्मानदृष्टीनें पहात होता, तो त्याचा धिःकार करूं लागला हेंही त्या पत्रावरूनच उघड होत होतें. हेळवांकच्या महालाबद्दल त्यानें अन्नपूर्णेला असें कळविलें होतें कीं, "तो ज्याला भाड्यानें दिला आहे, त्याची मुदत फार थोडी उरली आहे. ती भरतांच तो तुझ्या ताब्यांत येईल." अन्नपूर्णेनें ताराबाई (तिची वृद्ध दासी) विषयींही आपल्या मामाला लिहिलें होतें; पण तिच्याबद्दल त्यानें कांहींच लिहिलें नाहीं.

हें पत्र हातीं आल्यावर अन्नपूर्णेनें आपला सगळा वृत्तांत विनायकरावांस कळविला. तेव्हां तिच्या आतेच्या मिळकती बद्दल मोरोबानें लिहून घेतलें होतें; ह्मणून त्याच्यावर फिर्याद मांडण्याचा विनायकरावानें तिला विचार सांगितला.

तरी वामनरावांवाचून अन्नपूर्णेला एक क्षणभरही चैन पडत नव्हतें. त्याच्याकडून अद्याप उत्तरही आलें नव्हतें; ह्मणून तिला फारच काळजी लागली होती. "तो बेमान तर झाला नसेल? किंवा कांहीं संकटांत पडला नसेल! अथवा मी हिंदुस्थानांतून इकडे आले आणि तो माझ्या शोधासाठीं हिंदुस्थानांत गेला, असें तर झालें नसेल?" याप्रमाणें आपल्या मनाजवळ अनेक प्रश्न उत्पन्न करून त्यांचीं उत्तरेंही स्वतःच योजून मनाचें समाधान करून घेत असे.

एके दिवशीं वामनरावाचीं सगळीं पत्रें उलगडून अन्नपूर्णा वाचीत बसली होती व पूर्वीचे सुखाचे दिवस मनांत आणून एकांतीं रुदन करीत होती, तों देऊबाई त्या ठिकाणीं आली; आणि अन्नपूर्णा रडते असें पाहून तिची समजूत करूं लागली. पण ती आपल्यासमोर उभी आहे, असें पाहतांच अन्नपूर्णा चमकली आणि समोर उघडीं असलेलीं पत्रें आवरून ठेऊं लागली. त्या पत्रांतून कांहीं खालीं जरी पडलें, तरी अन्नपूर्णेला त्याची शुद्धि राहिली नाहीं.

" अरे देवा! काय हें? " खालीं पडलेली वस्तु उचलून व पाहून देऊबाई ह्मणाली.

" काय आहे? देऊबाई, काय आहे? " तिला आश्चर्यचकित पाहून अन्नपूर्णेनें विचारलें.

" अगदीं हुबेहुब तीच! बोला, बाईसाहेब, हें तुह्मांला कोणीं दिलें? " देऊबाईनें असें बोलून जी तसबीर अन्नपूर्णेच्या कागदांतून खालीं पडली होती, ती टेबलावर ठेवली.

" त्या मरण पावल्या, त्याच्या आधीं थोडे दिवस जशा दिसत असत; तसें हें चित्र काढलें आहे. बरोबर, हेंच नाक, हे असेच डोळे. अरे देवा! त्या माझ्या बाई किती मायाळू व गरीब असत! त्या अगदीं याचप्रमाणें असून फार वेळ विचार करीत बसलेल्या असत, केव्हां केव्हां रडतही बसत; पण त्यांनीं आमच्या जवळ त्याबद्दल कधीं एकही शब्द उच्चारला नाहीं. "

हें ऐकून अन्नपूर्णेला फारच आश्चर्य वाटलें. जर ही तसबीर त्या जहागीरदारणीचीच असेल, तर तिचा व आपल्या बापाचा संबंध काय? तिनें त्याबद्दल देऊबाईला तिची सगळी हकीकत विचारली, आणि देऊबाईनेंही रात्रीं सगळीं माणसें निजल्यावर ती सांगण्याचें कबूल केलें.

---

## प्रकरण २८ वें.

त्या दिवशीं रात्रीं अन्नपूर्णा, विनायकराव इत्यादि सगळीं माणसें त्या गांवांतील खेडेकऱ्यांचा नाच पाहण्यासाठीं गेलीं. पूर्वी तात्या बेशुद्ध झाल्यावर अन्नपूर्णा मदत मिळविण्यासाठीं ज्या ठिकाणीं धांवत आली होती, आणि ज्या ठिकाणीं गांवढळ बायकांस नाचतांना तिनें पाहिलें होतें, त्याच जागेवर हा नाच होणार होता. त्या जागेच्या आसपास असणाऱ्या देखाव्याचें वर्णन आपण एक वेळ वाचलेंच आहे, ह्मणून पुनः त्या बाबतीकडे लक्ष्य पुरविण्याचें कारण दिसत नाहीं.

त्या जागेवरील सगळे मंडप द्राक्षांच्या घोंसांनीं लवलेले होते.

पाहणारांस बसण्यासाठीं झाडांच्या खालीं बैठका घातलेल्या होत्या. एके बाजूस मेजवानीचा मंडपही निराळाच दाखविलेला होता.

चंद्रोदयाबरोबर नाचाला आरंभ झाला. त्या वेळेस सगळ्यांच्या मुखांवर आनंदाचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. पण तो देखावा पाहतांच अन्नपूर्णेला आपल्या मरणाऱ्या बापाची आठवण झाली; ह्मणून ती तेथून दुसऱ्या ठिकाणीं निघून गेली, व गर्द झाडींतून हिंडूं लागली. आकाशांत पूर्ण चंद्र प्रकाशित झालेला असल्यामुळें तेथील देखावा मोठा मोहक दिसत असे, आणि त्यामुळेंच अन्नपूर्णा बरीच दूर गेली, तरी तिला कळलें नाहीं. ज्या ठिकाणीं भयंकर आकार पाहून मिरोबा गाडीवाला घाबरला होता त्या ठिकाणीं ती येऊन उभी राहिली. पण तेथें येतांच तिला त्या पाहिल्या गोष्टीचें स्मरण झालें आणि "आतां परतावें" असें मनांत आलें. तेव्हां परतली व दहापांच पावलें चालली नाहीं तों मागें कांहीं वाजल्याचा भास झाल्यामुळें उभी राहिली. इतक्यांत दोन पुरुष झाडींतून बाहेर निघून तिच्यासमोर येऊन उभे राहिले. त्यांतील एकतर विनायकरावाचा मुलगा हरि होता आणि दुसरा—ज्याला पाहतांच अन्नपूर्णा आनंदानें कडकडून भेटली, तो तिचा प्रियकर—खुद्द वामनराव होता! दीर्घ कालानंतर एकमेकांस पाहिल्यामुळें त्या निर्दोष भाबडक माणुकांस किती आनंद झाला असेल बरें? त्या विषयीं पूर्ण विचार करण्याचें काम आह्मीं आपल्या वाचकांकडेच सोंपवितों.

अन्नपूर्णेनें वामनरावास जेव्हां पत्र पाठविलें, तेव्हां तो आपल्या पलटणीबरोबर दुसऱ्या एका गावीं गेला होता. तरी तें पत्र हातीं येतांच तिला भेटण्यासाठीं तो निघाला होता. त्याची व हरीची मार्गांतच भेट झाली. ते एकमेकांस चांगल्या प्रकारानें ओळखीत होते. आणि आपण पाहिलेंच आहे. कीं, ते दोघे गोष्टी बोलत येत असतां त्यांची व अन्नपूर्णेची अकल्पित भेट झाली.

नंतर हरि, वामनराव आणि अन्नपूर्णा हीं तिघेही जेथें नाच होत होता, तेथें आलीं. विनायकराव जरी वामनरावाला ओळखीत

होते, तरी त्यांनीं त्याचा कांहीं करावा तितका सत्कार केला नाहीं. अन्नपूर्णा आणि वामनराव जरा दूर जाऊन एक बैठक घातलेली होती; तिच्यावर गोष्टी बोलत बसलीं. वामनरावाच्या तोंड- वळ्यांत पुष्कळ फेरफार झालेला अन्नपूर्णेच्या ध्यानांत आला. क्षणो- क्षणीं तो विचारांत गुंतलेला दिसे आणि अन्नपूर्णेच्या दृष्टीबरोबर दृष्टि लावण्यास लाजत असे.

मोरोबाबद्दलची सगळी गोष्ट अन्नपूर्णेनें त्याला विस्तारपूर्वक सांगितली. त्याच्याबरोबर असतांना तिनें जीं दुःखें भोगलीं; तीं ऐकून वामनरावाला फार वाईट वाटलें. तें ऐकतां ऐकतां तो कित्येक वेळां दूर उठून गेला व पुनः येऊन जागेवर बसला. शेवटीं तर खोल विचारांत गढल्याप्रमाणें मुद्रा करून तो ति- च्याजवळून दूर गेला आणि रूदन करीत परत आला. अन्नपूर्णेनें त्याची समजुत करण्यासाठीं सांगितलें:—"आतां सगळीं संकटें दूर झालीं आहेत. आतां आपणांस सुखानें कालक्रमण करण्यास को- णत्याही प्रकारचा अडथळा उरला नाहीं." याप्रमाणें तिनें अनेक प्रकारें करून जरी सांगितलें, तरी त्याची खिन्नता दूर होईना. तो जों जों बोले तों तों त्याला अधिक हुंदका येत असे.

"अन्नपूर्णे, ह्या तुझ्या निर्मळ प्रीतिवाक्यांस कांहीं आतां हा वामनराव योग्य नाहीं." तो अधिक रडून बोलूं लागला. तेव्हां त्याच्या दुःखामुळें अन्नपूर्णेलाही वाईट वाटलें आणि ती मनांत धास्ती बाळगून त्याच्या तोंडाकडे पाहूं लागली.

"अगे, तूं याप्रमाणें माझ्याकडे पाहूं नको." वामनराव मा- येनें तिचा हात धरून दाबीत दाबीत ह्मणालाः—"तुझ्या ह्या अशा कृपेला मी खरोखर पात्र नाहीं!"

अन्नपूर्णेनें आतां त्याचें लक्ष्य दुसऱ्या कोणत्याही विषयाकडे वळविण्याचा प्रयत्न चालविला. ज्या नैसर्गिक देखाव्यांनीं पूर्वी त्यां- ना आनंद होत असे आणि दोघांनीं आपापले एकसारखे विचार एकमेकांस कळविले होते, त्याचें तिनें त्याला स्मरण दिलें. परंतु त्या स्मरणामुळें त्याचें दुःख कमी न होतां उलटें अधिकमात्र वाढलें! तरी

तो मनांत शंका आणून तिला ह्मणाला—"अन्नपूर्णे, पूर्वी तूं ज्याप्रमाणें माझ्याकडे प्रीतीच्या व पूर्ण कृपायुक्त दृष्टीनें पहात असस त्याचप्रमाणें आतांही पाहशील ? सांग सांग, तुझें पहिलें प्रेम कायम राहील ?"

"कां राहणार नाहीं असें तुह्मांला वाटतें?" अन्नपूर्णेनें विचारलें. "तूं भोळी आहेस! तूं निर्दोष आहेस! पश्चात्तापाचें दुःख किती असतें? याचा आजून तुला अनुभव नाहीं. ईश्वरा! ह्या माझ्या प्रियेला तूं अशीच निर्दोष राख!" असें बोलून तो पुनः रडूं लागला; तेव्हां अन्नपूर्णाही त्याच्या बरोबरीनें त्याची साथ करूं लागली.

परंतु तितक्यांत तिकडे नाच पुरा झाला आणि सगळे लोक आपापल्या घरीं जाण्यासाठीं उठले. तेव्हां वामनराव आणि अन्नपूर्णा हीं दोघेंही विनायकरावांस भेटण्यासाठीं त्यांच्या समोर गेलीं. नंतर वामनराव विनायकरावांचा निरोप घेऊन, एका धर्मशाळेंत उतरला होता तेथें आराम करण्यासाठीं निघून गेला.

ज्या धर्मशाळेंत वामनराव उतरला होता, तींत दुसरे कांहीं वाटसरू जे हिंदुस्थानांतून आलेले होते, तेही उतरले होते. अन्नपूर्णा दक्षिणेंत निघून आल्यावर हिंदुस्थानांत ज्या कांहीं खटपटी झाल्या, त्यांच्याच गोष्टी ते बोलत बसले होते. त्यांतील एक ऐकण्यासारखा व आमच्या गोष्टीबरोबर संबंध ठेवणारा प्रकार मोरोबाच्याबद्दलचा होता. तो आह्मीं आपल्या वाचकांसाठीं याच ठिकाणीं सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं.

मोरोबाच्या किल्ल्यांतून अन्नपूर्णेला काढून नेण्याच्या कामांत वारंवार अपजय येत गेल्यामुळें मोहनरायानें मोरोबाच्या वर्तनाबद्दल सरकारांत फिर्याद केली आणि त्यांतच त्यानें खुनी आनंदरावालाही आश्रय दिल्याबद्दल वर्दी दिली. याशिवाय मोरोबाबद्दल सरकारांत पूर्वीपासून नाचक्कीचाच बोलवा असल्यामुळें त्याला धरून कैद करून आणण्यासाठीं त्याच्या किल्ल्यावर सरकारतर्फे एक मोठी फौज रवाना झाली. त्या फौजेचें अधिपत्य ज्याच्याकडे होतें, त्याला त्या किल्ल्याच्या सगळ्या चोरवाटा आणि मजबुती यांबद्दल माहिती होती.

मोरोबानें जेव्हां पाहिलें कीं, ह्या जंगी फौजेपुढें आपला निभाव लागणार नाहीं, तेव्हां त्यानें आपल्या किल्ल्याच्या आस-पास जे गांव होते; त्यांतून मदत मिळविण्याची खटपट आरंभिली. परंतु मोरोबाच्या लुटारू टोळ्यांचा सगळ्या गांवांला आणि त्यांतील प्रत्येक मनुष्यवस्तीला वारंवार त्रास होत असे व नुकसानही सो-सावें लागत असे. ह्मणून त्याला कोणी कोणत्याही प्रकारची मदत केली नाहीं इतकेंच नव्हे; पण कित्येक लोक त्याला धरून सर-कारांत गुजरण्यासही तयार होते. त्यामुळें फौजेनें किल्ल्याला वेढा देतांच तो सरकाराच्या ताब्यांत आला. मोहनराय, मोरोबा हे दोघे-ही जीवंत सरकारी अधिकाऱ्यांच्या हातीं लागले. मग काय? त्यांच्या दुष्ट कर्माचीं फळें त्यांना मिळालीं, हें सांगितलें पाहिजे?

वामनरावानें ही गोष्ट ऐकतांच त्याच्या मनाला आनंद झाला आणि त्यानें "ही गोष्ट उद्यां अन्नपूर्णेला सांगावी" असा निश्चय केला.

---

## प्रकरण २९ वें.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं अन्नपूर्णा महालासभोंवतालच्या बागांत फिरत असतां विनायकरावही त्या ठिकाणीं आले आणि गोष्टीवरून गोष्टी बोलतां बोलतां वामनरावांच्या संबंधानें त्यांनीं अन्नपूर्णेला कित्येक प्रश्न केले.

"वामनराव चांगला हुशार मनुष्य आहे! मला वाटतें कीं, तुम-ची व त्याची जुनी ओळख आहे?" विनायकरावांनीं जरी असा वांकडातिकडा प्रश्न केला; तरी अन्नपूर्णेनें त्यांना "होय" ह्मणून सांगितलें. "त्यांची व माझी ओळख पहिल्यानें मुंबई शहरांत झाली." विनायकराव पुढें बोलूं लागले. "आणि आरंभीं त्यां-च्या सुशीलपणाचा मलाही आनंद झाला होता." इतकें बोलूनच विनायकराव थांबले; पण अन्नपूर्णेच्या मनाला ती गोष्ट ऐकण्याची फार चटपट लागून राहिली. "तुमची दोघांची ओळख होऊन आज किती दिवस झाले बरें?" असें विनायकरा-वांनीं शेवटीं विचारलें.

"महाराज, हा प्रश्न आपण का करतां? हें जर कृपा करून मला सांगाल; तर मी तुमच्या प्रश्नाचें उत्तर अत्यानंदानें देईन."

"शाबास! याचें कारण विचारणें, हेंच या वेळीं तुझें कर्तव्य आणि हक्क आहे आणि तें सांगणें हाच माझा मोठेपणा आहे. कारण तो तुला चाहतो, असें माझ्या ध्यानांत आलें आहे. ह्मणून मी जर तुझें कल्याण इच्छितों, तर या वेळीं जें योग्य तेंच सांगितलें पाहिजे. आतां, तो तुला चाहतो, याचें कांहीं मला नवल वाटत नाहीं. तुझ्यासारख्या तरुण रूपसंपन्न तरुणीला जो पाहील, तो चाहील. मी कधीं कोणाचें खोटें वर्णन करीत नाहीं. मला जें खरें दिसेल, तेंच मी बोलत असतों. बरें, तूंही त्याच्याकडे प्रेमदृष्टीनें पहातेस; ह्मणून मला त्या गोष्टीची मोठी धास्ती वाटते."

"या धास्तीचें कांहीं कारण सांगाल?" अन्नपूर्णा घाबरत घाबरत विचारूं लागली.

"कारण इतकेंच कीं, तो तुझ्या प्रीतीच्या योग्य नाहीं." या कारणाचें अन्नपूर्णेला नवल वाटल्यामुळें तिनें त्याच्याजवळ अधिक खुलासा करण्याबद्दल विनंति केली. तेव्हां तो ह्मणालाः—

"असें आहे तर ऐक. मीही स्पष्ट सांगण्यास तयार आहें, कारण कीं, या वेळेस तुझ्या कल्याणाशिवाय मला कांहींच दिसत नाहीं."

"या आपल्या सौजन्याबद्दल मी उपकार मानतें."

अन्नपूर्णा जरी हुशारीनें बोलत होती, तरी धास्तीनें फिक्की पडत चालली होती. तें तिचें स्थित्यंतर जाणून विनायकरावांनीं तेथून जवळच एका आंब्याच्या झाडाखालीं सावलींत नेऊन तिला बसविलें आणि स्वतः तिच्या समोर बसून सांगूं लागले:—

"अन्नपूर्णे, तुझ्यासारखी तरुण स्त्री माझ्या ह्या रीतीला बेशरमपणाची रीति, असें नांव ठेवील; त्याचप्रमाणें एवढ्याशा थोडक्या मुदतीच्या ओळखींत मी तरी तुझ्याजवळ निर्भीडपणानें वागतों; हें लोकांनीं पाहिलें तर मला शोभत नाहीं, असें ह्मणतील. असा जरी खरा प्रकार आहे, तरी केवळ तुझ्या कल्याणासाठींच ही गोष्ट मी तुला सांगण्यास तयार झालों आहें. यांत माझी अशी

खात्री आहे कीं,तूं आपल्या पोक्त समजुतीनें विचार करून मला दोष देणार नाहींस. जरी तुला मी नवीनच ओळखूं लागलों आहें, तरी इतक्या थोड्या मुदतींत तूं मजकडून वाहवा ह्मणून घेण्यास योग्य आहेस! अशी माझी खात्री झाली आहे आणि त्याचमुळें चांगल्याचें कधीं वाईट होऊं नये, असें माझ्या मनाला वाटूं लागलें आहे. बाई गे, तुझें सुख जितकें वाढेल, तितका मला आराम होईल. पण असें कां? ह्मणून जर तूं मला विचारूं लागलीस, तर कांहीं मला सांगतां येणार नाहीं. त्याला उत्तर हेंच कीं, जसें मी आपल्या आवडीचें सुख वाढावें असें इच्छितों; तसेंच तुझेंही; हें आपलें नैसर्गिक प्रेम एकमेकांला पाहतांच उदयास आलें ! "

याप्रमाणें खऱ्या मायेचीं भाषणें ऐकतांच अन्नपूर्णेला रडण्याचा हुंदका आला. तरी तो आवरून तिनें नुस्तें डोकें हालवूनच विनायकरावांचे आभार मानले. तेव्हां थोडें थांबून ते पुन्हां ह्मणाले:—

" आतां तुझ्याजवळ बोलतांना जर कांहीं तुला न आवडण्यासारखे प्रश्न मला करावे लागले, तर त्याबद्दल तूं मनांत खंति बाळगूं नयेस; आणि जर तुझ्या मनाला योग्य वाटत असेल, तर ह्या तरुणाची व तुझी ओळख पहिल्यानें कशी झाली? हें मला सांग. "

असें ऐकतांच अन्नपूर्णेनें पूर्वीची सगळी गोष्ट विनायकरावांजवळ सांगितली आणि ते त्याच्याबद्दल कसली धास्ती बाळगतात ती ऐकण्यास तयार झाली. त्याचप्रमाणें विनायकरावही होईल तितक्या मृदु शब्दांनीं सगळी गोष्ट सांगण्यास तयार झाले. ते ह्मणाले:—

" ह्या बहाद्दुर शिपायाची व माझ्या मुलीची पहिल्यानें एका अम्मलदाराच्या घरीं गांठ पडली; व पुढें हळु हळु त्याची आणि माझीही ओळख पडली. नंतर त्याला जेव्हां वेळ मिळेल, तेव्हां त्यानें माझ्या घरीं यावें; असें मी त्याला आमंत्रण दिलें.त्या वेळेस मला हें ठाऊक नव्हतें. कीं, जे लोक लुच्चे, ठक, जुगारी आणि आपलें आयुष्य बेअब्रूंत घालविणारे असे याचे मित्र आहेत.याचे कित्येक आप्त

जे मुंबईंत रहात होते, ते सगळे माझ्या ओळखीचे होते. त्यांच्या अब्रूवरूनच मीं त्याला आपल्या घरीं बोलावलें, आणि हाही सभ्य असेल असें मनांत आणलें. असो. पण अन्नपूर्णे, मला वाटतें कीं, तूं ही गोष्ट या वेळेस ऐकण्याला अशक्त आहेस. तर राहूं दे. मी पुन: एकादे वेळीं तुला ऐकावीशी वाटली तर सांगेन."

" महाराज, ही गोष्ट याच वेळेस ऐकण्यास मी अत्यंत उत्सुक आहे.तर कृपा करून आपण जें असेल तें सांगावें."

" असें आहे तर ऐक. नंतर थोडक्याच दिवसांत मला असें कळलें कीं, त्याला दुर्जनांच्या संगतीनें जुगाराचा नाद लागला आहे! आणि त्यांतून त्याची मुक्तता होणें कठीण असतांही तो मुक्त होण्यास इच्छित नाहीं. त्यानें त्या दुर्व्यसनांत आपल्या जवळचें सगळें द्रव्य आणि अब्रू नाहींशी केली! ही गोष्ट मी त्याच्या हित कर्त्यांस कळविली; पण तो त्यांची पर्वाच करीत नसे. शेवटीं मला असें कळलें कीं, खेळण्याच्या कामांत तो सदोदित यशस्वी असतां केवळ लुच्चे लोकच त्याला नशिबवान् मानून मुद्दामच आपल्या खेळांत सामील करीत."

" ही गोष्ट कधींही न घडणारी आपण सांगत आहां!" अन्नपूर्णा मध्येंच एकाएकीं जरी बोलली; तरी मी कोणाजवळ बोलतें. हें लौकरच तिच्या ध्यानांत आलें. तेव्हां तिनें त्याच्याजवळ मृदु शब्दांनीं क्षमा मागितली आणि ह्मणाली, " महाराज, मला असें वाटतें कीं, हें त्याच्या एकाद्या शत्रूनें आपणांस मुद्दाम सांगितलें आहे." " बाई, तसेंच असेल तर मी फार खुष आहे. पण तसें कांहीं नाहीं. जर दुसऱ्या कोणीं मला सांगितलें असतें. तर मी खोटें मानलें असतें."

अन्नपूर्णा गुपचूप बसून राहिली. आदल्या दिवशीं संध्याकाळीं वामनराव जें बोलत होता; त्या प्रत्येक शब्दाची तिला आठवण झाली. त्याचप्रमाणें तो बोलत असतां वारंवार आपल्या अपराधाबद्दल क्षमा मागून रुदन करीत होता, तेंही तिला आठवलें. तरी अजूनही ती गोष्ट तिच्या मनाला खरी वाटेना. त्याच्या वर्तणुकीला

दोष देण्यास तिचें अंतःकरण तयार होईना. फार वेळ अगदीं स्वस्थ बसल्यावर विनायकराव पुन्हा बोलूं लागले. " अन्नपूर्णे, मला असें वाटतें कीं, चांगल्या पुराव्याशिवाय तूं ही गोष्ट खरी मानणार नाहींस. तर तसा पुरावा करण्यासही मी तयार आहें; परंतु तशी शाबिती जर मी करीन तर माझ्या एका प्रिय मनुष्याला अति दुःख होईल, याच गोष्टीची मला धास्ती आहे. "

" ती धास्ती कसली आहे? कदाचित् ती धास्ती मी दूर करूं शकेन. आपण मी बोलतें हें खात्रीनें खरेंच माना. ज्या मनुष्याला एकवेळ मी चहात होतें, तो जर चांगल्या पुराव्यानें " वाईट चालीचा आहे " असें सिद्ध झालें; तर मी त्याला अवश्य विसरेन. त्याच्या बोलण्यावर किंवा आर्जवावर कधींही विश्वास ठेवणार नाहीं." हें बोलत असतां अन्नपूर्णेच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागला आणि तिला असें वाटूं लागलें कीं, "ज्याला मीं एक वेळ प्रिय मानलें, त्याला विसरणें फार कठीण आहे. "

" असें आहे तर तो पुरावा करण्यास मी तयार आहें. वामनरावाची दुष्ट चाल माझ्या पुत्रानें स्वतः आपल्या नेत्रानें पाहिली आहे. एक वेळ असें आढळलें होतें कीं, त्याच्या संगतीनें माझ्या मुलालाही तो खराब नाद लागला होता; पण मी स्वतः त्याला त्यांतून काढलें. अन्नपूर्णे, तर तूं आतां विचार कर. ज्या नादांतून मीं आपल्या पुत्राला काढलें; त्यांतच दुसऱ्याला कां बरें फसूं द्यावें? ज्या माणसांकडे पाहतांच माझ्या अंगाला कंप सुटतो; त्यांच्या बरोबर वामनरावास खेळतांना मीं आपल्या दृष्टीनें पाहिलें आहे. आतां याहूनहीं जर तुला संशय असेल; तर तूं माझ्या हरीला विचारून पहा. "

" नाहीं महाराज; आतां अगदी संशय उरला नाहीं. जी गोष्ट स्वतः तुम्हीं आपल्या नेत्रांनीं पाहिली; ती मी खोटी का मानावी? तरी मला असें वाटतें कीं, वामनराव कदाचित् एकाद्याच्या संगतीनें कांहीं दिवस त्या नादांत फसला असेल. त्याच्या पहिल्या

वागणुकीचा जर आपण विचार कराल; तर माझें हें मत चुकीचें आहे असें आपणांस वाटणार नाहीं. ''

" हाय हाय ! '' विनायकराव दिलगीर होऊन ह्मणालेः– "जो प्रकार आपल्याला दरिद्रावस्थेस पोंचवील; तो घडावा, असें कोण बरें इच्छील ? अगे कोणालाही खोटी आशा लाऊन मला फसवितां येत नाहीं. जुगाराचा छंद किती वाईट आहे ? हें तर जगप्रसिद्ध आहे. त्याचा नाद ज्याला आहे, तो त्यांतून सुटला, असें तर कधींच होत नाहीं. कदाचित् चार दिवस सुटला ह्मटलें; तरी त्याला तो पुनः लागण्याचा संभव आहे. आणि आतां मला लपविण्याचें कांहीं कारण नाहीं. बाई, जुगारच काय ? पण तो प्रत्येक नादांत फसलेला आहे. प्रत्येक दुर्व्यसन त्याच्याजवळ आहे. ''

विनायकराव अडखळत अडखळत याप्रमाणें बोलले आणि स्तब्ध झाले. पुष्कळ वेळपर्यंत दोघेंही स्तब्धच होतीं. नंतर बऱ्याच वेळानें विनायकराव आणखीं बोलूं लागले– " अन्नपूर्णे, आतां जर मी स्तब्ध राहिलों; तर तो एकप्रकारचा घातकीपणा होईल. यासाठीं जें आहे, तें मला सांगणें भाग आहे. आतां तुला अधिक काय व किती सांगूं ? तो आपल्या उडाऊपणामुळें दोन वेळ मुंबईच्या दिवाणी तुरुंगांतही पडून राहिला होता. त्याला तेथलिच एका उमरावाच्या मुलीनें त्यांतून सोडविलें.याला कांहीं फार दिवस झालेले नाहींत.ती मुलगी मला भेटली होती व तिनेंच स्वतः हें मला सांगितलें."

अन्नपूर्णेच्यानें कांहीं तें अधिक वेळ ऐकवेना. ती जेथें बसली होती, तेथेंच बेशुद्ध होऊन पडली, आणि विनाकराव तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करूं लागले. त्यांनीं आपल्या चाकरांना हांका मारल्या; परंतु घरापासून फारच दूर असल्यामुळें त्या त्यांना ऐकूं गेल्या नाहींत. शेवटीं तिला एका बांकावर निजवून ते जवळच्या कारंज्यावर पाणी आणण्यासाठीं गेले. पण तेथें कांहीं पात्र मिळेना. तेव्हां निरुपायास्तव भांडें आणण्यासाठीं ते घराकडे गेले.

थोड्या वेळानें अन्नपूर्णा शुद्धीवर आली आणि तिनें आपल्या समोर विनायकरावांबद्दल वामनरावांस पाहिलें.

विनायकराव मदत मिळविण्यासाठीं महालाकडे गेल्यावर अन्नपूर्णेची प्रातःकालीं भेट घेण्यासाठीं वामनराव तेथें आला. पण तिला बेशुद्ध पाहतांच त्यानें जवळच्या कारंज्यांतून चुळक्या चुळक्यानें पाणी आणून तिच्या तोंडावर मारलें, तेव्हां ती शुद्धीवर येत चालली.

" अन्नपूर्णे, अन्नपूर्णे, हा काय प्रकार आहे ?" तिला मायेनें उठवीत असतां वामनराव विचारूं लागला.

ओळखीचा स्वर ऐकल्यामुळें ती लौकर शुद्धीवर आली आणि प्रीतीनें वामनरावाच्या मुखाकडे पाहूं लागली. पण तिच्यानें फार वेळपर्यंत त्याच्याकडे पाहवेना. तिनें आपले नेत्र बंद केले.

तों विनायकराव पाणी घेऊन त्या ठिकाणीं आले व वामनरावास दूर होण्याबद्दल हातानें खुणावूं लागले. परंतु अन्नपूर्णा शुद्धीवर आल्याशिवाय तेथून न हालण्याचा त्यानें निश्चय केला होता. तरी काय झालें असावें हें लौकरच त्याच्या ध्यानांत आलें आणि विनायकराव क्रुद्ध मुद्रेनें त्याच्याकडे पाहूं लागला. त्याच्या हृदयांत संताप उत्पन्न झाला.

तरी थोडक्याच वेळांत त्या क्रोधानें शोकाचें रूप धरलें. तें इतकें कीं, विनायकरावासही त्याची दया येऊं लागली. तों अन्नपूर्णा पुनः शुद्धीवर आली आणि वामनरावाला दुःखी पाहून त्याच्याबरोबर स्वतः तीही रडूं लागली. तरी विनायकराव समोर उभा आहे, असें जाणून ती वामनरावाच्या हाताचा आधार घेऊन उठून उभी राहिली. पण तो हातही त्वरेनें सोडून चालूं लागली. तेव्हां वामनराव मंद स्वरानें दुःखाचा सुस्कारा टाकीत ह्मणालाः– "देवा, मीं असा कोणता अपराध केला ? माझ्याजवळ असा कठोरपणा करण्याचें कारण काय झालें असेल ?"

अन्नपूर्णेनें जरी हे शब्द ऐकले, तरी उत्तर न देतां ती पुढें चालूं लागली. तेव्हां वामनराव मोठ्यांनीं ह्मणालाः–"अन्नपूर्णे, तूं असा कठोरपणा कां करतेस ! हें मला कांहीं कळत नाहीं, क्षणभर उभी रहा, उत्तर दे आणि तुला जायचें असेल तर जा."

असें ऐकतांच अन्नपूर्णेच्या तर्फेनें विनायकराव बोलूं लागले:—" या वेळेस अन्नपूर्णेची प्रकृति चांगली नाहीं. तुह्मांला जर तिचा जबाब पाहिजे असेल, तर उद्यां प्रातःकालीं येऊन तो मिळविण्याची पूर्ण परवानगी आहे. या वेळेस तुह्मी जाल तरच ठीक होईल."

आतां मात्र वामनराव क्रोधानें लाल झाला. तरी अन्नपूर्णा व विनायकराव यांच्याकडे दुःखी दृष्टीनें पाहूं लागला. तेव्हां अन्नपूर्णा त्याचें दुःख समजली व त्याला थोडें तरी धैर्य यावें, अशा इच्छेनें ह्मणाली:—" मला वाटतें कीं, उद्यां माझी प्रकृति चांगली होईल. त्या वेळीं तुह्मांला येण्याची परवानगी आहे."

" परवानगी आहे ? " वामनराव धिःकारदृष्टीनें विनायकरावांकडे पाहून मृदुशब्दांनीं ह्मणाला—" ठीक आहे. उमराव विनायकरावांकडून मिळालेल्या परवानगीला मी चांगला मान देईन."

इतकें बोलून त्यानें विनायकरावांस नमलें आणि अन्नपूर्णेकडे प्रेमदृष्टीनें पाहून दुःखी अंतःकरणानें त्यानें मार्ग धरला.

नंतर तेथून महालांत गेल्यावर सगळा दिवसभर अन्नपूर्णेच्या मनांत वामनरावाविषयींचेच विचार घोळत होते. तिच्या मनावर एके वेळीं प्रीतीचा व एके वेळीं दुःखाचा परिणाम स्पष्ट घडत असे. "ज्याला फार दिवसपर्यंत मनानें मानलें, त्याला एकदम विसरणें हें जिवावरचें कृत्य होय," असें तिला वाटूं लागलें.

" अहो वामनराव! " ती दुःख करीत असतां आपल्याशींच बोलूं लागली—"वामनराव! फार दिवसांनीं आपण एकमेकांना भेटलों; ती भेट काय आपला अक्षय्य वियोग करण्यासाठींच झाली? तुझ्या वृत्तांतश्रवणाच्या आधींच मला मरण कां आलें नाहीं! "

याप्रमाणें ती विचारांत निमग्न आहे, तों वामनरावाकडून तिच्या नांवाचें एक पत्र आलें. तें लिहितें वेळीं वामनराव किती दुःखांत होता, हें त्याच्या लेखावरून स्पष्ट होत होतें. " उद्यां प्रातःकालपर्यंत थांबण्यापेक्षां आज सायंकालींच तुझी भेट होईल

तर फार चांगलें होईल!" असें त्यानें अन्नपूर्णेला लिहिलें होतें. पण "त्याची भेट घ्यावी कीं नाहीं?" याचाही तिला संशय पडला. तेव्हां तें पत्र घेऊन ती विनायकरावांकडे गेली. त्यानें जेव्हां तें पत्र वाचलें; तेव्हां दोघांच्याही सौख्याचा विचार मनांत आणून सायंकालींच त्याची भेट घेण्याबद्दलचें मत दिलें.

---

## प्रकरण ३० वें.

सायंकाळीं अन्नपूर्णा आपल्या खोलींत बसली असतां विनायकरावांकडून तिला बोलावणें आलें. तेव्हां "वामनराव आला असेल" असें ती आपल्या मनांत समजली. पहिल्यानें तेथें जाण्याचें धैर्यच तिला होईना. तरी सगळी हिम्मत धरून ती विनायकरावाच्या बसण्याच्या जागीं गेली. तिला पाहतांच वामनराव आणि विनायकराव हे दोघेही आपापल्या जागेवरून उठले. विनायकरावानें पुढे होऊन तिला वामनरावाच्या जवळ बसविलें आणि स्वतः तें ठिकाण सोडून चालता झाला.

विनायकराव गेल्यावर वामनराव आणि अन्नपूर्णा हीं दोघें फार वेळपर्यंत अगदीं स्तब्ध होतीं. दोघांचेही कंठ भरून आले होते आणि दोघेंही बोलण्याची आनाकानीच करीत होतीं. तरी शेवटीं गंभीर स्वरानें वामनराव ह्मणालाः—"अन्नपूर्णे तुझ्या बदललेल्या मनोवृत्तीकडे पाहून मला जें दुःख होत आहे, तें कमी होण्यासाठीं असें बदलण्याचें कारण काय? हें कळलेंच पाहिजे, ह्मणून त्याचा खुलासा करण्यासाठीं मी या वेळेस मुद्दाम तुझ्याकडे आलों आहें. विनायकरावाच्या बोलण्यावरून माझ्या ध्यानांत आलें आहे कीं, कोणी तरी दुष्टानें माझ्या सौख्यांत माती कालविण्याचा निश्चय करून तुला कांहीं तरी भलतेंसलतें सांगून तुझे कान भरले आहेत. तरी मी असें मानतों कीं, माझ्या गैरहजिरीमुळें माझ्याविषयींची तुझ्या मनांतील प्रीति अगदी नाहींशी झाली यांत संशय नाहीं!"

हें बोलत असतां त्याची जीभ लडबडूं लागली आणि अन्नपूर्णे-

चें हृदय अधिक भरून आल्यामुळें ती खालीं पहात स्तब्ध राहिली. पण तिच्या स्वस्थ बसण्यामुळें वामनराव फारच अधीर झाला, आणि क्रोधानें इकडेतिकडे फिरूं लागला.

" इतक्या दीर्घ कालानंतर–अगे इतक्या अत्यंत अवकाशानें अशा शोकोत्पादक भेटीची कोणीं आशा ठेविली होती?" तो फारच क्रोधानें ह्मणाला:–" अन्नपूर्णे, तुझ्या ह्या गंभीर स्तब्धपणानें माझी खात्री झाली. आतां हें मला सहन होत नाहीं. पुरे, पुरे! फार झालें!"

याप्रमाणें क्रोधानें बोलून शेवटीं तो रडूं लागला, तेव्हां त्याचें रुदन पाहून अन्नपूर्णाही रडूं लागली. पण ती रडते असें वामनरावानें जेव्हां पाहिलें, तेव्हां " अजून हिची आपल्यावर प्रीति आहे." असें मनांत आणून आनंद मानला व त्या आनंदाच्या भरांत तो ह्मणाला:–

" अन्नपूर्णे, तूं रडतेस, यावरून अजूनही माझ्यावर तुझें प्रेम आहे असें सिद्ध झालें. तर सांग प्रिये, माझ्या ह्या दुःखद स्थितीची तुला अजून दया येते काय?"

अन्नपूर्णेनें आपले डोळे पुसले व त्याला सांगितलें:– "मला तुमची दया तर येतेच; पण आतां कोणत्या प्रकारानें मीं तुमच्यावर प्रीति करावी बरें? अहो, अजून तुमच्यावर माझा विश्वास व भरंवसा आहे. तर सांगा ज्या सद्गुणी व खबीदार वामनरावांवर माझी प्रीति जडली होती, तेच व तसेच अजून तुह्मी आहां काय? अद्याप तेच निर्मळ गुण तुमच्यांत वास करीत आहेत काय?"

"एक वेळ तुझी प्रीति जडली होती, तोच वामनराव मी आहें," याप्रमाणें तो पहिल्या सपाट्याबरोबर जरी बोलला, तरी तत्काल स्तब्ध झाला आणि कांहीं वेळानें गंभीर स्वरांत दुःखानें ह्मणाला:– "नाहीं, नाहीं. खरोखर मी तुझ्या योग्य राहिलों नाहीं. तसाच वामनराव कांहीं आतां मी नव्हें."

इतकें बोलून त्यानें आपल्या डोळ्यांवर रुमाल धरला आणि दुःखानें तो एकदम जाग्यावर बसला. त्याचा तो भोळेपणा पाहतां-

च अन्नपूर्णेलाही फार लागलें. तिनें "आपली ही शेवटची भेट!" असें सांगण्याचा जरी निश्चय केला होता, तरी तिच्यानें तसें सांगवेना.

वामनराव एवढा वेळ अगदीं स्तब्ध होता आणि एकसारखे तिच्याकडेच डोळे लाऊन बसलेला होता.

शेवटीं अन्नपूर्णा ह्मणाली:—"वामनराव, आज कित्येक दिवसपर्यंत आपणां उभयतांत जो कांहीं निष्कलंक प्रीतिसंबंध होता, तो आज तुमच्या दुराचरणास्तव मला संपवावा लागत आहे? हें असें करणें मला भागच आहे आणि त्यासाठींच आपली ही आजची शेवटची भेट आहे; असें मी मोठ्या दुःखानें आपणांस कळवितें."

"कधीं नाहीं; असें तर कधींच होणार नाहीं." वामनराव एकदम चमकून उठला व ह्मणाला:—"तूं जसें सांगतेस, तसें करण्याची तुझी इच्छा खरोखर नसेल. तूं आपल्यापुढून मला हांकून देण्यास मनापासून राजी नसशील, अशी माझी खात्री आहे."

"आपणांस एकमेकांचा संबंध तोडलाच पाहिजे व तोही अक्षरशः तोडला पाहिजे." अन्नपूर्णा ह्या वाक्यावर भार ठेवून बोलली:—"तुमच्या स्वतःच्या आचरणावरून मला असें केलेंच पाहिजे."

"हा ठराव तुझा नसेल. हा त्या विनायकरावाचा निश्चय असला पाहिजे. चिंता नाहीं. त्याला आमच्यांत मध्यस्थी करण्याचें कारण काय? हें मी त्याला विचारीन." असें वामनराव बोलला. तेव्हां "हा तर माझा स्वतःचाच ठराव आहे. तुह्मी भ्रांतीनें विनाकारण विनायकरावांचे नांव घेत आहां. तुह्मींच जर थोडा वेळ बसून विचार कराल, तर तुमच्या दुराचरणावरून माझ्या भावी सुखाचा विचार करितां मला असें करणें हेंच योग्य, असें वाटेल."

"तुझ्या भावी सुखासाठीं तुझा व माझा वियोगच झाला पाहिजे, असे शब्द तुझ्या तोंडानें ऐकेन, असें मला कधींच वाटलें नवतें." वामनराव दुःख करीत बोलला.

"आणि मी तरी 'मला असें सांगावें लागेल' असें कधीं मनांत आणलें होतें?" हें बोलत असतां अन्नपूर्णेचा आवाज अगदीं मंद झाला आणि नेत्रांतून तर अश्रुपात होतच होता.

नंतर वामनरावानें जेव्हां आपल्या आचरणाबद्दलचा विचार मनांत आणला; तेव्हां त्यालाही वाटलें कीं, अन्नपूर्णेला दुःख होण्यासारखें आचरण मीं केलें खरें; आणि तिनें जो निश्चय केला होता, तसाच केल्यावांचून तिला इलाज नाहीं, हें अगदी खरें आहे. स्वतःची चूक ध्यानांत येतांच लज्जेमुळें अधोवदनानें तो अगदींच स्तब्ध झाला. पण थोडक्याच वेळांत त्याच्या नेत्रांतून अश्रुपात व हृदयांतून दुःखोच्छ्वास चालू झाला.

अन्नपूर्णेला जरी तो देखावा पाहून दुःख होत होतें, तरी तिनें आपला निश्चय सोडला नाहीं. जरी ती वामनरावालाच मनापासून चहात होती; त्याच्याच प्रीतिपाशांत बद्ध होऊन राहिली होती; त्याच्यासाठींच तिनें संकटेंही सोसलीं होतीं; तरी तो वाईट मार्गानें जाऊन गैरअब्रूचा व कुलकलंक झाला, असें जेव्हां तिला कळलें, तेव्हां तिला आपल्या कुटुंबाला कलंक लावण्याचें भय वाटलें. तरी चमत्कार असा कीं, वामनराव पश्चात्ताप व दुःख करीत आहे हें पाहून ती दुःखी होत होती.

शेवटीं वामनराव तिच्याजवळ येऊन ह्मणालाः—"अन्नपूर्णे तूं माझ्यावरील प्रीति कमती करावीस, असें मीं आचरण केलें, यांत अगदीं संशय नाहीं, तरीही जर दुसरा कोणी आपल्या प्रीतींत अंतर आणीत नसेल, तर मला पुनः सन्मार्ग दाखवून ताळ्यावर आणण्यासाठीं तूं माझ्यावर प्रेम करणार नाहींस काय? बोल बोल! मला अक्षय्य दुःखसमुद्रांत लोटण्यास तूं तयार होशील, असें मला स्वप्नहीं पडलें नसतां एकाएकीं हें असें कसें व्हावें? मी दुःख, शोक, नामोशी आणि कर्ज यांच्या भारानें इतका दबलों आहे कीं, पुनः वर निघण्याची ताकद कांहीं माझ्यांत उरली नाहीं. तर आतां तुलाच जो विचार योग्य दिसेल तो कर." इतकें बोलून तो पुनः स्तब्ध झाला. नंतर कांहीं वेळ दोघेही न बोलतां दुःखोच्छ्वास टाकीत बसलीं होतीं.

अन्नपूर्णेनें विचार करून पाहिलें, तों तिला असें दिसलें कीं, आतां ही गोष्ट अधिक वेळ घांशीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

एवढें मनांत मात्र आलें व ती उठली. आणि " वामनराव आतां पुरें करा आणि शेवटचा निरोप द्या व घ्याच. " असें बोलून चालूं लागली.

" काय ! " तो एकदम चमकून उठला व घाईनें ह्मणालाः- " शेवटचा निरोप! अन्नपूर्णे उभी रहा, आणि तूं मला अशा दुःखांत सोडून जाण्यास मनापासून तयार आहेस काय ? एवढें सांगून जा. "

" तुह्मीं आपल्या तोंडानेंच मला सांगितलें. आतां मी तुह्मांला न सोडीन तर मरेपर्यंत दुःखांत पडेन, हें खास आहे. ह्मणूनच मी शेवटचा निरोप मागितला आणि दिलाही." असें अन्नपूर्णा ह्मणाली.

" कधीं नाहीं ! कधीं नाहीं ! " तो आतां ओरडून फारच मोठ्यानें बोलूं लागलाः-" मी तसें बोललों त्या वेळीं शुद्धीवर नव्हतों ! अरेरे ! (शोकानें ) मी किती मूर्ख हा ! माझ्या स्वतःच्या मूर्खपणामुळें मला हें सगळें सोसावें लागत आहे. अरेरे ! मी जर मुंबईस गेलों नसतों, तर फार चांगलें झालें असतें. दुष्ट लोभाच्या तडाक्यांत सांपडून असा मातीमोल तरी झालों नसतों ( नम्रपणानें ) अन्नपूर्णे, माझा त्याग करण्यास तूं आपल्या मनापासून तयार आहेस ? अगे, जो तुला प्राणाहूनही अधिक योग्यतेची मानणारा; अहोरात्र तुझ्याच चिंतनांत वेळ घालविणारा; आणि तुझ्याशिवाय जगांत प्रीतिपात्र नाहीं असें निश्चयानें मनांत ठेवणारा. बरें; तूंही आजपर्यंत ज्याच्यावर निष्कलंक प्रेम केलेस; ज्याला प्रीतीनेंच अहोरात्र पाहिलेंस; आणि ज्याला आपला विसावा असें मानलेंस, त्याची एकाएकी इतकी खराबी करण्याबद्दल तुला मुळींच शंका वाटत नाहीं! कोमल व मायाळू अंतःकरणांत असा कठोरपणा शोभत नाहीं! अन्नपूर्णे, आतां हें शेवटचें सांगतों कीं, जर अजून माझ्यावर तुझी थोडी तरी प्रीति असेल, तर तूं असें करण्यास तयार होणार नाहींस. मला संभाळण्यांत-माझा बचाव करण्यांत-तूं आपलें सुख समजशील. "

" तसें करूं गेल्यास पुष्कळ विघ्नें येणार आहेत. मी तुमच्यावर

प्रेम करून सुख भोगीन, ही गोष्ट आतां अगदीं न घडणारी आहे. त्याचप्रमाणें तुह्मीही जर मजवर प्रेम करीत असाल, तर आपल्याबरोबर मलाही आमरणांत दुःख भोगायाला लावणार नाहीं."

"काय! मी तुजवर प्रेम करीत असेन तर! यावरून माझ्या प्रीतीबद्दल तुझ्या मनाला अजूनही संशय आहे!" इतकें बोलून वामनरावानें पुनः शुद्धीवर आल्यासारखें केलें आणि नेत्रांत अश्रु आणून सांगितलें:—"अन्नपूर्णे, खरोखरच मी दुःखी व तुला अयोग्य झालों आहें; ह्मणून तुलाही आपल्याबरोबर ओढून दुःखांत ठेवणें हा अधमपणा होय. प्रीति अंध आहे, ती पाहिजे तसें वदवील. तरी सद्विचाररूपी नेत्रांनीं पाहून इष्टानिष्ट, पथ्यापथ्य आणि पात्रापात्र विचार करूनच जें करणें तें करावें. आतां खऱ्या विचारांनें पाहतां या वेळेस माझा त्याग करणें हेंच तुझें कर्तव्य आहे. त्यांत तूं चुकली नाहींस, हा तुझा गंभीरपणा फार वर्णनीय आहे. आतां तुला उगीच कंटाळा येण्यासारखें न बोलतां हें शेवटचेंच सांगतों कीं, वामनराव मजवर प्रीति करीत असतांही मी त्याची दुराचरणें ऐकून त्याला वरलें नाहीं, एवढें उगीच मनांत आणून कधीं कधीं मला आठवीत जा." असें बोलून तो जो उठला, तो खिन्न वदनानें चालताच झाला.

---

## प्रकरण ३१ वें.

वामनराव गेल्यावर दोन तीन दिवसांनीं देऊबाईनें अन्नपूर्णेला त्या महालांतील सरदारणीच्या हकीकतीचें स्मरण केलें. अन्नपूर्णा ती गोष्ट ऐकण्यासाठीं जरी फार उत्सुक होती, तरी वामनरावांच्या विचारामुळें ती तें सगळें विसरली होती. तरी स्मरण होतांच ती गोष्ट तिनें देऊबाईला विचारली. तेव्हां तिनें रात्रौ सगळ्यांना झोंप लागल्यावर येऊन सांगण्याचें कबूल केलें.

आपल्या वचनाप्रमाणें देऊबाई रात्रीं सगळीं माणसें निजल्यावर अन्नपूर्णेकडे आली. तेव्हां अन्नपूर्णेनें तिला आपल्याजवळ बसविलें आणि 'पहिल्यापासून गोष्ट सांग' असें सांगितलें.

देऊबाईनें सरदारीण वेणूबाईची जो हकीकत सांगितली, त्या हकीकतीवरून असें कळलें कीं, ती सरदारीण वेणूबाई, सुमारें वीस वर्षांच्यामागें तिचें मारुतीरावाबरोबर लग्न झाल्यावर, त्या बिल्लोरी महालांत येऊन राहिली होती. ती सुशील स्वभावाची, शहाणी, धर्मभीरु आणि अब्रूनें वागणारी होती. जरी ती बाहेरून पाहतां सुखी दिसत होती, तरी तिला अंतस्थ फार मोठें दुःख होतें. कारण लोकांच्या बोलण्यावरून विचार केला तर तिच्या बापानें केवळ पैशाचा लोभ धरून तिच्या इच्छेविरुद्ध तें लग्न केलें होतें. ती अंतर्यामीं एका दुसऱ्याच पुरुषावर प्रीति ठेवून राहिली होती आणि त्याच्या वियोगानें रात्रंदिवस झुरतही असे. कधीं कधीं ती आपल्या खोलींत एकटीच बसून रडतांना आढळत असे. तरी मारुतीराव खोलींत येतांच तिनें चट्कन् आपले नेत्र पुसून हास्यवदनानें त्यांच्यासमोर उभें रहावें. मारुतीरावही पहिल्यानें तिच्यावर फारच प्रीति करीत असत; परंतु पुढें पुढें त्यांची तिच्यावरील प्रीति कमी होत चालली. ती इतकी कीं, जरी ती पाहिजे तितक्या चांगल्या रीतीनें वागत होती, तरी मारुतीराव चार चार दिवस तिची भेट घेत नसत. तिला वारंवार दोष देत असत आणि तिचें कसेंही बोलणें असलें, तरी तें मनावर घेत नसत. तिचा धिःकार करण्याशिवाय दुसरें त्यांना कांहींच सुचत नसे. असें झाल्यावर सगळा दिवस एकांतीं बसून ती झुरूं लागली.

"एके रात्रीं त्या माझ्या वेणुबाईनीं मला आपल्या खोलींत बोलाविलें." देऊबाई पुढें सांगूं लागली:—"मी जाऊन पाहतें तों त्यांचा चेहेरा अगदीं बदललेला होता. मी तेथें जातांच त्या माझ्याकडे अगदीं दीन मुद्रेनें पाहूं लागल्या आणि माझ्या धन्याला बोलावून आण असें सांगूं लागल्या. तेव्हां मी तशीच जहागीरदाराकडे गेलें आणि त्यांची अनेक प्रकारें समजूत करून त्यांना त्या खोलींत घेऊन आलें. तेव्हां तरी ते" मोठ्या शर्थेनें तिच्या बिछान्याजवळ गेले. पण त्यांना पाहतांच तिनें "माझ्या मरणाची वेळ जवळ आली आहे!" असें सांगितलें व "आतां मी सांगतें तेवढें तरी

मजवर कृपा करून शांतपणानें ऐका," असें ह्मणूं लागली. तेव्हां सरदारांनीं मला बाहेर जाण्याचा हुकूम केला व मी निघून गेलें.

"मी पुनः जों खोलींत आलें, तों माझे धनी वैद्याला बोलाविण्याची गडबड करूं लागले. तरी वेणुबाईनीं सांगितलें कीं, "आतां ह्या खटपटी व्यर्थ आहेत. माझें आयुष्यच संपलें !" नंतर थोडक्याच वेळांत त्या अतिशय तळमळून किंकाळूं लागल्या. तेव्हां मारुतीरावांनीं धावरून वैद्याला बोलाविलें. तशा स्थितींत असतांही माझ्या बाईला क्षणोक्षणीं आराम वाटत असे व तशा वेळीं त्या इतक्या प्रेमदृष्टीनें मारुतीरावांकडे पहात कीं, शेवटीं त्यांनाही तिची दया आली व ते रडूं लागले. तेव्हां दुसऱ्या माणसांनीं त्यांची समजूत करून त्यांना दुसऱ्या जागीं नेलें व धीर देऊं लागले. मी माझ्या बाईजवळ एकटीच होतें. वैद्य येण्याचे आधीं त्यांनीं प्राण सोडला."

इतकें बोलून देऊबाई रडूं लागली आणि तिचें रुदन पाहून अन्नपूर्णेलाही फार वाईट वाटलें.

"वैद्य येऊन तिचें तोंड पाहतांच भय पावला. कारण कीं, तें अगदीं काळें ठिक्कर पडलें होतें. त्यानें दुसरीं सगळीं माणसें खोलींच्या बाहेर काढलीं आणि आडवे तिडवे प्रश्न करून तो त्यांच्या मरणाच्या आधींची हकीकत मला विचारूं लागला. माझ्या बाई कशा अजारी पडल्या, हें जरी मीं त्याला सांगितलें; तरी त्यानें तें कबूल केलें नाहीं. त्याच्या मनांत पक्का संशय उत्पन्न झाला आणि तो कोणता, हें मला ठाऊक होतें. माझ्या बाईच्या मरणानंतर सगळ्याच लोकांच्या मनांत तो संशय उत्पन्न झालेला होता, पण उघड करण्यास कोणाचीही शक्ति नव्हती. त्या वेणुबाईच्या मरणानंतर मारुतीराव हा महाल सोडून गेले. तेव्हांपासून कित्येक दिवस हा ओसाडच होता."

इतकी गोष्ट सांगितल्यावर देऊबाईला रात्र झाल्यासारखें वाटलें व तिनें निजावयाला जाण्याची परवानगी मागितली. दुसऱ्या रात्रीं येऊन वेणूबाईची खोली उघडून दाखविण्याचें तिनें

अन्नपूर्णेला वचन दिलें व ती आल्याजागीं निघून गेली.

दुसऱ्या रात्रीं देऊबाई आपल्या वचनाप्रमाणें सगळ्या किल्ल्या घेऊन अन्नपूर्णेकडे आली आणि त्या दोघीही त्या खोलीकडे निघाल्या. फार वर्षें ती खोली बंद असल्यामुळें आंत शिरण्यास त्या दोघींना ही धास्ती उत्पन्न झाली. तरी जसें तसें करून त्या दोघी त्या खोलींत शिरल्या. ती खोली इतकी मोठी होती कीं, अन्नपूर्णेच्या हातांतील एका दिव्यानें कांहीं ती पूर्ण दिसत नव्हती. भिंतीवरून तऱ्हेवाईक बुट्टेदार पडदे सुटलेले असून त्यांवर धूळ बसल्याकारणानें ते बेढब दिसत होते. खोलीच्या दुसऱ्या शेवटास एक छप्परपलंग मांडलेला होता.

अन्नपूर्णा त्या पलंगाजवळ जाऊन त्यावरील अभ्रा बाजूला सारणार होती. पण देऊबाईनें तिला तसें करूं दिलें नाहीं. कारण आपल्या मेलेल्या मालकिणीचा बिछाना पाहण्याचें तिला धैर्य होईना.

नंतर देऊबाई हळूच त्या बिछान्याच्या मागें गेली. अन्नपूर्णाही तिच्या मागून दिवा घेऊन जात होती. देऊबाईनें पलंगाच्यामागें जातांच एक लहानसें दार उघडलें. अन्नपूर्णाही तिच्यामागून त्या धाकट्या दारानें आंत शिरली. तेव्हां देऊबाईनें भिंतीकडे उंच हात करून अन्नपूर्णेला पहा ह्मणून सांगितलें. ती जों वर पाहूं लागली, तों एक तसबीर तिच्या दृष्टीस पडली. ती तसबीर व तिचा बाप जी तसबीर पाहून रडत होता ती अशा दोन्ही अगदीं एकसारख्या होत्या. शिवाय त्या चित्रांत व अन्नपूर्णेच्या चेहेऱ्यांत इतका सारखेपणा होता कीं, देऊबाई अन्नपूर्णेचा चेहेरा पाहून कांहीं वेळ स्तब्ध झाली.

ह्याच खोलींत एका धाकट्या टेबलावर मरणाऱ्या सरदारणीनें एक बांसरी ठेविली होती. ती जशीच्या तशीच राहिली होती.

ह्या बांसरीविषयीं देऊबाईनें सांगितलें कीं, मरणारी वेणूबाई नित्यरात्रीं ती वाजवीत बसत असे.

ह्या धाकट्या खोलींतील सगळें सामान पाहून दोघीही बाहेर आल्या आणि बिछान्याच्याच समोर दोन खुर्च्या ओढून त्यांवर

गोष्टी बोलत बसल्या. गोष्टी सांगतां सांगतां देऊबाई पेंगूं लागली आणि येथें फारवेळ बसणें चांगलें नाहीं, असें अन्नपूर्णेला वाटलें. ती फारवेळपर्यंत त्या पलंगाकडे पहात असतां स्वतःहि पेंगूं लागली; तरी दोघींच्या गोष्टी चालल्याच होत्या. त्या सांगतां सांगतां देऊबाई एकदम घाबरून उठली व धास्तीनें त्या बिछान्याकडे पाहूं लागली. तिची धास्ती कमती होते तों त्या पलंगावरची चादर हालत आहे असें अन्नपूर्णेला वाटलें. तेव्हां तर दोघीहि घाबरून कांपत उभ्या राहिल्या. तरी देऊबाईचें भय दूर करण्यासाठीं अन्नपूर्णा ह्मणाली:-"अगे, ती चादर वाऱ्यानें हालत असेल." याप्रमाणें जरी ती बोलली, तरी देऊबाई मानीना. कारण कीं, ह्या महालांतील भुतांच्या गोष्टी तिनें पुष्कळच ऐकल्या होत्या, आणि दोन तीन वेळां विचित्र प्रकार तिनें आपल्या नेत्रांनीं पाहिले होते. तेव्हां तिची त्या संशयाबद्दल खात्री करावी ह्मणून अन्नपूर्णा त्या बिछान्याजवळ जाऊं लागली. पण ती ह्या पलंगाजवळ पोंचण्याचे आधींच त्याची चादर आपैआप उचलली आणि हळूच कोणीं आपलें डोकें बाहेर काढलें! तें त्या दोघींनीं पाहिलें मात्र! भयानें किंकाळ्या फोडीत दोघीही पळत सुटल्या; त्या त्या खोलीच्या बाहेर येत तोंपर्यंत कांहीं थांबल्या नाहींत. बाहेर येतांच देऊबाई तर हातपाय पसरून पालथी पडली आणि अन्नपूर्णा भयानें कांपत भिंतीला टेंकून उभी राहिली. नंतर फारवेळ पर्यंत दम खाऊन अन्नपूर्णेनें देऊला विचारलें:-"बरें, आपण ह्या खोलींत शिरल्यावर कोणी मागून तर आलें नसेल? किंवा आपण येणार, अशी बातमी राखून कोणीं आपणांस फसविण्यासाठीं आधीं येऊन लपलें तर नसेल?" देऊबाई ह्मणाली:-"आपण आंत शिरतांच मी दाराला कडी लावून घेतली. आपण येणार हें कोणाला माहित होतें असेंही नाहीं, आणि आपण पाहिलें तें भुताशिवाय दुसरें कांहीं नाहीं. तुह्मी विनाकारण संशय ठेवूं नका."

इतकें ऐकल्यावर अन्नपूर्णेच्या मनांत असा संशय आला कीं, वेणूबाईच्या मरणानंतर चुकून एकादें दार उघडें राहिलेलें असावें

आणि त्यांतून कोणी मनुष्य आंत येऊं लागलें असावें. पण त्या-बद्दलही देऊबाईनें खात्री करून सांगितलें कीं, "नित्य रात्रीं मी निजायाला जाते वेळीं सगळे दरवाजे, खिडक्या, बाऱ्या वगैरेआपल्या हातानें बंद करीत असतें. अशा ओसाड खोलींत निरंतर मनुष्याला कांहीं रहावेंसें वाटणार नाहीं. सारांश आपण जें तोंड पाहिलें, तें भुताचें यांत संशय नाहीं."

---

## प्रकरण ३२ वें.

अन्नपूर्णा व देऊबाई यांस भय दाखविणाऱ्या भुताबद्दलची गोष्ट थोड्याच वेळांत महालांतील सगळ्या माणसांना कळली व सगळ्यांना तीच गोष्ट चर्चा करण्यास उपयोगी पडली. पण त्यामुळें सगळ्यांच्याच मनाला मोठी धास्ती वाटूं लागली. जेव्हां सगळीं चाकरमाणसें रिकामीं होऊन बसत; तेव्हां त्यांच्यांत त्या भुताबद्दलच्याच गोष्टी चालत. पण इतक्यानेंच पुरें झालें काय? नाहीं. त्यांत एक मनुष्य भुतांच्या नव्या नव्या गोष्टी सांगायाला तयारच होतें. तें कोणतर आपली पुष्कळ बोलणारी भोळी नानी!

नानीला तर आपण पुष्कळ वेळ विसरलों आहों? पण ती कांहीं यशवंत किल्ल्यांतील भुतांना विसरली नव्हती. ती तर हल्लीं आरबी भाषेतील गोष्टी सांगणारी शहाज्यादीच बनून राहिली आहे. "अल्लादिनाचा चमत्कारिक कंदील" आणि "अलीबाबाचे चाळीस चोर" तर तिच्या "यशवंत किल्ल्यांतील भुतांच्यापुढें पाणी भरीत होते. त्या किल्ल्यांत पाहिलेल्या कागास वाघ करायास तिला कांहीं वेळ लागत नसे. तिच्या गोष्टी ऐकणारांच्या अंगावर कांटा आला नाहीं, असें तर कधींच झालें नाहीं. सारांश या विलो-री महालांत नित्य नव्या भुतांच्या गोष्टी चालू झाल्यामुळें तो एक नवीन भूतखानाच बनला!

फार काय सांगावें? या महालांतील चाकरमाणसांना नित्य एक दोन भुतें दिसल्यावांचून दिवस जाईनासा झाला. शेवटीं सगळ्यांच्या मनानें पक्की धास्ती घेतल्यामुळें तीं सगळीं चाकरमाणसें एके

दिवशीं विनायकरावांजवळ रजा मागण्यासाठीं एकमतानें येऊन उभीं राहिलीं.

याच वेळेस विनायकरावांकडे नवे पाहुणे आले होते. त्यांत एक सरदार फत्तेसिंह आणि त्याचा मुलगा परशुराम हे दोघे मुख्य होते. हा परशुराम विनायकरावांचा जांवई, म्हणजे आवडीचा नवरा होणार होता.

ह्या पाहुण्यांचें आगतस्वागत करण्यासाठीं या वेळेस विनायकरावांला चाकर माणसांची जरूर होती. अशा गरजेच्या वेळीं सगळीं माणसें जर चाकऱ्या सोडून निघालीं, तर दुसरीं माहितीचीं माणसें इतक्या लौकर कशीं मिळवावीं? अशा गोष्टी मनांत आणून पाहिल्यानें तर त्यांनीं त्या गोष्टींची थट्टा उडवून त्या हशाखालीं दाबण्याचा यत्न केला; नंतर थोडा धाक घातला; तरी त्यांच्या भोळ्या मनाची समजूत होईना!

याप्रमाणें विनायकराव "आतां या माणसांची समजुत कशी करावी?" अशा विवंचनेंत पडले आहेत तों लक्ष्मणानें मोठें धैर्य धरून विनायकरावांच्या जवळ जाऊन त्या खोलींत एकरात्र पाहरा करण्याची परवानगी मागितली. तो म्हणाला:—"मी कांहीं भुतांचें व पिशाच्याचें भय बाळगीत नाहीं. बरें, जर हें कृत्य एखाद्या लुच्या मनुष्याचेंच असेल, तर त्याचीं हाडें मोडण्यास कमी करणार नाहीं."

"तूं हिम्मतवान् दिसतोस, हें खरें आहे." विनायकराव हंसून म्हणाले:—"तरी पहा, चांगला पोक्त विचार कर आणि ध्यानांत ठेव कीं, तुला भुतांच्याबरोबर सामना करायाचा आहे."

"महाराज, त्या भुतांना हटविण्यापुरती शक्ति मी बाळगतों." लक्ष्मणानें पूर्ण धैर्य धरून उत्तर दिलें."

"असें आहे तर जा; मी तुला परवानगी देतों. ह्या तुझ्या हिंमतीबद्दल मी तुला चांगलें इनाम देईन."

"महाराज, तुमच्या जवळच्या शाबासकीशिवाय दुसरें इनाम मी इच्छितच नाहीं. माझ्यावर तुमची मेहेरबानी तर आहेच आहे.

त्या पहाऱ्याच्या वेळेस जर मला एकादें हत्यार मिळेल तर फार चांगलें! त्याच्या मदतीनें मी आपल्या शत्रूला जेर करीन."

"अरे, पण तुझी तरवार कांहीं भुताच्या अंगावर चालणार नाहीं!" विनायकराव हंसून मस्करीनें ह्मणाले:—"दारें, कठडे, खिडक्या, हीं कांहीं भुतांला अडवीत नाहींत. भुतांना बारीक छिद्रांतून सुद्धां जातां येतां येतें."

"महाराज, तुह्मी मला एक तलवार द्या आणि ह्या महालांतील सगळ्या भुतांना मी हांकून देतों कीं नाहीं हें पहा." लक्ष्मण बोलला.

"ठीक आहे तर. मी तुला चांगला हत्यारबंद करीन. शिवाय तुझी रात्र आनंदांत जावी ह्मणून खाण्यापिण्याचीही व्यवस्था करीन." असें विनायकरावांनीं मोठ्या आनंदानें त्याला सांगितलें.

लक्ष्मणाच्या धैर्याबद्दल सगळ्या चाकरमाणसांना आश्चर्य वाटलें, आणि सगळीं "रात्र केव्हां होते," ह्मणून वाट पाहूं लागलीं. कित्येकांस त्याच्या बद्दल धास्तीही उत्पन्न झाली. नानी तर रडूं लागली आणि अन्नपूर्णा जरी भय पावली होती, तरी जगांत भूतांचें अस्तित्व केवळ संशया वरून आहे असें तिला वाटे.

रात्र पडण्याचे आधींच विनायकरावांनीं देऊबाईस ती खोली झाडून ठेवायाला सांगितलें. पण तिनें "त्या खोलींत मी पाय ठेवणार नाहीं." असें साफ सांगितलें. दुसऱ्या कोणाचेंही धैर्य त्या खोलींत पाय ठेवण्याचें होईना!

शेवटीं रात्र झाली. सगळ्यांनीं जेवणखाण आटपलें. भोजन केल्यावर विनायकरावांनीं लक्ष्मणाला आपल्याजवळ बोलाविलें, आणि पुष्कळ धैर्याच्या गोष्टी सांगून एक तरवार बक्षीस दिली.

"हें शस्त्र पुष्कळ महावीरांवर मीं चालविलें आहे; पण आज तुला हें भुतांच्या अंगावर चालवायाचें आहे. ह्मणून फार सावधगिरीनें काम कर. उद्यां प्रातःकाल होतांच मी स्वतः तुला त्या खोलींतून बाहेर काढण्यासाठीं येईन."

लक्ष्मणानें त्यांस नमून ती तरवार घेतली आणि सांगितलें,

" महाराज, मी खात्रीनें सांगतों कीं, उद्यां प्रातःकाळा नंतर या महालांत भूतांचें नांव निवणार नाहीं, असा बंदोबस्त आजच्या रात्रींत करतों. आपण अगदीं काळजी करूं नये."

असें ऐकतांच विनायकराव त्याला घेऊन त्या खोलीकडे निघाले. सगळीं चाकरमाणसें त्यांच्या पाठीमागून एका छबिन्यांत चालल्याप्रमाणें निघालीं. खोलीजवळ येतांच सगळीं उभीं राहिलीं. पुढें जाण्याची हिम्मत कोणालाही होईना. सगळ्यांच्या मनांत आश्चर्य, चिंता, भय हे विकार उद्भवले होते.

लक्ष्मण तेथें आल्यावर सगळ्यांना भेटला आणि आपल्या हातानें खोलीचें कुलूप काढून पहिल्यानें स्वतः एकटा आंत शिरला. विनायकराव आणि हरि त्याच्यामागून आंत गेले. हरीनें लक्ष्मणासाठीं एक मद्याचा शिसा व फराळाचें टोपलें बरोबर आणलें होतें. त्यांनीं आंत येतांच आधीं दाराला कडी लावून घेतली. त्याचा मतलब इतकाच कीं, त्यांच्या न कळत मागून कोणी आंत शिरून लपून बसूं नये. नंतर त्या तिघांनीं त्या खोलीचा चांगला तपास केला आणि पहात पहात ते जेथें पलंग ठेवलेला होता; त्या ठिकाणीं आले. ही पलंगाची खोली त्या महालाच्या अगदीं शेवटच्या टोंकाला होती, आणि हीच " भुतांची खोली " हें नांव पावलेली होती. तरी ह्याच खोलींत रात्र काढण्याचा लक्ष्मणानें निश्चय केला.

नंतर त्यानें आपली तरवार तेथें असलेल्या टेबलावर ठेवली आणि बरोबर कोळसा घालून. तयार करून आणलेली शेगडी त्यानें पेटविली. तो शिसा व टोपलेंही त्यानें टेबलावरच ठेवलें; आणि आपली रात्रीची सगळी व्यवस्था लाऊन घेतल्यावर त्यानें विनायकराव आणि हरी यांस " बाहेर जा " ह्मणून सांगितलें. तेव्हां विनायकरावांनीं ' ज्यांत मायाच पूर्ण आहे ' अशा शब्दांनीं त्याला पुनः धैर्य देऊन सांगितलें:—" भूत किंवा पिशाचें जरी तुला दिसलीं व जरी भय वाटलें, तरी तूं आमच्या समोर येण्यास लाजूं नको. तूं उद्यां प्रातःकाळीं सहीसलामत राहून बाहेर

आलास, म्हणजे या तुझ्या सेवेबद्दल मी तुला सुखी करीन."

आपल्या बहादरीवर विश्वास ठेवून लक्ष्मणानें विनायकरावांस हिमतीचें उत्तर दिलें आणि ज्या दारानें आंत येऊन त्यानीं तें लावून घेतलें होतें, त्या दारापर्यंत जाऊन, त्यांस बाहेर घालवून लक्ष्मणानें पुनः आंतून कडी लावून घेतली. त्यानें आपली खात्री व्हावी अशा उद्देशानें पुनः हातांत दिवा घेऊन ती सगळी खोली आणखी एक वेळ तपासली.

तो पहात पहात पलंगाच्या खोलींत आला. शेगडी नुकीच पेटलेली असल्यामुळें तिचा धूर सर्पाचीं रूपें धरून तेथील कडी पाटावर पसरत चालला होता.

लक्ष्मण त्या शेगडीजवळ उभा राहिला आणि ज्या खोल्यांतून तो फिरून आला होता, त्यांच्यावर एकदम दृष्टि फिरवूं लागला. तो आतां विचार करूं लागला कीं, "हा अफाट रंगमहाल कित्येक वर्षें ओसाड पडलेला असतां या वेळेस यांत मी एकटाच उभा आहे. आतां इतका तपास करूनही जर कांहीं चोरटे यांतल्या यांतच लपून राहिलेले असले, व ते मजवर चालून आले; तर माझें एकट्याचें कांहीं चालणार नाहीं, हें खरेंच आहे. पण मदतीसाठीं जर येथून ओरडूं लागलों, तर तें बाहेर कोणाला ऐकूंही जाणार नाहीं." याप्रमाणें अनेक विचार त्याच्या मनांत आले आणि सहज त्याची दृष्टि शेगडीवर गेली. तेव्हां त्या शेगडीकडे पाहतांच तो एकाएकीं चमकला व त्याचें काळीज धडधडा उडूं लागलें.

शेगडीकडे पाहतांच त्याला असें वाटलें कीं, शेंकडों मानवरूपी आकार त्या भिंतीवर उड्या मारताहेत व कित्येक पलंगाच्या मच्छरदाणींतून बाहेर पडून शेगडींत उड्या टाकताहेत. तो तें पाहतांच फिक्का पडला, गांगरला आणि दिङ्मूढ होऊन आगच्याजागीं स्तब्ध उभा राहिला. काय करावें, हें त्याला सुचेना. तरी थोड्याच वेळांत त्याची चूक त्याच्या ध्यानांत आली. जे आकार उड्या मारतात असें त्याला वाटलें होतें, ते कांहींच नव्हते. तरी पेटलेल्या शेगडींतील अग्नीचें धुरावर परावर्तन पडून तो धूर जिकडे जिकडे पसरत

होता, तिकडे तिकडे तशी कृति घडल्याचा सहज भास होत होता.

आसपास सगळें शांत होतें; रात्र फार झाली होती; वाऱ्याच्या सोसाट्याशिवाय कांहीं ऐकूं येत नव्हतें; आणि अशा वेळीं त्या भव्य रंगमहालांत लक्ष्मण एकटा होता. त्यानें ज्या टेबलावर आपली तरवार, शिसा वगैरे साहित्य ठेवलें होतें, त्याच्याच शेजारीं एक खुर्ची ओढून घेतली आणि हुशारी येण्यासाठीं तो शिसा उघडून, त्यांतील द्रव्याचा आस्वाद घेऊन, व मेवामिठाई खाऊन निवांत होऊन खुर्चीवर बसला. थोडावेळ इकडे तिकडे पाहिल्यावर त्यानें केव्हांना "कथाकल्पतरु" या नांवाचें अनेक चमत्कारिक गोष्टींचें पुस्तक आपल्याबरोबर वाचण्यासाठीं आणलें होतें, तें उघडलें: तों:—

भूत झालेला सरदार.

या नांवाची गोष्ट निघाली. ती खालीं लिहिल्याप्रमाणें:—

"बिरवाडी या नांवाच्या गांवात एक मातबर सरदार रहात होता. त्याच्या महालांत अहोरात्र मेजवान्या, खाणें, नाच व रंग उडत असे. त्यानें पुष्कळ लढायांत पराक्रम गाजवून मोठमोठाले किताब आणि मौल्यवान चांद बक्षीस मिळविले होते.

"तो सरदार आपल्या उतार वयांत वर लिहिलेले ठिकाणीं येऊन राहिल्यावर अनेक चमत्कारिक प्रसंग घडून आले. त्यांतील एक एथें उतरून घेतों, एके रात्रीं तो सरदार नाच, गाणें वगैरे पुरें झाल्यावर निजण्यासाठीं आपल्या खोलींतील बिछान्यावर जाऊन बसला. त्याचीं चाकरमाणसें बाहेर पहारा करीत होतीं. परवानगीशिवाय कोणींही आंत येऊं नये, असा त्याचा सक्त हुकूम होता. असें असतां तो जों पाहतो तों त्याच्या रोज बसण्याच्या खुर्चीवर कोणी परकी मनुष्य बसला आहे. सरदार समजला कीं, हा गुप्तपणानें माझ्या खोलींत शिरला असावा. असें मनांत आणून त्यानें आपली तरवार खेंचली आणि त्या परक्या मनुष्यावर चाल केली. पण तो मनुष्य भयाचें चिन्ह न दाखवितां त्या सरदाराच्या पुढें आला आणि हळूच बोलला, " तूं अगदी धास्ती करूं नको. मी

कांहीं तुझ्याजवळ लढण्यासाठीं या ठिकाणीं आलों नाहीं. पण एक फारच भयंकर व गुप्त गोष्टीची बातमी तुला कळविण्यासाठीं आलों आहें."

"त्या परक्या मनुष्याची मृदु भाषणें ऐकतांच सरदारानें आपली तरवार म्यान केली आणि तो तेथें कसा व कोणत्या कारणासाठीं आला होता, याबद्दल त्याला प्रश्न केला. पण त्या परक्या मनुष्यानें त्याला त्यावेळेस एकाही प्रश्नाचें उत्तर न देतां सांगितलें कीं, या गांवाच्या अरण्याच्या पलीकडल्या टोंकापर्यंत तूं मजबरोबर एकटाच येशील, तर जो गुप्त बनाव आहे, तो मी तुला सांगेन.

"हें सांगणें त्या सरदाराला भय उत्पन्न करण्यासारखें होतें. त्यानें विचार केला कीं, जो अगदीं अनोळखी, त्याच्या बरोबर अपरात्री एकटे जंगलांत जाणें हे फारच धोक्याचें आहे. यांत याचा कांहीं तरी वाईट मतलब असला पाहिजे. अशा अनेक विचारांमुळें त्यानें त्या परक्या मनुष्याबरोबर एकटें जंगलांत जाण्याचें नाकबूल केलें आणि सांगितलें, 'तुला जर कांहीं सांगायाचें असलें, तर तें ह्या महालांतच उभा रहा व सांग, मी तें ऐकण्याला तयार आहें. हे बोलत असतां सरदारानें त्याला नखशिखांत निरखून पाहिलें. त्याचा पोषाख सरदारी बाण्याचा असून तो शिरापासून कंबरेपर्यंत हत्यारांनीं भरलेला होता, आणि इतक्या सगळ्या लक्षणांवरून तो मोठा बलवान असावा, असें सिद्ध होत होतें. "असा उंची दर्ज्याचा मनुष्य," सरदार आपल्या मनांत विचार करूं लागला:—"मला मारून टाकण्यासाठीं नेण्याचा नीच उद्योग करील, असें वाटत नाहीं. बरें, याच्या बोलण्यावरून असें दिसतें कीं, त्यांत कांहीं तरी खोल मतलब भरलेला आहे. तर तो कोणता? हें मला समजलेंच पाहिजे."

इतकें मनांत आणून तो पुनः स्तब्ध झाला आणि त्या परक्याला आणखी बारीक नजरेनें तपासूं लागला.

"जर माझ्याबरोबर माझ्या पांचच शिपायांला तूं येऊं देशील तर तूं जिकडे सांगशील तिकडे येण्यास मी तयार आहें."

त्या परक्या मनुष्यानें डोकें हालविलें आणि पूर्ण गंभीरपणानें त्याला सांगितलें:-"नाहीं. जें मी तुला सांगणार आहे, तें फक्त तिघांनाच ठाऊक आहे, आतां तेंच जर तूं जाणशिल, तर तुला व तुझ्या कुटुंबाला लाभदायक होणार आहे. जर तेथें येशील, तर सुखी होशील! नाहींतर शेवटपर्यंत पश्चात्ताप करीत राहशील. बोल, काय मर्जी आहे? मी आपल्या शस्त्रास्त्रांची शपथ घेऊन सांगतों कीं, तुझ्या एका केंसालाही माझ्याकडून धक्का लागणार नाहीं. तुला गरज असेल तर चल; नाहींतर हा मी चाललों. मला वेळ नाहीं."

सरदारनें त्या मनुष्याकडे पाहिलें आणि "जावें कीं न जावें;" अशा विचारांत तो अगदीं गोंधळून गेला.

[ इतक्यांत लक्ष्मणाला कांहीं खडबडल्यासारखें वाटलें आणि त्यानें डोकें वर करून पाहिलें तों कांहीं नाहीं. त्यानें टेबलावरून दिवा उचलून पाहिलें, तरी कांहीं दिसेना. तेव्हां पुढें वाचूं लागला. ]

" सरदार खोलींतल्या खोलींतच कांहीं वेळ इकडून तिकडे फिरला आणि विचार करून त्याला ह्मणाला, 'तुझ्याबरोबर येण्याला मी मोठ्या आनंदानें तयार आहें. पण तुझें नांव आणि हुद्दा ठाऊक नसल्यामुळें जरासें भय वाटतें. तूंच सांग बरें, अशा अपरात्रीं भयंकर अरण्यांत एकटेंच येऊन मी मुद्दाम धास्तींत पडावें हें मला योग्य आहे? तर आतां तूं मला इतकेंच सांग कीं, तूं कोण आहेस? आणि येथें कसा आलास?"

" असें ऐकतांच त्या परक्या मनुष्यानें भिंवया चढवून राग आल्याचा आविर्भाव दाखविला. नंतर मोठ्या गंभीर स्वरानें बोललाः—" मी एक मराठा शिपाई आहें. मार्गांत येत असतां रात्र पडली आणि—पण मी पुढें सांगण्यास खुषी नाहीं. तुला येणें असेल तर ये, नाहीं तर हा मी निघालों."

" सरदारानें पुनः थोडीशी आनाकानी केली; पण लौकरच त्याच्याबरोबर जाण्याची तयारी केली. त्यानें आपली तरवार

कंबरेस बांधली व हातांत एक कंदील व मोठीशी काठी घेऊन त्याला' पुढें चल, असें सांगितलें. तें ऐकतांच तो जिन्यानें खालीं उतरून बागेंत आला व एक चोरदार उघडून बाहेर पडला. तें चोरदार मला एकट्यालाच ठाऊक आहे; अशी त्या सरदाराची समजूत होती; पण तें ह्या परक्यानें उघडतांच तो पुनः जरा आश्चर्यांत पडला. तरी त्याच्या मागून अरण्यपंथानें चाललाच होता. वारा फार असल्यामुळें प्रत्येक पावलास दिवा जाण्याचें भय तर त्याला वाटतच होतें.

( येथें लक्ष्मणानें बुकांतुन पुनः डोकें बाहेर काढलें व आपल्या दिव्याकडे पाहिलें. त्यावर गुल आला होता तो कातरला आणि त्याला पूर्ण प्रकाशित करून पुनः वाचण्याचें काम पुढें चालविलें. )

" दोघेही येतां येतां किर्र झाडींत आले व तो देखावा पाहून सरदाराला भय वाटलें. तो एकदम उभा राहिला व ह्मणाला:—" तूं मला कोणीकडे घेऊन चालला आहेस? मला नीट सांग; नाहींतर आतां एक पाउलही मी याच्या पुढें टाकणार नाहीं."

"येथून ती जागा आतां अगदीं जवळ आहे." त्यानें गंभीरपणानें सांगितलें, ' तूं भितोस कां? मी शपथ कसली घेतली आहे? अगदींच विसरलास? चल मी शूर आहें. चोरासारखें कर्म कधींच करणार नाहीं आणि वचनाला मागें घेणार नाहीं. चल तुझ्या केंसालासुद्धां धक्का नाहीं.'

" याप्रमाणें त्यानें त्या सरदाराची खात्री करितांच तो पुढें चालूं लागला. दोघेही एका टेंकडीजवळ आले. त्या ठिकाणीं झाडी इतकी गच्च होती कीं, आकाशाचा यत्किंचितही भाग दिसत नव्हता, तरी तो शिपाई खिन्न मुद्रेनें पुढें चालतच होता. तो येतां येतां एका झाडाच्या बुंधाजवळ आला व त्या सरदाराला खालीं पहा अशी खूण करूं लागला. ती खूण समजून तो सरदार खालीं पाहतो तों एका मनुष्याचें शरीर छिन्नविछिन्न होऊन

रक्तानें भरलेलें असें पडलें आहे. त्याच्या मस्तकावर एक फार मोठी जखम झालेली होती आणि तें मनुष्य मरण पावलेलें होतें.

" तो सरदार तो विलक्षण प्रकार पाहतांच त्याला आणि बरोबर आलेल्या मनुष्याकडे पाहूं लागला. नंतर पडलेल्या प्रेतांत थोडा तरी दम आहे कीं नाहीं! हें पाहण्यासाठीं तो त्याला हालविण्याचा प्रयत्न करूं लागला असतां त्या मनुष्यानें मोठ्या कष्टानें 'त्याला तसें करूं नको. त्यांत जीव नाहीं' असें सांगितलें, तेव्हां त्यानें तसें करण्याचें सोडून दिलें.

नंतर हातांतील कंदील पुढें करून सरदार त्या पडलेल्याचें तोंड पाहूं लागला, तों त्याच्या आश्चर्याला पार नाहींसा झाला! जो मनुष्य त्याला महालांतून येथ पर्यंत घेऊन आला; तोच मनुष्य तो होता! त्यानें फिरून मागें त्या शिपायाकडे पाहिलें तों त्याचा आकार हळू हळू बदलत चालला. तो असा कीं, कमी कमी दिसत असतां शेवटीं अगदींच दिसेनासा आणि एक अशरीरिणी वाणी ( आकाश वाणी ) त्याला ऐकूं आली.

[ इतकें वाचीत आहे तों कोणी बोलत असल्याचा लक्ष्मणाला भास झाला आणि तो होतांच एका तडफेबरोबर तो उभा राहिला. त्यानें त्या पलंगाकडे पाहिलें, पण त्यावरील मच्छरदाणीशिवाय दुसरें कांहींच त्याला दिसलें नाहीं. तरी त्याच्यांत कांहीं श्वासोच्छ्वास टाकण्याचीही हिम्मत राहिली नाहीं. तो लक्ष्यपूर्वक ऐकूं लागला; पण समुद्राच्या लाटा आणि वाऱ्याचा सोसाटा यांशिवाय दुसरें कांहींच त्याला ऐकूं आलें नाहीं. ]

" त्या सरदाराला जी आकाशवाणी ऐकूं आली ती अशी:— 'सातांऱ्यांतील एका शूर सरदाराचें प्रेत तुझ्या पुढें पडलें आहे. रणभूमींतून परत येत असतां याला कित्येक चांडालांनीं घाला घालून मारून टाकलें आहे. या मरणाराच्या शूरत्वाला साजेल, अशी या प्रेताची व्यवस्था कर आणि त्या चांडालांचा शोध लावून त्यांना योग्य शिक्षा देवीव. हें करशील तर आपल्या मुलांबाळांसह सुखी होशील; नाहीं तर हयगयींची कडू फळें चाखशील.'

"तो सरदार हें ऐकून आश्चर्यांत व धास्तींत पडला होता. तरी तसाच आपल्या महालांत परत आला आणि मनुष्यें पाठवून त्यानें या प्रेतास मूठमाती देवविली व त्या रानांतील चोरांचा शोध लावून त्यानें त्यांनाही योग्य शिक्षा करविली."

\+ + × + + + + +

लक्ष्मणाची गोष्ट संपतांच त्याला झोंपेच्या डुलक्या येऊं लागल्या. त्यामुळें एका कोंचावर पडून तो घोरूं लागला. तरी क्षणोक्षणीं त्यानें झोंपेंतून दचकून उठावें आणि कांहीं नाहीं असें पाहून पुनः निजावें. कित्येक वेळीं त्याला स्वप्नांतच भुतें दिसलीं आणि भिऊन जागा होऊन पुनः निजला.

यानंतर त्या लक्ष्मणाची काय व्यवस्था झाली? याविषयींचा विचार आतां पुढें करण्यांत येईल.

---

## प्रकरण ३३ वें.

१ दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं विनायकराव लक्ष्मणास उठविण्यासाठीं त्या खोलीजवळ गेले. ज्या दारानें रात्रीं तो आंत गेला होता, त्या दाराजवळ जाऊन पहिल्यानें त्यांनीं हांका मारल्या; जबाब नाहीं. तेव्हां 'तो अगदीं शेवटच्या खोलींत निजला असेल;' असें त्याच्या मनांत आलें आणि त्याला ऐकूं जावें ह्मणून ते दरवाजा गडबडावूं लागले. तरी आंत कांहीं हालचाल नाहीं. तेव्हां 'तो कदाचित् बेशुद्ध होऊन पडला असेल,' असें मानून त्यांनीं आपलीं सगळीं चाकरमाणसें बोलाविलीं आणि त्यांच्याकडून दुसरीं हत्यारें आणवून त्यांच्या मदतीनें तो दरवाजा मोकळा केला. नंतर स्वतः विनायकराव हरीला बरोबर घेऊन कांहीं धीट नोकरांसह त्या रंगमहलांत शिरले.

सगळे भाग स्मशानाप्रमाणें अगदीं शांत होते. विनायकराव इतर खोल्यांकडे न पाहतां समोर पलंगाच्या खोलीपर्यंत गेले. पण आंत न शिरतां तिच्या बाहेरच उभे राहिले, आणि लक्ष्मणास हांका मारूं लागले; तरी जबाब नाहीं, इतकेंच नव्हे, पण आंत

कोणी मनुष्य असेल असा भासही नाहीं. तेव्हां मात्र त्यांच्या मनांत धास्ती उत्पन्न झाली. त्यांत सगळ्या बाऱ्या झांकलेल्या असल्या कारणानें त्या सगळ्या रंगमहालांत किट्ट काळोख पडला होता.

विनायकरावांनीं एका चाकराला सगळ्या बाऱ्या उघडायाला सांगितलें. तो जो खिडक्या उघडण्यासाठीं गेला; तो कसली ठोकर लागून पडला! व तो पडतांच जो आवाज झाला, त्यामुळें सगळा रंगमहाल दणाणून राहिला! त्या आवाजामुळें सगळे चाकर जे भय पावले ते विनायकरावास आणि हरीस त्या भव्य महालांत सोडून—शेंपट्या वर करून—बाहेर पळाले!

परंतु ह्या धांदलीच्या वेळीं स्वतः विनायकराव त्या पलंगाच्या खोलींत शिरले आणि त्यांनीं आपल्या हातानें बारी जेव्हां उघडली तेव्हां त्यांना कळलें कीं, ज्या खुर्चीवर लक्ष्मण वाचायाला बसला होता, त्या खुर्चीची ठोकर लागल्यामुळें तो चाकर पडला होता. पण लक्ष्मण कांहीं त्या खुर्चीवर नव्हता आणि कोठें त्याचा मागमोसही लागण्यासारखें नव्हतें. तो प्रकार ध्यानांत येतांच विनायकरावांस दुप्पट धास्ती उत्पन्न झाली. त्यांनीं सगळ्या बाऱ्या उघडल्या, पण महालांत कोण आहे? कोणीच नाहीं. त्यांनीं तो पलंग, बिछाना, वगैरे सगळें तपासलें, पण लक्ष्मणाचा ठिकाण नाहीं! त्याच्या शिवाय बाकी सगळें जशाच्या तसें आहे.

विनायकराव विचार करूं लागले कीं, तो धास्तीमुळें कदाचित् महालांतून निघून गेला असेल; पण त्यानें जावें कसें! त्यांतून बाहेर जाण्याला दरवाज्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. बारींतून उडी टाकून पळाला ह्मणावें; तर त्या बाऱ्या इतक्या उंच होत्या कीं, त्यांतून उडी टाकून कोणी जाईल तर मरेलच. तेव्हां तसाही असंभवच!

विनायकराव मोठ्या विचारांत पडले. रात्रीं महालांत कांहीं गडबड किंवा मारामारी झाली असेल असें ह्मणावें, तर खुर्ची, टेबल, शिसा, टोपलें, तरवार, सगळें जागच्याजागीं जसेंच्या तसें ठेवलेलें होतें. कोणतीही वस्तु इकडल्या तिकडे झाली आहे, असा

संशयही येत नव्हता. तो कदाचित् एकाद्या चोरदारानें तर निघून गेला नसेल? पण चोरदारच कोठें आहे? विनायकरावांनीं आपल्या हातानें भिंतीवरील सगळे पडदे उघडून पाहिले, पण चोरदाराचा कांहीं कोठें माग दृष्टीस पडेना.

याप्रमाणें महालांत अनेक प्रकारें शोध केल्यावर विनायकरावांनीं आपल्या हातानें सगळीं दारें मजबूत बंद केलीं आणि त्यांच्या किल्या आपल्याजवळ ठेवून घेतल्या. नंतर सगळ्या माणसांना त्यानें सांगितलें कीं, "आसपासच्या खेड्यापाड्यांतून बारीक रीतीनें लक्ष्मणाचा शोध करा."

लक्ष्मण महालांतून नाहींसा झाल्यामुळें त्यांतील चाकरमाणसांत भूतांविषयीं अधिक चर्चा सुरू झाली. तेव्हां सर्वांचा भ्रम दूर करण्यासाठीं एके रात्रीं स्वतः विनायकराव आणि हरि यांनीं त्या खोलींत राहून पाहरा करण्याचा निश्चय केला. तेव्हां महालांतील सगळ्या चाकरमाणसांनीं आणि सरदार फत्तेसिंह यानेंही त्यांना तसें न करण्याबद्दल आग्रह केला. परंतु त्यांनीं कोणाचेंही ऐकलें नाहीं.

त्या दिवशीं रात्र होतांच विनायकराव आणि हरि हे दोघे त्या रंगमहालांत पाहरा करण्यासाठीं गेले. आदल्या दिवसाप्रमाणें त्यांना तेथपर्यंत पोंचविण्यासाठीं सगळीं माणसें गेलीं होतीं. त्या बापलेकांनीं आंत जातांच पहिल्यानें दार बंद करून घेतलें; आणि त्या महालाचा कोनकोपरा सगळें शोधून पाहिलें आणि शेवटीं जेथें लक्ष्मण बसला होता; तेथेंच जाऊन पाहरा करण्यासाठीं बसले.

प्रातःकाल होतांच उमराव फत्तेसिंह विनायकरावांच्या समाचारासाठीं त्या रंगमहालांत गेले. तों त्या दोघांचीही तोंडें अगदीं उतरलीं होतीं व ते फारच भय पावले आहेत असें पाहणारास दिसत होतें. त्या दोघांनीं जरी हंसून कांहीं नाहीं, असें दाखविण्याचा यत्न केला, तरी ते आनंदांत नाहींत हें उघडपणें दिसत होतें. त्यांना कोणी अगदीं शोषून घेतल्याप्रमाणें दिसत होतें.

विनायकरावांच्या स्थितींत एकारात्रींत इतका फेरफार झालेला पाहून उमराव फत्तेसिंह फार अजब झाले. तो फेरफार कशानें झाला ? असें जेव्हां त्यांनीं विनायकरावांला विचारलें, तेव्हां त्यांनीं मोठ्या दुःखी अंतःकरणानें असें सांगितलें:—" प्रिय मित्रा, याविषयीं तूं मला एकही प्रश्न कधीं विचारूं नये. याचा खुलासा माझ्या पासून तुह्मांस कधींही मिळणार नाहीं. आतां एवढें सांगण्याला मी लाजत नाहीं, अगदीं मोकळ्या मनानें सांगतों कीं, कालची रात्र आह्मीं अगदीं बेचैन स्थितींत घालविली. आह्मांला लक्ष्मणाचा शोध लागला नाहीं, आणि त्याच्या शोधाच्या नादीं लागल्यामुळें काय झालें ? या गोष्टीचें सविस्तर वर्णन आमच्यानें कधींही होणार नाहीं. विनायरावांचा समाचार घेऊन फत्तेसिंह हरीकडे गेला; पण त्याचीही तीच स्थिति !

---

## प्रकरण ३४ वें.

लक्ष्मण कसा गुप्त झाला ? त्याला भुतांनीं कसें घेरलें ? आणि विनायकराव व हरि यांस कोणीं भिवतून शोषण केलें ? या गोष्टींचा शोध आपण पुढें गेल्यावर खचित लावणार आहों. तूर्त अन्नपूर्णा काय करीत आहे ? हें पाहूं या.

हिंदुस्थानांतील यशवंतकिल्यांतुन सुटून आल्यानंतर अन्नपूर्णेनें आपल्या मामाला जें पत्र पाठविलें होतें, त्याचें उत्तर आलें होतें; व त्यांत त्यानें तिला "तूं लौकर तुळशींत येऊन माझी भेट घे" असें लिहिलें होतें. कारण—हेळवांकांतील तिच्या बापाचें घर जें आजपर्यंत भाड्यानें दिलें होतें, त्याची मुदत संपली होती; आणि आतां अन्नपूर्णेला त्या घरांत ठेवण्याची व्यवस्था करण्यासाठीं तिचा मामा केशवराव तुळशींत येऊन राहिला होता. आणखी त्या पत्रांत असें लिहिलें होतें कीं, चिमाबाईच्या मिळकतीबद्दल अन्नपूर्णेनें मोरोबाच्या खतावर जी सही केली होती, तें खत रद्द करण्याबद्दल फिर्याद करण्याचें आतां कारण उरलें नाहीं. मोरोबा—ज्याला आपण सत्तिसाव्या प्रकरणांत

कैद केलेलें पाहिजे आहे तो—मरण पावला होता. त्यामुळें अन्न-पूर्णेला मिळालेल्या मिळकतीवर आतां कोणाचाही दावा चालणार नाहीं. केशवराव जो आजपर्यंत अन्नपूर्णेला तिच्या गरिबीबद्दल तुच्छ मानीत होता, तो तिला अपरंपार इस्टेट मिळाली, असें पाहतांच तिला चाहूं लागला आणि तिला आपल्याकडून होईल तितकी मदत करण्यासही सिद्ध झाला. पैशानें त्याला दयाळू केलें! एका अनाथ बच्याला मदत करण्यास आप्तपणानें नाहीं, मनुष्यपणानेंही नाहीं, भाऊपणानें तर नाहींच; पण एकट्या द्रव्यानें त्याला वळविलें!

अन्नपूर्णेनें ही गोष्ट विनायकरावांस कळविली, तेव्हां ती सुखी झाली असें जाणून त्याला फार संतोष झाला; आणि तो आनंदानें तिला ह्मणाला:—"मलाही कुटुंबासहित थोड्या दिवसांनी तुझ्या गांवाकडे यावयाचें आहे. तर आपण बरोबरच जाऊं? कसें हें तुला आवडतें? सांगवें."

अन्नपूर्णेनें मोठी दिलगिरी दाखवून तें नाकबूल केलें व त्याचें कारण तिनें असें सांगितलें कीं, "माझा मामा माझी भेट घेण्या-साठीं मुद्दाम तुळशींत येऊन राहिला आहे. ह्मणून मला लौकर तिकडे गेलें पाहिजे. आतां, आपण जेव्हां तिकडे याल; तेव्हां माझ्या गरीबाच्या घरीं आल्यावांचून पुढें जाऊं नये; अशी माझी हात जोडून विनंति आहे." हें मागणें विनायकरावांनीं मान्य केलें.

अन्नपूर्णेनें तेथून जाण्याचे आधीं केशवस्वामींच्या मठांतलि योगिनींचें दर्शन व बोरकर नानाची भेट घेणें योग्य आहे, असें मनांत आणलें. ती त्या मठांत गेली, तों तेथेंही भुतांनीं लक्ष्मणा-ला उचलून नेलें आणि पुत्रासह विनायकरावांस भिवविलें, इत्या-दि गोष्टींची चर्चा चालली होती.

त्यांत पार्वतीबाई ह्मणून एक जोगीण होती; तिचें मत असें होतें कीं, विनायकरावांनीं स्वतः तपास केला, हे फार चांगलें केलें, त्यांना या भुतांनीं कांहीं केलें नाहीं; यावरून ते पुण्यवान आहेत.

पण या मताला यशोदाबाई ह्मणून एक जोगीण होती, ती अगदी विरुद्ध होती. तिचें वदन क्षणांत खिन्न आणि क्षणांत सुप्रसन्न दिसत असे. जेव्हां जेव्हां विनायकरावांच्या गोष्टी निघत, तेव्हां तेव्हां ती क्रोधांत आहे, असें दिसत असे; आणि त्या महालाच्या पूर्वीच्या मालकिणीला ( वेणूबाईला ) ती पातक्यांत गणीत असे. ती केव्हां केव्हां शांतपणानें बसून मोठ्या शहाणपणाच्या गोष्टी सांगत असे; पण केव्हां केव्हां मस्तक फिरविल्याप्रमाणें करून पाहिजे तसें बडबडत असे. एकादे वेळेस पश्चात्ताप करी आणि एकादे वेळीं विरहानें तळमळल्यासारखें दाखवी.

सगळ्यांच्या गोष्टी चालल्या असतां ती यशोदा एकदम मोठ्यानें बोलूं लागली:—" खऱ्याला मुळींच खोटेपणाचा दोष नाहीं. तरी त्या विनायकराव सरदारानें खरेपणावर दावा चालवूं नये. त्यानें या जगांत येऊन आपलें कर्ज फेडलें नाहीं. त्याला अजून पुष्कळांचें देणें आहे, तर तो असो; पण जगांत असा तरी कोण आहे ? कीं जो खात्रीनें 'मी निर्दोष आहे ' असें सांगेल. मनुष्यानें जन्म घेतला, कीं लगेच त्याजवर दोष येऊन बसला. विचार करा ! आपणां सर्वांस आपापल्या पातकांस्तव कशा भयंकर जागीं जावें लागेल ! हो."

असें बोलत असतां तिनें मोठ्यानें किंकाळी मारली आणि अन्नपूर्णेला ती ऐकतांच भय वाटलें. कारण-ती जोगिण एकसारखी तिच्याच तोंडाकडे पहात होती. थोड्या वेळांत ती आपली दृष्टि फिरवून अन्नपूर्णेकडे आली आणि तिचा हात धरून ह्मणाली:"

" तूं अजून लहान आहेस—निर्दोष आहेस ! ह्मणजे तूं अजून अपराध केला नाहींस. तरी तुझ्यांत ते अंकुर आहेत ! ते अगदीं पूर्ण भरलेले आहेत! तरी दिलाचा दंश अजून तुला ठाऊक नाहीं. तो ठाऊक होणारच. पण त्याच्या आधीं जर आपल्याला मरण आलें कीं नाहीं, तर तें चांगलें ! "

ज्या गंभीरपणानें व वेडेपणानें किंवा भोळेपणानें वरील शब्द उच्चारले गेले होते; तितक्याच भोळेपणामुळें अन्नपूर्णेच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागला.

" अः हं! काय! असें आहे; अशी तरुण असून अशी दुर्दैवी! अरेरे! तर तूंही माझ्यासारखाच अपराध केला असशील! तर ये, आपण दोघी एकमेकींला कडकडून भेटूं! " असें बोलून यशोदा तिला भेटण्यासाठीं उठली; पण तितक्यांत अडखळून ह्मणालीः—" पण नाहीं! नाहीं! पाप्यांनीं एकमेकांना भेटायाचें. ह्मणजे! त्याच्यांत दया, माया आणि प्रीति कोठून असणार! त्यांना सुख कशापासून मिळावें? अरेरे! तें एक वेळ मला मिळत होतें! पण आतां ते दिवस गेले! त्या दिवसांत माझ्या नेत्रांतून शांत प्रेमाश्रु पडत असत! आतां उष्ण दुःखाश्रूंचा वर्षाव होतो. पश्चात्तापरूप पवित्रोदकाच्यानेंही माझ्या पातकांचे डाग धुतले जाणार नाहींत! हाय हाय!! "

" अगे, तुझे विचार चुकीचे आहेत. पश्चात्ताप पाहिजे तसल्या पातकांची शुद्धि करणारा आहे! भोळ्या भावानें केलेली भक्ति भगवंताला भावतच असते! " इतर जोगिणी तिला समजावून " तूं आतां प्रार्थनेवर विश्वास ठेव, ह्मणजे मुक्त होशील. " असें सांगूं लागल्या.

" माझी प्रार्थना परमेश्वराला पसंत पडणार नाहीं! माझी पातकें असंख्य व अनिवार्य आहेत? तीं कधींही नाहींशी होणार नाहींत! यशोदा असे बोलते तों तिला आपल्यासमोर कोणी उभे आहे असें वाटलें; आणि ती त्याला भिऊन बोलली,—" हो! हो! अरे नाहीं! आतां माझें मस्तक फिरूं लागलें! तूं माझ्यापुढून जा! अजूनही तूं मला दुःख देणार काय? अजूनही तूं माझी पाठ सोडीत नाहींस! अरे पण दिवसा तरी स्वस्थ बसूं दे मला! हायरे दैवा! सगळे पूर्वींचे देखावे मला आतां दिसताहेत! "

" ती कोणाकडे क्रोधानेंच व रुद्रीन मुद्रेनें पाहिल्याप्रमाणें करीत आतां स्थिर उभी राहिली. पण तो प्रकार पाहून दुसऱ्या जोगिणी घाबरल्या. तरी त्यांतीलच एकीनें तिचा हात धरून तिला दुसऱ्या खोलींत नेलें व शांत करण्याचे उपाय चालविले. पण तितक्यांत ती स्वतःच शांत झाली आणि बिछान्यावर पडून

व डोळे झांकून ह्मणाली:—" आतां ते गेले! त्यांनीं माझी पाठ सोडली! मला जरा निजूं दे, ह्मणजे मी बरी होईन."

ती गेल्यावर अन्नपूर्णा घाबरली आहे असें पाहून पार्वतीबाईनें तिला आपल्या खोलींत नेलें आणि त्या यशोदेविषयीं तिला जें ठाऊक होतें तें सांगितलें.

पार्वतीबाईनें अन्नपूर्णेजवळ जी गोष्ट सांगितली, तीवरून असें ध्यानांत येतें कीं, यशोदा ही कोणा सरदाराच्या पोटीं उत्पन्न झालेली होती; आणि प्रीतीमुळें अंध होऊन तिनें मोठें पातक केलें होतें. त्यामुळें शेवटीं तिला वेड लागलें. तिच्या बापानें ती ज्याचा धि:कार करीत होती, त्याच्याबरोबर तिचें लग्न केलें. तेव्हां तिनें आपल्या नवऱ्याला गुप्तरीतीनें ठार मारण्याची मसलत केली, पण ती फुटली; आणि त्यामुळें तिच्याच जिवावर प्रसंग आला. तेव्हां तिच्या बापानें तिला जोगिणीचा वेष देऊन पळविलें आणि या मठांत आणून ठेवलें व लोकांत ती मेली असें प्रकट केलें. येथें आल्यावर तिनें बरें व्हावें, पण दुर्धर पातकांच्या सांठ्यामुळें असें वेड लागलें.

ह्या गोष्टीवरून अन्नपूर्णेच्या मनावर चमत्काकारिक परिणाम घडला! ती विचार करूं लागली:— देऊबाईनें सरदारीण वेणूबाई-ची जी गोष्ट तिला सांगितली होती; (पहा प्रकरण ३१ वें.) तिच्या जोडीचीच ही गोष्ट मला ऐकूं आली! वेणूबाईचें तिच्या बापानें तिच्या मर्जीविरुद्ध एकाबरोबर लग्न लाविलें होतें. व यशोदेचें तसेंच होतें. पण सरदारीण वेणूबाई आपल्या भ्रताराच्या जुलमामुळें मरण पावली होती व यशोदेला तिच्या बापानें पळविलें होतें. यावरून वेणूबाई तीच यशोदा असे तर होतच नाहीं. शिवाय यशोदाबाईचा चेहेरा अन्नपूर्णेनें कधीं पाहिला, असें तिला वाटत होतें, पण कधीं व कोठें! हें कांहीं तिला आठवेना.

याविषयीं तिनें पार्वतीबाईला सुचविलें. पण ती हंसूं लागली आणि ह्मणाली,—" असें तर कधीं कधीं घडून येत असतें. त्यांत कांहीं विशेष नाहीं; तुझा आणि यशोदेचा तोंडवळा मला अगदीं

सारखा वाटतो. फार नाहीं; पण तुह्मी दोघीं बहिणी आहां कीं काय? असाही मला भास होतो."

अन्नपूर्णा हें ऐकून फारच विचारांत पडली. तिला असें वाटूं लागलें कीं, माझ्या बापाजवळची तसबीर सरदारीण वेणुबाई प्रमाणें आहे आणि देऊबाईनेंही तिला सांगितलें होतें कीं, तिचा व वेणूबाईचा तोंडवळा अगदीं एकसारखा तिला दिसला. बरें, आतां पार्वतीबाई सांगते कीं,'तुझा व यशोदेचा तोंडवळा सारखा आहे.' तर काय यशोदा, सरदारीण वेणूबाई, अन्नपूर्णेच्या बापाजवळच्या तसबिरींत उतरलेली स्त्री, आणि स्वत: अन्नपूर्णा ह्या चौघी बहिणी होत्या? अन्नपूर्णेला मोठाच भ्रम पडला. असें कसें व्हावें, हें तिला कळेना.

शेवटीं पहिल्यानें यशोदा कोण होती, हें समजण्याची अन्नपूर्णेला चटपट लागली आणि त्याविषयीं तिनें पार्वतीबाईला विचारलें कीं, 'हिचें व हिच्या बापाचें खरें नांव काय?' असें ऐकतांच पार्वतीबाई ह्मणाली,-"तुझ्या वयाला जितकीं वर्षें आहेत; तितक्यांच्याही आधीं ही यशोदा या मठांत येऊन राहिली आहे. इतकी जुनी जोगीण येथें दुसरी एकही नाहीं, कीं-जी यशोदेची पूर्ण माहिती सांगेल. या मठांत जी महंतीण आहे, तीही अलीकडचीच! यशोदा तिच्या आधींची आहे."

हें ऐकून अन्नपूर्णेला फारच संशय उत्पन्न झाला. वेणूबाईला मरून तिच्या जन्माइतकींच वर्षें झालेली. यावरून तिच्या मनाला असें वाटलें कीं, वेणूबाई तीच यशोदा असण्याचा पूर्ण संभव आहे. पण या गोष्टीबद्दल नि:संशय खात्री यशोदा सांगेल तर होणार आहे; दुसरा इलाज नाहीं.

वाचकहो, आतां आपणही भ्रम उत्पन्न करणारी अशी ही गुंतागुंत क्षणभर अशीच ठेवून देऊंया.

---

## प्रकरण ३५ वें.

यशोदाबाई या नांवाची जी जोगीण आहे, ती पहिली कोण असेल? या गोष्टीचा बरोबर तपास करण्याचे आधींच अन्नपूर्णेला नानीसहवर्तमान चिमाबाईचा गांव जो तुळशी, त्या गांवीं जावें

लागलें. तेथें येतांच तिचे पहिले दिवस तिला आठवले. वामनरावांबरोबर किती आनंदानें कालक्रमणा केली होती, त्या गोष्टीचें हुबेहुब चित्र तिला दिसूं लागलें ! तिचा प्रियकर वामनराव तिला स्मरला आणि त्याबरोबर नेत्रांतून अश्रुपात झाला.

चिमाबाईच्या महालांत तेथील रखवालदाराशिवाय दुसरें कोणी नव्हतें. केशवरावांनीं आपल्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें ते कांहीं तेथें थांबले नव्हते. त्यांनीं अन्नपूर्णेला देण्यासाठीं एक पत्र लिहून तेथील चाकराच्याजवळ दिलें होतें व त्यांत असें लिहिलें होतें कीं, "मी कांहीं फार जरूरीच्या कामासाठीं निघून गेलों."

पण अन्नपूर्णा तेथें एकटी पडली, त्यामुळें वारंवार वामनराव तिच्या मनांत येऊं लागला. विनायकरावांच्या घरीं त्याला धिःकारल्याबद्दल तिला वाईट वाटूं लागलें आणि त्याच्याबद्दल अनेक विचार तिच्या मनांत उद्भवले. वामनरावाविषयींचें प्रेम तिच्या मनांत पुनः जागृत झालें आणि पूर्वीं तो मोरोबाला नकळत गुप्तपणानें विवाहविधि उरकून घेण्याबद्दल सांगत होता; तें न ऐकल्याबद्दल खंती वाटूं लागली. तिला जरी पुष्कळ संपत्ति मिळालेली होती, तरी ती अप्रिय वाटूं लागली.

चिमाबाईनें मोरोबाबरोबर पाट लावण्याचे आधीं आपली बहुतेक दौलत पुरून त्याबद्दल यादीही मोठ्या तजविजीनें ठेवल्या होत्या. तशींच सगळ्या मालमिळकतीचीं खतेंपत्रें वगैरे मोठ्या सावधगिरीनें कधींही कोणाच्या ध्यानांत न येतील अशा ठिकाणीं लपविलेलीं होतीं. पण ती जेव्हां मेली, तेव्हां तिनें अन्नपूर्णेला सगळें सांगितलें होतें. त्याप्रमाणें महालांत आल्यावर नानीच्या मदतीनें तिनें आधीं यादी व खतेंपत्रें हस्तगत करून घेतलीं. नंतर त्याप्रमाणें खुणेखुणेनें सगळ्या जागा शोधितांच अन्नपूर्णेला रोकड, दागदागिने, भांडींकुंडीं मिळून सुमारें पन्नासलक्षांची दौलत मिळाली. त्याशिवाय बागा, मळे, शेतें इत्यादिक दहा लक्षांची मिळकत होती.

इतकें जरी मिळालें, तरी वामनरावाच्या वियोगानें तिला तें

सगळें तृणाप्रमाणें वाटलें इतमाम जरी वाढला, तरी आराम होईना. एके रात्रीं बिछान्यावर पडून तळमळत असतां तिला फिरावेंसें वाटलें आणि ती जी निघाली, ती सहज बागांत उतरली. रात्र फार झालेली असल्यामुळें जिकडे तिकडे शांत होतें. सहज कांहीं गडबडलें तरी अन्नपूर्णा चमकून उभी राहत असे. अशा समयीं आधीं चंद्रावरून ढग गेल्यामुळें तिला मनुष्यासारखी सावली पडल्याप्रमाणें वाटलें आणि तेवढ्यानेंच ती थबकली; तों खरोखरच एक मनुष्य तिच्या समोर येऊन उभा राहिला. मग काय, अबलाच ती! दबकली, व मागें सरली; परंतु वामनरावासारखें तोंड दिसल्यामुळें तिला जरासा धीर आला. पण तितक्यांत तो मनुष्य झाडींत निघून गेला, तेव्हां मात्र ती अन्नपूर्णा अगदीं दंग झाली व जागच्या जागीं उभी राहिली. एकाएकीं देखावा दाखवून गुप्त होण्याचें वामनरावाला तरी कारण काय? आणि वामनराव तेथें आला कसा?

ह्यानंतर पुनः अपरात्रीं एकटें बागेंत उतरण्याचें अन्नपूर्णेला कधींच धैर्य झालें नाहीं. तरी एक वेळ प्रिय मानलेल्या वामनरावाचें हास्यवदन पाहण्यास ती फार उत्सुक होती. एके बाजूनें रात्रीं बागेंत न उतरण्याबद्दल विचार व अक्कल तिला अडथळा करीत असे आणि एके बाजूनें प्रीति आपल्या जादूच्या गुप्त ओढीनें तिला रात्र झाली कीं बागेच्या बाजूला ओढीत असे. शेवटीं एका आठवड्यानंतर रात्रीं नानीला बरोबर घेऊन ती बागेंत उतरली. पण आपली भोळी नानी आपल्या भोळेपणाच्याच, पण विजातीय व भयंकर गप्पा सांगितल्याशिवाय कधीं राहिली आहे, ती आज राहील! तिनें जर एकादा काग पाहिला, तर त्यालाच ती बाघ ह्मणणार. कोणी वाटसरू दिसल्यास तो पेंडारी व खराच पेंडारी दिसल्यास तें तिच्या समजुतीनें भूत ठरणारच! काल रात्रीं बागेंत कोणी चोर आला होता. त्याच्या गोष्टी ती पहिल्यानें सांगूं लागली, त्यांत माळ्यानें त्याला गोळी मारली; तरी तो कांहीं सांपडला नाहीं. पण त्याला गोळी लागून चांगलीच शिक्षा झाली आहे. हें बागेंत सांडलेल्या रक्तावरून समजलें. ही एक गोष्ट

तिनें अन्नपूर्णेला सांगितली. पण ती संपेपर्यंत अन्नपूर्णेच्या आंगाचा थरकांप झाला! "जो चोर ह्मणून ही सांगते, तो वामनरावच असला पाहिजे." असें तिच्या मनानें घेतलें. जरी ती वामनरावाच्या दुराचरणावरून आलीकडे त्याला धि:कारूं लागली होती, तरी तें हृदयापासून नव्हे, केवळ वरकरणीं. त्याच्या जिवाला दु:ख व्हावें; असें कांहीं तिला वाटत नव्हतें. तिनें माळ्याला आपल्याजवळ बोलावून चौकशी केली, पण त्याच्यानेंही तो कोण होता, हें खात्रीनें सांगवलें नाहीं.

तेव्हां तर वामनरावाविषयीं तिच्या मनाला फारच काळजी उत्पन्न झाली. त्याला वर्मी लागून त्याच्या प्राणावर तर वेळ आली नसेल? या विचारांनीं तिला वेड लागल्यासारखें झालें. तिनें त्याचा शोध करण्याबद्दल पुष्कळ खटपट केली, पण कांहीं शोध लागेना.

शेवटीं पुष्कळ दिवसपर्यंत वाट पाहून तिला तुळशी सोडून आपल्या वतनावर ह्मणजे हेळवांकास जावें लागलें. विनायकरावांच्या भावडीकडून तिला एक पत्र आलें होतें व त्यांत तिनें लिहिलें होतें कीं, थोडक्यांच दिवसांत आह्मी कुटुंबासह तुझ्या घराकडे येणार आहों. तीं सर्व माणसें, हेळवांकापासून जवळच उमराव फत्तेसिंहाचें घर होतें तेथें येऊन राहिलीं होतीं. त्यांचा आदरसत्कार करण्यासाठीं अन्नपुर्णेला आपल्या स्वत:च्या घरींच जाणें भाग पडलें. तेव्हां ती तुळशींतील मिळकतीची आपल्या मनासारखी व्यवस्था करून नानीला बरोबर घेऊन हेळवांकास गेली.

सायंकाळच्या सुमारास ती हेळवांकांत आपल्या घरीं आली. तेथें येतांच तो महाल व त्यांतील प्रत्येक जागा तिला तिच्या बाळपणची आठवण देऊं लागली. त्या ठिकाणीं आनंदाश्रु टाकून भरलेलें हृदय खालीं केल्यावर तिनें आपल्या जुन्या दासीला ताराबाईला भेटण्याचा विचार मनांत आणला.

वाचकांला स्मरण असेलच कीं, केशवरावानें—अन्नपुर्णेच्या मामानें—ताराबाईला तिच्या वार्धक्याबद्दल विचार न करितां—

अन्नपुर्णेच्या महालांतून हांकून लावलें होतें. हल्लीं ती त्या महालापासून जराशी दूर एका लहानशा झोंपड्यांत रहात होती. तिनें आपल्या हातानें त्या खोपटाच्या सभोंवतीं लहानसा टुमदार बागही तयार केला होता. तो बाग पाहतांच अन्नपुर्णेला आनंद झाला. ज्याप्रमाणें पूर्वीं तिनें महालांतील प्रत्येक जागा स्वच्छ आणि प्रत्येक वस्तु व्यवस्थेनें ठेवलेली असे, त्याचप्रमाणें या लहानशा झोपडीचीही व्यवस्था ठेवलेली होती.

अन्नपूर्णा त्या ठिकाणीं आली; त्या वेळेस ती मांडवावरून द्राक्षें उतरीत होती. अन्नपुर्णेला पाहतांच, ती आपल्या तरुण मालकिणीला आनंदानें धांवत जाऊन भेटली. हर्षामुळें तिचें हृदय भरून आलें.

“ बाई अन्नपूर्णे, मला तर अलीकडे असें वाटूं लागलें होतें कीं, आतां तुझी व माझी भेट होणें दुर्घट आहे. पण ईश्वरानें हें तुझें तोंड या वृद्धेला पुनः दाखविलें! तूं गेल्यानंतर येथें माझ्यावर कसला कठीण प्रसंग आला होता ह्मणून सांगूं? माझ्या कधीं स्वमांतसुद्धां आलें नव्हतें कीं, या माझ्या वृद्धपणांत मला माझ्या मायाळु धन्याचें घर सोडून जावें लागेल!”

या गोष्टीबद्दल अन्नपूर्णेनें फार दिलगिरी दाखविली, पण मग तिला खात्रीनें सांगितलें कीं, “ आतां मी तुझ्यावर कसलाही प्रसंग येऊं देणार नाहीं.” तिनें त्या वृद्धेला पुनः आपल्या महालांत येऊन रहायालाही सांगितलें; पण तिनें तें मोठ्या नम्रपणानें नाकबूल केलें. ती ह्मणाली:—“ मुली, या जगांत आतां मी फार सुखी आहें. ईश्वरानें त्या उदार तरुणाला उदंड आयुष्य दिलें, ह्मणजे मला कांहीं कमी नाहीं. बाई, काय सांगावें तुह्मांला? माझें हें असें वार्धक्य, अशा प्रसंगीं तुह्मांला दूर जाऊन रहावें लागलें आणि माझ्यावर उघडें पडण्याचा प्रसंग आला, पण देवानें त्याला अवचित या ठिकाणीं पाठविलें आणि त्याच्याकडून सर्व प्रकारची मदत करविली.”

“ तो उदार तरुण कोण होता? मला सांग.” अन्नपूर्णा मो-

ळ्या उत्सुकतेनें विचारूं लागली. " सांग बाई, त्याला मी आपला एक हितकर्ता समजून त्याचे आभार मानीन."

" बाई, जे उदार आहेत, त्यांला आपल्या औदार्याचा डांगोरा पिटणें कधींही आवडत नाहीं. त्यानें आपलें नांव गुप्त ठेवण्याबद्दल मला सक्त ताकीद केलेली आहे; ह्मणून तें सांगावें अशी माझीही इच्छा नाहीं. पण बाई, तुह्मी तिकडे गेल्यावर तुमच्यांत किती फेरफार दिसूं लागला हा! तोंड तर अगदीं उतरून गेलें आहे. तरी माझ्या स्वर्गवासी धन्याची तसवीर तुमच्यांत दिसते. पहिल्या पासूनच तुमचा तोंडवळा तुमच्या आईसारखा नसून अगदीं तात्यांच्या सारखा दिसत असे; तसाच आतांही आहे. पण तुमची ती आत्याबाई खुशाल आहेना? मीं ऐकलें होतें कीं, ती कोणा परदेशी पुरुषाबरोबर पाट लाऊन त्याच्या देशांत जाऊन राहिली आणि जातांना तिनें तुह्मांलाही आपल्याबरोबर नेलें. ही खरी गोष्ट कां? ती आत्या बाई आतां कशी आहे?"

अन्नपूर्णेनें सांगितलें कीं; " तिला मरून फार दिवस झाले."

" हाय हाय! ती जर माझ्या धन्याची बहीण नसती; तर मला मुळींच वाईट वाटलें नसतें. ती हमेश आड रस्त्यानें जाणारी होती. बरें, तो एक वामनराव नांवाचा तरुण येत असे; तो कोठें आहे? तो जसा दिसण्यांत सुरेख, तसाच कर्तीतही! तो खुशाल आहेना?"

हे शब्द तर अन्नपूर्णेला फारच लागले; आणि तीं अतिशय लाजल्याप्रमाणें झाली. तेव्हां तारा बाई पुन: बोलूं लागली:—

" ईश्वरानें त्याला खुशाल ठेवावें! बाई, त्यांत लाजण्यासारखें काय आहे? मला सगळें ठाऊक आहे. तुह्मीं असें समजत असाल कीं तो तुमच्या वर प्रीति करितो हें मला ठाऊक नसेल. पण तुह्मीं गेल्यावर तो नित्य या ठिकाणीं येत असे. तुमच्या खोलींत जाऊन बसे. तुह्मीं जी बांसरी ठेवली होती, ती वाजवी आणि तींच तीं बुकें रोज हौसेनें वाचीत असे."

" बस बस! तारे, ही तुझी टकटक बंद कर. भलतेंसलतें बडबडूं नको. मी जितकें विचारीन, तितकेंच सांग. तुझी आतां

येथेंच राहण्याची इच्छा आहे कीं महालांत यायचें आहे?" असें अन्नपूर्णेनें चिडून विचारलें.

"बाई, अशी गोष्ट उडवून टाकूं नको. ज्या दासीनें तुला लहानाचें मोठें केलें, तिच्याजवळ असल्या गोष्टी चोरूं नयेस. मी सगळें समजतें. अशा मोठ्या कुलांतील उदार तरुणास जर पसंत केलेंस, तर त्यांत कोणीही नांवें ठेवणार नाहींत." तारा मोठेपणानें बोलली. तें ऐकतांच अन्नपूर्णेनें दीर्घश्वास टाकला.

"तो तुमच्याबद्दल गोष्टी बोलायाला किती उत्सुक असे. तो तुमच्यावर प्रीति करी, ह्मणून तर मीही त्याच्याजवळ बोलत असें. तुमच्या जन्मापासूनच्या गोष्टी तो मोठ्या प्रेमानें रोज ऐकत बसे. बाई, एकादे वेळीं तुमचें नांव घेऊन, आतां पुनः भेट होणार नाहीं! असें ह्मणून एकांतीं रडतांनाही सांपडे."

"पुरे. तारे, वेड्यासारखें किती बोलशील? तुला ह्मातारचळ लागला असें मला वाटतें." अन्नपूर्णा चिडून बोलली.

"पण जेव्हां तुमच्या मामानें तुमचा महाल भाड्यानें दिला, तेव्हां त्याला तें सुख अंतरलें व तो अतिशय खिन्न झाला."

"तारे, आतां मात्र तुझी बडबड अगदीं बंद कर. मी त्याचें नांव फार वेळ ऐकण्याची इच्छा करीत नाहीं."

"काय! त्याचें नांव ऐकायाला तुह्मी इच्छित नाहीं! ह्मणजे? त्या तरुणाला तर मी तुमच्याबरोबर मान देतें. "ताराबाई ह्मणाली.

"त्यांत कदाचित् तुझी चूक असेल." अन्नपूर्णेनें आपले अश्रु पुसण्याचा प्रयत्न करून बोलणें पुढें चालविलें:—"तूं त्याला पाहिजे तसा जरी मान दिलास; तरी मी त्याला भेटण्याची इच्छा करीत नाहीं."

"भेटण्याची इच्छा करीत नाहीं? तुझ्या समजुतींत चूक असेल" ताराबाई आश्चर्यानें बोलूं लागली.—"बाई, मी हें काय ऐकतें! वामनरावांला मान देण्यांत माझी चूक नाहीं. ज्यानें माझ्या वार्धक्यांत मला अब्रूनें निर्वाह करण्याची मदत केली; ज्याच्या साह्यानें मी आज ह्या महालासारख्या झोंपड्यांत सुख भोगीत आहे; त्याला जर मी मान देऊं नये, तर काय करावें?"

"तर काय तो वामनरावच तुझा मदतगार होता!" अन्नपूर्णेनें मोठ्या आश्चर्यांत पडल्यासारखें करून विचारलें.

" तर मग दुसरा कोण असणार! जरी त्यानें मला आपलें नांव कोणाला न सांगण्याबद्दल ताकीद केली होती, तरी तुमच्या तोंडानें त्याच्याविषयींचे उलटे विचार ऐकतांच मला तें सांगावें लागलें. बाई, आतां तुह्मांला रडूं येतें; पण मी ह्मणतें कीं, तशा भल्या माणसाबद्दल पाहिजे त्याला आनंद होईल आणि वाईटही वाटेल. माझ्या प्रसंगाच्या वेळीं मी न मागतां त्यानें मला मदत केली. मला हें झोंपडें बांधवून दिलें. तसेंच हें सगळें सामानसुमान बाजारांतुन नवें आणून दिलें. आणि मी दुखण्यांत असतां माझ्या मदतीसाठीं मी दुसरी बायको ठेवावी, ह्मणून पैसे दिले. त्याशिवाय माझी अब्रूनें गुजराण व्हावी, ह्मणून ज्यानें आपल्या पगारांतून प्रत्येक महिन्यास मला मदत करण्याचा बंदोबस्त केला. त्याला जर कोणी विनाकारण नांव ठेवील; तर मला कसें बरें चांगलें वाटेल! तुह्मी विचार करा. तुह्मांलाही त्याच्याबद्दल वाईट वाटतेंच आहे. तरी तें असो; पण हल्लीं पगाराची मुदत भरून गेली तरी अद्याप त्याच्या कडून तजवीज झाली नाहीं इतकेंच नव्हे; पण आज दोन तीन महिन्यांत त्याचें मला पत्रही नाहीं. ह्मणून मी फार काळजींत आहें."

" तूं त्याच्याचबद्दल काळजींत आहेस?" इतकेंच बोलून अन्नपूर्णा रडूं लागली; तरी तिनें त्यांतच विचारलें:—" तुला तो शेवटीं भेटून किती दिवस झाले बरें!"

" फार दिवस झाले; मला तो मुळींच भेटला नाहीं."

" बरें त्याचा समाचार तरी तूं कधीं ऐकला होतास?"

" बाई, तो तुळशीस गेल्यापासून मला त्याचा समाचार कळला नाहीं. त्याच्यावर काय प्रसंग आला असेल; तो देवाला ठाऊक! जर मला शक्ति असती, तर मी स्वतः त्याच्या शोधासाठीं गेलें असतें. कोणाला पाठवीन ह्मटलें तरी हल्लीं माणसांचे कामाचे दिवस आहेत, त्यामुळें कांहीं इलाज चालत नाहीं."

या सगळ्या भाषणावरून ज्याला माळ्यानें गोळी मारली, तो वामनरावच, असें तिच्या मनाला खात्रीनें वाटूं लागलें; आणि त्यामुळें मुळींच चैन पडेनासें झालें. तेव्हां तिनें ताराबाईजवळ थोडेसे पैसे देऊन " त्याच्या शोधासाठीं मजूरदार करून पाठीव" असें सांगितलें. तें तिनें मोठ्या आनंदानें कबूल केलें. नंतर तिला कांहीं खर्चायाला ह्मणून देऊन अन्नपूर्णा आपल्या महालांत आली.

---

## प्रकरण ३६ वें.

विनायकराव सरदार फत्तेसिंहाच्या घरीं येऊन सहकुटुंब राहिले होते. त्यांना आपल्या कुळस्वामीच्या दर्शनासाठीं जेजुरीस मुद्दाम जायचें होतें. त्याप्रमाणें ते फत्तेसिंहाच्या घराहून निघाले. त्यांच्याबरोबर त्यांची मुलगी आवडी, जांवई परशुराम आणि इतर पुष्कळ मनुष्यें होतीं. कोंकणांतून ह्मणजे चिपळोणाकडून वर हेळवांकाकडे येण्याचा मार्ग डोंगरी व बिकट असून त्यांत चोरांचें भय होतें. त्यांतच वळिवाचे पाऊस येण्याचे दिवस. इतक्या सगळ्या अडचणी मनांत आणून त्यांनीं आपल्याबरोबर सरंजाम फार चांगला आणि पोक्त राखला होता. दोन असामी वाट दाखविण्यासाठीं बरोबर घेतले होते. त्यांच्या सांगण्यावरून डोंगर चढायाला लागलें, ह्मणजे तो उतरून हेळवांकापर्यंत जात तों पावेतों उतरण्यासारखी व राहण्यासारखी जागा नव्हती.

या सगळ्या गोष्टींचा विचार करून विनायकरावांनीं आपल्या बरोबर पुष्कळ हत्यारबंद लोक घेतले आणि एका दिवसांत हेळवांकास पोंचण्याचा बेत करून ते प्रातःकालीं कुंभारलीचा घांट चढूं लागले.

अरण्य फारच दाट माजलेलें असून ते सह्याद्रीचा घांट चढायाला अतिशय कठीण व भयंकर होता. त्यांनीं आपलें सगळें सामान घोड्यांवरून लादलें होतें व एका लमाणाच्या थाटानें ते मार्गक्रमण करीत होते. मार्ग चालत असतां सगळे शिपाई व मार्ग दाखविणारे लोक नाना प्रकारच्या गोष्टी सांगत होते. तसें बोलत

बोलत चालले असतां मार्ग लौकर संपतो. अशी त्यांची समजूत होती. त्यांत ते वाटाड्ये निरनिराळ्या वेळीं चोरांच्या धाडा पडल्यामुळें त्यांच्यावर कसे कसे प्रसंग आले होते? त्या गोष्टी मोठ्या रसिकपणानें सांगत असत.

सायंकाल झाला. रात्र पडण्याचा रंग दिसूं लागला. तरी ते अर्ध्या डोंगरांतच होते. चार दिवसांच्या आधीं फारच पाऊस पडलेला असल्यामुळें डोंगरावरून खालीं पडणारे पाण्याचे असंख्य प्रवाह मोठ्यानें गर्जना करीत होते. त्यांतच रात्र पडल्यामुळें कित्येक जनावरेंही फिरूं लागलीं. त्यामुळें एकाएकीं सगळ्यांनाच विचारांत पडल्यासारखें झालें, पण तितक्यांत पर्वताच्या शिखरावरून शिकारी कुत्रा भोंकल्याचा आवाज त्यांना ऐकूं आला व त्यांतल्या त्यांत थोडेसें धैर्य आलें. वर कोठें तरी राहण्यासारखी जागा सांपडेल; असें मनांत आणून प्रत्येक मनुष्य झपाझप पाय उचलूं लागलें. तों कुत्र्याचा शब्द पुनः ऐकूं आला व तो जवळ जवळ येत आहे, असेंही वाटूं लागलें. तेव्हां सगळ्यांचीच दृष्टि वर लागली. तों दिव्याचा मंद प्रकाश दृष्टीस पडला! तरी तो दिवा फार उंच असून झाडांच्या दाटीमुळें केव्हां दिसे व केव्हां दिसतही नसे. वाटाड्यांनीं विचार केला कीं, कोणी मनुष्य जर दिवा नेत असेल, तर तो हांक देईल. असें मनांत आणून ते हांका मारूं लागले. जबाब नाहीं. तेव्हां त्यांनीं बंदुकीचे वायबार काढले. पण त्यांच्या प्रतिशब्दाशिवाय त्यांना कांहीं ऐकूं आलें नाहीं.

जरी काळोख किट्ट झालेला होता, तरी कांहीं वेळानें चंद्र पर्वताच्या शिखरावर आला आणि त्याच्या प्रकाशानें त्यांना वर काळ्या भिंतीचा देखावा दिसूं लागला. तेव्हां तो किल्ल्याचा भाग असावा; असें त्यांनीं ठरविलें.

विनायकरावांनीं स्वतःही तो किल्लाच असावा, असें अनुमान केलें. सह्याद्रीवर पूर्वीं पुष्कळ लहान लहान किल्ले बांधलेले होते. तरी हल्लीं कोणी त्याची डागडुजी करीत नसल्या कारणानें ओसाड पडलेले असत. त्यांत कोणी थकले भागलेले मुशाफर विसांवा

घेत आणि कित्येकांत चोरांनीं आपलींच ठाणीं बसविलीं होतीं.

जरी तो किल्ला दृष्टीस पडला; तरी ओसाड असेल, असें मनांत आणून विनायकरावांनीं थंड वेळेंत पुढें जाण्याचा निश्चय केला. पण थोडेसे पुढें गेले नाहींत, तों वादळ सुटलें, आकाशांत ढग आल्यामुळें चंद्र झांकला व मोठा पाऊस पडण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां निरुपायास्तव त्यांनीं दिसत असलेल्या किल्ल्याचाच आश्रय करण्याचा बेत मनांत आणला. पण किल्ल्याकडे जाण्याचा रस्ता फारच बिकट होता. तरीही आदळत आपटत, पडत झडत तीं सगळीं मनुष्यें किल्यापर्यंत येऊन दाखल झालीं. तो जरी अगदीं पडलेला होता, तरी तो पूर्वीच्या मोठेपणाची साक्ष देत असे. विनायकराव त्याचा तपास करूं लागले. आंत कोणी असेल कीं नाहीं? याबद्दल कांहींच कळत नव्हतें. तरी थोडक्यांच वेळांत त्यांना आंत कोणी बोलत असल्याचा भास झाला. कोण बोलत असेल? ह्मणून विनायकराव जिकडून बोलणें ऐकूं आलें, तिकडे गेले. तों आंतून दहा पांच कुत्रे एकदम भुंकूं लागले. त्यांचे शब्द ऐकतांच आंत मनुष्यें आहेत, अशी त्यांची खात्री झाली. तरी आंत जाऊन राहण्याचें त्यांना धैर्य होईना. तेव्हां परशुरामानें त्यांना तुफान होत असल्याचें स्मरण केलें, आणि आतां बाहेर उभें राहणें कल्याणप्रद होणार नाहीं, असें विनायकरावांनींही पाहिलें. शिवाय "आपल्याबरोबर हत्यारबंद मनुष्यांचा जमावही बराच आहे. तेव्हां कांहीं असलें तरी आंत जाण्यास आपणांला मुळींच भय नाहीं." असेंही त्यांनीं मनांत आणलें, आणि आपल्या मनुष्यांस दरवाजा ठोकण्याचा हुकूम केला. पण त्यांच्या ठोकण्याच्या प्रतिशब्दाशिवाय त्यांना कांहींच ऐकूं आलें नाहीं. तेव्हां विनायकरावांनीं, त्यांच्या हातांत जी लोखंडी काठी होती, ती दरवाजावर मारली. तो पांच सहा कुत्री एकदम भुंकल्याचा आवाज बाहेर आला. तीं कुत्रीं भुंकून थांबताहेत, तों कांहीं मनुष्यें आंत बोलताहेत, असेंही त्यांना वाटलें, ह्मणून त्यांनीं आपली काठी पुनः दारावर आपटली. पण त्यामुळें जीं माणसें बोलत होतीं,

तींही बंद झालीं. तेव्हां विनायकराव समजले कीं, " आंत असणारे लोक एक शिकारी किंवा धनगर असले पाहिजेत, जे त्यांना लुटारू समजून धास्तीनें गपचूप झाले आहेत." असो, याप्रमाणें अनेक प्रकार मनांत आणून त्यांनीं मोठ्यानें हांक मारलीः-" आंत कोण आहे? मेहेरबानी करून दरवाजा उघडा. आह्मी दमलेभागलेले प्रवासी असून अशा भयंकर रात्रीं आश्रय शोधीत फिरत आहों."इतकें ते बोलले मात्र. एका क्षणांत आंत माणसें चालताहेत असा भास झाला, व तितक्यांत आंतूनच कोणीं प्रश्नही केलाः- "कोण आहे बाहेर," " आह्मी तुमचे मित्रच आहों. दार उघडा! ह्मणजे तुमच्याजवळ अधिक बोलतां येईल." तेव्हां मोठा थोरला पोलादी अडसर ओढल्याचा आवाज आला आणि दुसऱ्याच पळांत दार उघडून, हातांत एक उंच व भयंकर भाला घेऊन एक धिप्पाड पुरुष त्यांच्या समोर येऊन उभा राहिला आणि "अशा अपरात्रीं तुह्मीं आमच्या जवळ काय मागतां?" असें मोठ्या गंभीर स्वरानें त्यानें विचारलें. त्याबरोबर विनायकरावांनीं नेत्रांच्या इशाऱ्यानें आपल्या मनुष्यांस जवळ बोलावून त्याला उत्तर दिलें:-" आह्मी रात्रभर आश्रय मिळेल अशा ठिकाणाचा शोध करीत आहों." "तुह्मांला वेड लागलें! ह्या पहाडांत रात्रीं आश्रय मिळणार नाहीं, हें तुह्मांला कसें कळूं नये? बरें, आतां जर मला एकादें ठिकाण विचाराल, तर ठाऊक नाहीं. तो पहा; वर चंद्रमा आहे. त्याच्या मदतीनें पाहिजे तिकडे फिरा आणि तुह्मीं आपल्यासाठीं जागा शोधून काढा?

इतकें बोलून विनायकरावांस विचारांत पाडून तो मनुष्य दार बंद करून जाणार, तों वरून दुसरा एक मनुष्य बोलला, थांबा, थांबा, मित्रहो, मला वाटतें कीं तुह्मी कोणी चुकलेले आहां; तर थांबा, मी खालीं आलों. असें बोलून खालीं येण्यासाठीं तो पुनः आंत झाला. ज्यानें दार उघडलें होतें, त्याचें भय वाटल्यामुळें आवडीनें आपल्या बापाला मागें फिरायाला सांगितलें, पण विनायकरावानीं त्याच्या हातांत शिकारी भाला पाहिल्यामुळें

आंत जाण्याचें त्यांना मुळींच भय वाटलें नाहीं. दरवाजा उघडला आणि कित्येक शिकारी लोक आंत उभे आहेत असें दिसलें त्यांनीं विनायकरावांस पाहतांच नमून मोठ्या सत्कारानें त्यांच्या रिसाल्या-सह त्यांना आंत घेतलें आणि एका मोठ्या दिवाणखान्यांत नेऊन त्यांना उतरण्यासाठीं ती जागा दाखविली. त्या ठिकाणींही चार मनुष्यें शेगडी पेटवून शेकत बसली होतीं. विनायकरावांस पाहतांच तेही उभे राहिले. तों पांचसहा कुत्र्यांनीं त्यांच्या अंगावर भोंकण्याचा सपाटा चालविला;पण त्या लोकांनीं त्यांना स्वस्थ केलें.

विनायकराव त्या लोकांचे आभार मानून त्यांच्याजवळ नाना प्रकारच्या गोष्टी बोलत बसले. त्यावरून त्यांना असें कळलें कीं, ते सगळे लोक शिकार करणारे असून आज एकाएकीं वादळ व तुफान झाल्यामुळें त्यांनाही ह्या ओसाड किल्याचा आश्रय क-रणें भाग पडलें होतें.

विनायकराव त्यांच्याजवळ बोलत बसले असतां आवडी, जो एक मनुष्य परशुरामाकडेच दृष्टि लावून बसला होता, त्याच्या-कडे लक्ष्यपूर्वक पहात होती. ती धास्तीनें फिकी पडली होती. तरी त्या मनुष्या बद्दल आपल्या बापाला कसें सुचवावें? हे तिच्या ध्यानांत येईना. 'याचें आतां कसें करावें?' अशा विचारांतच ती जों आहे, तों रणशिंगाचा ध्वनि कानांवर आला व त्यामुळें तर ती फारच घाबरली. विनायकरावांनीं रणशिंग वाजण्याचे कारण जेव्हां त्या लोकांस विचारलें, तेव्हां त्यांनीं सांगितलें:—"आमचे दुसरे साथीदार शिकार मारून आले असावे" इतकें बोलून त्यांतील एक दरवाजा उघडण्यासाठीं गेला, व दोन तीन पळांत आपल्याबरोबर दोघां साथीदारांस बरोबर घेऊन आला. त्यांच्या खांद्यावरून बंदुका व कंबरेंत पिस्तुलें खोंचलेलीं होतीं. खोलींत येतांच त्यांनीं विनायकरावांविषयीं आपल्या सोबत्यांना विचारलें आणि त्यांनीं त्यांची माहिती सांगतांच दोघांतील एकानें आपल्या खांद्यावरील कोथळी भुईवर टाकली व तींतून थोडेसे मारलेले पक्षी बाहेर काढले. पण तें पोतें पडतांक्षणीं आंत कांही जड धातूचे तुकडे

असल्यासारखा ध्वनि विनायकरावांस ऐकूं आला आणि ते शंकित होऊन त्या पोत्याकडेच दृष्टी लाऊन बसले. तों आंत कांहीं चकचकीत जिनसा आहेत. अशी त्यांची पक्की खात्री झाली जे दोघे नवे मनुष्य आले, त्यांतील एकाचा शिकारी व दुसऱ्याचा लष्करी पोषाक होता. विनायकराव खालीं मान करून विचार करीत बसले असतां त्यांनीं एकाएकीं वर पाहिलें. तों तेथेंच अंधारांत एक मनुष्य उभा असून तो परशुरामाकडे टक लावून पहात आहे, असें त्यांच्या ध्यानांत आलें. त्या वेळेस परशुराम आवडीजवळ बोलत बसलेला होता. विनायकराव त्या मनुष्याकडे पुनः जों पाहतात; तों तो मनुष्य शिपायांत मिसळला आहे व एकाच्या आडून आतां विनायकरावांसच तपाशीत आहे; असें त्यांच्या ध्यानांत आलें. पण विनायकरावांची व त्या मनुष्याची दृष्टी एक होतांच त्यानें आपली नजर फिरविली. तेव्हां मात्र विनायकरावांस धास्ती उत्पन्न झाली. तरी तें लक्षण कोणी ओळखूं नये, ह्मणून ते आवडीजवळ बोलूं लागले. पुनः कांहीं वेळानें जों पाहतात; तों तो शिपाई व दुसरा एक मनुष्य तेथून निघून गेले आहेत, असें त्यांना दिसलें.

नंतर कांहीं वेळानें दुसऱ्या एका मनुष्यानें येऊन विनायकरावांस "भोजनासाठीं दुसऱ्या खोलीत चला. तेथें तयारी आहे." असें सांगितलें. खरोखर पाहतां विनायकराव, परशुराम व आवडी यांची जरी तेथून उठून जाण्याची इच्छा नव्हती; तरी त्यावेळेस त्यांना त्या मनुष्याबरोबर जाण्याचा प्रसंग आला. दिव्याच्या प्रकाशानें ते शिकारी लोक जरी त्यांना मार्ग दाखवीत होते; तरी तऱ्हेवाईक विकट बोळ ओलांडीत चालल्यामुळें विनायकरावांस भय वाटलें. त्या चाळींतून जात असतां, भिंतीला खिळा मारलेला होता; त्याला आवडीची साडी अडकली. विनायकराव आणि परशुराम गोष्टी बोलत चाललेले असल्यामुळें आवडीच्या अकस्मात अडथळ्यावर त्यांचें लक्ष्य पोंचलें नाहीं. ते तसेच पुढें चालले असतां वळणांत शिरतांच आवडीवर काळोख पडला. तिनें त्यांना

हांक मारली; पण बाहेर पावसाचा गडगडाट चाललेला असल्यामुळें त्यांना ऐकूं गेलें नाहीं. शेवटीं आवडीनें आपली साडी फाडली आणि जिकडे प्रकाश दिसत होता; तिकडे त्वरेनें निघाली. पण तिला ठाऊक नव्हतें कीं तो उजेड दुसऱ्याच खोलींतून बाहेर आला होता. त्या उजेडाजवळ पोंचतांच चौघेजण बसून कांहीं तरी मसलत करीत आहेत; असें तिच्या ध्यानांत आलें. तेव्हां ते काय बोलतात! हें ऐकण्यासाठीं ती लपून उभी राहिली.

---

## प्रकरण ३७ वें.

" अरे सगळ्यानांच एकदम ठार करा! ह्मणजे कसलीच अडचण राहणार नाहीं. मग सगळे आपलेंच. ती पोरटी, पेट्या आणि माल सगळा आपलाच. असें समजा!"

हीं हृदयभेदक भाषणें आवडीच्या कानीं पडतांच तिच्या काळजाचें पाणी होऊन गेलें. हे सगळे लुटारू व चोर आहेत. हें तर तिच्या ध्यानांत आलेच व ते तिच्या बापावर घाला घालणार असेंही ती समजली. त्या चौघांतील तिघे एक मताचे होते आणि चौथा त्यांना तसें न करण्याबद्दल उपदेश करीत होता. शेवटीं ते तिघे आपसांत हळूहळू बोलूं लागले. तें आवडीला जेव्हां ऐकूं येईना; तेव्हां आपल्या बापाला हें कळवावें ह्मणून जाण्यासाठीं निघाली; पण कांहीं पावलें जों चालली नाहीं; तोंच अंधारामुळें ठोकर लागून पडली.

तिच्या पडण्याचा धबकारा ऐकतांच ते चौघे चोर त्या खोलींतून बाहेर आले आणि त्या सुंदर शिकारीवर हात टाकून तिला ओढीत त्या खोलींत घेऊन गेले.

तों किल्ल्याच्या दुसऱ्या भागांतून बंदुकीचे बार ऐकूं येऊं लागले व ते ऐकतांच त्या चौघांनीं आपापलीं हत्यारें बांधलीं. इतक्यांत भयसूचक रणशिंग वाजलें. तेव्हां ते चौघेही आवडीला तेथेंच सोडून बाहेर धांवत गेले. आवडी अजून जों दम घेते, तों पुनः त्याच खोलीचा दरवाजा वाजला आणि रक्तबंबाळ झालेला

परशुराम त्याच खोलींत येऊन भुईवर पडला. त्याच्या पाठीस लागलेले चौघे चोरही आंत आले. पण आवडीच्यानें तो भयंकर देखावा बघवेना. ह्मणून ती भयानें किंकाळून तेथेंच अगदीं बेशुद्ध होऊन पडली.

जेव्हां ती शुद्धीवर आली, तेव्हां पाहते तों तिचा बाप तिच्याजवळ बसला आहे आणि जवळच एके बाजूला परशुरामाच्या जखमांवर लक्ष्मण मलमपट्या लावीत बसला आहे!

पण लक्षमण येथें कसा आला? या प्रश्नाचें उत्तर आपणांस पुढें गेल्यावर खास मिळेल. या वेळेस इतकेंच समजलें पाहिजे कीं, ईश्वराची कृपा आणि लक्ष्मणाची मदत या दोनच गोष्टींमुळें रिसाल्यासह विनायकरावांचा बचाव झाला आहे आणि त्या लक्ष्मणाच्याच मदतीनें विनायकरावांनीं ते सगळे चोर त्याच किल्ल्यांतील एका मजबूत खोलींत कैद करून ठेवलेले आहेत.

---

## प्रकर ३८ वें.

ताराबाईनें वामनरावांचा काय समाचार आणला असेल? तो ऐकावा. अशा इच्छेनें दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं अन्नपूर्णा ताराबाईकडे गेली. कारण त्या सायंकाळीं फारच तुफान झालेलें होतें व त्यांतून ताराबाईच्यानें येववेल, असें अन्नपूर्णेला वाटेना. अन्नपूर्णा तिच्या झोंपड्यांत जाऊन जों पाहते; तों ती शेगडी जवळ शेकत बसली होती. अन्नपूर्णेला पाहतांच ती उठली व जवळची एक खुर्ची ओढून तिच्यावर तिनें अन्नपूर्णेला बसविलें. खुर्चीवर बसल्यानंतर ती आपल्या निमखहलाल दासीकडे जों पाहते, तों तिचें तोंड उतरलें आहे. तें पाहतांच अन्नपूर्णेला वाईट वाटलें. दुःखानें तिचा गळा भरून आला. ताराबाई जरी तो प्रकार पहात होती; तरी मुद्दाम न बोलतां तशीच बसली.

"हाय हाय!" अन्नपूर्णा अत्यंत दुःखानें ह्मणाली:—"तारे, त्या वामनरावाचा काय समाचार आहे? हें आतां विचारण्याचेंही

कारण उरलें नाहीं. तुझा चेहराच तें सांगत आहे. बहुतकरून तो मरणच पावला असेल."

"बाई, या दुनियेंतील ढंग कांहीं निराळ्या प्रकारचे आहेत. आपणांस अज्ञान मानवांस काय बरें कळणार आहे?" ताराबाई डोळ्यांत पाणी आणून ह्मणाली:—"गरीब, श्रीमान् सगळे त्या परमेश्वराच्या घरीं सारखे आहेत! त्याची आज्ञा होईल तसें वागणें हा मानवांचा धर्म आहे. तो प्रत्यक्ष येऊन आज्ञा जरी करीत नाहीं; तरी आपल्या इच्छेप्रमाणें व्यवस्था करीत असतो. तीच आज्ञा आणि तो ज्या स्थितींत ठेवील, तीच सुखकर मानून राहणें, हेंच आज्ञा पालन!"

"अगे तर काय तो मरण पावला?" अन्नपूर्णेच्यानें न ऐकवल्यामुळें ती मध्येंच विचारूं लागली:—"सांग बाई! वामनराव खरोखर मरण पावल्याबद्दलचाच समाचार आला आहे नां?"

"बाई, मी तसें समजतें मात्र." तारा दीर्घश्वास सोडून ह्मणाली.

"तूं समजतेस?" अन्नपूर्णा दाटलेल्या आवाजानें ह्मणाली:—"तूं तसें समजतेस, इतकेंच नां?"

"होय बाई." तारेनें उत्तर दिलें:—"पाठविलेल्या मनुष्यानें पुष्कळ शोध केला. पण त्याचा कांहीं शोध लागत नाहीं."

इतकें बोलून ती वामनरावाचें वर्णन करूं लागली. त्याच्या औदार्यामुळें गांवांतील गरीब लोक त्याला किती मानीत असत? त्याचे सद्गुण कसे होते? इत्यादिक अनेक प्रकार ती सांगूं लागली आणि एकाद्या वेडीप्रमाणें अन्नपूर्णा तें सगळें ऐकत बसली. तिचा कंठ दाटून आला आणि ताराबाईला न कळत ती डोळे पुसूं लागली. तरी अन्नपूर्णा रडते, असें ध्यानांत येतांच ताराबाईही रडूं लागली.

इतक्यांत बाहेरून दारावर कोणी थाप मारली व ती ऐकतांच दार उघडण्यासाठीं ताराबाई उठूं लागली. पण अन्नपूर्णेनें तिला दार उघडूं नको ह्मणून सांगितलें. तितक्यांत दारावर दुसरी थाप बसली आणि अन्नपूर्णेला वाटलें कीं, तिचा चाकर तिला

बोलवायाला आला असेल, असें वाटतांच तिनें दार उघडायाला सांगितलें. तेव्हां ताराबाईनें दार उघडलें व एक मनुष्य आंत आला आणि शेगडी जवळ येऊन उभा राहिला. अन्नपूर्णेनें जों वर पाहिलें; तों वामनराव एकाएकीं तिच्या दृष्टीस पडला!

त्याला पाहतांच अन्नपूर्णा उभी राहिली; पण एकापळांत एकाएकीं बेशुद्ध होऊन खुर्चीवर पडून राहिली.

वामनराव तिला सावध करण्यासाठीं पुढें झाला आणि पाहतो तों ज्या स्त्रीला मदद करण्यासाठीं तो पुढें झाला; ती त्याची प्रिया अन्नपूर्णा! पहा कसा अकल्पित व चमत्कारिक मिलाफ झाला तो!

एकमेकांची पुनः कधींही भेट होणार नाहीं. असें ठरलेलें असतां एकदम गांठ पडतांच दोघेंही कांहीं वेळ आश्चर्यानें स्तब्ध झालीं. अन्नपूर्णेनें डोळे उघडले आणि आपल्या प्रियकराचें मुख पाहून पुनः मिटले. वामनरावाचें हृदय आनंद व प्रीतीच्या मिश्रणामुळें धडकूं लागलें. तो दहा दहा पांच पांच पळांनीं फक्त "अन्नपूर्णे" एवढ्याच शब्दाचा उच्चार करीत होता. अधिक बोलण्यास त्याच्यांत शक्तीच उरली नव्हती. तो तिच्या तोंडाकडे मायेनें पहात होता आणि ती वारंवार त्याच्या तोंडाकडे पाहून आपली दृष्टि फिरवीत असे. वामनरावानें प्रीतीनें जरी तिचा हात धरला होता; तरी तोही तिनें मागें ओढून घेतला नाही. 'वामनराव मरण पावला असेल' या विचारांनींच तिच्या मनांतील प्रीति पुनः ताजी झाली होती, आणि पुनः तो दिसल्यामुळें तिच्या मनाला पूर्ण आनंद झालेला होता. पण हा प्रकार फार वेळ टिकला नाहीं वामनरावाचें दुराचरण पुनः तिला स्मरूं लागले; तिनें आपला हात मागें घेतला आणि त्याच्यापासून दूर होऊन ती रडूं लागली! तरी आपल्या अब्रूचा बचाव करण्यासाठीं तिनें तें रडें आवरलें; आपल्या मनांतील प्रीतीचे तरंग दाबले आणि वामनरावानें तिच्यावर जे उपकार केले होते, त्याबद्दल तिनें त्याचे आभार मानले आणि ताराबाईजवळ निरोप मागून तें झोंपडें सोडून जाण्याचा आव घातला.

**वामनराव**, जो एवढा वेळपर्यंत विचारांत गुंग झालेला होता. तो एकाएकीं शुद्धीवर आल्याप्रमाणें करून उठला आणि फारच विनयानें, त्यावेळेस **अन्नपूर्णेनें** बाहेर जाऊं नये ह्मणून तिची आर्जवें करूं लागला. त्याचप्रमाणें ताराबाईनेंही तिला सांगितलें:—"या वेळेस वारा व पाऊस फार आहे. ह्मणून तूं बाहेर जाऊं नको." पण **अन्नपूर्णा** कांहीं ऐकेना. तिनें दार उघडलें आणि जेव्हां तोंड बाहेर काढलें, तेव्हां तिची खात्री झाली आणि मग कोणी न बोलावतां मुकाट्यानें आंत येऊन बसली. *वामनरावाला* पुष्कळ बोलायाचें होतें. पण त्याच्यानें बोलवेना. ह्मणून तो त्या खोपटांतच इकडे तिकडे फिरूं लागला. तेव्हां ताराबाई आपल्या वार्धक्यास साजेल असें बोलूं लागली:—

" रावजी, आज मला जसा आनंद झाला आहे; तसा माझ्या ह्या जन्मांत व इतक्या वयांत कधींही झाला नव्हता! तुह्मीं आलां, त्याच्या आधीं आह्मीं तुमच्याबद्दल फारच काळजी करीत होतों. तुह्मीं जेव्हां ह्या खोपटाचा दरवाजा ठोकला; तेव्हां तर आम्हीं दोघी जणी "तुह्मीं मरण पावलां" असें मानून अतिशय रडत होतों. माझ्या बाईच्या ( **अन्नपूर्णेच्या** ) डोळ्यांतून इतकें पाणी चाललें होतें कीं, मला वाटलें त्यांची छाती फाटली कीं काय!"

**अन्नपूर्णा** हें ऐकतांच नाखुष होऊन ताराबाईकडे पाहूं लागली, आणि तिनें बोलूं नये ह्मणून तिच्यावर तिनें डोळेही फाडले. इतक्यांत **वामनराव** आनंदानें ह्मणाला:—"**अन्नपूर्णे**, तर काय अजूनही माझ्यावर तुझी प्रीति आहे? आणि माझ्या पश्चात् माझ्याविषयीं थोडातरी विचार केलास आं? आणि माझ्यासाठीं अश्रुपातही! अरे वा: अजून माझी प्रिया मला चाहते तर! अन्नपूर्णे, अजूनही तूं रडतेस? तर आतां उगी रहा; रडूं नको."

इतकें ऐकतांच **अन्नपूर्णेनें** डोळे पुसले आणि आपल्या कडून हृदय मोठें कठीण करून त्याला सांगितलें:—" तारेवर तुह्मीं उपकार केले आहेत; तेव्हां तुमच्या बऱ्या वाईटाबद्दल तिला सुखदुःख होणें हें अगदीं साहजिक आहे, आणि त्याचमुळें ती रडत बसली

होती. तिच्या दुःखाच्या दिवसांत तुह्मीं तिला साह्य केलें; ह्मणून आतां मीही तुमचे उपकार मानतें. तरी आतां मी जवळ आहें. ह्मणून तुमच्याकडून होणाऱ्या मदतीची तिला गरज उरली नाहीं."

"अन्नपूर्णे," वामनराव बोलूं लागलाः—"ज्याला तूं आपला हात देऊन सन्मानानें राखण्याची इच्छा करीत होतीस; त्याच्या जवळ अशीं भाषणें करणें तुला शोभलेनां? जो खऱ्या दिलानें तुला चाहतो. तुझ्या प्रीतीस्तव ज्यानें कित्येक संकटें भोगलीं, त्याला तूं अशा तऱ्हेनें मान देतेस!" इतकें बोलून व पुनः शुद्धीवर आल्यासारखें करून तो मृदुशब्दांनीं ह्मणालाः—"अरे, पण मी हें काय बोलतों? क्षमा कर; अन्नपूर्णे तूं मला क्षमा कर. मी काय बोलत होतों तें माझें मलाच कळत नव्हतें. तूं माझें स्मरण करशील, मला मान देशील, किंवा मजवर प्रीति करशील, तरी मीच तशा योग्यतेचा राहिलों नाहीं. ह्मणून तुझ्या प्रीतीवर माझा अगदीं दावा नाहीं. तरी एकवेळ तूं मला चहात होतीस, मान देत होतीस व मजवर पूर्ण प्रीति करीत होतीस, हें मला स्मरतें; आणि आतां जें मला दुःख होतें; त्याचें वर्णन करायाला माझ्यापाशीं शब्दच नाहीं, असें मला ह्मणावें लागतें. तरीही माझ्यापासून तुला त्रास झाला यासाठीं मला क्षमा कर."

"अहो रावसाहेब," वामनरावाला मधेंच अडवून ताराबाई बोलूं लागलीः—"माझ्या बाई तुह्मांला चहात नाहींत, असें तुह्मीं समजतां कीं काय? खरोखर, जर असेंच समजत असाल, तर ती तुमची चूक आहे. अहो, ह्या सगळ्या जगांत अन्नपूर्णाबाई एक तुमच्यावरच प्रीति करणाऱ्या आहेत. तरीही तें तोंडानें प्रत्यक्ष कबूल करण्याची त्यांना लाज़ वाटत असेल."

"हें तर अगदींच सहन न करण्यासारखें आहे." अन्नपूर्णा क्रोधानें ह्मणालीः—"तारे, तुला ह्मातारचळ लागल्यामुळें तोंडाला येईल तसें तूं बडबडूं लागली आहेस; असें मला वाटतें." इतकें बोलल्यावर ती वामनरावाला ह्मणालीः—"तुह्मीं जर मला सुखांत पाहूं इच्छितां, तर ह्या दुःखाचा परिहार करणें तुमच्याच हातीं आहे."

"मी तुला कोणत्याही प्रकारें दुःख देण्याला राजी नाहीं" वामनराव प्रीतीनेंच; पण थोड्याशा मगरूरीनें ह्मणालाः—"आणि जर कोणी तुला दुःख देतो, असें मी पाहिलें; तर त्याचेंही निवारण करीन. मी थोडावेळ तुझ्या जवळ बोलणार होतों; पण जर माझ्या बोलण्यापासूनच तुला त्रास होतो; तर मी तेंही बोलत नाहीं. आतां तर मी खचित असेंच समजतों कीं, मी पूर्ण दुर्दैवी आहे."

"चमत्कार आहे बाई! ह्या दोघां तरुणांनीं काय ढोंग माजविलें आहे? हें कांहीं कळत नाहीं. एकमेकांस चाहतात; एकमेकांवर प्रीति करतात आणि समोरासमोर होतांच एकमेकांवर थोबाडें चढवून बसतात!" ताराबाई हळूच आपल्याशीं ह्मणूनच बोलली. पण त्यामुळें अन्नपूर्णा चिडून उठली आणि ह्मणालीः—"आतां तर मला गेलेंच पाहिजे. वारा, पाऊस सगळें बंद झालें आहे."

"उभी रहा. अन्नपूर्णे, जरा थांब." वामनराव तिला अडवून ह्मणालाः—"मी तुला आतां अधिक वेळ कंटाळा येऊं देत नाहीं. मी तुझें लौकर ऐकलें नाहीं, यासाठीं तूं मला क्षमा कर. जर तुझ्या मनास वाटेल, तर माझ्यावर कधींतरी दया कर. मी आपल्या कर्मानें तुझ्याबरोबर जगांतील सगळीं सुखें नाहींशीं करून बसलों आहे. तरी तूं सुखी रहा; अन्नपूर्णे, आनंद कर. जरी मला कधींही सुखाचा अनुभव येणार नाहीं, तरी तूं सुखांत रहावेंस ह्मणून मी ईश्वराची नित्य तीनवेळ प्रार्थना करीत राहीन."

शेवटचे शब्द उच्चारीत असतां त्याचा स्वर अगदीं मंद झाला आणि तो प्रीतीनें अन्नपूर्णेकडे पहात पहात तें झोंपडें सोडून एकदम चालता झाला, तो कांहीं परत फिरलाच नाहीं.

परंतु तो जाण्याबरोबर ताराबाई "आतां वाऱ्यांत व पावसांत त्याचें कसें होईल?" ह्मणून काळजी करीत बसली. ती अन्नपूर्णेला दोष देऊं लागली; पण तिच्याहून अधिक अन्नपूर्णेचें मनच तिला खाऊं लागलें! वामनरावाबद्दलची प्रीति पुनः तिच्या मनांत ताजी झाली.

वारा व पाऊस बंद झाला आणि वामनरावाजवळ विपरीतप-

णानें वागल्याबद्दल पश्चात्ताप पावलेली अन्नपूर्णा आपल्या महालांत निघून गेली. त्यावेळेस तिचें मन विचारसागरांत गोते खात होतें.

पण एकाएकीं वामनराव या ठिकाणीं कसा आला? विनायकरावांच्या महालांत अन्नपूर्णेचा व त्याचा संवाद झाल्या नंतर तो आपल्या भावाच्या भेटीसाठीं निघाला असतां मार्गांतच त्याला तुळशी गांव लागलें. त्याच गावांत अन्नपूर्णेच्या संगतीनें त्यानें अत्यानंदांत कित्येक दिवस घालविले होते व ते दिवस आतां त्याला फारच सुखाचे वाटूं लागले होते. ह्मणून तुळशींत आल्यापासून नित्य दिवसा, रात्रीं, तो चिमाबाईच्या महालासभोंवतीं हिंडत असे. त्याप्रमाणेंच फिरत असतां त्याला एकवेळ अन्नपूर्णेनें पाहिलें होतें, आणि पुनःही तो त्याच नादांत फिरत असतां माळ्यानें त्याच्यावर गोळी घातली. ही गोळी लागल्या नंतर त्याला फार दिवसपर्यंत घराच्या बाहेर निघतां आलें नाहीं. पण त्याच्या वैद्यानें त्याला बाहेर फिरण्याची मोकळिक देतांच तो हेळवांकास आला, तेथें आपण पाहिलेंच आहे कीं, ताराबाईच्या झोपड्यांत त्या आषकमाषुकांची भेट झाली!

---

## प्रकरण ३९ वें.

अन्नपूर्णा आणि वामनराव यांची अकल्पित भेट झाली; त्याच्या दुसऱ्या दिवशीं अन्नपूर्णा आपल्या महालांतील दिवाणखान्यांत बसली असतां नानी एकदम तिच्याजवळ आली आणि घाबरल्याप्रमाणें श्वास टाकीत बसली. तो प्रकार पाहतांच अन्नपूर्णा घाबरली आणि "काय झालें?" ह्मणून मोठ्या काळजीनें विचारूं लागली. पण नानी छाती बसल्याप्रमाणें करून आधीं बराचवेळ बोलली नाहीं. नंतर अन्नपूर्णेला बरेंच पासवून सांगूं लागली:—"बाईसाहेब, मी जर सांगितलें, तर तुह्मीं खरें मानणार नाहीं. तो भूत होऊन आला आहे! भूत! त्याला मी आपल्या ह्या डोळ्यांनीं पाहिलें!" "अगे पण कोणाला पाहिलेंस तूं?" असें अन्नपूर्णेनें विचारतांच ती सांगूं लागली:—"बाईसाहेब, मी घरांतू-

न बाहेर निघतांच माझ्यासमोर येऊन उभा राहिला! " " पण तो कोण तुझ्यासमोर आला?" " बाई, ज्याप्रमाणें पूर्वीं तो पोषाख करीत होता; त्याप्रमाणें अगदीं हुबेहुब! " नानी आणखी पुढेंही बोलणार होती. पण तितक्यांत एक चाकर आंत आला आणि " बाई, कोणी अनोळखी मनुष्य तुमच्या भेटीसाठीं विचारीत आहे; त्याला आंत पाठवूं? " असें विचारूं लागला.

अन्नपूर्णेनें विचार केला कीं, तो वामनरावच असेल ह्मणून " मी सध्यां कामांत आहें " असें सांगून पाठविलें. त्याप्रमाणें त्यानें आपल्या मालकिणीचा निरोप पोंचविला. पण त्यानें सांगितलें कीं, " माझें फार अगत्याचें काम आहे- यासाठीं मला त्यांची भेट घेतलीच पाहिजे. " हा निरोप तो चाकर येऊन सांगणार, तों त्याचे आधींच नानी मोठ्यानें ओरडून ह्मणाली:—" अहो बाईसाहेब तो लक्ष्मण आला आहे, लक्ष्मण! " इतकें बोलून ती बाहेर जाऊं लागली. तेव्हां अन्नपूर्णेनें लक्ष्मणास आंत घेऊन येण्याचा हुकूम केला. तो ऐकून ती गेली व थोडक्यांच वेळांत लक्ष्मणासह अन्न-पूर्णेसमोर येऊन उभी राहिली. लक्ष्मणाला पाहतांच अन्नपूर्णे-ला आश्चर्य वाटलें, व त्यांत त्यानें विनायकराव आणि आवडी यांची पत्रें तिला देतांच तिच्या आश्चर्याला पार नाहींसा झाला!

अन्नपूर्णेनें तीं पत्रें उलगडलीं. तों त्यांत विनायकराव आणि त्यांच्या रिसाल्यावर आलेल्या महत्प्रसंगाचें थोडेंसें वर्णन करून ती बातमी लिहिलेली होती. त्यांत आणखीं असेंही होतें कीं, परशु-रामाच्या जखमा अद्याप भरून आल्या नाहींत; ह्मणून विनायकराव आणि आवडी यांच्यांशिवाय कोणी हेळवांकास येणार नाहींत. या-शिवाय आवडीच्या लग्नाच्या आधीं थोडे दिवस त्यांनीं अन्नपूर्णेला आणखीं कांहीं दिवस बिलोरी महालांत येऊन राहण्याचें आमंत्रण-ही केलेलें होतें.

पत्रें वाचल्या नंतर " तूं या भूतखान्यांतून एकदम कसा गुप्त झाला होतास? " असें अन्नपूर्णेनें लक्ष्मणाला विचारलें. तेव्हां ती

हकीकत विस्तारपूर्वक सांगण्यास लक्ष्मण तयार झाला आणि अन्नपूर्णा व नानी लक्ष्यपूर्वक ऐकत बसल्या.

आतां आमच्या वाचकांसाठीं लक्ष्मणानें सांगितलेली हकीगत आम्हीं थोडक्यांत सांगतों.

तो लक्ष्मण पुस्तक वाचतां वाचतां निजल्यावर कांहीं वेळानें पलंगाच्या मागे कांहीं खडखडल्यासारखें वाटल्यावरून तो घाबरून जागा झाला व त्या पलंगाकडे पाहूं लागला. पण पाहिल्यानें त्याला कांहीं दिसलें नाहीं. तरीहि पुनः तिकडूनच कुलुपांत किल्ली फिरविल्याप्रमाणें ऐकूं येऊं लागलें. तिकडे दरवाजा नाहीं, हें त्याला ठाऊक होतें; पण तितक्यांत भिंतीवर सोडलेला पडदा हालूं लागला आणि एक मनुष्य त्याच्याकडे पहात आहे, असें त्याला दिसलें. लक्ष्मण त्याला पाहून त्याबद्दल विचार करणार, तों त्याच्या मागें दुसरा येऊन उभा राहिला व त्याच्याजवळ बोलूं लागला.

तेव्हां लक्ष्मण आपल्या तलवारीवर हात टाकण्याचा विचार करूं लागला. तों त्यांच्या मागें तिसरा, चौथा, पांचवा, असे एकामागून एक येऊन ओळीनें रांगच्यारांग—सुमारें पंचवीस मनुष्यांची उभी राहिली. इतकेंच नव्हे, पण ते सगळे एकदम त्याच्या अंगावर तुटून पडले. ह्या चोर दाराबद्दल अन्नपूर्णेनें जेव्हां लक्ष्मणाला विचारलें. तेव्हां तो ह्मणालाः—“ तें दार विनायकरावांलाही सापडलें नव्हतें, त्याचें कारण तें दार भिंतीच्याच रंगाचें असून भिंतीच्या बाजूंत सरकणारें आहे. ”

त्या चोरांनीं लक्ष्मणास धरून पहिल्यानें त्यानें ओरडूं नये ह्मणून त्याच्या तोंडांत बोळा घातला. नंतर त्याचे हात बांधले आणि महालांतील लोकांस भूतचेष्टाच दिसावी ह्मणून त्याची तलवार वगैरे सर्व जागच्याजागींच ठेऊन त्याला त्या चोरदारानें भुयारांत घेऊन गेले. तें भुयार लांबच्यालांब व अंधारानें भरलेलें असून वांकड्यातिकड्या मार्गांनीं त्यांतून समुद्रकांठावर एका गुंफेंत येऊन पोंचलें आहे. त्या गुंफेच्या दारांत समुद्राच्या लाटा आपटत असतात; आणि तेथून वर पाहिलें ह्मणजे बिलोरी महाल

दृष्टीस पडतो. त्याच किनाऱ्यावर एक होडी उभी होती; त्यांत जबर्दस्तीनें लक्ष्मणाला बसवून ते चोरही बसले आणि दूर एक गलबत समुद्रांत नांगर टाकून उभें होतें; त्या गलबतावर गेले. त्या गलबतांत त्यांनीं लक्ष्मणाला बांधूनच टाकलें; ते सर्व वर आले व त्यांनीं त्या गलबताचा नांगर ओढून शिडें सोडतांच दोन मनुष्य होडी घेऊन परत किनाऱ्याकडे गेले आणि बाकीचे सर्व लक्ष्मणासह जलमार्गानें चालते झाले. ते कांहीं दिवस पर्यंत समुद्रांत लूटफाट करून खाडींत शिरले आणि शेवटीं मागें सांगितलेल्या किल्ल्यांत येऊन त्याचे मालक होऊन राहिले होते.

नंतर कांहीं दिवसपर्यंत लक्ष्मणानें त्यांच्यांतून पळून जाऊं नये; ह्मणून त्यांनीं त्याच्यावर पहारा ठेविला होता; पण हळू हळू ते त्याला हिंडण्या फिरण्याला मोकळीक देऊं लागले. लक्ष्मणालाही कळून आलें कीं, ते लूट करणारे, वाटपाड्ये, चोर आहेत. तरी निरुपायास्तव तो त्यांच्यात मिसळला. ते लोक जमिनीवर आणि समुद्रांतही लुटालुटीचा धंदा करून आपला सगळा माल त्या समुद्रावरील गुंफेंत सांचवीत असत. पुढें त्यांना तें भुयार सांपडलें आणि त्यांतून महाला पर्यंत त्यांचा प्रवेश झाला. मग ते आपलें सामान त्या भुयारांत ठेवीत. पुढें सरदारीण वेणूबाई मरण पावली व तो महाल ओसाड पडला. तेव्हां तेच लोक आपल्या निर्भयपणासाठीं तेथील रखवालदारांस भूतचेष्टा दाखवून भिववूं लागले.

एके वेळीं अन्नपूर्णा व देऊबाई, ह्या दोघी त्या रंगमहालांत गेल्या असतां त्याच वेळेस एक चोर कांहीं सामान काढून नेण्यासाठीं तेथें आला होता. तो आपल्या भुयारांत उतरण्याचे आधींच त्या दोघी तेथें दाखल झाल्या. तेव्हां तो त्या पलंगावरील बिछान्यांत जाऊन लपला. नंतर योग्य संधी साधून, त्यानें त्या अबलांस भिवविलें. नंतर त्यांनीं तेथूनच लक्ष्मणाला धरून नेलें व तो महाल आतां अक्षयीं आपला झाला; असें आपल्या मनांत मानूं लागले.

पण त्यांची ती चूक होती. कारण थोड्यांच दिवसांत सरदार विनायकराव आणि हरि हे दोघे तेथें पाहरा करण्यासाठीं येऊन

अगदीं जागृत राहिले. त्यांच्या गोष्टीं जेव्हां त्या चोरांनीं ऐकल्या; तेव्हां त्यांना भय पडलें आणि ते आपला माल तेथून काढून नेण्याच्या विचारास लागले. तरी शेवटचा प्रयत्न ह्मणून त्यांतील दोघांतिघांनीं तेथें अंगावर रोमांच उत्पन्न करणारा शोक आरंभिला. त्यामुळें आपण पाहिलेंच आहे कीं त्या दोघांस नुस्तें भय पडलें, इतकेंच नव्हे; पण वेड लागण्याचाही प्रसंग आला होता.

लक्ष्मणाच्या तोंडानें वरील गोष्ट ऐकल्यानंतर अन्नपूर्णेनें त्याला जा ह्मणून सांगितलें. इतक्यांत जरी चालवत नव्हतें; तरी ताराबाई त्या ठिकाणीं आली.

आदल्या दिवशीं तिच्या झोंपडींतून अन्नपूर्णा गेल्यावर वामनराव पुनः तेथें आला आणि अन्नपूर्णेच्या दिलगिरीबद्दल ताराबाईकडून गोष्टी ऐकतांच "ती अजून माझ्यावर प्रीति करीत आहे," असें त्यानें आपल्या मनांत मानलें. त्याचें तिजविषयींचें प्रेम फारच वाढलें आणि तिच्या गोष्टी ऐकण्यासाठीं तो पुनः पुन ताराबाईकडे खेपा घालूं लागला. त्यानें ताराबाईच्या मुखानें अन्नपूर्णेच्या गोष्टी ऐकल्यावर आपल्या जवळचे सगळे पैसे तिला बक्षीस दिले. नंतर आपल्या बोटांतील एक आंगठी तिला काढून देऊन ह्मणालाः—"ही आंगठी तूं अन्नपूर्णेला नेऊन दे आणि माझ्याकडून तिची आर्जवें करून तिला सांग कीं, मेहेरबानी करून ही तूं आपल्या बोटांत ठेव आणि जेव्हां तुझी दृष्टि या आंगठीवर जाईल; तेव्हां हिच्या दुर्दैवी देणाराचें स्मरण कर. ही माझी तुझ्याजवळ शेवटची प्रार्थना आहे."

ताराबाई ती आंगठी घेत असतां रडली. तरी आपल्यावर नेमलेलें काम करावें ह्मणून अन्नपूर्णेकडे आली. ती आंगठी पाहतांच अन्नपूर्णेला आपले पहिले सुखाचे दिवस आठवले. पूर्वी ती आंगठी तिनें पुष्कळ वेळीं पाहिली होती व प्रेमांत येऊन ती त्या आंगठीजवळ पुष्कळच खेळलेली होती. तें सगळें सुख जरी तिला आठवलें; तरी ती आंगठी घेण्याचें तिनें नाकबूल केलें. ताराबाईनें वामनरावाचें सगळें दुःख विस्तारानें सांगितलें. तें

ऐकत असतां अन्नपूर्णा रडली जरी, तरी तिनें आंगठी घेणें नाकबूलच केलें व ती 'त्याला परत नेऊन दे' असें सांगून तिला तेथून घालवून दिलें.

तारांबाई मोठ्या खिन्न वृत्तीनें आपल्या झोंपड्यांत आली आणि "अन्नपूर्णा सुशिक्षित असतां असें वेड्यासारखें काय करतें?" ह्मणून विचार करूं लागली. तिनें असा निश्चय केला कीं, "नाना प्रकारचीं बुकें वाचून तरुण पोरींत असें वेड भरतें."

दुसऱ्याच दिवशीं सरदार विनायकराव आणि आवडी हीं दोघें अन्नपूर्णेच्या घरीं आलीं. तेथें एक आठवडा राहिल्यावर बिल्लोरी महालाकडे कोंकणांत परत फिरतेवेळीं त्यांनीं अन्नपूर्णेलाही आपल्याबरोबर येण्याचा आग्रह केला आणि त्यांच्या लोभास्तव तिला तो मान्य करावा लागला. तेव्हां तिनें आपला महाल पुनः ताराबाईच्या हवालीं केला आणि त्यांच्या बरोबर जाण्याची तयारी केली. तरी तिला वामनरावाचें स्मरण होतच होतें.

कोंकणांत जाण्याच्या आदल्या दिवशीं ताराबाई अन्नपूर्णेकडे येऊन "वामनराव अजून मला भेटला नाहीं. तर ही आंगठी तूं ठेव." असें सांगूं लागली. पण "तो भेटेल तेव्हां परत दे." असें सांगून तिनें आणखीं एक वेळ ती आंगठी परत केली.

---

## प्रकरण ४० वें.

आतां अन्नपूर्णा पुनः एकवेळ विनायकराव आणि आवडी यांच्या बरोबर बिल्लोरी महालांत आली. तेथें येतांच तिला कळलें कीं, ती यशोदा नांवाची जोगिण, जिच्याबद्दल आपण चौतिसाव्या प्रकरणांत वाचलें आहे. ती दुखण्यांत असून अगदीं मरणासन्न स्थितींत पडलेली आहे. वांचली तरी भाग्य! "ही जोगीण आपली बहीण आहे कीं काय? किंवा सरदारीण वेणूबाई आहे?" असा अन्नपूर्णेला संशय होता; ह्मणून त्या चमत्कारिक जोगिणीचें शेवटचें भाषण तरी ऐकावें, अशी तिला स्वाभाविक

इच्छा उपन्न झाली आणि दुसऱ्याच दिवशीं ती आवडीला बरोबर घेऊन केशवस्वामींच्या मठांत गेली.

तेथें जातांच मुख्य महंतिणीनें त्यांचा चांगला सत्कार केला, पण अन्नपूर्णेला " थोडा वेळ यशोदेच्या खोलींत जाऊं नको. " असें सांगितलें. कारण त्यावेळेस तिचा कोणी आप्त भेटण्यासाठीं तिच्याजवळ जाऊन बसलेला होता. त्या महंतिणीच्या सांगण्यावरून अन्नपूर्णेला कळलें कीं यशोदा शुद्धींत असतां दोन तीन वेळ आत्मारामतात्याच्या मुलीला भेटण्याची इच्छा करीत होती. थोड्यांच वेळांत तो आलेला यशोदेचा आप्त बाहेर निघाला व त्या महंतिणीला एके बाजूस बोलावून तिच्याजवळ कांहीं हळू हळू बोलूं लागला. तो बोलून गेल्यावर महंतीण अन्नपूर्णेला यशोदेच्या खोलींत घेऊन गेली आणि आवडी तेथें असलेल्या दुसऱ्या जोगिणींच्याजवळ गोष्टीं सांगत बसली.

यशोदा एका बिछान्यावर निजलेली असून तिचें तोंड अगदीं सुकून गेलें होतें. गाल बसलेले व डोळे खळग्यांत पडलेले असल्यामुळें पाहाणारास कांहीं एकदम तिची ओळख पटत नसे. ती कांहीं खोल विचारांत पडलेली आहे, असें दिसत होतें. अन्नपूर्णा तिच्याजवळ जाऊन उभी राहिली; तरी तिनें तिला ओळखलें नाहीं. तिनें आपली दृष्टि फिरवून कांहीं वेळपर्यंत अन्नपूर्णेकडे टक लावून पाहिल्यानंतर एकदम किंकाळी फोडिली आणि ह्मणाली:— " अगे, माझ्या मरणाच्या वेळींही तूं माझी पाठ सोडित नाहींस?"

अन्नपूर्णा घाबरून जराशी मागें हटली; पण जवळच महंतीण होती; तिनें तिला भिऊं नको ह्मणून नेत्रांची इशारत केली. " यशोदे, इकडे पहा. मी आत्मारामतात्याच्या मुलीला तुझ्या भेटीसाठीं बोलावून आणलें आहे. तूं तिला भेटायाला राजी आहेसनां ? " असें महंतिणीनें यशोदेला विचारिलें.

तेव्हां तिनें जरी उत्तर दिलें नाहीं; तरी ती एकसारखी तिच्याच तोंडाकडे पहात राहिली, आणि कांहीं वेळानें पुन्हा ओरडून ह्मणाली:—" अरे तीच ही ! हाय हाय ! ज्या सौंदर्यानें माझा

सर्वस्वी नाश केला; तेंच हिच्यांत पूर्ण भरलें आहे! तूं काय मागतेस? तुला काय पाहिजे? वैर! सूड! आतां तो पूर्ण उगविला जाईल! तुला शेवटीं पाहिली त्याला कितीवर्षे झालीं? तरी मी काल्च पाहिली होती, असें मला वाटतें. कालच, मी तो अपराध केला असें मनांत येतें! मी म्हातारी झालें; तरी तूं अजून तरणी आहेस! तुझ्यांत अजून तें सौंदर्य आहे, कीं ज्यानें मला तें भयंकर कर्म करण्याची लालुच उत्पन्न केली! असो, मी तें कधीं व केव्हां विसरेन बरें?"

इतकें बोलून ती कांहींवेळ थांबली आणि पुनः म्हणाली:–
"वर्षानुवर्ष जरी पश्चात्ताप करीत राहिलें, तरी काय झालें? खुनाचा डाग कांहीं त्यानें धुतला जात नाहीं. खून! खून! अरे पण तो कोठें आहे? बाई, तूं रागावून माझ्याकडे पाहूं नको."

आतां तर ती फारवेळ स्तब्ध पडूनच राहिली. तरी कांहीं वेळानें अगदीं शांत झाल्याप्रमाणें करून ती अन्नपूर्णेला म्हणाली:–
"हुबेहुब तोच तोंडवळा, यांत अगदीं संशय नाहीं. बोल बाई, तूं त्या सरदारणीची मुलगीच आहेसनां?"

"कोणती सरदारीण?" अन्नपूर्णेनें आतां प्रश्न केला. "कोणती बरें ती? मी फक्त एकाच सरदारणीला ओळखतें; तिचें नांव वेणूबाई?"

हें नांव ऐकतांच आपल्या बापाची जी स्थिति झाली होती; ती यावेळेस अन्नपूर्णेला आठवली. ती आश्चर्यानें स्तब्ध होऊन बसली आहे, तों यशोदेनें जवळ असलेली एक लहानगी पेटी उघडली आणि एक तसबीर काढून अन्नपूर्णेला दाखविली.

"पहा ही तसबीर. अगदीं तुझ्यासारखीच आहे कीं नाहीं? पाहून घे. माझी पक्की खात्री आहे कीं, तूं हिचीच मुलगी आहेस!"

अन्नपूर्णेनें पाहिलें तों तिच्या बापाच्या कागदांत जी तसबीर तिला सापडली होती, तिचीच ती हुबेहुब नक्कल उतरलेली होती. ती तसबीर हातांत घेऊन यशोदेनें थोडावेळ प्रार्थना केल्यासारखें केलें आणि ती अन्नपूर्णेस देऊन म्हणाली:–"ही तुझ्याजवळच ठेव.

मी ही तुलाच दिली पाहिजे. कारण हिच्यावर तुझा पूर्ण हक्क आहे."

नंतर यशोदेनें त्याच पेटीचा एक चोरखण उघडला आणि दुसरी एक तसबीर काढून अन्नपूर्णेला दिली आणि ह्मणालीः– "घे ही आणि हें सौंदर्य कसें आहे पहा, व त्यावरून मगरूरी न करण्याचा एक उत्तम धडा पाठ करून ठेव. हा चेहेरा लक्ष्यपूर्वक पहा व माझी पूर्वीच्या आणि सांप्रतच्या सौंदर्याची तुलना कर."

अन्नपूर्णेनें ती तसबीर हातांत घेवून पाहिलीमात्र, तों ती तिच्या हातांतून खालीं पडली. यशवंत किल्ल्यांत रेशमाच्या काळ्या अभ्राखालीं लक्ष्मीबाईची जी तसबीर तिनें पाहिली होती; तिची ही हुबेहुब नक्कल होती. जी स्त्री फारच चमत्कारिक रितीनें नाहींशी झालेली आणि मोरोबानें जिचा खून केला, असें सर्वतो मुखीं होतें; त्याच स्त्री बरोबर मी गोष्टी सांगत आहें, असें अन्नपूर्णेला वाटेना! ती पूर्ण संशयांत पडली आणि ह्मणालीः–

" मी हा चेहरा एकवेळ पाहिला आहे; असें वाटतें. पण त्याच तुह्मीं आहां काय? तो चेहरा तुमचाच आहे काय? "

" होय. हा खरोखर माझाच आहे." यशोदेनें उत्तर दिलेंः– "माझ्या तारुण्यांत मी अशी सौंदर्यवान होतें. त्या वेळेस मी निर्दोषी होतें. पहा, पातकानें मला कसें भयंकर करून ठेवलें आहे. प्रीति, अदेखाई आणि मनोविकार यांनीं माझी अशी माती केली! पहा हें सगळे त्या दुष्ट कर्मांचें फळ! "

असें बोलून यशोदेनें आपल्या तोंडाकडे हात केला. नंतर तिनें अन्नपूर्णेला विचारलें:–" पूर्वी असा चेहरा तूं कोणत्या ठिकाणीं पाहिला होतास?" या प्रश्नाचें उत्तर देत असतां अन्नपूर्णेनें यशवंत किल्ल्याचें नांव घेतलें; तें ऐकतांच त्या यशोदेला आपल्या बाळपणाची आठवण झाली!

आतां यशोदा यशवंत किल्ल्याची मालकीण लक्ष्मीबाई, असें ओळखण्याला कांहीं आपणांस चिंता नाहीं.

यशवंत किल्ल्यांत पाहिलेला भयंकर देखावा अन्नपूर्णेच्या पुढें पुनः हुबेहुब उभा राहिला. तिला वाटलें कीं तें भयंकर कर्म

करणारी ती लक्ष्मीबाईच असली पाहिजे. अन्नपूर्णा तिला मुद्दाम वाकडे तिकडे प्रश्न करूं लागली; पण ती जोगीण एकही उत्तर न देतां भयंकर तऱ्हेच्या आरोळ्या ठोकूं लागली. त्यामुळें शेवटीं अन्नपूर्णेला तेथून जावें लागलें.

अन्नपूर्णा बाहेरून बाहेर येतांच सगळ्या जोगिणी व आवडी तिला काय झालें? ह्मणून अनेक प्रकारांनीं विचारूं लागल्या. तेव्हां " यशोदा आतां मरण पावेल!" इतकेंच अन्नपूर्णेनें त्या सगळ्यांना थोडक्यांत उत्तर दिलें. नंतर सायंकाळ झाल्यामुळें ती आवडीसह बिल्लोरी महालांत जाण्यासाठीं निघाली. तेव्हां महंतिणीनें अन्नपूर्णेला "उद्यां इकडून एक फेरी मारून जा" असें सांगितलें, तें तिनें मोठ्या नम्रपणानें कबूल केलें.

दिवसमावळण्याचा सुमार झाला असल्यामुळें लौकर पोंचावें, अशा हेतूनें आवडी व अन्नपूर्णा ह्या फेरा चुकविण्यासाठीं शेतांतूनच निघाल्या. त्या अर्ध्या मार्गांत पोंचतात तों दोन असामी गोष्टी बोलत बोलत त्यांच्या मागून आले. तेव्हां दोघीही घाबरल्या व होईल तितकी त्वरा करून पाय उचलूं लागल्या. तरी थोडक्यांच वेळांत ते दोघे त्यांच्या अगदीं जवळ येऊन पोंचले; पण अन्नपूर्णेनें मागें वळून त्यांच्याकडे पाहतांच तिच्या मनांतील धास्ती उडून गेली. त्या दोघांसही ती ओळखित होती. त्यांतील एक यशवंत किल्ल्यांतून अन्नपूर्णेबरोबर पळून येणारा दामोदरराव आणि दुसरा लक्ष्मीबाईला (यशोदेला) भेटण्यासाठीं आलेला जो गृहस्थ तो होता. ते पुढें येतांच ज्याचें नांव बाळासाहेब होतें व जो त्या लक्ष्मीबाईचा आप्त, तो दामोदररावास भेटून आपल्या बिऱ्हाडाकडे निघून गेला, आणि दामोदरराव त्या दोघींच्या बरोबर बिल्लोरी महालांत आला.

पण हा दामोदरराव एवढावेळपर्यंत कोणीकडे गेला होता? सत्ताविसाव्या प्रकरणांत आपण त्याच्याबद्दल शेवटचें वाचलें आहे. त्यानंतर थोडे दिवस तेथें राहून तो आपल्या मुलांबाळांस भेटण्यासाठीं गेला होता. तो हल्लीं आवडीच्या लग्नासाठीं विनाप-

रावांच्या पत्राला मान देऊन या ठिकाणीं आलेला आहे.

त्यानें विनायकरावाजवळ बाळासाहेबाविषयीं गोष्ट सांगतांच तोहि विनायकरावांच्या ओळखीचा निघाला. तेव्हां त्यांनीं त्याचवेळेस त्याच्या बिऱ्हाडासह त्याला आपल्या महालांत आणविलें व कांहीं दिवस राहण्याचा आग्रह केला; तो कांहीं त्याच्यानें मोडवला नाहीं.

बाळासाहेब एका मोठ्या कुळांतील पुरुष, हिंदुस्थानांतील मराठ्यांच्या लष्करावर एक अम्मलदार होता. तो एक लक्ष्मीबाईचा अगदीं जवळचा आप्त होता, पहिल्यानें जरी तो श्रीमंत होता; तरी कालचक्राच्या सपाट्यांत सापडल्यामुळें गरीब झाला होता. तो इतक्या गरीबीला आला कीं, मागणारांनीं तगादे लाऊन शेवटीं फिर्यादी मांडल्या आणि त्यामुळें त्याला मुंबईच्या बंदिखान्यांत कांहीं दिवस रहावें लागलें. त्याच्या बायकोचें त्याच्यावर फार प्रेम होतें. त्याचा वियोग तिला सहन होईना. तेव्हां तिनें सरकारांत खटपट करून नवऱ्या बरोबर तुरुंगांत राहण्याची परवानगी मिळविली आणि तीहि त्याच्या बरोबर तुरुंगांत जाऊन राहिली. त्या दोघांसही तेथें फार दुःख वाटे आणि त्यामुळें प्रत्येकाला त्यांची दया येत असे. त्यांच्या शेजारच्याच खोलींत दुसरा एक बंदिवान होता; त्याची जेव्हां मुक्तता झाली; तेव्हां त्यानें कोणाकडून त्यांच्या कर्जाइतकी रक्कम आणून त्या दोघांचीही मुक्तता केली. बाळासाहेबानें व त्याच्या स्त्रीनें त्या उदारपुरुषाचे उपकार मानून, सुटका होतांच जारीनें उद्योग करून, त्याची रक्कम परत करण्याची वेळ आणली; पण त्यानें ती त्यांच्याच उपयोगासाठीं राखून ठेवायाला सांगितलें आणि दुसऱ्याच दिवशीं तो गांव सोडला.

अशा दयाळू अंतःकरणाचा उदार पुरुष कोण असावा? वाचकहो, तो अपला वामनराव बरें!

आपण मागें पाहिलेंच आहे; अन्नपूर्णा यशवंतकिल्ल्यांत असतां वामनरावास त्याच्या भावानें मुंबईस पाठविलें होतें. तो वामनराव मोठ्या कुळांतील असल्यामुळें मोठमोठ्या लोकांकडून

त्याला आमंत्रणें येऊं लागलीं आणि श्रीमंतांच्या चटोर पोरांच्या संगतीनें फिरतांना अफाट खर्च करण्याची खोड लागली.

सरदार विनायकरावाची व त्याची ओळख एका मजलसींतच झालेली होती. पण त्यांच्या हरीबरोबर थोडक्यांच दिवसांत त्याचें मित्रत्व जडलें व ते दोघे बरोबर फिरूं लागले. त्यांत कांहीं लोकांच्या दुष्ट संगती मुळें त्यांस जुगाराचा नाद लागला. पण हरीला त्याच्या बापानें त्यांतून सोडविलें आणि वामनरावास कोणी आवरता नसल्या कारणानें तो त्यांतच रमला. तो इतका कीं, त्याला शेवटीं कर्ज झालें आणि तुरुंगांतही जावें लागलें. पण तेथें असतांही त्याला अन्नपूर्णेची आठवण होऊन तो रडत असे व "आतां मी दोषी झालों, तिच्या उपयोगाचा नाहीं." असें मनांत आणून दुःखी असे. पण तो खरोखरच दोषी होता काय? नाहीं. त्याचें मन पवित्र होतें; हें दुसऱ्या एका गोष्टीवरून सिद्ध होत आहे. त्याच्या थोरल्या भावानें त्याला कांहीं दिवस तुरुंगांत राहूं दिलें आणि तितकीच शिक्षा पुरे; असें मानून पुढें त्याचें कर्ज वारून त्याला सोडविलें आणि त्याच्या खर्चावेंचाचीही योग्य व्यवस्था केली. तो तुरुंगांतून सुटून जात असतां त्याच्या शेजारच्याच खोलींत बाळासाहेब व त्याची स्त्री हीं दोघें दुःखांत होतीं; त्यांच्याकडे पाहतांच त्याचें अंतःकरण विरघळलें आणि त्यांची मुक्तता करण्यासाठीं त्यानें एक चमत्कारिक व धैर्याचा उपाय योजला व अमलांतही आणला.

वामनरावाच्या भावानें त्याला खर्चासाठीं जी रक्कम पाठविली होती, ती घेऊन बंदिखान्यांतून सुटतांच तो पहिल्यानें समोर जुगार खान्यांत गेला आणि त्याच्याजवळ जी रक्कम होती, ती त्यानें एकदम जुगारांत लावली. त्यांत हेतु इतकाच कीं, जर फासा पडला, तर बाळासाहेब व त्यांची स्त्री या दोघांस मुक्त करावें. सत्कृत्याला ईश्वर साह्य होतो, असें ह्मणतात त्याचा त्याला त्या एकाच बैठकीला अनुभव आला. परोपकाराचें चिंतन करून फांसा फेंकतांच वामनरावानें त्या दिवशीं जुगारखान्यांत जितके लोक

खेळायाला आले होते. तितक्या सगळ्यांना जिंकलें आणि सुमारें सात लक्षांपर्यंत ऐवज एकदम मिळविला. तेव्हां त्यानें आपल्या मनाजवळ पुनः जुगारांत न शिरण्याची पक्की शपथ घेतली आणि तुरुंगांत जाऊन त्या दोघांची मुक्तता केली.

तुरुंगांत दोन तीन वेळां जाण्याचें व दुसऱ्याजवळ मदत मागण्याचें तुफान त्याच्यावर लोकांनीं घेतलें; पण तें केवळ अदेखाईमुळें, तो आपल्या मनानें खरोखरच पवित्र होता.

वामनरावाचें पवित्र चरित्र जेव्हां विनायकरावांनीं ऐकलें; तेव्हां " आपण मोठी चूक केली " असें त्यांना वाटलें आणि पश्चात्ताप झाला ! त्यानें पाहिलें कीं, लोकांनीं मत्सर भावानें त्याला वामनरावाचे नसते दुर्गुण कळविले होते. अशा थोरमनाच्या मनुष्याला आपण विनाकारण छळलें, असें विनायकरावांच्या मनांत वरचेवर येऊं लागलें व त्यांनीं ती आपली दिलगिरी घालविण्यासाठीं वामनरावास एक पत्र लिहून पाठविलें. त्यांत एकंदर प्रकार खुलासेवार लिहून त्यांनीं त्याला आपल्या घरीं येण्याचें आमंत्रण केलें होतें.

तरी वामनराव येईपर्यंत त्यांना समजलेली गोष्ट त्यांनीं अन्नपूर्णेजवळ सांगितली नाहीं. त्यांना असें वाटलें कीं, " आतां तो येथें नसून जर त्याची खरी खुबी मी अन्नपूर्णेला सांगितली; तर तिचें प्रेम एकाएकीं वृद्धि पावेल आणि त्यापासून कदाचित् भयंकर परिणाम निपजण्याचा संभव आहे. "

---

## प्रकरण ४१ वें.

आतां आपण आपल्या गोष्टीचें चक्र लक्ष्मीबाईकडे जाऊन फिरवूं. ज्या दिवशीं सायंकालीं अन्नपूर्णा तिची भेट घेऊन आली; त्याच रात्रीं ती मरण पावली ! तिच्या मरणानंतर थोडक्यांच दिवसांनीं, तिनें आपलें मृत्युपत्र करून ठेवलें होतें तें उघडलें. त्या वेळेस बाळासाहेब आणि दुसरे कित्येक गृहस्थ साक्षीदार ह्मणून तेथें हजर होते. त्या मृत्युपत्रांत स्पष्ट लिहिलें होतें कीं, तिच्या

मिळकतींतील तिसरा हिस्सा मरणारी सरदारीण वेणूबाईच्या आप्तांपैकीं अगदीं जवळचें जें कोणी असेल; त्याला द्यावा. पण त्या वेणूबाईची जवळची आप्त कोण होती ? वाचक हो, ती अन्नपूर्णाच !

ज्या महंतिणीनें अन्नपूर्णेला "उद्या एक फेरी मारून जा" असें सांगितलें होतें, ती अन्नपूर्णेच्या कुटुंबाविषयींची पूर्ण माहिती सांगणारी एक होती; परंतु आत्मारामतात्यांच्या मरणाच्या वेळीं जो उपाध्याय त्यांच्याजवळ होता; त्यानें त्या महंतिणीला "ती हकीकत एव्हांशी प्रसिद्ध करूं नको." असें सांगितलें होतें. ह्मणून त्या जोगिणीनें आजपर्यंत तें सगळें गुप्त ठेविलें होतें. तरी आतां त्या गुप्त पणाचें कारण नाहीं; असें समजून त्या जोगिणीनें अन्नपूर्णेला सांगण्याचा विचार केला. त्याचप्रमाणें आतां आमच्या वाचकांपाशींही तो प्रकार गुप्त ठेवण्याचें कारण उरलें नाहीं. असें मानून तो प्रकार—

लक्ष्मी बाईचें चरित्र.

सांगतांना वाचकांजवळ जाहीर करतों.

लक्ष्मीबाई आपल्या आई बापांची एकुलती एक कन्या होती. यशवंत किल्ल्यावरील श्रीमान सरदाराची ती एकुलती एक असल्या मुळें जन्मापासून लाडांत व सुखांतच ती वाढली होती. तिच्यावर जन्मापासून मुळींच अंकुश नसल्या कारणानें तारुण्यांत येतांच ती अतिशय चवचाल निघाली.

दुर्दैव कसें आहे पहा! ती तारुण्यांत येण्याच्या सुमारास तिची आई व बाप हीं दोघेंही परलोकवासी झालीं. तेव्हां तारुण्याच्या पूर्ण बहारांत असल्यामुळें तिनें पुष्कळ तरुणांचा सहवास केला होता.

त्या तरुणांत एक मारुतीराव विजापूरकर असून तो आपलें वतन सोडून देश पाहण्याच्या हेतुस्तव हिंदुस्थानांत आलेला होता. लक्ष्मीबाईचें सौंदर्य पाहतांच तो मोहित झाला आणि तीही त्याला खऱ्या दिलानें चहात होती. परंतु आपल्या अब्रूसाठीं मारुतीराव तिच्या बरोबर लग्न लावण्याला मागें घेत होता. पण लक्ष्मीबाई जी त्याला खऱ्या प्रेमानें चहात होती; ती लग्नाबद्दल त्याच्याजवळ

घाई करूं लागली. तेव्हां अनेक प्रकारच्या कामांचे बहाणे करून तो हिंदुस्थानांतून निसटला, तो पुनः तिकडे गेला नाहीं.

मारुतीराव निघून गेल्यानंतर मोरोबा जो तिच्या आईच्या भावाचा मुलगा होता; तो तिच्याजवळ लग्नाची मागणी करूं लागला. पण ती त्याला चहात नवती, ह्मणून तिनें त्याला नाकबूल केलें.

मारुतीरावाला जाऊन फार दिवस झाले, तरी तो परत आला नाहीं. तेव्हां त्याच्या विरहांत लक्ष्मीबाई झुरूं लागली. ती इतकी कीं, शेवटीं ती माणसांच्या संगतीलाही कंटाळली आणि आपल्या एका दासी शिवाय कोणाला जवळ येऊं देईनाशी झाली. रात्रंदिवस मारुतीरावाच्या नांवानें शोक करीत बसावें; असें करतां करतां तिला वेड लागलें.

पुढें तिला असें कळलें कीं, मारुतीरावानें कोंकणांत जाऊन दुसऱ्या स्त्रीबरोबर आपलें लग्न केलें. ह्या बावतीनें तर तिला पक्कें वेड लागलें आणि कोंकणांत जाऊन मारुतीरावाचा आणि त्याच्या स्त्रीचा खून करण्याचा तिनें निश्चय केला. पण हा निश्चय तिनें आपल्या दासीशिवाय कोणालाही सांगितला नाहीं. तिनें आपलें कोट्यावधि रुपायांचें जें जवाहीर होतें; तें एकत्र करून त्याचें गांठोडें केलें आणि एकेरात्रीं तें गांठोडें घेऊन त्या दासीसह ती त्या किल्ल्यांतून निघाली आणि कोंकणांत बिल्लोरी महाल या नांवाचें ठिकाण वसवून मारुतीराव आपल्या स्त्रीसह राहिला होता, त्या ठिकाणीं येऊन पोंचली.

मारुतीरावाचा सहकुटुंब नाश करून आपण आपलाही अपघात करून घ्यावा, असा तिचा इरादा होता; परंतु त्याच्या समोर जातांच तिच्या मनांत त्याजविषयीं जी प्रीति होती, तिला पुनः अंकुर फुटला आणि "ज्याला एकवेळ प्रिय मानला, त्याचाच खून करणें योग्य नव्हे;" असें तिला वाटलें. तिने दुसऱ्याच प्रकारानें त्याचा सूड उगविण्याचा विचार केला. तो प्रकार ह्मणजे मारुतीरावाच्या धर्मपत्नीचा हत्या करणें ! ! !

तरीही लक्ष्मीबाई बिनधोक आपलें काम करीलच; असें कांहीं नव्हतें. मारुतीरावाचें त्याच्या स्त्रीवर पूर्ण प्रेम होतें. कारण कीं, ती शहाणी, चतुर व मनमिळाऊ अशी होती. त्याशिवाय मारुतीरावाची आज्ञा मनोभावापासून मान्य करणारी व त्याला पूर्ण सुखानुभव दाखविणारी ह्मणून त्याच्याही मनानें मानली होती.

पण लक्ष्मीबाईनें आपल्या मनोवेधक नखऱ्यांनीं थोडक्यांच दिवसांत मारुतीरावाचें मन वेधून घेतलें आणि मग ती त्याच्या बायकोबद्दल खोट्या खोट्या गोष्टींनीं त्याचे कान भरूं लागली. तिनें मारुतीरावाला कळविलें कीं, " तुझी बायको दुसऱ्या पुरुषावर प्रीति करीत असते. आणि गुप्तपणानें ती तुझा घात करण्याचा विचार करीत आहे." अशा अनेक खोट्या गोष्टी नित्य ऐकूं येत गेल्यामुळें मारुतीरावाचें त्याच्या स्त्रीवरील प्रेम कमती होऊं लागलें. लक्ष्मीबाईनें जेव्हां पाहिलें कीं, आतां हा आपल्या आटोक्यांत आला; तेव्हां तिनें त्याला त्याच्या बायकोच्या अन्नांत नित्य थोडें थोडें विष घालण्याला शिकविलें. आणि अविचारानें आंधळा झालेला मारुतीराव नित्य तिच्या शिकवणीप्रमाणें आपल्या स्त्रिच्या अन्नांत थोडें थोडें विष कालवूं लागला. त्यामुळें ती दुखण्यांत पडली आणि फार थोड्या मुदतींत अगदीं मरणाच्या स्थितीला लागली. शेवटीं मरते वेळीं तिनें आपल्या प्रिय पतीला जवळ बोलाविलें आणि भोळ्या अंतःकरणानें, त्यानें शेवटपर्यंत सुखी असावें ह्मणून त्याला आशीर्वाद दिले. नंतर प्रीतीस्तव कृष्ण कारस्थान करणाऱ्या स्त्रीच्या कृतीमुळें त्या मारुतीरावाच्या स्त्रीनें आपला प्राण सोडला !

परंतु जी गोष्ट घडल्यानंतर मी अक्षयी सुख भोगीन; असें लक्ष्मीबाई समजत होती; तीच गोष्ट तिच्या नाशास कारण झाली. ती असें समजत होती कीं, मारुतीरावाची लग्नाची स्त्री मेली, ह्मणजे तो मला वरील; परंतु तसें कांहीं घडून आलें नाहीं. मारुतीरावाला त्याच्या स्त्रीचा निर्दोषपणा ती मरतेवेळीं चांगल्या प्रकारानें कळून आला. ती प्राण सोडूं लागली, तेव्हां त्यानें तिला

खरेखरे प्रकार सगळे विचारून घेतले व तिनें आपला निर्दोष पणा त्याच्या मनांत पूर्ण भरवून दिला. तेव्हां त्याच्या कर्माचें त्यालाच वाईट वाटलें आणि लक्ष्मीबाईबद्दल पूर्ण द्वेष त्याच्या मनांत उभा राहिला. त्यामुळें त्यानें असा निश्चय केला कीं, पहिल्यानें लक्ष्मीचा प्राण घेऊन मग आपणही आपला जीव द्यावा. तरी वेणूबाईनें मरतेसमयीं त्याचे सर्व अपराध विसरून त्यानें सुखी-रहावें, ह्मणून आनंद मुद्रेनें त्याला तसें न करण्याबद्दल आपल्या गळ्याची शपथ घालून त्याचें त्या कर्मापासून निवारण केलें. नंतर वेणूबाईचें और्ध्वदेहिक केल्यावर मारुतीरावानें लक्ष्मीबाईचा धि:कार केला आणि तिला आपल्या महालांतून घालवून दिलें.

ज्या पुरुषावर तिची खरोखर प्रीति होती; ज्याच्यासाठीं तिनें आपल्या बापाची जहागीर सोडून दिली आणि ज्याच्या प्राप्तिसाठीं ती अघोर पाप करण्यास प्रवृत्त झाली; त्यानेंच धि:कारून घालवून देताक्षणीं लक्ष्मीबाई अर्धी वेडी झाली आणि "आतां कृतकर्माचा पश्चात्ताप करीत रहावें; ह्मणजे तीं दुष्ट कृत्यें अत्यंत भयप्रद होणार नाहींत." असा विचार मनांत आणून तिनें बिलोरी महालाच्या जवळच असणाऱ्या केशवस्वामीच्या मठाचा आश्रय केला. तेव्हां त्या मठांतील रिवाजाप्रमाणें तिला वेष पालटावाच लागला; त्याबरोबर तिनें आपल्या थोर घराण्याचा बोज राखण्यासाठीं नांवही पालटलें. नंतर त्याच मठांत तिनें आपल्या जन्माचा शेवट केला, हें आपण पाहिलेंच आहे आणि त्यावरून दुष्कर्म करणारांचा परिणाम कसा दु:खदायक व क्लेशकर होतो? हेंही आपल्या ध्यानांत आलें आहे.

इकडे मारुतीरावही आपल्या कर्माबद्दल पश्चाताप व खेद करीत करीत लक्ष्मीबाई प्रमाणेंच परदेशांत जाऊन, वर्षानुवर्षे दुखण्यांत काढून, शेवटीं झिजून झिजून मरण पावला.

जो वैद्य वेणूबाईला औषध देत होता; त्यानें तिला कोणीतरी विष चारलें आहे; अशी तिला पाहतांच परीक्षा केली होती; परंतु मारुतीरावानें त्याचा हात दाबून तोंड शिऊन ठेवलें! तरी

ही तें पातक शेवटीं उदयास आलें. लोकांत या गोष्टीचा बभ्रा होतांच त्या वेणूबाईचा सख्खाभाऊ आत्मारामतात्या त्या गोष्टीचा तपास करूं लागला. त्याच्या कडून मारुतीरावास मोठ्या जरबेची पत्रे येऊं लागली आणि मारुतीराव दोषी असून भय पावलेला होता; ह्मणून तो शेवटपर्यंत विनयालाच चिकटून राहिला, वरें आत्मारामतात्यालाही कांहीं योग्य पुरावा मिळाला नाहीं; ह्मणून त्या बाबतींत तो मारुतीरावाचें कांहीं करूं शकला नाहीं. शिवाय तो साधु मार्गांतील असल्यामुळें त्यानें ही जी गोष्ट घडून गेली; तिच्याबद्दल अधिक चर्चा केली नाहीं. तात्यांनीं प्राण सोडतेवेळीं अन्नपूर्णेला जे कागद जाळण्याची आज्ञा केली; ते सर्व त्याच विष प्रयोगाच्या प्रकरणाचे होते. आपल्या कोमलांत:करणाच्या मुलीनें जर तीं पत्रें वाचलीं; तर तिच्या मनावर भलताच परिणाम घडून येईल. असें मनांत आणून त्यांनीं तीं पत्रें न पाहतां जाळून टाक; अशी तिला सख्त ताकीद केली होती आणि चिमाबाईनेंही त्या बाबतींतील गोष्टी अन्नपूर्णेला कधीं कळवूं नयेत; असा त्यांनींच बंदोबस्त केला होता.

हेळवाकांतून प्रवासाला निघण्याच्या आदल्या रात्रीं आत्मारामतात्या जीं पत्रें वांचून रडत होता; तीं सर्व तींच होतीं आणि त्याच्याजवळ जी तसबीर होती; ती त्याच्या सख्ख्या बहिणीची होती; हें काय आतां निराळें सांगितलें पाहिजे? ह्या बहिणीचे सद्गुण आत्मारामतात्याला ठाऊक होते आणि ह्मणूनच त्याचें तिच्यावर फारच प्रेम होतें. ह्मणून जेथें आपल्या सुशील बहिणीचा अंत झाला; तेथेंच आपलाही व्हावा; अशी तो इच्छाच करीत होता. त्याप्रमाणेंच घडूनही आलें; हें आतां सहज ध्यानांत येतें. यावरून काय झालें? सुशीलाची चांगली वासना ईश्वरच पूर्ण करितो! असें आपणांस उघड दिसून आलें नव्हे?

बिल्लोरी महालाच्या आसपास जें कोणी बांसरी वाजवून अपरात्रीं गात फिरत असे; तें दुसरें कोणी नसून लक्ष्मीबाईच होती. ती आपल्या मनाला विश्रांति मिळविण्यासाठीं अशा तऱ्हेनें गात वाज-

वीत फिरत असे. कारण–त्या मठांत राहणाऱ्या जोगिणानें कधींही गायन करूंनये आणि कोणतेंही वाद्य वाजवूं नये; असा त्या ठिकाणीं रिवाज होता.

ती लक्ष्मीबाई आपल्या पातकांबद्दल आपल्या मनाजवळच पश्चात्ताप करीत असे. त्यामुळें "वेणूबाईचें कोणी असल्यास त्याच्यावर थोडे तरी उपकार करावे आणि एक लेशभर तरी उतराई व्हावें;" असें तिला वाटूं लागलें होतें आणि तसें करायाला तिच्या संग्रहीं कोट्यावधि रुपयांचें जवाहीर होतें. त्याची व्यवस्था तिनें पूर्ण शुद्धींत असतां करून ठेविली; ती अशी कीं:–"त्यांतील तिसरा हिस्सा सरदारीण वेणूबाई हिचें कोणी अगदीं जवळचें नातलग असल्यास त्याला; त्याचप्रमाणें बाळासाहेबाची बायको त्या लक्ष्मीबाईची मावसबहिण होती; ह्मणून त्या जवाहिरांतील तिसरा हिस्सा आणि तिचा किल्ला वगैरे दुसरी सगळी स्थावर मिळकत तिला द्यावी आणि बाकीचा तिसरा हिस्सा दान धर्मासाठीं मठाच्या वर्गणीच्या रकमेंत जमाकरून त्याची व्यवस्था मठांतील अधिकाऱ्यांनीं लावावी." असें स्वदस्तूरचें मृत्युपत्र करून तो लाखोटा बंद करून तिनें ठेवला होता. त्याची व्यवस्था तिच्या इच्छेप्रमाणेंच लागण्यांत अंतर पडलें नाहीं.

यशवंत किल्ल्यांतील भयंकर देखाव्याला कारण लक्ष्मीबाई असें अन्नपूर्णा समजत होती. पण तो केवळ संशयच होता. तर तो भयंकर देखावा कसला होता?

आपण पाहिलेंच आहे कीं, यशवंत किल्ल्यांत असतां काळ्या रेशमी अभ्र्याखालीं झांकलेला देखावा पाहण्याचा प्रयत्न करितांच अन्नपूर्णा बेशुद्ध झाली होती. त्या अभ्र्याखालीं दुसरें कांहीं नवतें, एक मोठासा कोनाडा असून त्यांत एक माणसाचें शरीर होतें ज्याला कोट्यावधि किडे पडलेले आहेत, तो किड्यांचा बुजबुजाट आणि तें अर्धें मुर्धें कोरून खाल्ल्यामुळें भयंकर दिसणारें शव पाहतांच कसाही धैर्याचा पुरुष असला तरी त्यानें भिवूनच पळावें, असा तो प्रकार मुद्दाम पातकी मनुष्याचा परिणाम दाखविण्यासाठीं

मेणाचा करून ठेविलेला होता. तो पाहतांच ती कोमलांतः-करणाची अन्नपूर्णा मुर्छित झाली, यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य मानण्यासारखें नाहींच.

---

## प्रकरण ४२ वें.

मागें सांगितल्याप्रमाणें सगळा भ्रम खुला झाला आणि " अन्न-पूर्णा आपली एक आप्त आहे " असें कळलें; त्यामुळें विनायक-राव, आवडी आणि त्यांचें सगळें कुटुंब संतोष पावलें.

तरी स्वतः अन्नपूर्णा अहोरात्र वामनरावाचें चिंतन करीत असून मोठ्या खोल विचारांत पडली आहे असें स्पष्ट दिसत होतें. तिला जरी अतोनात संपत्ति मिळाली होती; तरी ती वामनरावा-वांचून अप्रिय वाटत असे. त्याचे पहिले सद्गुण मूर्तिमंत तिच्यापुढें उभे रहात व " असा योग्य मनुष्य दुर्जनांच्या संगतीनें फसला कसा ? " हा प्रश्न वारंवार ती आपल्या मनाजवळ करीत बसे. त्या शिवाय ताराबाईच्या संबंधानें त्याची उदार वागणुक आणि विनयाचें भाषण आठवलें ह्मणजे तर तिच्यानें रडल्यावांचून रहा-वतच नसे. ती आपला बहुतेक वेळ विचार करण्यांतच घालवी.

तरीही अशा पवित्र प्रीतीच्या दुःखांत तिला फार दिवस रहावें लागलें नाहीं. विनायकरावांनीं वामनरावाला जें पत्र पाठविलें होतें; त्याचें त्याच्यांकडून उत्तर आलें होतें आणि त्यांत त्यानें " मी थोडक्यांच दिवसांत निघून येतों " असें लिहिलें होतें. तें वाचल्यानंतर विनायकरावांनीं अन्नपूर्णेला वामनरावाचें खरें चरित्र कथन केलें. तें ऐकतांच तिची वृत्ति पूर्ण आनंदित आणि अगदीं तन्मय होऊन राहिली. तें वर्तमान ऐकल्यामुळें रात्रं दिवस ती वामनरावाचाच ध्यास धरून त्याची वाट पहात बसली.

सायंकाळचा सुमार झालेला असल्या कारणानें सूर्य आपलीं सोनेरी किरणें पश्चिम समुद्रावर पसरून राहिला आहे. बिल्लोरी महाला सभोंवतालच्या बागबगीच्यांतील वृक्षांवर असणारे पक्षी आपल्या मधूर स्वरानें गायन करीत आहेत. मंद, सुगंध आणि सुशीतल

वारा वहात असल्यामुळें प्राणिमात्रांस आनंद होत आहे. अशा रम्य समयीं अन्नपूर्णा बागेतील एका कारंज्या समोरच्या दगडी बैठकीवर जाऊन बसली आणि आसपासची सर्व विलक्षण शोभा पाहून आनंद पावली. नंतर कांहीं वेळ तेथें बसून मनाला पूर्ण शांतता मिळाली, असें वाटल्यावर तिनें आपला मधुर स्वर प्रगट करून गाणें गाण्याची सुरवात केली. तें गायन त्या वेळेला शोभविणारें असें असल्यामुळें त्या वेळेस तेथें असणारा जिवंत जीव त्या गायनावर लुब्ध होऊन राहिला होता. तें गायन गात असतां तिनें असे आलाप काढले कीं, ते ऐकतांच एकाद्या गवयानें थक्क होऊन ऐकतच रहावें. कांहीं वेळानें तिनें तें गायन संपविलें आणि तेथून उठण्याचें मनांत मात्र आणलें, तों तिच्या बैठकीच्या मागें लपून बसून तिचें गोड गायन ऐकणारा गृहस्थ एकाएकीं तिच्या समोर येऊन उभा राहिला. त्या वेळेस अन्नपुर्णेला इतका आनंद झाला कीं ती त्या आनंदाच्या भरांत त्या आलेल्या गृहस्थाच्या हातांत जाऊन बेशुद्ध झाली. तेव्हां त्यानेंही अत्यानंदानें तिला सांवरून धरलें आणि सावधही केलें. ती आनंदाची बेशुद्धि असल्यामुळें तिला शुद्धीरव येण्याला कांहीं फारसा वेळ लागला नाहीं. पण आलेला हा गृहस्थ कोण ? वाचकहो, तो अन्नपूर्णेचा प्रियकर वामनराव!

एवढावेळ पर्यंत जे कांहीं भ्रमाचे भाण्डार भरलें होतें; तें आह्मीं आपल्या वाचकां समोर खुलें करून ठेवलें. आतां विनाकारण कंटाळा देत बसण्याचें कारण जर उरलेंच नाहीं; तर आतां इतकें सांगितलें ह्मणजे पुरें होईल, कीं— सगळा बिल्लोरी महाल लग्नाच्या गडबडीमुळें गजबजून राहिला आहे. विनायकरावांच्या आवडीचें परशुरामाबरोबर आणि अन्नपूर्णेचें वामनरावाबरोबर एकाच मुहूर्तावर व एकाच जागीं लग्न झालें! दामोदर, जो अन्नपूर्णेला मनापासून चहात होता; त्यानें अन्नपूर्णा वामनरावासच योग्य, असें जाणून आपला आग्रह सोडला आणि

बाळासाहेबाच्या मुलीबरोबर आपलें लग्न केलें. आपली गरीब नानी लक्ष्मणाचा हात धरून सुखी झाली.

वर सांगितलेल्या लग्नांच्या धामधुमींत बरेच दिवस गेल्यावर अन्नपूर्णा आणि वामनराव सगळ्यांचे आशीर्वाद घेत घेत हेळवांकच्या महालांत येऊन राहिलीं. वृद्ध ताराबाईनें तर त्यांच्यावर आशीर्वादांचा पाऊस पाडला! अन्नपूर्णेनें नानीला दुसरें घर बांधून दिलें आणि लक्ष्मणाला आपल्या मिळतीचा कारभार सांगितला. हेळवांकच्या महालांत येऊन पोंचतांच वामनरावाचा थोरलाभाऊ त्याला आशीर्वाद देण्यासाठीं तेथेंच आला आणि त्यानें आपल्या जहागिरीपैकीं मोठा भाग वामनरावाला बक्षीस दिला. आणि त्यानंतर आमच्या गोष्टींतील सर्व सत्पात्रें आत्यानंदांत असूनही जगत्कर्त्याचे अनंत उपकार आठवीत सुशीलपणानें आपापल्या जागीं कालाचा सद्व्यय करीत राहिलीं.



समाप्त.

# हर्डीकर यांची नवीन पुस्तकमाला.

## पत्ता--नारायण गोपाळ हर्डीकर
## बुकसेलर--रामवाडी--मुंबई.

### शालोपयोगीं पुस्तकें.

१ न्यू रॉयल रीडर-नंबर १ ला-शब्दार्थ-उच्चार-फ्रेझिस व भाषांतरासह. किम्मत ०३ आणे. टपाल खर्च ००६ पै. किंमतीच्या मानानें पाहतां हें पुस्तक फारच स्वस्त आहे. त्याचप्रमाणें उपयोगाच्या मानानें पाहतां हुशार विद्यार्थ्यांस गुरूशिवाय इंग्रजी भाषेचें ज्ञान करून घेतां येईल, अशी या पुस्तकाची रचना केलेली आहे. पुस्तक पाहतांच सर्व प्रकार ध्यानात येतील.

२ न्यू रॉयल रीडर नंबर २ रा-शब्दार्थ-उच्चार फ्रेझिस व भाषांतरासह. किम्मत ०३ आणे. टपाल खर्च ००६ पै. या पुस्तकाची रचनाही पहिल्या नंबराप्रमाणेंच आहे व उपयोगही तसाच आहे. इंग्रजी भाषाभांडारांत प्रवेश करणारास हें साधन अत्युत्तम आहे.

३ न्यू रॉयल रीडर नंबर ३ रा-शब्दार्थ-उच्चार-फ्रेझिस व प्रतिशब्दांसह. किम्मत ०४ आणे. टपालखर्च००६ पै. वरील दोन नंबरांप्रमाणेंच हा तिसरा नंबरही अत्यंत उपयोगीं असून विद्यार्थ्यांस व अभ्यास करणारांस फारच सोईचें होणार आहे. सदहू पुस्तकाचें छापण्याचें काम चाललें आहे.

४ सॅन्ड फर्ड ॲन्ड मर्टन-फारच कठीण व अप्रसिद्ध शब्दांचे उच्चार-शब्दार्थ आणि फ्रेझिससह-किम्मत ०६ आणे. टपालखर्च ०१ आणा. इंग्रजीचा आभ्यास करणारांस सदहू पुस्तक किती महत्त्वाचें आहे हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. आपलें इंग्रजी भाषेचें ज्ञान वाढविणारांनीं याचें एकवेळतरी अवलोकन केलेंच पाहिजे.

५ हावर्डकृत इंग्रजी तिसऱ्या पुस्तकाचे शब्दार्थ-उच्चार-ल्याटिन रूट्स आणि फ्रेझिस. किम्मत ०८ आणे. टपालखर्च ०१ आणा. हवार्ड साहेबांचीं इंग्रजी क्रमिक पुस्तकें शिकूनच आजपर्यंत हजारों विद्यार्थी तयार झालेले आहेत आणि यापुढेंही होतील; त्यांच्या उपयो-

गाकरितां हें तिसरें पुस्तक तयार केलेलें आहे. अभ्यास करणारांनीं याची एकेक प्रत घेऊन अवलोकन केल्यास याचें महत्व सहज समजून येणार आहे,

६ **ओल्ड रायल रीडर नंबर ४ था.** किम्मत ०६ आणे व टपाल खर्च ०१ आणा. मागें दर्शित केलेल्या न्यू रॉयल रीडरच्या ३ नंबराप्रमाणेंच याचीही रचना केलेली आहे. इंग्रजी भाषेचें विशेष ज्ञान संपादन करणारांस हें पुस्तक फारच महत्वाचें आहे असें वाटणें अगदीं साहजिक आहे. याच्या अवलोकनापासून त्या भाषेची माहिती अधिक होईल, हें काय सांगितलें पाहिजे ?

७ **स्कूल डायलाग-भाषण सांप्रदायिक वाक्यें**-शाळेंत जाऊन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस या पुस्तकापासून फारच लाभ होत आहे. याची किंमत ०२ आणे. टपालखर्च ००६ पै

८ **केकासार**-मराठी ६ आणि इंग्रजी ३ ऱ्या यत्तेचा आभ्यास करणाऱ्यां करितां. महाकवि मयूरपंडितकृत केकावलींचें यांत फारच चांगल्या प्रकारानें स्पष्टीकरण केलेलें आहे. यांच्या अवलोकनापासून केकावलींतील कोणतेंही पद्य लावणें अगदीं सुलभ होईल. याची किम्मत ०६ आणे व टपाल खर्च ००६ पै.

## धर्म संबंधीं पुस्तकें.

९ **सार्थ सत्यनारायण कथा आणि पूजा**-किम्मत ०६ आणे व टपालखर्च ०१आणा. सत्यनारायणाची पूजा करून कथा श्रवण करणारांस हें पुस्तक किती महत्वाचें आहे? हें सांगत बसण्याबद्दल आह्मी आपल्या ग्राहकांस याची एकेक प्रत मागवून पाहण्याबद्दलचीच शिफारस करितों.

१० **सार्थ हरितालिका कथा आणि पूजा**-किम्मत ०४ आणे व टपालखर्च ०१ आणा. हरितालिकेची पूजा करणाऱ्या सौभाग्यवती देशभगीनींस हें पुस्तक फारच उपयोगीं पडेल. कोठें कोठें कथा सांगणारा मिळत नाहीं; ह्मणून हें पुस्तक संग्रहीं ठेवणारांस कोणत्याही गोष्टीची अडचण पडली असें वाटणार नाहीं.

११ **सार्थ गणेश चतुर्थी कथा आणि पूजा**-किम्मत ०५ आणे. टपालखर्च ०१ आणा. आमच्या लोकांत आणि महाराष्ट्र भाषा बोलणारांत प्रतिवार्षिक गणेशोपासना सर्वत्र आहे असें ह्मणावयास मुळींच चिंता नाहीं. गणपतीची कथा ऐकावी, असें पूजन करणाऱ्या प्रत्येक मनुष्यास वाटणें साहजिक आहे ह्मणून ही सार्थकथा तयार केली आहे. देशीं परदेशीं राहणाऱ्या प्रत्येक गणेशोपासकानें याची एकेक प्रत मागवून पहावी.

१२ **सार्थ ऋषिपंचमी कथा आणि पूजा** किम्मत ८५ आणे व टपालखर्च ८१ आणा. आमच्या महाराष्ट्रांत ऋषिपंचमीचें व्रत करणाऱ्या स्त्रिया पुष्कळच आहेत. क्वचित् पुरुषही हें व्रत करीत असतात. ह्मणून हें पुस्तक सार्थ तयार केलें आहे. देशीं परदेशीं राहणाऱ्या प्रत्येक व्रत कर्त्यास हें एक पुस्तक जवळ असलें ह्मणजे कोणतीही अडचण आहे असें वाटणार नाहीं.

१३ **सार्थ अनंतचतुर्दशी कथा आणि पूजा**–किम्मत ८५ आणे व टपालखर्च ८१ आणा. अनंताचें व्रत करणारे आमच्या देशांत बहुत लोक आहेत आणि उद्योग धंद्याच्या संबंधानें त्यांचे राहणेंही अनेक अडचणींच्या जागीं आहे. ह्मणून सर्वांस उपयोग होण्यासारखें हें पुस्तक तयार केलें आहे. पाहिल्यावर खात्री होईल.

१४ **सार्थ–सोमवती कथा आणि पूजा**–किंमत८४ आणे. टपाल खर्च ८८६ पै. अनंताप्रमाणेंच सोमवतीचा संबंध होय. तरी त्यांत फरक इतकाच कीं, अनंताची पूजा करणारे जसे पुरुष फार, तशा सोमवती वाहणाऱ्या स्त्रिया पुष्कळ, क्वचित पुरुषही आपल्या आई, मावशी, अथवा बहिणीकरितां सोमवती वाहतो. त्या प्रत्येकास उपयोग व्हावा ह्मणून हें पुस्तक तयार केलें आहे. मागवा !

१५ **सार्थ–वटसावित्री कथा आणि पूजा**–किंमत ८५आणे व टपाल खर्च ८१ आणा. आमच्या देशांतील सौभाग्यवर्धनोत्सुका स्त्रिया हें व्रत मोठ्या प्रेमानें करितात; हें सर्व प्रसिद्ध आहे. वटसावित्रीची पूजा करणाऱ्या बायांस कथा ऐकण्याची इच्छा होणें स्वाभाविक आहे. ह्मणून हें पुस्तक तयार केलें आहे. प्रत्येक कुटूंबांत याची एकेक प्रत असल्यास कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाहीं.

१६ **श्री शिवशक्तिप्रणीत सामुद्रिक–अथवा स्त्रीपुरुषांग लक्षणविद्या.** किंमत ८४ आणे व टपाल खर्च ८१ आणा. खालावलेल्या अथवा दुर्दशेंत आलेल्या प्रत्येक मनुष्यास आपलें दैव कळावें असें वाटत असतें. या सामुद्रिकांत स्त्रिया व पुरुष यांच्या अंगलक्षणांवरून जन्मापासून शेवटपर्यंत बहुतेक भाकित सहज समजून घेतां येतें. शिवाय भरभराटींत असलेल्यांसही आपलें आयुष्य, विद्या, स्त्रिया, मुलें, इत्यादिकांबद्दल या पुस्तकावरून अदमास करितां येतो. ह्मणून हें सामुद्रिकही प्रत्येक मनुष्यानें संग्रही ठेवण्यास योग्य आहे. विशेष काय सांगावें ? पुस्तक पाहतांच सर्व प्रकार सहज कळून येतील.

# मनोरंजक आणि व्यवहारोपयोगीं पुस्तकें.

१७ **सर्वोपयोगी संसारचोपडी**–किंमत १२ आणे व टपाल खर्च १–६ एक आणा सहा पै. हें पुस्तक प्रत्येक व्यवहारी, प्रवासी व राजकारणी पुरुषास अत्यंत उपयोगाचें आहे. यांतील प्रत्येक विषय मोठ्या कसोशीनें निवडून काढलेला आहे. विशेष पाल्हाळ न सांगतां हें प्रत्येकानें मागवून पहावें अशी शिफारस करितों.

१८ **श्रीकृष्णशिष्टाई**–किंमत ०२–०३ सवादोन आणे. टपाल खर्च ००६ पै. या पुस्तकांतील नीतिवचनें प्रत्येक वाचकास आनंद उत्पन्न करणारीं आहेत. हें सर्व कविताबद्ध असून नवीन संगीताच्या पद्धतीनें याची रचना झाली आहे.

१९ **गुलबंकावली**–मनोरंजक कथानक–किम्मत १०४ सवारुपया व टपालखर्च ०१०६ एक आणा सहा पै. हें पुस्तक वाचण्यासाठीं हातांत घेतल्यावर पूर्ण केल्याशिवाय हातांतून खालीं ठेववतच नाहीं. अधिक काय लिहावें? वाचकांनीं एकेक प्रत मागवून अनुभव घ्यावा, अशी शिफारस आहे.

२० **संगीत छेलबटाऊ मोहनाराणी नाटक**–किम्मत ०३ आणे टपाल खर्च ०१ आणा. नवीन संगीताच्या पद्धतीवर हें मनोरंजक पुस्तक तयार केलें आहे, पद्यें सुरस आणि गोड व भाषणें चटकदार–पहा व खात्री करून घ्या.

२१ **अन्नपूर्णा आणि वामनराव–अथवा भूतभ्रम**–एक मनोरंजक आणि कल्पित कादंबरी–किम्मत १०८ दीडरुपाया व टपाल खर्च ०३ या पुस्तकाची रचना अगदीं नव्या तऱ्हेची आहे. हें वाचण्यांत करमणूक तर आहे. शिवाय भूतांचे भ्रम कसे उत्पन्न होतात, हें सहज समजून येईल व त्याचें निराकरणही जागच्या जागीं होईल.

२२ **बागोबहार–अर्थात् उपवन विलास**–उर्दू भाषेंतून मराठींत. भाग २, प्रत्येक भागाची किम्मत १०४ सवारुपाया व टपाल खर्च ०३ आणे. यांत चौघां विरक्तांनीं व अजात शत्रु नामक राजानें आपापलें जन्मकर्मकथन केलेलें आहे. पुस्तक फारच मनोरंजक आणि चालू भाषा सांप्रदायास अनुसरून आहे. मागवा आणि अनुभव घ्या. हीं दोन पुस्तकें छापण्याचें काम सुरू असून पूर्ण होत आलें आहे.

२३ **गुजराथी–सार्थ सत्यनारायणकथा**–किम्मत ०४ आणे. ट. ख. ०१ आणा.

| पुस्तक. | रु.आ.पै. |
|---|---|
| (२५) मुलांचा पहीला शिक्षक रंगीबेरंगी क. पृ. ३६ .... | ०--०-६ |
| (२६) लोखंडी सडकांचा चमत्कार. ... | ०—२—० |
| (२७) चिनी भाषेंतील सुरस गोष्टी. भाग१. | ०-१२-० |
| (२८) जर्मन भाषेंतील सुरसगोष्टी भाग १ | ०-१४-० |
| भाग २ ... | १--४-० |
| (२९) परशियन नाईट भाग१-२-प्रत्येक | १-१२-० |
| (३०) बायकांची गाणी भाग १-२-३-४ प्रत्येक. ... | ०—६-० |
| (३१) विश्वसेन कादंबरी भाग १-२-प्रत्येक | ०-१०-० |
| (३२) ऐतिहासीक पुरुषांची चरित्रमाला. | |
| (१) शिवछत्रपतीचे चरित्र | ०--३-० |
| (२) रत्नाकरपंत आप्पा. | ०—१-६ |
| (३३) संसार चोपडी भाग १० पृष्टें ३८४. | ०-१२-० |
| (३४) श्रीगुंडोजी महाराज याचें भजन. | ०—१-० |
| (३५) अहिल्याबाई होळकरीण यांचे चरित्र, | १—२-० |
| (३६) रेशमी रुमाल. ... | ०—०-३ |
| (३७) श्रीदत्त महाराजाचें भजन दु. आ. | ०--१-० |
| (३८) अन्नपूर्णा आणि रामनराव अथवा भुतभ्रम पृ. ३०० | १ —८-० |
| (३९) बागोबहार अर्थात् उपवन विलास ह्या० चार दर्वेश किंवा चौदा विराचें चरित्र भाग १-२ पृ. ३०० प्रत्येक. | १—४-० |
| (४०) भाषांतराकरितां उतारे यत्ता चवथी. | ०—३-० |
| ,, पाचवी ... | —७-० |
| ,, सहावी. .. | ०—८-० |
| ,, सातवी. ... | ०—९-० |

रामदास स्वामींचे समग्र ग्रंथ छापत आहेत

( या किंमती शिवाय ट. ख. निराळा पडेल. )

सूचनाः—या पुस्तकांशिवाय वरील पुस्तकालयांत शालोपयोगी व इतर सर्व प्रकारची मराठी, गुजराथी, इंग्रजी व कायद्याचीं पुस्तकें; प्राकृत व संस्कृत ग्रंथ विकत मिळतील.

विशेष सूचनाः—पुस्तकें मागविणारांनीं पत्रव्यवहार व आपलें नांव गांव, पोष्ट, व डिस्ट्रीक्ट प्रत्येकवेळीं बालबोध अक्षरांनी लिहावी.

पुस्तकें रोख अगर व्ही. पे. पा. मांगवावी. उत्तरा करितां रिप्लाय कार्ड अगर तिकीट पाठवावी.

नारायण गोविंद माडगांवकर.

बुकसेलर.

# माडगांवकर पुस्तकालय.

म्याथुरोड, गिरगांव, मुंबई.

## काव्यसंग्रह.

सन १८९० च्या ज्यानुआरीपासून वरील नांवाचें मासिकपुस्तक निर्णयसागर छापखान्यांतून प्रसिद्ध होत जाईल, यांत **मोरोपंत, वामन, मुक्तेश्वर,** व इतर महाराष्ट्र कविंचीं उत्तम काव्यें, रसाळ आख्यानें, उपाख्यानें, व सुरस पदें, कटाव, वगैरेचा समावेश होत जाईल. ग्रंथसंशोधनाचें, अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टिपा देण्यांचे आणि कवींचीं चरित्रें वगैरे लिहिण्याचें काम **रा. रा. जनार्दन बाळाजी मोडक, बी. ए.** यानीं पत्करिलें आहे. प्रत्येक अंक अष्टपत्री सांच्याचा १०० पृष्ठांचा निघेल.

## किमतीचे ठराव.

| | | | |
|---|---|---|---|
| वर्षास (आगाऊ) रु. ... | ४-८ | टपाल हा. सुद्धां ... | रु. ५-४ |
| फुटकळ अंकास रु. ... | ०-८ | ... २ ... ... | रु. -१० |

ज्या कोणास घेणें असेल त्यांनीं आपली नांवें व वर्गणी "मुंबईंत वरील पुस्तकालयांत खालीं सही करणाराकडे पाठवावी. **वर्गणी आगाऊ आल्याखेरीज पुस्तक रवाना केलें जाणार नाहीं.**

| पुस्तकें. | रु. आ. पै. |
|---|---|
| ( १ ) मुंबईचें वर्णन. | ३—८—० |
| ( २ ) गुणोत्कर्ष नाटक. | ०—८—० |
| ( ३ ) तन्त्रसारोक्त पुजापद्धति. ... | ०—४—० |
| ( ४ ) विनोदात्मक चुटके. | ०—३—० |
| ( ५ ) पानपतची बखर. | ०—६—० |
| ( ६ ) सात गोष्टी. ... | ०—६—० |
| ( ७ ) नऊरत्नें (नऊ गोष्टी) | ०—२—३ |
| ( ८ ) सत्यनिरूपण ती. | ०—६—० |
| ( ९ ) श्रीव्यंकटेशाष्टोतरशतनामावली. ... | ०—१—० |
| ( १० ) गोमंतकाचा इ० | १—४—० |
| ( ११ ) रामजोशी कृत कविता. ... | ०—६—० |
| ( १२ ) नीतिसंवाद दु. अ० | ०—१—० |
| ( १३ ) बापुगोखले यांचे चरित्र ती. आ. | ०-१२-० |
| ( १४ ) यात्रा कल्पलता. | ०-१२-० |
| ( १५ ) आनंद फंदीकृत कविता. ... | ०—८—० |
| ( १६ ) भोजन बंधु पान तंबाखु. ... | ०—३—० |
| ( १७ ) उर्ध्व पुंड्र विधी (तिळक धारण) | ०—१—० |
| ( १८ ) ऋतुसंहार काव्य. | ०—६—० |
| ( १९ ) विंचुरकर घराण्याचा इ० ... | १—८—० |
| ( २० ) त्रिकाळ संध्या. | ०—२—० |
| ( २१ ) तिर्थयात्रा प्रबंध. | १—८—० |
| ( २२ ) सौ. डा. आनंदीबाई जोशी यांचें चरित्र | २—०—० |
| ( २३ ) तुर्क व रशियन लोकांचा इ० ... | १—४— |
| ( २४ ) भजनामृत. ... | ०—०—३ |